**( सभापतीस्थानी : माननीय उपसभापती )**

**सभागृहातील अपु-या गणसंख्येबाबत.**

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ही विशेष बैठक आपण या विधेयकांकरिता बोलाविली आणि सभागृहामध्ये पुरेसे सन्माननीय सदस्य देखील उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार हे खरोखर दुर्देव आहे,मी आपल्या भावनेशी सहमत आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : माणसाने फक्त भावनाशील असून चालत नाही तर कामकाजाच्या दृष्टीकोनातून व्यवहारशील पण असावे लागते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,आता आम्ही जर या सभागृहातून बाहेर गेलो तर काय अवस्था होईल ?

श्री.मधुकर सरपोतदार : सभागृहाच्या दिवसाच्या कामकाजानुसार जर विधेयकांवर चर्चा घेण्याचे ठरले असेल तर सभागृहामध्ये उपस्थित राहण्याची सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची जबाबदारी नाही का ?

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय संसदीय कार्यमंत्री आज येथे उपस्थित आहेत. ते गेले दोन - तीन दिवस झाले रागावलेले आहेत. आज त्यांनी सांगावे की,सत्ताधारी पक्षाचे सदस्य सभागृहामध्ये का उपस्थित नाहीत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझ्या दृष्टीने एकच मुद्दा महत्वाचा आहे आणि तो रेकॉर्डवर यायला पाहिजे. सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना असे वाटत नाही का की, आपल्या सदस्यांनी येथे उपस्थित राहावे आणि या सदनाचे कामकाज चांगल्या पध्दतीने करुन घ्यावे,अशी भावना त्यांची नाही का ?

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक.

**मु.शी.**: सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 89,महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करण्याची मुदत वाढविण्यासंबंधी प्रस्ताव.

श्री. चंद्रकांत हंडोरे ( सामाजिक न्याय मंत्री ) : अध्यक्ष महाराज,सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 89 अंधविश्वास आणि अज्ञानावर पोसल्या जाणा-या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने,तसेच,समाजातील सर्वसामान्य लोकांचे मानसिक,शारीरिक व आर्थिक शोषण करुन त्यांचे नुकसान करण्याच्या,व त्याद्वारे समाजाची घडी विस्कटून टाकण्याच्या दुष्ट हेतूने वैदू व भोंदूबाबा यांनी सर्वसामान्यत: जादूटोणा म्हणून ओळखल्या जाणा-या तथाकथित अंतींद्रिय किंवा अतिमानुष शक्ती किंवा चमत्कार करुन भूतपिशाच्च यांच्या नावाने जनमानसात रुजवलेल्या अंध विश्वासापोटी निर्माण होणा-या अनिष्ट व दुष्ट प्रथांचा व अघोरी रुढींचा मुकाबला करुन त्याचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने यासंबंधात समाजामध्ये जागृती व जाणीव निर्माण करण्याकरिता तसेच निकोप व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याकरिता, आणि तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक. यावर विचार करण्याकरिता दिनांक 17 एप्रिल,2007 रोजी नेमण्यात आलेल्या संयुक्त समितीने आपला अहवाल सादर करण्यासाठी नेमून दिलेली मुदत विधानपरिषदेच्या पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत वाढविण्यात यावी असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, खरे तर हे अंधश्रध्दा विधेयक चर्चेला आणण्याची जरुर नव्हती. कारण परवाच सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांनी पुरवणी मागण्यांच्या उत्तरामध्ये हुडाबळीविषयी सांगितले आहे.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार,मी हुंडाबळीविषयी त्यावेळी बोललो नसून दारुबंदीविषयी बोललो होतो.

श्री.मधुकर सरपोतदार : लोकांमधील अंधश्रध्दा समाज प्रबोधन करुन दूर करण्यात याव्यात. नको त्या लोकांकरिता आपण हे विधेयक आणत आहात,असे मला वाटते.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका (तात्पुरती सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL No.XIII OF 2007**

**(A BILL TO TEMPORARY AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)**

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2007 चे वि.प.वि. क्र.13 मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये तात्पुरत्या सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.प.वि. क्र.13 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

------



30-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) B-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ D/

**पृ.शी.**: महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO. XXVIII OF 2004**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949 AND THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948.) (AS AMENDED BY THE JOINT COMMITTEE.)**

श्री.राजेश टोपे (नगरविकास मंत्री) : सभापती महोदय, सन 2004 चे वि.प.वि. क्रमांक 28 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक (संयुक्त समितीने सुधारणा केल्याप्रमाणे) विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, याबाबत माझी हरकत आहे. संयुक्त समितीचा अहवाल आज पिजनहोलमध्ये टाकलेला आहे, मी अजून पिजनहोल उघडून पाहिलेला नाही. ताबडतोब मंजूरीसाठी होयचे बहुमत मागणे ही कोणती पध्दत आहे ?. किमान एक दिवस अगोदर हे विधेयक व अहवाल वाचण्यासाठी आम्हाला मिळाले पाहिजे. याबाबत दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीने काय अहवाल दिलेला आहे, निदान हे तरी आम्हाला समजले पाहिजे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, संयुक्त समितीमध्ये या सभागृहाचे जेष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते होते. संयुक्त समितीने या विधेयकासंबंधी सर्वात महत्वाची अशी तरतूद केली आहे की, "अशोभनीय वर्तन केल्यानंतर महानगरपालिकेतील सदस्यांना अनर्ह करण्याची तरतूद" यामध्ये करण्यात आली आहे. सभागृहात मागील वेळी हे विधेयक मांडण्यात आले, त्यावेळी अनेक सदस्यांनी असे सांगितले होते की, शासनाकडे खूप जास्त अधिकार आहेत त्यामुळे कदाचित त्याचा गैरवापर होऊ शकेल, त्यामुळे संयुक्त समितीकडे हे विधेयक पाठविण्यात आले. संयुक्त समितीच्या अनेक बैठका झाल्या. त्यामध्ये माननीय सदस्यांनी काही दुरुस्त्या सुचविल्या. यामध्ये शासनाने कार्यवाही करण्याअगोदर महानगरपालिकेला एक महिन्याची सवलत देण्यात आलेली आहे. महानगरपालिकेने कार्यवाही केल्यानंतर त्यांचे अपील म्हणून राज्य शासनाला कार्यवाही करता येऊ शकेल. अशा प्रकारच्या दुरुस्त्या संयुक्त समितीच्या माध्यमातून या विधेयकात करण्यात आलेल्या आहेत.

नंतर कु.धनश्री.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ D/ MAP/ 10:10

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विधेयके संयुक्त समितीकडे पाठविल्यानंतर त्या समितीचा अहवाल आल्यानंतर त्यावर साधकबाधक चर्चा व्हावी, त्याचे वाचन व्हावे व त्यानंतर तो अहवाल सदनामध्ये सादर व्हावा अशी अपेक्षा असते. हा अहवाल सदनामध्ये सादर केल्यानंतर व तो सन्माननीय सदस्यांना वितरित झाल्यानंतर कमीत कमी एक दिवसानंतर तो अहवाल सदनामध्ये मंजुरीसाठी आणला पाहिजे. परंतु हा अहवाल पिजन होल मधून अजुनही मला मिळालेला नाही. ही कोणती वैधानिक पध्दत आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हा अहवाल सन्माननीय सदस्यांना काल वितरित करण्यात आला होता.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा अहवाल मला माझ्या पिजन होलमध्ये मिळालेला नाही. अशा पद्धतीने अहवाल उशीरा वितरीत करणे ही प्रथा चुकीची आहे असे मला येथे सांगावयाचे आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, अहवालाचे एक दिवस आधी वाटप झालेले आहे अशा प्रकारची घटना येथून पुढे घडणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



30-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) C-2

डॉ. दीपक सावंत.( मुंबई पदवीधर ) : सभापती महोदय, आपण हा जो संयु क्त समितीचा अहवाल सदनासमोर ठेवलेला आहे, त्या अहवालास समिती सदस्यांनी काही सुधारणा सुचविलेल्या आहेत. लज्जास्पद हा शब्द बदलून अशोभनीय असा शब्द वापरला आहे. या विधेयकामध्ये असे म्हटले आहे की, "कोणताही पालिका सदस्य त्याच्या चालू पदावधीत किंवा चालू पदावधीच्या लगतच्या कालावधीमध्ये, पालिका सदस्य म्हणून कर्तव्ये बजावीत असताना कोणत्याही गैरवर्तवणूक किंवा कोणत्याही अशोभनीय वर्तणुकीबद्दल दोषी ठरला असेल तर राज्य शासन स्वत:हून किंवा महानगरपालिकेच्या शिफारशीवरुन त्या सदस्यास पदावरून दूर करता येईल." अशोभनीय या शब्दाची व्याख्या करणे अतिशय आवश्यक आहे. याच्या मोडॅलिटी आपण काय काय ठरविणार आहोत ? कोणते कृत्य हे अशोभनीय मानले जाणार आहे त्यासाठी कोणत्या गोष्टी ग्राहय धरल्या जाणार आहेत याचे स्पष्टीकरण येथे होणे आवश्यक आहे. याबाबत आपण मोडॅलिटी ठरविणे आवश्यक आहे, मला असे वाटते अशा प्रकारे मोडॅलिटी तयार केलेल्या नाहीत. आता या मोडॅलिटी तयार करुन याबाबत सुस्पष्टता आणणे आवश्यक आहे. दुसरा एक असा मुद्दा आहे की, अशा सदस्यास काढून टाकण्याबाबत, आणि निरर्ह ठरविण्याबाबत कोणतीही शंका किंवा कोणताही वाद उद्‌भवल्यास अशा पालिका सदस्यास महानगरपालिकेच्या विनंतीवरुन, आयुक्तास जिल्हा न्यायाधीशाकडे रेफरन्स करता येईल असे शेवटच्या वाक्यात म्हटले आहे. आपण प्रत्येक केस जिल्हा न्यायाधीशाकडे पाठविणार काय ? आपण ज्यावेळी कोणालाही पदावरुन दूर करतो त्यावेळी वाद हा उद्‌भवतोच. याबाबत देखील सुस्पष्टता करण्यात आलेली नाही. वादाची लाईन ऑफ डिमार्केशन काय असेल याची देखील सुस्पष्टता होणे आवश्यक आहे. या तरतुदीमुळे प्रत्येक वाद जिल्हा न्यायाधीशांकडे किंवा आयुक्तांकडे जाण्याचा संभव आहे असे वाटते. या दोन गोष्टींच स्पष्टीकरण होणे व त्यामध्ये सुस्पष्टता आणणे आवश्यक आहे असे मला वाटते. धन्यवाद.

..............

..3..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा ) : सभापती महोदय, लोकशाही समृध्द होण्याच्या दृष्टीकोनातून स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार अतिशय चांगला असला पाहिजे, सक्षम असला पाहिजे. राजकारणामध्ये प्रतिस्पर्धी पक्षांमध्ये, विविध गटांमध्ये देखील स्पर्धा असते अशा वेळेला शहकाटशहाचे राजकारण होऊन प्रत्यक्षात राजकीय सूड उगविण्यासाठी कायद्याचा गैरवापर होऊ नये असे मला वाटते. यासाठी आपण संयुक्त चिकित्सा समिती नेमली होती. मला या ठिकाणी 3 गोष्टींकडे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधावयाचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी उचीत अशा कायदेशीर यंत्रणा उच्च न्यायालयाने व सर्वोच्च न्यायालयाने सुचविलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी होत आहे किंवा नाही ? या ठिकाणी नगरविकास विभाग आणि जिल्हापरिषदांचा संबंध येतो म्हणून ग्राम विकास विभाग हे दोन्ही विभाग स्वतःची जबाबदारी पार पाडत नाही असे माझे स्पष्ट मत आहे. महानगरपालिकेमध्ये आणि जिल्हापरिषदेमध्ये नगरसेवकांनी केलेले चुकीचे वर्तन यासंदर्भात मी आपणास दोन तीन उदाहरणे देईन.

यानंतर श्री. सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ D/ MAP/ कु. गायकवाड नंतर --- 10:15

डॉ. गोऱ्हे ....

की, ज्यांना कायद्याच्या चौकटीमध्ये बसविणे गुन्हेगारी कायद्यानुसार शक्य होते परंतु त्याबाबत कोणी पुरावा देण्यासाठी ना कोणी पुढे येते, ना त्या अधिकाऱ्यांची तेवढी हिंमत होते. म्हणजे त्या नगरपालिकेतील नगरसेवकाबद्दल काही मांडू शकतील आणि काही वेळेस छोट्या छोट्या कारणां वरून एखाद्याचा बळी घ्यायचा असेल तरी राज्य सरकार स्वत:च्या बळाचा उपयोग करण्यासाठी या कायद्याचा उपयोग करून घेऊ शकते. सभापती महोदय, 'लज्जास्पद वर्तन' वा 'अशोभनीय वर्तन' या शब्दाभोवती या विधेयकावरील चर्चा संपूर्णपणे केंद्रित झाल्यासारखे दिसते. यातील 'लज्जास्पद' हा जो शब्द आहे, त्या संदर्भात आपल्याला कायद्याची कल्पना आहे की, गुन्हेगारी स्वरूपाच्या सगळ्या गुन्ह्यांमध्ये पोलीस ठाण्यांमध्ये जेव्हा गुन्हे नोंदविले जातात त्यावेळेस 'लज्जास्पद वर्तन' याचा अर्थ त्या माणसासाठी लज्जास्पद नव्हे पण दुसऱ्याला देखील त्याच्या वर्तनाची लाज वाटेल अशा पद्धतीचे वर्तन. म्हणजेच थोडक्यात सांगावयाचे तर निर्लज्जासारखे वर्तन तो माणूस करीत असतो अशा वेळेस या कायद्याचा आपण उपयोग करू शकतो. पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, नागपूर महानगरपालिका या दोन्ही-तिन्ही महापालिकांमधून सातत्याने माझ्याकडे तक्रारी आलेल्या आहेत आणि त्यामध्ये लोकप्रतिनिधी, ज्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यामध्ये जाऊन तक्रारी करण्याची सामान्य माणसाला हिम्मत होणार नाही, अशा लोकांनी केलेले वर्तन, मग ते सभासदांच्या बरोबर केलेले असू शकते किंवा महिला कर्मचाऱ्यांबरोबर केलेले असू शकते. तर हे लज्जास्पद वर्तन झाले, तर ते वर्तन झाल्यानंतर आपण कोठली प्रोसिजर अमलात आणतो हा एक प्रश्न मला येथे उपस्थित करावासा वाटतो. आता सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार तक्रार निवारण समित्या सगळ्या महापालिकांमध्ये नेमायला पाहिजे होत्या, त्या तुम्ही नेमलेल्याच नाहीत. त्यामुळे आर्बिटरी पद्धतीने ज्याला ज्याची लाज वाटतच नसेल आणि इतरांनाही त्याच्या वर्तनाची लाज वाटत नसेल तर ते वर्तन 'लज्जास्पद' मध्ये बसणार नाही आणि अशोभनीय मध्येही बसणार नाही हे मी आपल्याला उदाहरण देऊन सांगू शकते. येथे एक सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत, पण मी कोल्हापूर महानगरपालिकेतील एक घटना उदाहरणादाखल सांगू इच्छिते. काही वेळेस सभागृहामध्ये महिला सदस्य बोलत असताना एवढे अर्वाच्चपणे अन्य सदस्य बोलत असतात, मी तर म्हणेन की, सभापती महोदय, हा कायदा आपल्या या सभागृहाला देखील आपण का लागू करीत नाही ? विधानसभा आणि विधान परिषदेमध्येसुद्धा

...... डी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

लज्जास्पद वर्तन, स्वत:चे नसले तरी अनेक वेळेस असे शब्द ज्याप्रकारे आपल्या सभागृहात वापरले जातात, त्यामागे ती भावना तरी तीव्र असते, किंवा संतापजनक अशी भावना त्यांना वाटत असते म्हणूनच सभासद असे शब्द वापरतात हे आपण गृहीत धरले तरीसुद्धा मला असे वाटते की, 'लज्जास्पद' आणि 'अशोभनीय' हे जे दोन्ही शब्द आहेत त्यांची व्याख्या ठरविणे ही अतिशय अवघड गोष्ट आहे. सभापती महोदय, तिसरे उदाहरण मी आपल्याला असे देईन की, पश्चिम महाराष्ट्रातील एका नगरपालिकेमध्ये तेथील नगराध्यक्ष बाई या अमुक एका गटाच्या म्हणून तेथे काम करीत होत्या. नंतर त्यांनी त्याच पक्षामध्ये हळूहळू त्यांचा होरा बदलून दुसऱ्या गटाकडे आपला रोख बदलला. ही घटना स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये कोणाचेही नाव घेता प्रसिद्ध झालेली आहे, ज्याबद्दल आपण खरोखरी अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. अशा वेळेस एका नेत्याच्या घरी सगळे लोक बसले असताना तेथे त्या नगराध्यक्ष बाईंना बोलावून घेऊन, गावातील 15-20 महत्त्वाची मंडळी समोर असताना, ही बाई नगराध्यक्ष आहे ना ? काय हिची लाज आहे ते मी बघतो असे म्हणून तिचा पदर सोडून चारचौघांमध्ये तिचे वस्त्रहरण करण्याची घटना तेथील स्थानिक वर्तमानपत्रामध्येही नोंदविली गेली आहे. त्यानंतर ती नगराध्यक्ष बाई एकदाही नगरपालिकेत गेली नाही आणि नंतर तिच्या विरूद्ध अविश्वासाचा ठराव आणून तिला लाथ मारून बाहेर काढून टाकण्यात आले. तेव्हा अशा घटनाही घडत असतात. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, शासन म्हणून अधिकारी वर्गाने अशा घटनांची सूओमोटो दखल घेतली पाहिजे. अधिकारी वर्गाने अशा घटना रेकॉर्डवर आणल्या पाहिजेत. कारण ती महिलाच स्वत:च अशोभनीय वर्तनाबद्दल किंवा दुसरा नगरसेवक, त्याची तेवढी हिम्मत असेल असे नाही, पण त्याने तक्रार केली रे केली की, त्या शहरामध्ये रात्री त्याच्या घरी जायचे आणि त्याचा कोथळा बाहेर काढायचा अशी जर का परंपरा असेल तर कोठला माणूस कोणाच्या अशोभनीय वर्तनाबद्दल पोलिसांकडे तक्रार करणार आहे ? म्हणून अशा अशोभनीय वर्तनाची दखल घेणारी आपली जी यंत्रणा आहे ती यंत्रणा किती निरपेक्ष असणार आहे ? आणि त्याबाबत नियम करीत असताना मला आपल्याला असे सुचवावेसे वाटते की, जे निवृत्त किंवा चांगले पोलीस अधिकारी आहेत, चांगले या अर्थाने की, ज्यांना या कायद्याची पूर्णपणे माहिती आहे अशांच्या सूचना घेऊन अशोभनीय वर्तन या गोष्टींची यादी आपल्याला करावी लागणर आहे. म्हणजे कशा कशाला अशोभनीय वर्तन म्हणावयाचे. काही वेळेस

...... डी 3 ..



KBS/ D/ MAP/ कु. गायकवाड नंतर --- 10:15

डॉ. गोऱ्हे ....

असे होते की, अशोभनीय वर्तन जे आहे ते अशोभनीय नाहीच आहे असे उपायुक्त स्तरावरील लोक बोलत असतात. सभापती महोदय, पुणे महानगरपार्लिकेतील एका उपायुक्तांना नुकतेच निलंबित करण्याबद्दलचा निर्णय पुणे महापालिकेमध्ये झाला. पण त्यापूर्वी जवळपास 7 ते 8 वर्षे त्या व्यक्तीबद्दल सातत्याने तक्रारी येत होत्या. त्या तक्रारी काय स्वरूपाच्या होत्या ? तर संध्याकाळच्या वेळेस त्याच्या मजल्यावरील सगळे दिवे बंद असायचे आणि महिला कर्मचाऱ्यांना हा माणूस कामासाठी आत चेंबरमध्ये बोलवायचा आणि वाटेल ते प्रकार सातत्याने त्याच्या अँटीचेंबरमध्ये चालत होते. पोलिसांमध्ये त्याबाबत त्याची तक्रार होऊनही त्याची दखल कोणी घेत नव्हते.

( यानंतर श्री. सरफरे .... इ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

शेवटी नंतर नगरविकास विभागाने यासाठी समिती नेमली म्हणून मला असे विचारावयाचे आहे की, आपण संयुक्त समिती नेमली. परंतु त्या समितीच्या अहवालामध्ये सुध्दा आपण लज्जास्पद आणि अशोभनीय हे शब्द म्हटले आहेत. त्यांची शहानिशा करुन त्यांच्या वर्तनामध्ये मागील अनेक वर्षांचा सूड घेणे आणि वादविवाद करणे हा हेतू आहे काय? याकरिता त्याचा पाठपुरावा करणे, माहिती घेणे. ज्याला आपण परिस्थितीजन्य पुरावा म्हणू हे करणे. आणि तिसरे अति महत्वाचे म्हणजे अशी घटना एकदा किरकोळ स्वरुपात घडते, दुसऱ्यावेळी किरकोळ स्वरुपात घडते. त्याची दखल घेणारी यंत्रणा सक्षमरित्या त्या महानगरपालिकेत असणे आवश्यक आहे. आणि ती यंत्रणा सक्षमपणे काम करीत आहे की नाही, याकरिता त्या विभागाने त्यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. त्याकरिता तुम्ही प्रवाही पध्दतीने दर दोन तीन महिन्यांनी आढावा घेत असतांना त्यातील अधिकाऱ्यांना याबाबत संवेदनशीलता असावयास पाहिजे. ती संवेदनशीलता अधिकाऱ्यांमध्ये नसेलतर या यंत्रणा संपूर्णपणे निष्प्रभ होतात ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, महिलांचे हक्क व कल्याण समितीच्या भेटी महानगरपालिकांना होतात तेथील सर्व गोष्टी आम्ही उघडपणे बोलू शकत नाही. तरीसुध्दा एक-दोन उदाहरणे द्यावीशी वाटतात. महानगरपालिकांच्या अधिकाऱ्यांची असलेली भूमिका आपण पाहिली तर त्या भूमिकेमध्ये वेगवेगळया प्रकारची माणसे काम करीत असलेली आपल्याला दिसतात. त्यामध्ये आम्हाला अनेक चांगले अधिकारी भेटले त्याप्रमाणे अनेक अधिकारी आम्हाला असेही भेटले की, त्यांचे स्वत:चे वर्तन अशोभणीय म्हणता येईल असे आहे. त्यबाबत मी असे म्हणेन की, तुमच्याकडे महिला अधिकारी असेल तर तुम्ही एखादी समिती नेमा. महिला नगरसेविका आणि महिला कर्मचारी यांच्यासाठी असलेल्या स्वच्छतागृहांमध्ये काय लिहून ठेवलेले असते याची जर तुम्ही जावून तपासणी केली तर प्रत्येक ठिकाणी नावासकट धडे गिरवलेले असतात. म्हणून मला वाटते की, हा आपण धाडशी निर्णय घेत आहोत. अशोभणीय वर्तनाबद्दल आपण शिक्षा करावयास निघालो आहोत. आणि स्वत:हून एक महिन्यात शासन निर्णय घेवू शकते अशाप्रकारची ही मोठी घटना आहे. ते करण्यासाठी तुम्ही कशापध्दतीची यंत्रणा उभी करणार आहात? याचा निर्णय घेतला नाहीतर केवळ कुणाचे तरी बहुमत कमी करण्यासाठी म्हणून या कायद्याचा दुरुपयोग केला जावू शकतो. शेवटी मी पुणे जिल्हा परिषदेचे उदाहरण देते. पुणे जिल्हापरिषदेमध्ये राष्ट्रवादी कॉग्रेसच्या महिला प्रतिनिधी आहेत त्यांना संबंधित राष्ट्रवादी कॉग्रेसच्या अध्यक्षांनी सांगितले की, शिवसेनेची महिला प्रतिनिधी श्रीमती आशा बुचके एवढया



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MAP/

डॉ. नीलम गोऱ्हे....

सारखा बोलत असतात तर मग तुम्ही राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या महिला काय बघत असता? तुम्ही तिला जाऊन बडवत कां नाही? स्वत: विधीमंडळाचा सदस्य असणारा माणूस महिला लोकप्रतिनिधीबद्दल हे बोलत असेल तर यामध्ये कुणाचीर कुठली शोभा राहिली? म्हणून अशोभणीय आणि लज्जास्पद या दोन शब्दांची नीट व्याख्या ठरविली पाहिजे. त्याची दखल कशापध्दतीने घेतली जाईल हे बघितले पाहिजे. आणि कोणत्याही प्रकारे सूडबुध्दीने घटना घडत असेल तर त्यावर त्या व्यक्तीला अपिलाचा अधिकार असला पाहिजे. आणि अशावेळी सेक्सच्युअल हॅरॅसमेंट ॲट वर्कप्लेस किंवा यापध्दतीने अशोभणीय वर्तनाची दखल घेणारी कार्यपध्दती किंवा कृती समिती तयार केल्याशिवाय आपल्याला यामध्ये पुरेसा न्याय मिळू शकणार नाही . एवढेच मला यानिमित्ताने सभागृहाचे लक्ष वेधावेसे वाटते. धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MAP/

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, संयुक्त समितीने सादर केल्याप्रमाणे सन 2004 चे वि.प.वि. क्रमांक 28 मी पूर्णपणे चाळले नाही. त्या विधेयकातील दोन शब्दासंबंधी मी बोलणार आहे. ज्या शब्दांचा उल्लेख माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी याठिकाणी केला आहे. "लज्जास्पद आणि अशोभणीय" या दोन शब्दांची व्याख्या आपण म्हणता तितकी सोपी नाही. एखाद्या माणसाच्या दृष्टीने एखादी घटना लज्जास्पद असेल तर दुस-या माणसाच्या दृष्टीने ती भूषणावह ठरेल. या शब्दाच्या बाबतीत अनेक प्रकारे इंटरप्रिटेशन होऊ शकते. परंतु लज्जास्पद आणि अशोभणीय हे शब्द जनरल टर्म म्हणा किंवा सर्वसाधारण उपयोग करावयाचा झाला तर सदस्यांची संख्या कमी करण्यासाठी या शस्त्राचा उपयोग केला जाईल. हा उपयोग काही ठिकाणी सर्रास होत आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषदेपासून महानगरपालिकेपर्यंत हे लोण पसरत आहे. हे लोण अजून विधानपरिषद, विधानसभा आणि लोकसभेमध्ये गेले नाही. त्याठिकाणी महिलांची संख्या मर्यादीत आहे. त्याठिकाणी महिला आरक्षण विधेयक मंजूर झाले नाही. ते मंजूर झाले तर काय होईल मला माहीत नाही.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

ते झाल्यावर काय होईल हे माहीत नाही. म्हणूनच शिवसेनाप्रमुख माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी महिला आरक्षणाला विरोध केला होता. मीही विरोध केला होता. लोक आग्रह धरत आहेत परंतु त्यातून अशाच गोष्टी जास्त वाढण्याची शक्यता आहे. त्यांची जी सँटीटी असावयास पाहिजे आहे ती टिकेल की नाही याबद्दल मी साशंक आहे. या अहवालामध्ये या दोन्ही शब्दांबद्दल व्याप्ती काय राहील आणि कोणत्या मर्यादेपर्यंत त्याच्यावर कारवाई केली जाईल यासंदर्भातील खुलासा खरे म्हणजे संयुक्त चिकित्सा समितीने करावयास पाहिजे होता. परंतु तो खुलासा आलेला दिसत नाही. या खात्याचे मंत्री म्हणून आपली काही संकल्पना असेल तर सांगावे. अशोभनीय कृत्य कोणते तसेच अमुक ते अमुक पर्यंत लज्जास्पद कृती असे सदनाला समजावून सांगितले तर त्याची दिशा सन्माननीय सदस्यांना कळू शकेल. या अहवालामध्ये असे म्हटले आहे की, "समितीने यासंदर्भात विचारविनिमय करुन असा निर्णय घेतला की, लज्जास्पद वर्तणूक या संबंधात व्याख्या करावयाची झाल्यास ती सर्वसमावेशक होणार नाही." हे बरोबर आहे. आपण अहवालामध्ये जे म्हटले आहे ते चुकीचे आहे, असे नाही. त्याची व्याख्या करता येणार नाही. परंतु उदाहरण म्हणून काही शब्द टाकावयास पाहिजे होते. नाही तर या शब्दाचा गैरवापर होणार आहे. माझ्याही मनामध्ये शंका आहे. या शब्दांची व्याख्या आणि व्याप्ती करणे खूप कठीण आहे. अशोभनीय कृत्य कोणते आणि शोभनीय कृत्य कोणते याची व्याख्या करणे अतिशय कठीण आहे. जी गोष्ट एका माणसाला शोभनीय वाटते ती दुसऱ्याला अशोभनीय वाटू शकते, अशी इंटरप्रिटेशनची परिस्थिती आहे. म्हणून काही उदाहरणे यामध्ये द्यावयास पाहिजे होती असे मला वाटते. त्यामुळे त्या शब्दापुरती त्याची दिशा आपल्याला समजू शकली असती. त्यानंतर दशा काय झाली असती हे आपण पाहिले असते. पण कमीत कमी काही तरी उल्लेख आपण करावयास पाहिजे होता. संयुक्त चिकित्सा समितीचे याकडे का दुर्लक्ष झाले हे मला माहीत नाही. अशा पध्दतीचे मार्गदर्शन झाले असते तर बरे झाले असते. हे विधेयक चांगले आहे. परंतु त्याचा गैरवापर होऊ नये. आपण आपल्या सदनाच्या कामकाजाच्या बाबतीत बघावे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, हे विधेयक आणि त्याची व्याप्ती विधानसभा, विधान परिषद तसेच लोकसभेपर्यंत जावी. मला त्याची आवश्यकता वाटत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MAP/

श्री. मधुकर सरपोतदार ......

नाही. अशा प्रकारचे कोणतेही सन्माननीय सदस्य या सदनामध्ये येतात यावर माझा विश्वास नाही. हे वरिष्ठ सभागृह आहे. या सभागृहाची प्रतिष्ठा आहे. अशा प्रकारचे शब्द या ठिकाणी वापरुन त्याला हे लागू करणे ही सुध्दा या सदनाची अप्रतिष्ठा ठरेल. म्हणून सन्माननीय सदस्यांच्या या मताशी मी सहमत नाही. पण सगळ्यांची डिग्निटी आणि शिस्त सांभाळली गेली पाहिजे. ग्रामपंचायतीमध्ये हरकत नाही. महापालिकेपर्यंत ते मर्यादित ठेवणे ठीक आहे. त्याच्या पलीकडे जाऊ नये. अमुक कृत्य अशोभनीय, अमुक घटना लज्जास्पद अशा पध्दतीची एक दोन उदाहरणे दिली तर याची व्याप्ती आणि आपली विचार करण्याची दिशा आम्हाला कळेल. एवढी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MAP/

श्रीमती उषाताई दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आताच सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या विधेयकाच्या बाबतीत आपले विचार व्यक्त केलेले आहेत. सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांचा प्राधान्यक्रम आम्ही 25 वर्षापासून मान्य केलेला आहे. त्यांनी आपले विचार व्यक्त केले म्हणून नाही तर, त्या विरोधी पक्षाच्या बाकावर बसलेल्या असल्या तरी त्यांच्या आणि माझ्या बोलण्यामध्ये समानतेच्या विचाराचा धागा आहे आणि आमची सामाजिक परिवर्तनाची सामुहिक जबाबदारी असल्यामुळे एकाच विषयावर आम्ही दोघींनी बोलणे हे आमचे कर्तव्य आहे. त्या कर्तव्यापासून आम्ही बाजूला जाऊ शकत नाही. हा धागा आणि व्यथा धरुन मी या सभागृहामध्ये माझे मत स्पष्टपणे व्यक्त करणार आहे. लज्जास्पद या शब्दामुळे कायद्याचा गैरवापर होण्याची भीती या ठिकाणी व्यक्त झाली. शेवटी कायदा हा कायदा आहे आणि कोणताही कायदा परिपूर्ण असतो असा माझा दावा नाही.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 10:30

(श्रीमती उषाताई दराडे...)

परंतु ज्या तरतुदी आपण कायद्यामध्ये करतो त्या समाजात निर्माण झालेल्या प्रश्नामध्ये निर्णय देण्यासाठी किंवा एखाद्यावर अन्याय झाला तर त्याला न्याय देययासाठी करतो. आता पोटगीचा कायदा आहे. पोटगीची एखादी केस खोटीही असू शकते.परंतु याचा अर्थ आपण कायदा करायचा नाही काय ? 498(अ)चा कायदा आहे. त्यामध्ये ॲट्रॉसिटीबाबत किती वाद निर्माण होतो ? प्रिव्हेन्शन ऑफ ॲट्रॉसिटी ॲक्ट आहे. आपण दलितांना ख-या अर्थाने संरक्षण देण्याचा प्रयत्न या कायद्याने केला. परंतु या कायद्याचा गैरवापर झालाच नाही काय ? काही प्रमाण तो झालेला आहे. पण याचा अर्थ आपण कायदा करावयाचा नाही असा होत नाही. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी समाजाची आणि कर्मचा-यांची मानसिकता कशी बदलता येईल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कायदाच करु नये असे नाही. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी या विधेयकाच्या संदर्भात आपले विचार मांडले. सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी आपल्या भावना प्रामाणिकपणे याठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत. त्यांनी विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा, राज्यसभा यांचा उल्लेख केला. ही सर्वोच्च सभागृहे आहेत. त्यांचा आपण सर्वांनी सन्मान केला पाहिजे. त्याठिकाणी येणारे आपण सर्व सदस्य आहोत, म्हणजे आपण सुसंस्कृत आहोत अशी व्याख्या या देशात कुठेही बघायला मिळत नाही. आपण असे गृहीत धरु या की, असे होणार नाही की, कुणी लज्जास्पद वर्तन करील. परंतु त्यांना कुठल्याही कायद्याच्या व्याख्येतून दूर करण्याचे गृहीत धरणे बरोबर होणार नाही. असे प्रकार होतच नाहीत असाही दावा करता येत नाही. स्त्रिवाचक उदाहरणांची रेलचेल आपल्याला सभागृहामध्ये बघायला मिळते. मागच्या अधिवेशनामध्ये एका मुलीवर झालेल्या अन्यायाच्या संदर्भातील विषय चालू होता. मी या ठिकाणी कुणाच्या नावाचा उल्लेख करणार नाही. परंतु खाजगीमध्ये दोन आमदारांची अशी चर्चा चालू होती की, या विषयावर तुम्ही अधिक कशाला बोलता ? तुम्ही तिच्याशी लग्न करुन तिला न्याय देणार आहात काय ? ती खाजगी चर्चा पटलावर येत नव्हती, परंतु आम्हाला ऐकायला येत होती. अखंड स्त्री जातीचा अपमान करण्याची मानसिकता या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये निर्माण झालेली आहे आणि अनादीकाळापासून, सीतेपासून, द्रौपदीपासून ती आजपर्यन्त चालत आलेली आहे. म्हणून आपण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती उषाताई दराडे...)

कुणीतरी त्यापासून फार वेगळे आहोत असे कुणी म्हणण्याचे कारण नाही. आपण राणीच्या पडलेल्या पदराची उदाहरणे देतो. आपली भावना खूप चांगली असते. कुणाचा अनादर करण्याची आपली भावना नसते. तो एक साहित्यिक, नाटक आणि अभिनयाचा मूड असतो म्हणून आपण थोडेसे उत्साहाने बोलतो. त्याच्यात विशेष असे काही नाही. मिडियाने, नाटकाने आणि सिनेमानेसुध्दा आमच्या पदरापेक्षा आणि आमच्या स्त्रित्वापेक्षा काही वेगळे दाखविण्याचा प्रयत्न केलेला नाही. तो परिणाम माझ्यावरही असू शकतो. पदर हा आईच्या दुधाने भिजलेला, झोपडीमध्ये उघडया-नागडया पडलेल्या लेकराचे अंग झाकणारा सुध्दा असू शकतो आणि लेकराला उब देणारा सुध्दा असू शकतो. हा दृष्टीकोन माझ्या समाजाने दिलेलाच नाही. मी तो दोष आहे असे म्हणत नाही. स्त्रिवाचक उदाहरणे देण्याचा मोह आम्हाला सुध्दा आवरत नाही. म्हणून लज्जास्पद या शब्दाची व्याख्या स्पष्ट असावी किंवा नसावी या वादात मी जाणार नाही. परंतु त्या दृष्टीने सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या तीव्र आहेत. या राज्यातल्या तमाम महिला भगिनींच्या प्रातिनिधिक भावना आहेत. म्हणून त्या भावनांचा मी आदर करते आणि माझे भाषण संपविते.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोरे, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या विधेयकावर विचार व्यक्त केले.

सभापती महोदय, ग्रामपंचायत, जिल्हापरिषद, नगरपालिका, महानगरपालिका, विधानसभा, विधानपरिषद याठिकाणी लोकप्रतिनिधी निवडून जातात. उठण्या-बसण्याच्या बाबतीत, वागणुकीच्या बाबतीत काही ना काही कोड ऑफ कंडक्ट असला पाहिजे आणि तो असतो. नगरपालिकेच्या कायद्यामध्ये ही तरतूद पूर्वीपासून आहे. आपल्या राज्यामध्ये 227 नगरपालिका आहेत. ही तरतूद असताना सुध्दा अशी किती उदाहरणे आहेत की ज्यामध्ये "लज्जास्पद" असा शब्द आहे ? लज्जास्पद शब्दाला फार मोठा आक्षेप सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी घेतला होता आणि त्यांनी आग्रहपूर्वक तो शब्द अशोभनीय करावा असे सांगितले. त्यादृष्टीकोनातून योग्य तो बदल करण्यात आलेलेला आहे. कायद्यामध्ये ही तरतूद असताना देखील नगरपालिकेमध्ये आतापर्यन्त दोन उदाहरणे घडलेली आहेत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ 10:35

श्री.राजेश टोपे........

म्हणजे यामध्ये अनेकांच्या विचारानंतर मी जो बोध घेतला त्यानुसार राजकीय दृष्टीने सदस्य कमी करणे असा हेतू या बिलामध्ये आहे का? तसा हेतू अजिबात नाही. आज राज्यामध्ये 22 महानगरपालिका आहेत. शहरीकरण वाढत आहे. महानगरपालिकांचे अनन्यसाधारण महत्व निश्चितपणे निर्माण झालेले आहे. आपण अशाही काही गोष्टी वृत्तपत्रातून वाचतो, टीव्हीवर पाहतो. एखादा नगरसेवक त्याच्या पदाला शोभा न देणारी गोष्ट महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये करीत असतानाचे चित्र आपण पाहतो आणि त्यासंबंधीची बातमी देखील वाचतो. त्या संदर्भात कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणताही नियम किंवा कायदा अस्तित्वात नाही. त्या पदाला शोभेल अशीच वर्तणूक असली पाहिजे. अनेक सन्माननीय सदस्यांनी उदाहरण द्या म्हणून सांगितले.

सभापती महोदय, संयुक्त समितीमध्ये अनेक ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी यावर विचारमंथन केले. उदाहरण देता येणार नाही असे अशोभनीय कृत्य आहे, आज इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा प्रसार वाढलेला आहे. कोणी एखादा एसएमएस पाठवू शकतो. कितीतरी उदाहरणे देता येतील. उदाहरण दिले तरी त्या बाहेर एखादी घटना घडली तर तिचा समावेश होणार की नाही याबाबत देखील चर्चा झाली. चर्चेअंती असे ठरले की, उदाहरणे देऊ नयेत. याची व्याप्ती कमी करु नये अशा प्रकारचा निर्णय झाला. या मिसकण्डक्टविषयी नागरी सेवा नियमामध्ये किंवा मॅरेज ॲक्टमध्ये क्रुअल्टी विषय आहे. आपण व्याख्या केलेली नाही. अनेक सन्माननीय सदस्यांचे म्हणणे होते की, व्याख्या नमूद करावी. हा आग्रह या बिलाचा मुख्य हेतू, मुख्य अर्थ, मुख्य उद्देश आणि मुख्य गाभा काढून घेण्यासारखा होईल. म्हणून ती व्याख्या करणे चुकीचे होईल. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, रेफरन्सच्या दृष्टीने विचार करावा. रेफरन्स म्हणजे अपील अभिप्रेत आहे. बी.एम.सी.कायद्यामध्ये डिसक्वालिफिकेशन झाले, अनधिकृत बांधकामाच्या माध्यमातून किंवा अन्य वेगवेगळया कारणामुळे डिसक्वालिफिकेशन झाले तर स्मॉल कॉज कोर्टामध्ये अपील करण्याची संधी नियम 18 अन्वये उपलब्ध आहे. नागपूर महानगरपालिका आणि बीपीएमसी या दोन्ही कायद्यामध्ये अशा प्रकारची अपिलाची तरतूद नव्हती. म्हणून जिल्हा न्यायाधीश आणि जिल्हा न्यायालय याठिकाणी रेफरन्स करण्याची तरतूद ठेवली आहे. अनेकांनी असा विचार मांडला की, राजकीय कारणाने निर्णय घेतला जाईल. आज लोकशाही आघाडीचे शासन सत्तेवर आहे, जाणीवपूर्वक राजकारण करण्याचा प्रयत्न एखाद्या महानगरपालिकेमध्ये घडला तर तसे होऊ

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे........

नये यादृष्टीने यामध्ये थोडीफार दुरुस्ती जाणीवपूर्वक केलेली आहे. काढून टाकण्याचा अधिकार हा राज्य शासनाला असेल. परंतु कोणीही उठून हा अधिकार वापरु नये यादृष्टीने संयुक्त समितीमध्ये या संदर्भात सविस्तर चर्चा झाली. महानगरपालिकेमध्ये आज जे प्रतिनिधी आहेत त्यांना संधी असली पाहिजे. म्हणून 3/4 सदस्यांनी ठराव मंजूर करावा लागेल. तो ठराव मंजूर करुन शासनाकडे पाठवावा लागेल. हा ठराव करण्यापूर्वी संबंधितांना वाजवी संधी द्यावी लागेल. त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर ठराव करुन तो राज्य शासनाकडे पाठविला जाईल. राज्य शासन सुनावणी घेऊन, अभ्यास करुन त्यानंतर उचित निर्णय कायद्याप्रमाणे घेतला जाईल. वाजवी संधी देण्याचा विषय सुध्दा यामध्ये अंतर्भूत आहे. महानगरपालिकेला एका महिन्याची संधी देऊन त्यांचा या संदर्भातील निर्णय 3/4 बहुमताने मंजूर करायचा असल्यामुळे कोणतेही राजकारण करण्याची संधी निश्चितपणे कोणाला मिळणार नाही अशा प्रकारची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

त्यामुळे 3-4 प्रश्न होते की, राजकारण होऊ नये, अशोभनीय कृत्य होऊ नये तसेच रेफरन्सच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त केलेले आहेत त्यामुळे हे विधेयक संमत करावे अशी मी सभागृहास विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** :विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2004 चे वि.प.वि. क्रमांक 28- संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2004 चे वि.प.वि. क्रमांक 28 संमत झाले आहे.

-----------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वि.स.वि. क्र. 54 प्राथम्यक्रमाने घेण्याबाबत**

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, 2007 चे वि.स.वि. क्रमांक 54 प्रथम घेण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, कामकाज पहिले कोणते घ्यावयाचे यासंदर्भातील कालचा मला आलेला अनुभव चांगला नाही त्यामुळे सभागृहाच्या मान्यतेने मी 2007 चे वि.स.वि. क्रमांक 54 हे प्रथम घेतो.

------------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सहकारी संस्था (सुधारणा )विधेयक

L.A. BILL NO. LIV OF 2007

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.)

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 54, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : महोदय,मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 54 महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक शंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयककाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधयेकाचे भाग झाले.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 54 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 54 संमत झाले आहे.

----------

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विधेयक मंजूर करण्यास आमची काहीही हरकत नाही परंतु विधेयकावर काहीही चर्चा न होता विधेयक मंजूर करणे योग्य नाही. विधेयकावर चर्चा होणे आवश्यक आहे. विधेयकावर सन्माननीय सदस्यांना एक दोन शब्द आपण बोलू दिले पाहिजे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी विधेयकावर बोलण्यास माझी काहाही हरकत नाही. परंतु मी विधेयकाची प्रोसिजर वाचल्यानंतर कोणीही सदस्य काहीही बोलेले नाहीत म्हणून मी पुढची प्रोसिजर वाचण्यास सुरुवात केली.

श्री.अरविंदर सावंत : सभापती महोदय, मग हे विधेयक अगोदर घेण्याचे प्रयोजन काय ?

**उपसभापती** : आता मी पुन्हा मागे जायचे का ?

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपणास विनंती आहे की, आपण यापुढे काळजी घ्यावी.

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना सांगू इच्छितो की, आपण मागे सूचना केली होती की, कोणत्याही विधेयकावर चर्चा झाल्याशिवाय ते मंजूर करु नये. ही सूचना मी आजतागायत पाळत आलो आहे. आपण आम्हास वडिलधारे आहात. आपली सूचना मी शिरसावंद्य मानतो. मी जेव्हा आपली सूचना मान्य करतो तेव्हा माझेही म्हणणे मान्य करणे आपले कर्तव्य आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, यामध्ये आपली काही चूक नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी हे विधेयक अगोदर घेण्याची विनंती केली. परंतु ते बोलण्यासाठी उभे राहिले नाहीत...

**उपसभापती** : ठीक आहे. आता पुढील काजकाज घेत आहे.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबईचा सरकारी जागा ( काढून टाकण्याबाबत ) ( सुधारणा ) विधेयक

L.C. BILL NO VIII

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY GOVERNMENT PREMISES (EVICTION) ACT, 1955 )

श्री.अनीस अहमद (औकाफ मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.प.वि.क्र.8 - मुंबईचा सरकारी जागा ( काढून टाकण्याबाबत ) अधिनियम, 1955 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

माननीय सभापति जी, इस बिल में संशोधन करने का प्रस्ताव यहां पर लाया गया है. वक्फ प्रापर्टी पर यह कानून लागू करने के लिए यह प्रस्ताव यहां पर लाया गया है. मैं बताना चाहूंगा कि आज पूरे महाराष्ट्र में 95327 एकड़ जमीन वक्फ बोर्ड की है. खासकर औरगांबाद में या जो पुराने इलाके हैं, वहां पर यह जमीन है. यह जमीन वहां पर है जहां पर दरगाह है, मस्जिद है या कब्रिस्तान हैं. लेकिन आज वहा अतिक्रमण किया जा रहा है. वहां पर आज एन्क्रोचमेंट हो रहा है. उस जमीन का इस्तेमाल जिस मकसद के लिए होना चाहिए उस मकसद के लिए उस जमीन का उपयोग नहीं हो रहा है. जब वक्फ का सी.ई.ओ. वहां के एस.डी.ओ. या कलेक्टर को कम्पलेंट करता है तो उसका निपटारा जल्दी नहीं होता है. यदि एक हजार कम्पलेंट की गयीं तो मुश्किल से एक प्रतिशत या दो प्रतिशत कम्पलेंट्स का ही निपटारा हो पाता है. उसका कारण यही है कि उनके पास पहले से ही काम बहुत ज्यादा है. इसी वजह से वहां का एन्क्रोचमेंट नहीं उठ पाता है. मुस्लिम समाज में बहुत सारे लोग हैं जो अपनी जमीन दरगाह के नाम पर या कब्रिस्तान के नाम पर देते हैं. यह जमीन बेची नहीं जाती है और इस जमीन में कोई अदला बदल भी नहीं होता है या वक्फ की प्रापर्टी लीज नहीं होती है. इस जमीन का उपयोग मुस्लिम समाज को आगे बढ़ाने के लिए ही किया जाता है. लेकिन आज जो बड़े बड़े बिल्डर हैं उनकी नजर वक्फ की जमीन पर है......

...3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री अनिस अहमद...

माननीय सभापति जी, आपको मालूम है कि पिछले दिनों में वक्फ की जमीन को इल्लीगल तरीके से बेचा गया और कई जमीन लीज पर दी गयीं और कई जगहों पर एन्क्रोचमेंट हुआ. इन सब चीजों को रोकने के लिए तथा वक्फ बोर्ड की जमीन का सही इस्तेमाल हो, एजुकेशन से संबंधित काम हो और गरीबों को मदद करने की दृष्टि से इस जमीन का उपयोग हो सके इसी लिए यह बिल सभागृह के सामने लाया गया है. मैं सभी माननीय सदस्यों से रिक्वेस्ट करता हूं कि इस बिल को पास किया जाये.

प्रश्न प्रस्तुत झाला.

--0--

K-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ( नामनियुक्त ) :सभापति महोदय, वक्फ जमीन के संबंध में होने वाली इररेग्युलरीटीज और इल्लीगॅलीटीज तथा एन्क्रोचमेंट को रोकने की जरुरत को देखते हुए आघाडी सरकार की ओर से यह बिल यहां पर लाया गया है. इस बिल का मैं स्वागत करती हूं.

सभापति जी, वक्फ जमीन के संबंध में होने वाले गैर प्रकार और इररेग्युलरीटीज कई प्रकार की हैं. वे गैर प्रकार मैं यहां पर बताना चाहूंगी. 1. Ilegal encroachment on Wakf or Inami Land by individual people, by private individuals. 2. Ilegal encroachment or possession of Wakf or Inami Land by Government Organisation. 3. Illegal possession by private individual.

सभापति जी, ये जमीन बड़े पैमाने पर मराठवाडा में हैं. इनकी इल्लीगल बिक्री होती है. उदाहरण के लिए हम परभणी में सर्वे नंबर 250 और 255 दे सकते हैं. यह जमीन बेच दी गयी है. वक्फ बोर्ड की भी जमीन इल्लीगल तरीके से मारगेज की गयी और लीज पर दी गयी. 1995 के वक्फ एक्ट के अनुसार ये जमीन सिर्फ 3 साल के लिए ही लीज की जा सकती हैं जबकि ये जमीन 99 साल के लिए और 30 साल के लिए लीज की गयी हैं. मेरा कहना है कि इस तरह से वक्फ बोर्ड की जमीन लीज होती हैं और ट्रांस्फर ऑफ लेंड भी वहां पर होता है. ये ज्यादातर काम स्थानिक स्वाराज्य संस्थाओं में होता है. वहां पर यदि किसी ने अर्ज कर दिया तो पब्लिक यूटीलिटी लेंड होने के बावजूद उसको परस्पर एक्वायर कर लिया जाता है और उसको रिजर्व करने का काम स्थानिक स्वराज्य संस्थाओं के माध्यम से होता है. ऐसा करने के लिए वक्फ बोर्ड की मान्यता भी नहीं ली जाती है और न ही सरकार की परमीशन ली जाती है. सिटी डॅवलपमेंट के नाम पर उस जमीन को रिजर्वेशन के अंदर रख दिया जाता है. इस तरह के ज्यादातर केसीज नगरपरिषदों या दूसरे स्थानिक स्वराज्य संस्थाओं में होते हैं.. करीब 50-60 प्रतिशत लेंड परभणी जिले में उद्योगपतियों को दे दी गयी है. मराठवाडा में वक्फ की काफी जमीन पर कंस्ट्रक्शन की परमीशन दे दी गयी है. ये परमीशन देते समय न तो वक्फ बोर्ड की परमीशन ली जाती है और न ही उसकी हियरिंग के लिए वक्फ बोर्ड से किसी को बुलाया जाता है. थर्ड पार्टी के रुप में जमीन अलाट कर दी जाती है. यह काम वहां पर बड़े पैमाने पर हो रहा है, इसलिए यह बात सोचने जैसी है. इस बारे में सब रजिस्ट्रार को क्लियर डायरेक्टिवज हैं कि यदि वक्फ बोर्ड का



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान...

ऑब्जेक्शन है या गवर्नमेंट गजट में उसका उल्लेख है तो सब रजिस्ट्रार को उसका रजिस्ट्रेशन नहीं करना चाहिए. लेकिन यह सब काम अधिकृत रुप जैसा हो रहा है. वहां पर डेप्युटी कलेक्टर अपने अधिकारों को ओवर स्टेप कर रहे हैं डेप्युटी कलेक्टर, लेंड रिफार्म को यह काम नहीं करना चाहिए. यह काम उनके अधिकार में नहीं है. इस बारे में उस्मानाबाद के डेप्युटी कलेक्टर को सस्पेंड भी किया गया है. डेप्युटी कलेक्टर लेंड रिफार्म ज्यादा से ज्यादा टाइप ऑफ लेंड डिक्लेयर कर सकते हैं, वैसे तो वह भी नहीं करना. चाहिए. इसकी जो ऑथेरिटी है, जहां पर अपील किया जा सकता है, वह रिवेन्यु मिनिस्टर है.

( इसके बाद श्री तालेवार के पास...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ D/ SBT/ पूर्वी श्री दत्त 10:55

श्रीमती फौजीया खान ...

महसूल विभाग के मंत्री को अपील की जा सकती है. लेकिन वहां पर अपील की सारी प्रकिया खत्म हो कर फैसला होता है तब तक उस जमीन को बेच कर निपटारा कर दिया जाता है. इस तरह से सैकड़ों एकड़ जमीन बेची जा रही है. डेप्युटी कलेक्टर को सरकार की ओर से निदेश दिए जाने चाहिए कि यह सिलसिला बंद होना बेहद जरुरी है. शासन को इस संबंध में तत्काल कदम उठाना चाहिए. इन सब मामलों में हैदराबाद का जो एक्ट है, उसका सहारा लिया जाता है. लेकिन इस बात को स्वीकार किया गया है कि डेप्युटी कलेक्टर को वक्फ जमीन के मामले को टच नहीं करना चाहिए. इस प्रकार के निदेश सरकार की ओर से जाने चाहिए. लैंड ट्रांसफर जिस प्रकार से की जाती है, उसकी कार्यप्रणाली इस तरह से होती है कि बिल्डर पहले मुतवल्ली से सम्पर्क स्थापित करता है, फिर मुतवल्ली बोगस कागजात बनाता है और उसके बाद तलाठी से मिलकर सात बारा के उतारे में किसी व्यक्ति का नाम लिखवा देता है. इस प्रकार का नियम है कि ऐसे मामलों में सात बारा के उतारे में सिर्फ संस्था का ही नाम लिखा जा सकता है, किसी व्यक्ति का नहीं. लेकिन नियम होने के बावजूद डिसप्युट पैदा करने के लिए जानबूझकर व्यक्ति का नाम लिखा दिया जाता है और इस प्रकार से अनियमितता की जाती है. इसलिए इन मामलों में भी सरकार की तरफ से स्पष्ट निदेश दिए जाने चाहिए. चूंकि सरकार की ओर से निदेश दिए गए है् लेकिन अमल नहीं हो रहा है. ऐसे मामलों में वक्फ बोर्ड की एनओसी जरुरी है लेकिन वक्फ बोर्ड की एनओसी नहीं ली जा रही है और अवैध रुप से जमीन सेल की जा रही है. इस प्रकार के गैरकानूनी मामलों को रोका जाना जरुरी है. मैं इस संबंध में यह सुझाव देना चाहती हूं कि इस प्रकार से जितनी जमीन अवैध रुप से ट्रांसफर हुई है, सात बारा के उतारे में संस्था के स्थान पर गलत व्यक्ति का नाम लिखा गया है, ऐसे सभी मामलों की छानबीन करने के लिए एक कठोर अभियान शुरु किया जाना चाहिए और प्रोहिबिटेड क्लाज़ पर स्टॅम्प लगाया जाना चाहिए ताकि इस प्रकार से होने वाली माल प्रेक्टिस रोकी जा सके. इस विधेयक के द्वारा क्यूरेटिव मेजर लिए जा रहे हैं लेकिन मेरा यह सुझाव है कि प्रिवेन्टिव मेजर भी लिए जाने चाहिए. अगर इस प्रकार के उपाय किए जाएंगे तो मुझे लगता है कि जमीन हस्तांतरण के मामलों में गैरकानूनी काम रुक सकते हैं. इसलिए सरकार को इस मामले में कठोर कदम उठाना चाहिए. जिन मामलों में डिसप्युट है, जिन मामलों में टायटल क्लियर नहीं है, ऐसे जो मामले हो रहे हैं, उनको रोकने

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ D/ SBT/ 10:55

श्रीमती फौजीया खान ...

की दिशा में पहले से डेटा बँक तैयार किया जाना चाहिए, अगर पहले से ही डेटा बँक तैयार होता है तो एक्शन प्लान बनाने में आसान होगा. चूंकि गैरकानूनी मामलो को रोकने के लिए कानून बनाये जा रहे हैं लेकिन कानून बना देने से हर समस्या हल नहीं हो जाती है. कानून के साथ साथ सरकार की इच्छा शक्ति और सिन्सेयरिटी भी होनी जरुरी है. इन मामलों के प्रति जब तक स्थानिक स्वराज्य संस्था एवम् शासकीय कार्यालय गंभीर रुप से कदम नहीं उठाएंगे तब तक समस्या हल नहीं होगी. सीईओ और डेप्युटी सीईओ को अतिक्रमण हटाने के लिए अधिकार दिए जा रहे हैं. मैं इस कदम का सस्वागत करती हूं.

भाषण अपूर्ण, इसके बाद श्री दत्त.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान...

मैं कहना चाहती हूं कि एस.डी.ओ. के पास ज्यादा टाइम नहीं होता है. 483 केसीज में ंसे सिर्फ 21-22 केसीज का ही निपटारा हुआ है. इसलिए इस कदम के साथ-साथ मैं यहां पर ं3-4 सुझाव देना चाहूंगी. मैं अपने सुझावों को यहां पर रिपीट करना चाहूंगी और उन पर शासन अमल करे,ऐसी मेरी विनती रहेगी. मेरा कहना है कि स्वराज्य संस्थाओं पर निर्बंध डालने के लिए डायरेक्टिव देने चाहिए कि कायदे की अमलबजावणी काटेकोर ढंग से होनी चाहिए. इसके अलावा हवाला बेसीज, कंडीशनल लीज बेसीज तथा रिजर्वेशन हटाने की परमीशन जो कि नगरपालिकाओं द्वारा दी जा रही है, इसको रोकने के लिए शासन की ओर डायरेक्टिव दिए जाने चाहिए और इस पर सरकार की ओर से विजीलेंस होना चाहिए, मॉनीटर होना चाहिए. सब रजिस्ट्रार को भी डायरेक्टिव दें कि वहां पर नियमों का पालन सही ढंग से क्यों नहीं हो रहा है. डेप्युटी कलेक्टर को भी डायरेक्टिव देने चाहिए कि जो काम उनके अधिकार में नहीं है, उससे संबंधित केस उन्हें नहीं लेने चाहिए. 7/12 के अंदर प्रोहीबिटिड क्लास के रुप में उस पर रोक लगानी चाहिए. यदि ये सब काम करते हैं तो हजारों एकड़ जमीन पर माल प्रेक्टिस रोकी जा सकती है. साथ ही मैं कहना चाहूंगी कि एक डाटा बैंक तैयार किया जाये. जहां जहां पर डिसप्युट है और लीगल टाइटल के बारे में यदि कोई बात क्लियर नहीं है तो उस बारे में एक डाटा बैंक तैयार किया जाये तो यह काम आसान हो जाएगा. मैं कहना चाहूंगी कि सी.ई.ओ.और डेप्युटी सी.ई.ओ. को इस कायदे के माध्यम से जो अधिकार दिए जाने का काम किया जा रहा है उसका मैं स्वागत करती हू और अपना भाषण समाप्त करती हूं. धन्यवाद

-0-

M-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 8 या सदनामध्ये चर्चेसाठी आलेले आहे. या विधेयकाला जे शीर्षक दिलेले आहे ते मजेशीर आहे आणि या विधेयकावर जी भाषणे होत आहेत ती वेगळी आहेत म्हणून आश्चर्य वाटते. "मुंबईचा सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) अधिनियम, 1955 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक" असे या विधेयकाचे शीर्षक आहे आणि भाषणे होत आहेत ती वक्फबाबत होत आहेत. त्या ठिकाणी गैरव्यवहार सुरु होते, ते होऊ नयेत म्हणून सन 1995 चा वक्फ बोर्ड ॲक्ट आला. हा कायदा केंद्र शासनाचा आहे. या कायद्यांतर्गत अनेक सुधारणा सूचविलेल्या आहेत. मी लोकसभा सदस्य होतो त्यावेळी माझ्याकडे दहा राज्यांची जबाबदारी होती. वक्फ बोर्डाची तपासणी करणे, माहिती घेणे, वस्तुस्थिती तपासून अहवाल सादर करणे, अशी ही जबाबदारी होती. या दहा राज्यांमध्ये महाराष्ट्र राज्याचाही समावेश होता. आपले राज्य झोपी गेलेले असते आणि ज्यावेळी जाग येते त्यावेळी उशीर झालेला असतो. आज वक्फच्या जमिनींचा गैरफायदा घेतला जातो आहे आणि जमिनी विकल्या जात आहेत, अशा प्रकारची चर्चा सुरु झाल्यानंतर ही सुधारणा करण्याचा प्रसंग आला आणि शासन जागे झाले. "झोपी गेलेला जागा झाला."

सभापती महोदय, हा विषय गंभीर यासाठी आहे की, याच्या उद्‌देश व कारणे यामध्ये जी माहिती दिलेली आहे त्यात वक्फ अधिनियम 1995 (1995 चा 43) याच्या कलम 54 व 55 मध्ये, वक्फ मंडळाच्या मालमत्तेमधून अतिक्रमणे हटविण्याकरिता तरतूद आहे.

यानंतर कुमारी जयश्री..........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी : तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे )**

श्री.मधुकर सरपोतदार.......

तथापि,उक्त अधिनियमामध्ये,वक्फ मंडळाच्या जागेमध्ये अनधिकृत भोगवटा करीत असलेल्या व्यक्तींना त्या जागांमधून काढून टाकण्याची तरतूद नाही. मुंबईचा सरकारी जागा ( काढून टाकण्याबाबत ) अधिनियम, 1955 ( 1956 चा मुंबई 2 ) मध्ये,सरकारी जागांतून अशा व्यक्तींना काढून टाकण्यासाठी सोप्या व प्रभावी कार्यपध्दतीची तरतूद केलेली आहे. आहे ना तरतूद ? मग का वापरत नाही ती ? या कायद्यात सुधारणा करण्याची काय गरज आहे ? हा माझा प्रश्न आहे. जर वक्फची जमीन वक्फच्याच मालकीची आहे,त्याच्यावर शासनाचा काहीही अधिकार नाही तर तेथील अतिक्रमणे हटविण्यासाठी शासकीय कायद्यामध्ये परिवर्तन करण्याची गरज आहे का ? हे ही सत्य होऊ शकते. वक्फच्या जमिनीवरील अतिक्रमण शासन हटवू शकते,वक्फच्या जमिनीबाबत होणा-या गैरवापराबाबत शासन हस्तक्षेप करुन कायद्यामध्ये काही सुधारणा करु शकते, हे जर सत्य आहे तर सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.अनिस अहमद माझा आपल्याला प्रश्न आहे की, यासंदर्भातील दोन्ही कायदे स्पष्ट आहेत, आणि येथे उद्देश आणि कारणांमध्ये जे दिलेले आहे ते तुम्हाला माहित आहे. वक्फच्या जमिनीवरील अनधिकृत बांधकाम काढण्याचे अधिकार वक्फला आहे, मग वक्फ तो अधिकार का वापरत नाही ? याचे कारण तेथील गैरव्यवहार वक्फच्याच मुतवल्लींनी केलेला आहे,त्यांच्याच माध्यमातून सगळी सुत्रे हलविली जातात. चुकीच्या मार्गांचा अवलंब करुन वक्फच्या अनेक जागा गैरमार्गाने वापरल्या जात आहेत. त्याचे प्रमाणे खूप वाढले आता त्याच्याबद्दलची चर्चा सर्वत्र सुरु आहे. आज हे त्याचे मूळ कारण आहे. जशा शासकीय जागांवर झोपडया बांधण्यात आल्या,अतिक्रमण झाले तरी शासनाला जाग आली नाही. आणि ज्यावेळी जाग आली, त्यावेळी 1976 साली स्लम्सचा कायदा निर्माण झाला तोपर्यंत शासन झोपलेले होते. आम्ही रात्रंदिवस आरडाओरड करुन सांगत होतो की, झोपडया वाढत चालल्या आहेत, अनधिकृत बांधकाम वाढत चालले आहेत. परंतु त्यावेळी सरकारने लक्ष दिले नाही. शासनाला आज मला हा प्रश्न विचारावयाचा आहे की,शासकीय जमिनीवर कितीही अतिक्रमण झाले तर ते अतिक्रमण काढून टाकण्याचा अधिकार शासनाला आहे आणि तशी कायद्यात तरतूदही आहे. मग शासनाने तो अधिकार का वापरला नाही ? एवढे अतिक्रमण झालेच कसे ? म्हणून यासंदर्भात कायद्यात सुधारणा करण्यासाठी नवीन कायदा आणला गेला आहे,त्यात असे स्पष्ट म्हटले आहे की, मुंबईच्या

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

सरकारी जागा ( काढून टाकण्याबाबत ) अधिनियम 1955 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी शासनाकडे कायदा आहे, परंतु आपण त्याचा वापरच करीत नाही. कारण त्याच्यामध्ये अनेक राज्यकर्त्यांचे हात गुंतलेले आहेत, आणि आपल्याच पक्षाच्या कार्यकर्त्यांवर कारवाई ते करु शकत नाहीत. सभापती महोदय,हा एक असाध्य असा रोग आहे आणि कोणत्याही असाध्य रोगावर एकच औषध असते ते म्हणजे ऑपरेशन करणे. परंतु ऑपरेशन केल्यानंतर रोगी बरा होतोच असे नाही आणि त्याच्या बचावण्याची शक्यताही कमी असते. ऑपरेशन ही शेवटची स्टेप असून त्यामध्ये रिस्क असते. त्याप्रमाणे यामध्ये कायदा ही शेवटची पायरी आहे. या कायद्यामध्ये पृष्ठ क्रमांक 02 मध्ये उद्देश व कारणांमध्ये असे म्हटलेले आहे की," मुंबईच्या सरकारी जागा ( काढून टाकण्याबाबत ) अधिनियम 1955 ( 1956 चा मुंबई 2 ) मध्ये सरकारी जागांतून अशा व्यक्तींना काढून टाकण्यासाठी सोप्या व प्रभावी कार्यपध्दतीची तरतूद केलेली आहे." सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.अनिस अहमद मला एकच सांगा ही जी दुरुस्ती आहे, ती फक्त वक्फसाठी वापरली जाणार अन्यथा वापरली जाणार नाही, असे असेल तर यामध्ये तशी तरतूद करणे आवश्यक होते. वक्फच्या जमिनींबाबतचा संदर्भ जर या कायद्यामध्ये घेतला असेल तर तसे सांगण्यात यावे. ही दुरुस्ती सगळयांना लागू होणार का ? वक्फची जमीन असेल किंवा नसेल ज्या ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे,त्या ठिकाणी शासन ते अतिक्रमण काढून टाकू शकते त्याकरिता कोणाच्याही परवानगीची गरज नाही. यासंदर्भातील आपसातील ॲडजस्टमेंट व देवाण घेवाण यामुळे हे अतिक्रमण वाढत चालले आहे. महाराष्ट्रातील बहुतांश शहरांची वाट लागली. मग कोणतातरी चंद्रशेखर येतो आणि ठाण्याचा आणि नागपूरचा कायापालट करुन टाकतो. आपल्यापैकी अनेक जण नागपूरचे आहेत,आपल्याला कल्पना आहे की, याकरिता किती अतिक्रमण काढून टाकावे लागले. गेली 50 वर्षे कॉंग्रेसचीच सत्ता या देशावर आहे. तुमचीच पुण्याई आहे,तुमच्याच पुण्याईमुळे वाढलेले हे बांडगुळ आहे आणि ते काढण्यासाठी आता कायद्यात तरतूद करावयाची आहे.

यानंतर श्री.गागरे.....

अध्यक्षीय प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ SBT/ 11:15

श्री. मधुकर सरपोतदार....

विधेयक क्रमांक 8 वर येथे चर्चा चालू आहे. ही चर्चा वक्फ बोर्डासबंधी नाही. केवळ या बोर्डासंबंधात आम्ही येथे बोलत आहे. कोणतेही अनधिकृत बांधकामे काढून टाकण्याची तरतूद या कायद्यामध्ये आहे. परंतु त्या तरतुदीची अंमलबजावणी केली जात नाही. म्हणून शासनाने ॲडीशनल जबाबदारी घेऊन ही कार्यवाही करीत आहे. यामुळे वक्फ प्रॉपर्टीची जी जमीन आहे ती मोकळी होईल व लोकांना यामुळे याचा फायदा हाईल. असे झाले तरच या कायद्याचा हेतू साध्य झाला असे आपल्याला म्हणता येईल. अन्यथा उद्येश आणि कारणे केवळ वाचण्यासाठी दिलेली आहेत त्याचा काहीही उपयोग नाही असा त्याचा अर्थ होईल. धन्यवाद.

............





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा ) : सभापती महोदया, मुबईच्या सरकारी जागा काढून टाकण्याबाबतचा अधिनियम 1955, याबाबत मी येथे बोलणार आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, या अधिनियमाचे, "मुबईच्या सरकारी जागा काढून टाकण्याबाबत" असे जे शीर्षक आहे, ते आपण बदलले पाहिजे. या शीर्षकातून या अधिनियमाचा बोध होत नाही. याठिकाणी महाराष्ट्र राज्याने अशा पद्धतीच्या सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यासंदर्भात ही सुधारणा अत्यंत महत्वाची आहे. या खात्याला आता एनेबलिंग प्रोव्हीजन आणून ही पॉवर या कायद्याअन्वये देत आहोत. 1995 च्या वक्फ कायद्यामध्ये 113 कलमे आहेत. या 113 कलमांमध्ये आपण सीइओ यांना पॉवर दिलेल्या आहेत, त्या पॉवरमध्ये सुधारणा करीत असताना ही सुधारणा त्या कायद्यामध्ये अंतर्भूत करणे देखील आवश्यक आहे. याठिकाणी कलम 25 मध्ये सीईओचे अधिकार दिलेले आहेत, तसेच कलम 33 मध्ये देखील काही अधिकार दिलेले आहेत. या कायद्यान्वये अधिकार देत असताना वक्फ कायद्यामध्ये देखील बदल करणे आवश्यक आहे. ते जर आपण केले असते तर वक्फ कायदा आणि हा कायदा यामध्ये समन्वय साधला गेला असता. वक्फ कायद्यामध्ये एनेबलिंग प्रोव्हीजन करुन, सीइओ यांना पॉवर दिल्या असत्या तर हा कायदा बदलण्याची आवश्यकता होती असे मला वाटत नाही. हा अधिनियम आपण आणीत आहात त्यामध्ये दोन प्रमुख बाबी आहेत. स्टेटमेंट ऑफ ऑब्जेक्ट अँड रिजनमध्ये केंद्र शासनाने असे म्हटले आहे की, राज्य शासनाने सुधारणा कराव्यात. सर्व राज्य सरकारांनी आपापल्या राज्यातील वक्फ मालमत्ता सरकारी ताब्यातून काढून टाकण्याबाबतचे अधिकार अधिनियमान्वये जे देण्यात आलेले आहेत त्यांच्या कक्षेबाबतचा विचार करावा अशी शिफारस केंद्र शासनाने केली आहे. तसेच दुसरी बाब म्हणजे मुंबईतील सरकारी जागा काढून टाकण्याच्या अधिनियमाचा अधिकार कक्षेत आणण्याची विनंती शासनाला केली आहे. एकूण किती जागा तसेच किती जमिनीवर अतिक्रमण झाले आहे याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी दिली असती, तर अधिक बरे झाले असते. आताच सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी सांगितले की, 3 वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी जागा भाडयाने देऊ शकत नाही पण आपण 99 वर्षापर्यंत लीज केलेले आहे असे त्यांनी याठिकाणी सांगितले. 99 वर्षांचे लीज करणे हा एक भाग आणि हे लीज काढून टाकण्यास

..3.....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी........

सांगणे हा दुसरा भाग आहे. याला रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्ट देण्याची आवश्यकता आहे. हे ज्या वेळी घडले असेल त्यावेळेपासून रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्ट दिलेला आहे असे मला येथे दिसून येत नाही. 'It is a piecemeal approach and not an integrated approach'. शासनाच्या या विधेयकाचे स्वागत करीत असताना मी आपणास सांगू इच्छितो की, असा इफेक्ट देण्याची आवश्यकता असेल तर याबाबत पुन्हा सुधारणा आणावी. मधील कालावधीमध्ये एखादा वटहुकूम आणावयाचा असल्यास तसा वटहुकूमही आपल्याला आणता येईल. आपण कोर्टात जाऊन याबाबत काही फारसा उपयोग होईल असे मला वाटत नाही. याठिकाणी काही 2-3 बाबींचा उल्ले्ख सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी केला होता. डेप्युटी कलेक्टर याबाबींची नोदणी करतात. मी माननीय मंत्री महोदयांनी देखील याबाबत विनंती करीन की, आपण यासंदर्भात नेमके काय केले पाहिजे व काय करु नये या साठी तसेच एखादी कारवाई करण्यासंदर्भात एक चेकलिस्ट तयार करावी. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

...............

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, खरे तर हे एक साधे आणि स्वच्छ असे विधेयक आहे. देशांतर्गत वक्फच्या जमिनींचा दुरूपयोग होतो असे केंद्रीय वक्फ समितीला वाटले म्हणून घटनेच्या कलम 249 आणि 250 अंतर्गत केंद्राला म्हणजे संसदेला जे अधिकार आहेत त्या अधिकारातून हा कायदा झाला. असा कायदा होतो तेव्हा त्या कायद्यात जी तत्त्वे दिलेली आहेत त्यानुसार राज्य सरकार कायदा करते आणि त्याची अमलबजावणी करते. त्यामुळे त्यात अमेंडमेंट करावी की नाही, तर त्याचा अधिकार राज्याला नाही. परंतु एक अधिकार आपल्याला निश्चितपणे प्राप्त झाला. तर आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.गुजराथी यांची सूचना घ्यायची असेल तर मग आदेश काढा. पण विधीमंडळामध्ये ठराव आणून तो पारित करून त्याद्वारे केंद्र सरकारला आपल्याला याबद्दल सुचविता येईल आणि मग केंद्राने विचार केला तर यात अमेंडमेंट होऊ शकेल. म्हणून हा कायदा आज आपल्यापुढे आलेला आहे तो स्वच्छ आहे. मागे काय घडले याचा विचार करण्यापेक्षा पुढे काय घडू नये याची काळजी घेण्यासाठी हा कायदा आहे. 99 वर्षांची लीज दिल्यानंतर, कायद्यात सुधारणा करून तुम्ही दीर्घ मुदतीचा लीज करार करू शकता. तीन वर्षांचे लीज देऊन दर तीन तीन वर्षांनी तो करार करण्याचा, वाढविण्याचा अधिकार आपणास प्राप्त होतो. म्हणजे त्या करारानुसारच तीन वर्षांनी तुम्हाला ते लीज टर्मिनेट करता येत नाही. त्या करारामध्येच अशी तरतूद असते की, 5 रूपये करारावर तीन वर्षासाठी जमीन दिलेली आहे आणि त्या लीजमध्ये अशीच अट असते की, प्रत्येक तीन वर्षांनी हा करार पुढे जात राहील. परंतु त्यानंतर लीजप्रमाणे 5 रूपये भाडे असेल तर प्रत्येक तीन वर्षांनी कराराची मुदत वाढविताना त्या भाड्यामध्येही पहिल्या वेळी 2 टक्के, दुसऱ्या वेळी 4 टक्के, नंतरच्या वेळी 6 टक्के याप्रमाणे भाडेवाढ होत राहील असा हा करार असतो. सभापती महोदय, मला सन्माननीय आमदारांच्या जागरूकतेबद्दल आनंद झाला. किती जागरूक आमदार आहेत. या ठिकाणी विधीमंडळामध्ये बोललो की, वर्तमानपत्रातून त्यांचे नाव बाहेर जाते आणि मग 'ये हमारे लिए झगडता है' असा खिताब त्याला मिळतो आणि मग त्या समाजाचे नेतृत्त्व करण्याचा एक आयाम तयार होतो. परंतु हा पोकळ वासा आहे. तुम्ही एवढ्या पोटतिडकीने बोलता, वक्फ बोर्डाने अशा बेकायदेशीर गोष्टी केल्या असतील तर मग आपल्या 1995 च्या कायद्यात तरतूद आहे, शिवाय हायकोर्टामध्ये आपण जनहित याचिकेद्वारे प्रकरण आणू शकता. त्यासाठी तर त्यांना कोणीही अडविले नव्हते. आपल्याला काही

...... क्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

घटना गैर घडल्याचे वाटले असेल तर आपण त्याला बाहेरही उघड आव्हान देऊ शकला असता, लोकशाही मार्गाने. आणि ते रद्द करून घेऊ शकला असता. परंतु एकानेही ही ताकद बाहेर दाखविली नाही. कारण त्यासाठी खर्च करावा लागतो. पण येथे बोलल्याने, येथे विषय काढल्याने, तसे काही होत नाही. उलट येथे भत्ता घेऊन बोलता येते आणि ते सोपे आहे. भत्तादेखील मिळतो आणि सभागृहात बोलल्यामुळे नाव देखील होते. हे अधिक सोपे. आपण सुशिक्षित आहात, आपल्याला आपल्या समाजाचे भले कळते म्हणून या कायद्यांतर्गत आपण कोर्टात जाऊ शकला असता. सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी परभणीचा एक प्रश्न येथे मांडला. ....

( यानंतर श्री. सरफरे .... आर 1 ..

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

मला त्याची कल्पना नाही. तुम्हाला ते माहीत आहे. याठिकाणी विषय मांडला आहे म्हणून मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो. माननीय मंत्री श्री. अनिस अहमद यांना सांगून उपयोग नाही. त्यांनी काल भाषण करतांना म्हटले की, मला काही अधिकार नाही, मी काही करु शकत नाही, मला त्यातील काही समजत नाही....

श्री. अनिस अहमद :सभापति महोदय, अभी सम्माननीय सदस्य श्री रावते जी ने जो कहा है, वह रेकॉर्ड पर न रहे. वे राजनीतिक बात कर रहे हैं.

श्री. दिवाकर रावते : आपण असे बोलला आहात, मी आपणावर हक्कभंग आणीन. आपले म्हणणे रेकॉर्डवर आहे. आपण ते चेक करु शकता. मुख्यमंत्री कोण मला नेमणारे ? असे आपण म्हणाला आहात....

. श्री. अनिस अहमद : मैंने ऐसा नहीं कहा था.

श्री. दिवाकर रावते :आपने ऐसा कहा था. वह रेकॉर्ड पर है.आपने कहा था कि मैं ऊपर से आया हूं.

श्री. अनिस अहमद : मैंने ऐसा नहीं कहा था. मैंने यह कहा था कि वह वक्फ बोर्ड की प्रापर्टी है. वक्फ बोर्ड की जमीन गैरकानूनी ढंग से दी होगी तो ऊपर वाले को जवाब देना होगा.

श्री. दिवाकर रावते :नहीं, आपने ऐसा नहीं कहा था. आपने कहा था कि मैं मंत्री पद पर यहां किसी की मेहरबानी से नहीं हूं. मंत्री पद मुझे ऊपर वाले से मिला है. ऊपर से मंत्री पद मिला है. आप बहुत ताकत वाले है. आप मुख्यमंत्री से भी पंगा ले सकते हो.

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : आपण विषयावर येऊन बोलावे...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, या सभागृहामध्ये जे घडले आहे, ते मी सांगत आहे. मघाशी आलेल्या विधेयकाप्रमाणे जर मी अशोभनीय बोललो असेन तर आपण मला त्याची जाणीव करुन द्यावी. त्या दिवशी सभागृहाचा अवमान झाला, त्यादिवशी आम्हाला खूप वेदना झाल्या, आमचे अश्रू पुसायला कोण आहे? राजकीय डावपेचामध्ये आम्ही त्यांच्यावर मात करु. त्यावेळी ते आमच्या जागेवर बसतील आणि आम्ही त्याठिकाणी बसू, तो भाग वेगळा आहे. परंतु याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांच्या अधिकाराला आव्हान दिले गेले आहे. त्यांची नेमणूक घटनात्मक आहे. आम्ही याठिकाणी बसून ते सर्व पाहिले आहे. त्यावेळी दुसऱ्याला वेदना देणारे लोक कसे

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.......

असतात? राज्य मंत्रिमंडळातील एक सदस्य आपल्याला जाहीर आव्हान देतो हा विषय आम्ही याठिकाणी मांडला आणि त्यावर मी बोलत आहे. सभापती महोदया, आपल्याला वेदना होण्याचा प्रश्न नाही. आपण आम्हा सर्वांचे संरक्षक आहात, तेव्हा आपण उजवा आणि डावा असे करु नका. याठिकाणी विषय मांडून माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी काय केले? नाहीतर हे मंत्री उद्या म्हणतील, मै वक्फ का मंत्री हूँ......

**तालिका सभापती** : ज्या दिवशी अशाप्रकारचे वक्तव्य झाले त्या दिवशी आपण बोलण्याची गरज होती. आज आपण विषयावर बोलावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, मी विषयावरच बोलत आहे. जे रेकॉर्डवर आहे त्यासंबंधी बोलत आहे. यु.एल.सी. च्या विषयावर बोलत नाही, वक्फच्या विषयावर बोलत आहे. संबंधित मंत्रिमहोदयांनी उत्तर देण्यासाठी उठून उभे रहावयास नको याची मला काळजी घ्यावयास नको काय?माझा माननीय मुख्यमंत्र्यांवर विश्वास आहे. सभापती महोदया, मला थोडेसे माहीत आहे, जास्त माहीत नाही. सभागृहाच्या सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी वक्फ बोर्डाच्या जमिनीसंबंधी विषय मांडला. त्यांनी सांगितले की, वक्फ बोर्डाच्या जागा उद्योजकांनी बळकावल्या आहेत. त्यांनी चुकीचे मांडले नाही. त्याबाबत मला थोडीशी माहिती आहे. मी माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्यासारखे सांगणार नाही. परवाच्या दिवशी सच्चर समितीच्या अहवालावर चर्चा सुरु होती. त्या चर्चेमध्ये आम्ही आनंदाने भाग घेतला होता. त्या समाजाची उन्नती झाली पाहिजे, त्यांची शैक्षणिक प्रगती झाली पाहिजे, त्यांचे आरोग्य चांगले राहिले पाहिजे, त्यांना इतर समाजाबरोबर आणले पाहिजे. याबाबत आम्ही प्रेमाने आणि आनंदाने चर्चा केली. त्या चर्चेमध्ये आम्ही आमची राजकीय नीती आणली नाही. त्यावेळी माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे बाहेरुन सभागृहात आले. त्यांना मागची चर्चा माहीत नव्हती. सच्चर समितीच्या अहवालाशी वक्फच्या जमिनीचा काहीही संबंध नाही. तरीसुध्दा ते उभे राहून बोलले की, वक्फच्या सर्व जमिनी अमूक-तमूक ठिकाणी आहेत त्या तुम्ही ताब्यात घ्या. आणि त्याठिकाणी कॉलेज, हॉस्पिटल्स, उच्च शिक्षणाकरिता संस्था निर्माण करा. आणि त्यामध्ये मुस्लिम समाजाच्या मुलांना प्रवेश द्या. मुस्लिम समाजाबद्दल त्यांना इतके कौतुक आले कोठून? ते कन्व्हर्ट झाले की काय? हे माझ्या लक्षात आले नाही.

(यानंतर श्री. बरवड)

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

या ठिकाणी दोन तास चर्चा झाली. त्यामध्ये बेसिक प्रश्न हा होता की, मुस्लीम समाजातील लोकांना प्राथमिक शिक्षण मिळत नाही. ते शाळेमध्ये जात नाहीत. ज्यांनी प्राथमिक शिक्षण घेतले नाही ते कॉलेज बांधून वक्फ बोर्डावर कसे जाणार ? ही बाब सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आली नाही. त्यांचे प्रेम उतू गेले. बाटगा कडवट असतो अशी एक म्हण आहे, तसे झाले. वक्फचा विषय आल्याबरोबर अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात हळवे होतात परंतु ज्यांचा संबंध आहे ते हळवे होत नाहीत. माझा माननीय मुख्यमंत्र्यांवर विश्वास आहे. सन्माननीय सदस्य प्रा. फौजीया खान यांनी दोन तीन विषय या ठिकाणी मांडले. त्या विषयाला धरुन सन्माननीय सदस्य श्री. गुजराथी साहेब बोलले म्हणून मी हा विषय सुरुवातीला मांडला. ज्या उद्योजकांनी या जागा बळकावलेल्या आहेत त्याची उच्चस्तरीय चौकशी करावी आणि जे कोणी उद्योजक असतील, मग ते स्वत:च्या पक्षाचे असो किंवा युतीच्या पक्षाचे असो किंवा आमदार असो किंवा बलदंड राजकीय पुढारी असो, त्यांच्यावर कारवाई करण्याची हिंमत दाखवून परभणीमध्ये अशा जमिनी बळकावल्या आहेत ते जगासमोर येऊ द्या. विकासामध्ये आमच्या जागा दाखवितात असा मुद्दा मांडण्यात आला. विकासामध्ये आपल्याच जागा दाखवितात असे नाही. ज्यावेळी नगरपालिकेचा, महानगरपालिकेचा विकास आराखडा तयार होतो त्यावेळी जे आरक्षण करावयाचे त्याबाबत सूत्रे दिलेली आहेत. त्याबाबत पध्दत दिलेली आहे. त्याप्रमाणे अमुक जागा कब्रस्तानकरिता आरक्षित, अमुक जागा स्मशानाकरिता आरक्षित, अमुक जागा बगिचाकरिता आरक्षित, अमुक जागा मैदानाकरिता आरक्षित असे आरक्षण केले जाते. पिढ्या न पिढ्या 100 वर्षापासून ज्यांच्याकडे जमीन असते त्या जमिनी सुध्दा सार्वजनिक आरक्षणामध्ये घेतात. आपल्या जमिनी अशा काय लागून गेलेल्या आहेत की ज्यामुळे त्या जमिनी आरक्षित करावयाच्या नाहीत ? गरज असेल तर ती जमीन आरक्षित केली जाईल. आरक्षणाचे ते अधिकार सरकारला प्राप्त होतात. त्यामुळे आरक्षणाच्या बाबतीत पब्लीक इंटरेस्टटमध्ये एखाद्या जागेच्या संदर्भात आरक्षण आले ....

प्रा. फौजीया खान : सभापति महोदय, मेरा पॉइन्ट ऑफ ऑर्डर है. सम्माननीय सदस्य जो कह रहे हैं कि आरक्षित जमीन शहर के विकास के लिए ली जा रही है, अगर वह पब्लिक यूटिलिटी के लिए दी गई हो, जैसे दफन भूमि के लिए तो उसे चेंज करने का अधिकार कैसे प्राप्त हो सकता है ?

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/

श्री. दिवाकर रावते : आपला मुद्दा बरोबर आहे परंतु कोणतेही आरक्षण हे केवळ ठराव मंजूर झाल्यावरच होत नाही. त्यावर नगरपालिकेच्या पातळीवर, महानगरपालिकेच्या पातळीवर आपल्याकडून सूचना मागविल्या जातात. हे झाल्यानतर तो आराखडा सरकारकडे येतो. नगरविकास विभाग पुन्हा एकदा जाहिरात देऊन आपले काय म्हणणे आहे ते मांडण्याची संधी देत असते. सरकारी कारणाकरिता वक्फची जागा घेता येत नाही, हा विषयच असू शकत नाही आणि तो असता कामा नये. देवाच्या नावावर जमिनी दिलेल्या आहेत. गरिबांचे भले करण्यासाठी हा कायदा आहे पण त्याबाबत काहीही खुलासा केलेला नाही. वक्फच्या जमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमणे झ ाली असतील तर ती काढली पाहिजेत याकरिता तो कायदा आहे. गरिबांचे भले झाले तर बरेच आहे. पण यामध्ये तुमच्याच लोकांनी लावलेल्या टपऱ्या तोडल्या जातील. अमुक ही वक्फची जागा आहे असे सांगून विकास अडवला जातो. त्यामुळे संभाजीनगरमध्ये गेल्या 25 वर्षापासून इंजिनिअरींग कॉलेज बांधले जात नाही. केवळ सांगितले जाते की, ही वक्फची जागा आहे. सरकारी अधिकारी हात बांधून गप्प बसले. आपल्या सुभेदारी गेस्ट हाऊसच्या समोरच ती इंजिनिअरींग कॉलेजची जागा आहे. कोणाची हिंमत होत नाही. ही वक्फची जागा शंभर टक्के नाही. समजा वक्फची जागा असली तरी वक्फच्या जागा शेकडो लोकांना इतर कामासाठी दिलेल्या आहेत अशा प्रकारचे निवेदन ज्यावेळी आपण करता

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 11:35

(श्री. दिवाकर रावते...

त्यावेळी संभाजीनगरमध्ये सरकारी कॉलेज, तंत्रनिकेतन निघत असेल तर त्यासाठी तुम्ही खुशीने जागा दिली पाहिजे. परंतु ती वक्फची जागा म्हणून ते तंत्रनिकेतन 25 वर्षे अडवून ठेवले. सार्वजनिक हिताचा गांभीर्याने विचार करायला पाहिजे. दादागिरी कुठपर्यन्त ?

सभापती महोदय, आमच्या संभाजीनगरमध्ये क्रांती चौक आहे. त्याचे मी उदाहरण देतो. हे किती लांच्छनास्पद प्रकारण आहे ते मी सांगतो. या सरकारला तर ते शंभर टक्के लांच्छनास्पद आहे. संभाजीनगरमधील क्रांतीचौकातील रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे ठरले. आजूबाजूला असलेल्या मराठी लोकांची सगळी दुकाने साफ करण्यात आली. मी हिंदू हा शब्द वापरुन जातीय रंग देत नाही. जी दुकाने पाडली त्यामध्ये आमच्या एक-दोन मुस्लिम बांधवांची देखील दुकाने होती. मध्ये एक टेकडी आली. ती टेकडी कसली आहे ? तर त्या क्रांतीचौकामध्ये एक कबरस्तान आहे. त्या कबरस्तानमध्ये 10x12 चा भाग आहे. तो भाग त्या रस्त्याच्या मध्ये येतो. 10x12 ची जागा म्हणजे तो अशूलखाना आहे. कबरस्तानामध्ये मृत व्यक्तीला आणल्यानंतर त्याच्या नावे शोक व्यक्त करण्याची ती जागा आहे. तो वजुखाना नाही, अशूलखाना आहे. वजुखान्यामध्ये मृत व्यक्तीच्या आत्म्याला शांती मिळावी यासाठी प्रार्थना केली जाते, शोक व्यक्त करुन, हातपाय धुऊन मुस्लिम बांधव निघून जातात. या जागेबाबत असे सांगण्यात आले की ती वक्फची जागा आहे, मशिद आहे, ती तोडायची नाही, रस्ता वाढवायचा नाही. सभापती महोदय, आजूबाजूचे सर्व साफ झाले. त्या ठिकाणी जातीय तणाव नको म्हणून 25 पोलीस आजही तंबू ठोकून बसलेले आहेत. गोविंदभाई श्रॉफ म्हणजे मराठवाड्यातील अंतिम शब्द. त्यांनी वर्तमानपत्रातून जाहीर केले की, "मी येथे लहानाचा मोठा झालो. मी अनेक मुस्लिम बांधवाच्या अत्यंविधीसाठी गेलो आहे. तो अशुलखाना नाही". परंतु हे म्हणतात की ती आमची वक्फची जागा आहे, ती मशिद आहे. त्यानंतर प्रकरण कोर्टामध्ये गेले. त्यांनी कोर्टामध्ये कोणताही पुरावा दिला नाही. त्या जागेच्या आजूबाजूची सर्व दुकाने उद्‌ध्वस्त झ ाली. त्यांचे पुनर्वसन झाले नाही. कोर्टात एकदा नाही तर दोनदा हरले. संभाजीनगर मधील एक मुस्लिम नगरसेवक नगरपालिकेमध्ये अगदी प्राबल्याने बोलले आणि तेथील कमिशनर तिस-यांदा हायकोर्टामध्ये गेले. कोर्टाने आदेश दिले की, विकासाच्या आड असल्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

गोष्टी येता कामा नयेत. ती जागा मिलिटरी डिप्लॉय करुन डिस्ट्रॉय करा, असे कोर्टाने आदेश दिले. या पंगू सरकारला, लांगूनचालन करणा-या सरकारला, त्यांच्या पेक्षा आमच्या भावना कशा दुखावतील हे पाहणा-या या सरकारला कोर्टाने आदेश दिले. त्यावेळी डॉ.पद्मसिंह पाटील हे बांधकाम मंत्री होते. त्यांनी त्याठिकाणी वनलेन फ्लायओव्हर बांधू असा प्रस्ताव पाठविला.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

दुसरा शब्द नाही. वन लेन फ्लायओव्हरचा प्रस्ताव दिला. तो कोर्टाने फेटाळून लावला. आजही परिस्थिती तशीच आहे. तुमच्या संवेदना या समाजाबरोबर रहायच्या आहेत ना? तुमचा हेतू प्रामाणिक आहे ना? वक्फ बोर्डाचे मंत्री म्हणून जा तिकडे. घ्या बैठक. विकासाच्या आड येणारा असूरखाना दुसरीकडे न्या. विकासाचा मार्ग मोकळा करतो असे सांगा. तरच तुमच्या याबाबतीत ज्या संवेदना आहेत त्यापेक्षाही तुमची अकाऊंटीबिलिटी सिध्द होईल. ते तुम्ही करणार नाही.

सभापती महोदय, कोणाला शिक्षा करायची? भिवंडी पोलीस ठाण्याचा प्रश्न आम्ही या सभागृहात लावून धरला. आम्ही या संदर्भात हक्कभंगाचा प्रस्ताव दिला आहे. परंतु निर्णय दिला जात नाही. या सदनामध्ये सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील उभे राहून म्हणाले होते की, सर्व गोष्टींची छानबीन 15 दिवसांच्या आत करु. सिध्द झाले तर ताबडतोब बांधकामाला सुरुवात करु. हळूच मागच्या दाराने वक्फ बोर्डाला कोर्टात पाठविले. कोर्टाने स्टे दिलेला नव्हता. परंतु कोर्टातील लढाई आहे. शेवटी ती जागा वक्फ बोर्डाची नाही त्यामुळे बांधकाम ताबडतोब सुरु करा असा कोर्टाने निर्णय दिला. अजूनही त्यांचे हात चोळणाऱ्या पोलिसांचे कोथळे काढले, डोळे फोडले, मेंदू फोडून टाकला. आम्ही अशा घटना इतिहासात वाचत होतो. परंतु प्रत्यक्षात हे घडले आहे. त्या जागेवर पोलीस स्टेशनचे बांधकाम सुरु होत नाही. सभागृहाचे सगळे पावित्र्य घालविले आहे. या सदनामध्ये प्रश्न सोडवायचे असतात. गुंता निर्माण करायचा नसतो. गुंता निर्माण करुन गेले याचे वाईट वाटते. वक्फ बोर्डाची जागा आहे असे सांगितले, कारण त्यांचा अवमान होऊ नये.

सभापती महोदय, पोपट भविष्य सांगण्यासाठी ज्याप्रमाणे कार्ड उचलून आणतो तसे कार्ड आणले. डी.शिवानंदन यांनी प्रेस कॉन्फरन्स घेतली आणि दोन्ही समाजांना एकत्र आणून प्रश्न मार्गी लावतो असे सांगितले. कशासाठी? वक्फ बोर्डाची ती जागा नाही. हा कायदा मंजूर करीत असताना या घटना घडतात याचे उत्तर मंत्रीमहोदय देणार आहेत का? इंजिनिअरिंग कॉलेजसाठी 25 वर्षे होऊनही जागा मिळत नाही. तिथे तुमच्या समाजाची मुले शिकणार नव्हती का? केवळ हिंदू मुलांकरीता ते कॉलेज होणार होते का? अजूनही जागा दिलेली नाही. वक्फ बोर्डाची जागा असली तरी या कामाकरीता का दिली जात नाही? कोणी शोध घ्यायचा? मला एक गोष्ट आठवते. टी.व्ही.वर जाहिरात दाखविली जाते. दोन मुले चिखलामध्ये मारामारी करीत असतात. पालकांना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.दिवाकर रावते.........

वाटते काय चालले आहे? ते चिंता व्यक्त करतात. परंतु ही मुले एकमेकांना डोळा मारतात. त्यांनी आपापसात हा खेळ चालविलेला असतो. तसे आपण ठरवून चिखल उडविण्याचे काम केले आहे. हा कायदा अगदी साधा कायदा आहे. अतिक्रमणे होत असतील तर ती काढून टाकायची. पूर्वीलक्षी प्रभावाने करायचे म्हणजे काय? काँग्रेस पक्षाने हा प्रस्ताव आणला असल्यामुळे याचे श्रेय त्यांना मिळणार आहे. त्यामुळे आपले काय असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसला पडणे स्वाभाविक आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी उठून उभे राहिले आणि म्हणाले पूर्वलक्षी प्रभावाने करा. पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे केव्हापासून? 1995 ला कायदा आला. त्यापूर्वीपासूनच्या नाही, तर एकदम पूर्वलक्षी. काय लांगूलचालन चालले आहे? करु नका. योग्य असेल ते करा. कायद्याने असेल ते जरुर करा. मुसलमान आहेत म्हणून करु नका. भारतीय बांधव, समाजाचे घटक म्हणून करा. नाही तर राहूल गांधींच्या गळ्यात पडलेली बॉम्बस्फोटाची माळ पुन्हा कधी कोणाच्या गळ्यात पडेल हे कळणार नाही.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, यासंदर्भात मी एकच सांगतो की, पाकिस्तान आणि हिंदुस्तान वेगळा झाला त्यावेळेस एका गोळीने महत्मा गांधी यांचा मृत्यू झाला. एका गोळीच्या शेकडो गोळया झाल्या व त्या त्या शेकडो गोळयांमुळे श्रीमती इंदिरा गांधी यांचा मृत्यू झाला. नंतर एलटीटीच्या हल्यात राजीव गांधींना फुलाचा हार घालून त्यांच्या शरिराच्या चिंधडया चिंधडया उडवल्या गेल्या. आता राहूल गांधी या देशाचे सुपूत्र आहेत, ते आपले नेतृत्व करीत आहेत. त्यांच्या सोबत असा प्रकार होऊ नये यासाठी, ज्यांनी असे प्रकार केलेले आहेत त्यांच्या विरुध्द आता तरी आपण कणखर भूमिका घ्या. केवळ मताच्या लाचारीचे राजकारण करु नका. त्यामुळे पाकिस्तान, शीख, एल.टी.टी.टी. मधील 1500 आतंकवादी आज सुध्दा फरारी आहेत. आज जो प्रकार चालू आहे तो असाच चालू राहिला तर हुरळली मेंढी अन लागली लांडग्याच्या मागे अशी पाळी येईल त्यामुळे यासंदर्भात गंभीर दखल घ्यावी एवढीच विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, या बिलाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. वक्फ बोर्डाच्या जमिनीवर अतिक्रमणे आणि अवैध रित्या ज्यांनी कब्जे केलेले आहेत ते काढले गेले पाहिजेत, या जमिनी मोकळया झाल्या पाहिजेत. वक्फ बोर्डाच्या जमिनींचा उपयोग मुस्लीम समाजाला झाला पाहिजे आणि त्यातून त्यांचा विकास झाला पाहिजे अशा अपेक्षेने जर हे बील येथे आणले असेल तर ते योग्य आहे असे मला वाटते. "वक्फ" या शब्दाचा अर्थ असा आहे की," Wakf means any Muslim donating any moveable or immoveable property which is for the religious and pious purpose for the welfare of the society that is called a Wakf. मुस्लीम धर्मासाठी, समाजाच्या कल्याणासाठी, उन्नतीसाठी मुस्लीम समाजातील व्यक्तींनी या जमिनी दान केलेल्या आहेत, चल अचल संपत्ती दान केलेली आहे त्याला वक्फ म्हणतात. यासंदर्भात शरियत आणि मुस्लीम लॉमध्ये बरेच काही सांगितलेले आहे. मी यासंदर्भात माहिती घेण्याचा प्रयत्न केला होता त्यावेळी मुस्लीम धर्मात असे लिहिले आहे की, "मुस्लीम समाजातील लोकांनी अशा प्रकारे दान केलेल्या प्रॉपर्टीचा दुरुपयोग केला, त्या प्रॉपर्टीचा स्वत:साठी वापर केला, आपल्या ताब्यात घेतली तर त्याला फार मोठे पाप मानले जाते. वक्फ प्रॉपर्टी रिलिजिअस व पायस म्हणून मुस्लीस समाजाच्या विकासासाठी वापरली गेली पाहिजे. प्रश्न असा आहे की, खरे म्हणजे या प्रॉपर्टीचा उपयोग मुस्लीम समाजाच्या विकासासाठी झाला पाहिजे. हिंदू मंदिरात पैसे किंवा जमिनी दान केल्या जातात व दान केलेल्या चल व अचल संपत्तीचा उपयोग त्या धर्मातील लोकांसाठी झाला पाहिजे. लोकांच्या कल्याणासाठी या चल आणि अचल संपत्तीचा उपयोग झाला पाहिजे. अशा प्रकारे जर उपयोग होत असेल तर त्यामध्ये काहीही गैर नाही. घटनेने तशा प्रकारचे अधिकार सुध्दा दिलेले आहेत. त्यामुळे याला विरोध करण्याचा प्रश्नच येत नाही. परंतु ज्यांनी अशा प्रकारच्या जागा बळकावल्या असतील, अतिक्रमणे केली असतील तर त्या जागा मोकळया करणे, व त्या जागांचा उपयोग त्या त्या समाजासाठी करुन देणे हे सरकारकडून अपेक्षित आहे. परंतु वक्फ बोर्डच्या जमिनीच्या संदर्भात गेल्या काही वर्षापासून अशा प्रकारे पुष्कळ जमिनी लाटल्या गेलेल्या आहेत. या जमिनीच्या संदर्भात बरेच घोटाळे झालेले आहेत, या जमिनी ट्रान्सफर देखील झालेल्या आहेत. त्यामुळे या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी आपण हा कायदा करीत आहोत.

====3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

त्यामुळे तुम्हाला या कायद्याने अधिकार मिळाल्या नंतर आपण किती दिवसात ज्यांनी जमिनी हडपलेल्या आहेत, लाटलेल्या आहेत, बळकावल्या आहेत, ट्रान्सफर करुन घेतलेल्या आहेत त्या आपण किती दिवसात मोकळया करणार आहात याची माहिती या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी चितलांगे केसच्या संदर्भात अभ्यास केलेला आहे. या केसच्या संदर्भात जे न्यायाधीश होते त्यांची वक्फ बोर्डाच्या जमिनीच्या संदर्भात चौकशी करण्यासाठी नेमणूक केलेली आहे. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी हाय कोर्टास सांगितले होते. त्या प्रमाणे हायकोर्टाच्या न्यायाधीशांची नेमणूक केली आहे. यासंदर्भात मी देखील हायकोर्टाला पत्र लिहिले होते की, ही चौकशी निश्चित काळात संपली पाहिजे. अन्यथा त्याचा काही उपयोग होणार नाही. परंतु यासंदर्भात अजून पर्यंत काहीही निर्णय झालेला नाही. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, यासंदर्भात त्यांनी देखील लक्ष घालावे. चौकशी निश्चित काळात संपली पाहिजे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...........

अशाप्रकारची भूमिका सरकारी अधिकारी घेऊ शकतात. सरकारला मनापासून मुस्लिमांचा विकास करायचा असेल तर त्यांच्यासाठी एक कालबध्द कार्यक्रम ठरवून त्याची अंमलबजावणी केली पाहिजे.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, परवा मी जे सांगितले ते सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना का कळले नाही ते मला माहीत नाही. माननीय शिवसेना प्रमुखांनी काय सांगितले ते त्यांना माहीत आहे. पण त्यादिवशी ते असे का बोलले मला माहीत नाही. माझी त्यांच्याबद्दल तक्रार नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, आमचा मुस्लिमांच्या सर्वंकष विकासासाठी विरोध नाही. आमचा विरोध अफझल गुरु आणि पाकिस्तानातील आय.ए.एस. आतकंवाद्यांविरुध्द आहे. श्री.राहुल गांधी, श्रीमती सोनिया गांधी यांच्यावर डायरेक्ट व इनडायरेक्ट ॲटक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या जात्याधांच्या विरोधात आहे. तुष्टीकरण आणि विकास या दोन गोष्टींचे पृथक्करण करुन त्याचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना मी सांगू इच्छितो की, संसदेवर हल्ला केला की, संशय निर्माण होतो. त्याचा अर्थ आपण नीट समजावून घेतला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांना सांगू इच्छितो की, संसदेवर हल्ला झाला त्या हल्ल्यामागे अफझलगुरुचे मास्टर माईन्ड होते. अफझलगुरुने संसदेवर हल्ला केला म्हणून त्यास सेशन कोर्टाने, हाय कोर्टाने व सुप्रीम कोर्टाने फाशीची शिक्षा दिलेली असताना सरकार त्याची अंमलबजावणी का करीत नाही ? जम्मू व काश्मिर राज्याचे व कॉंग्रेस पक्षाचे मुख्यमंत्री श्री.गुलाब नबी आझाद तसेच राष्ट्रवादी पक्षाचे सदस्य श्री.तारीक अन्वर यांनी देखील अफझलगुरुची फाशीची शिक्षा माफ करावी म्हणून माननीय राष्ट्रपतींकडे विनंती केलेली आहे. सत्य असे आहे की, सेशन कोर्टाने, हाय कोर्टाने व सुप्रीम कोर्टाने अफझलगुरुस फाशीची शिक्षा सुनावल्यानंतरही त्यास सरकारने फाशीची शिक्षा दिलेली नाही. गुन्हेगारांना जात, पंथ, धर्म नसतो. ज्यांनी देशाच्या संसदेवर हल्ला केला त्यास फाशीची शिक्षा झाली पाहिजे. परंतु सरकार त्यांचे तुष्टीकरण करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...........

सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या जमिनीवर इंजिनिअरींग कॉलेजेस, आय.टी.आय. कॉलेजेस उघडून मुस्लिमांना विकासाचा अजेंडा दिला पाहिजे. गेली 60 वर्षे काँग्रेस पक्षाचे सरकार होते. युतीचा कालावधी फक्त साडेचार वर्षाचा होता. युतीचे सरकार फक्त त्याच कालावधीपुरते जबाबदार आहे. परंतु उरलेल्या 55 वर्षात कॉग्रेस पक्षाचे सरकार होते. या सरकारला मुस्लिमांच्या विकासाबाबत काही करायचे आहे का याबाबत संशय निर्माण झालेला आहे. ते मुस्लिमांचे तुष्टीकरण करीत आहेत आणि आम्ही या तुष्टीकरणाच्या विरोधात आहोत.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी "सेक्युलर" या शब्दाचा अर्थ डिक्शन्रीमध्ये पहावा. "सेक्युलर" या शब्दाचा अर्थ "सर्वधर्म समभाव" असा आहे. धर्मनिरपेक्ष असा नाही. इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्या अंत्येष्टीवेळी वेदमंत्राचे पठण झाले होते. सरकार धर्मनिरपेक्ष असते, पण व्यक्ती कधीही धर्मनिरपेक्ष असू शकत नाही. अनेक जण वेदमंत्र पोथ्या वाचणारे आहेत. माझ्यासमोर बसलेले कोणी साईबाबांकडे जातात, कोणी सत्यसाईबाबांकडे जातात. कोणी कोणाकडे जावे हा त्यांचा अधिकार आहे. घटनेमध्ये धर्माचे आरक्षण मांडलेले नाही. त्यामुळे धर्मावरील आरक्षणबाबतची केस उच्च न्यायालयात जिंकू शकणार नाही हे आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांना माहीत होते.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ पूर्वी श्री.अजित... 11:55

श्री.नितीन गडकरी...

परंतु केवळ आम्ही आपल्या बाजूने आहोत हे दाखवण्याकरिता व त्यांची मते मिळवण्याकरिता हे सर्व घडलेले आहे. तेव्हा माझी आपल्याला अशी विनंती आहे की, या जमिनीचा विनियोग करीत असताना या समाजातील दलित, पिडित, शोषित, अल्पसंख्याक, बहुशोषित या सगळया समाजाला आपण विकासाचे दरवाजे उघडे करुन दिले पाहिजेत. म्हणून माझी विनंती आहे की, या जमिनीचा विनियोग करीत असताना, याबाबतची चौकशी करीत असताना, किती वर्षाच्या आत आपण हा कार्यक्रम राबविणार आहात, याचाही खुलासा करावा. अन्यथा अशाप्रकारची दुरुस्ती केल्यानंतर पुन्हा दोन वर्षाने सांगाल की, आम्ही या कायद्यात दुरुस्ती केली परंतु अजून चौकशी झाली नाही त्यामुळे आम्हाला जागा ताब्यात घेता आल्या नाहीत. पुढे 20-20 वर्षे जर अशाप्रकारे हे प्रकरण चालणार असेल तर त्याला काहीही अर्थ राहणार नाही. आपण याबाबतीत बराच संयम ठेवून याकडे दुर्लक्ष केले व त्यामुळेच 24 रुपये स्क्वेअर फुटाने मशिद विकल्या गेल्या. आम्ही जातीयवादी, सांप्रदायवादी आहोत, असे आमच्यावर आपण आरोप करता परंतु आमच्यापैकी कोणीही मशिद विकलेली नाही. आपण मात्र मशिदही विकून मोकळे झालात व कब्रस्तानातील मुडदेही उखडून मोकळे झालात. आज सगळे अनाथालये, दर्गे आपण हातात घेतलेत. यामध्ये सगळे लोक हे काँग्रस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचेच आहेत. त्यामध्ये जर बीजेपी किंवा शिवसेनचा निघाला असता तर आपण जल्लोष करुन आमची नांवे येथे घेतली असती. परंतु यामध्ये सगळे आपलेच बंधू निघाले. ही गोष्ट स्वत:ला सेक्यूलर म्हणणाऱ्यांना योग्य वाटते का ? आपल्या पांढऱ्या चेहऱ्यावर हा काळा डाग लागलेला आहे. तो डाग जर आपल्याला कृतीने बदलवायचा असेल तर या समाजाच्या विकासाचा कार्यक्रम करीत असताना व विज्ञानाच्या 21 व्या शतकात जात असताना विज्ञान, तंत्रविज्ञ ाान या माध्यमातून हया समाजाला पुढे घेऊन जावे. या जमिनीचा उपयोग या कारणांसाठीच झाला पाहिजे, असे मला वाटते. परंतु याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी माझ्यावर जो आरोप केला, तो अतिशय बेजबाबदारपणाचा आहे. खरे म्हणजे संकेत हा आहे की, सभागृहामध्ये सहयोगी पक्ष असताना अशाप्रकारे बोलायचे नसते. याबाबतीत राष्ट्रवादी काँग्रेसवाले व काँग्रेसवाले बंधने पाळतात. परंतु याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी उत्साहाच्या भरात जे आरोप केलेत ते अतिशय चुकीचे व बिनबुडाचे आहेत. मी स्वत:च सांगतो की, तुष्टीकरणाच्या आम्ही विरोधात आहोत, कुठल्याही प्रकारचे तुष्टीकरण आम्हाला मान्य नाही. परंतु

..2....

30-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) X-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

याचा अर्थ प्रत्येक मुस्लीम व्यक्तिचा आम्हाला विरोध आहे अशाप्रकारची भावना मांडणे बरोबर नाही. प्रत्येक मुसलमान नको अशाप्रकारची जर भावना असती तर शिवसेनाप्रमुखांनी या देशाचे राष्ट्रपती म्हणून डॉ.अब्दुल कलाम यांच्या नावाला कधीच मान्यता दिली नसती. त्यांनी मान्यता याकरिता दिली की, डॉ.अब्दुल कलाम आमचे आदर्श आहेत, ते आमचे प्रेरणास्थान आहेत. त्यांचे 'अग्नीपंख' हे आत्मचरित्र वाचल्यानंतर मी प्रभावित झालो. त्यामुळे माणूस हा जातीने किंवा धर्माने श्रेष्ठ नाही तर तो गुणांनी श्रेष्ठ होतो. म्हणूनच माननीय शिवसेनाप्रमुखांनी डॉ.अब्दुल कलाम यांच्या उमेदवारीचे समर्थन केले. मला असे वाटते की, याबाबतीत तुष्टीकरण आणि मुस्लीम समाजातील विकास यात गल्लत होता कामा नये. आपण जे तुष्टीकरण करीत आहात, ते चुकीचे आहे. आपण व्होट बँक पॉलिटीक्स करीत आहात, आपण अफझल गुरुला फाशी देत नाही, हे योग्य नाही. ....(अडथळा)...आमच्या येथे पाशा पटेल आहेत ना ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीनजी गडकरी हे राष्ट्रीय भाषण करीत आहेत व आम्ही मुसलमानांच्या विरोधात नाहीत, असे सांगत आहेत. मला वाटते की, त्यांनी केव्हातरी स्पष्ट आणि खरे बोलले पाहिजे. गुजरातमध्ये निवडणुका होत असताना, त्याठिकाणी दुर्दैवाने फार मोठा तणाव निर्माण झालेला आहे. अशावेळी तो तणाव दूर करण्यासाठी भारतीय जनता पार्टीची भूमिका मुसलमानांच्या विरोधातील नाही तर राष्ट्रद्रोही मुसलमांनाच्या विरोधात आहे अशाप्रकारची भूमिका त्यांनी तेथे मांडली पाहिजे. परंतु राष्ट्रांवर प्रेम करणा-या मुस्लीम उमेदवारांस एखादे तिकीट जर गुजरात निवडणुकीत दिले असते तर त्यांचे भाषण अधिक उठावदार झाले असते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी, गुजरातमध्ये होत असलेल्या निवडणुकीचा विषय काढला. गुजरातच्या पार्लमेंटरी बोर्डामध्ये कोणी तिकीटे मागितली, याची लिस्ट माझ्याजवळ नाही. परंतु या देशातील मुस्लीम समाजाच्या उमेदवारांना भारतीय जनता पार्टीने लोकसभा, राज्यसभा, विधानसभा व विधानपरिषदेमध्ये तिकीटे दिलेली आहेत. या नागपूर शहरामध्ये आम्ही उपमहापौर देखील त्याच समाजाचा केलेला आहे. आपणांस जर विचारले की, लातूर नगरपालिकेमध्ये त्यांना आपण किती तिकीटे दिली तर त्याचा हिशेब आपण काय सांगणार ?

(..3...



SSP/ SBT/ पूर्वी श्री.अजित... 11:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, आम्ही जेव्हा एखादी गोष्ट करतो तेव्हा आपण तुष्टीकरण करीत आहात असे म्हणता. परंतु आपण जेव्हा विचार मांडता तेव्हा आमचा तुष्टीकरणास विरोध आहे, असे आपण म्हणता.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख........

आम्ही कोणाला तिकिटे दिली, मंत्री केले की तुष्टीकरण केले असे म्हणायचे, म्हणजे तुमची जी आयडॉलॉजी आहे, जी तुम्ही या ठिकाणी सांगत आहात, त्याबाबत शंका उत्पन्न होते. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत भूमिका मांडली, सन्माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या मताबद्दल सांगितले, त्याबद्दल आम्हाला काही म्हणावयाचे नाही, तो त्यांचा आपापसातील प्रश्न आहे. वक्फ बोर्डाच्या जमिनींच्या संदर्भात गैरव्यवहार होत आहेत, काँग्रेसच्या लोकांनी जमिनी हडपण्याचा प्रयत्न केला आहे, असा जो आरोप त्यांनी केला आहे, त्याबाबत चौकशी होईल, संबंधितांवर कारवाई होईल. त्यामुळे त्यांचे म्हणणे आम्हाला मान्य आहे. त्यांनी जे आरोप केले त्याबाबत चौकशी करण्याचे आम्ही मान्य केले आहे. एवढे सर्व सांगत असतांना, उदार, उदात्त हेतू समोर ठेवून सांगत असतांना..... गुजराथबाबत परवाच आम्ही सांगितले की, एवढी एवढी तिकिटे जाहीर केली, एकही मुस्लिम उमेदवाराला तिकिट दिलेले नाही.... एवढे सर्व सर्वधर्मसमभावाबाबत सांगत असतांना त्यांना एखादाही मुस्लीम उमेदवार सापडला नाही, जो या राष्ट्रावर प्रेम करणारा आहे. आमची तक्रार नाही आणि हे सत्य आहे की, ते स्वत: महाराष्ट्राचे भाजपाचे अध्यक्ष असल्याने तेथील पार्लमेंटरी बोर्डाने निर्णय केला, त्याची त्यांना माहिती नाही, मान्य आहे. परंतु, येणा-या विधानसभेमध्ये दोन-चार तिकिटांची अपेक्षा आपण करु.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, तिकिटे वाटून वाटूनच मुस्लीम समाजाचा तुम्ही घात केला. तिकिटे देता पण सन्माननीय ज्येष्ठ नेते श्री.अे.आर.अंतुले आणि सन्माननीय मंत्री श्री.अनिल अहमद यांची तुम्ही जी हालत केली त्यावरुन तुमचे मुस्लीम प्रेम दिसून आले. ठीक आहे. सन्माननीय मुख्यमंत्री महोदय, मी आपल्याला एक छोटा प्रश्न विचारतो. त्या अफझल गुरुला सुप्रिम कोर्टाने, सेशन कोर्टाने फाशीची शिक्षा दिली. त्या ठिकाणी जी सिक्युरिटी होती त्यांनी त्यांना मिळालेले गोल्ड मेडल परत केले, अशापरिस्थितीत अफझल गुरुला फाशी देत नाही, ही कोणती पध्दत आहे, हे कोणते तुष्टीकरण आहे आणि हे कोणत्या कायद्यात बसते ? घटनेमध्ये गुन्हेगाराला जात, धर्म, पंथ, भाषा नसते. तुमच्या पक्षाचे सोडा, राष्ट्रवादी काँग्रेसने, मुंबईमध्ये

...2........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

बॉम्बब्लास्ट झाला....माझे काही बोल काही लोकांना अस्वस्थ करतात, त्यांना ते सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही....राष्ट्रवादी काँग्रेसने मजीद मेमन यांना त्यांच्या पक्षाचा जनरल सेक्रेटरी केला. काय केले या मजीद मेमन यांनी ? मुंबईत झालेल्या बॉम्बब्लास्टमधील आरोपींचे ते वकील होते. मला वाईट वाटले. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसबद्दल मी आक्षेप घेत नाही. पण सगळया मुस्लीम समाजाच्या विकासासाठी जरुर काम करा, मत मिळतील म्हणून मजीद मेमनला जनरल सेक्रेटरी करता, उत्तर प्रदेशच्या निवडणुकीत फायदा होईल म्हणून हे करता ? हे खरे शल्य आहे. माझे शल्य हे आहे की, पार्लमेंटवर हल्ला केला त्याला फाशीची शिक्षा देण्याची हिंम्मत का दाखवत नाही ? सुप्रिम कोर्ट, सेशन कोर्ट यांनी फाशी दिली, ही फाईल का दाबून ठेवली आहे ? हे तुष्टीकरण आहे, ते होता कामा नये, मतपेटीच्या राजकारणाकरिता विचार होता कामा नये. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व लोकांचा विकास झाला पाहिजे, असा विचार मांडला होता. वक्फ बोर्डाबाबत विचार करतांना माझी वेळोवेळी विनंती राहिली आहे की, जोपर्यन्त मुस्लीम समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार होणार नाही, जोपर्यन्त विज्ञान, तंत्रज्ञान शिकविले जाणार नाही, महिलांना समान अधिकार मिळणार नाहीत, आय.ए.एस., आय.पी.एस., डॉक्टर, इंजिनिअर यासाठी त्यांना शिक्षण दिले जात नाही, तोपर्यन्त ख-या अर्थाने मुस्लीम समाजाचा विकास होणार नाही. सन्माननीय मंत्री अनिल अहमद या ठिकाणी उपस्थित आहेत. मी नागपूर जिल्हयाचा पालकमंत्री असतांना नागपूर येथील अंजुमन-ए-ईस्लाम या विद्यालयाच्या पदाधिका-यांना बोलावून घेतले, त्यांना इंजिनिअरींग कॉलेज मिळवून दिले. त्यांना इंजिनिअर बनविले पाहिजे, डॉक्टर बनविले पाहिजे, असा विचार केला. आपण मुस्लिम समाजाचा विचार करीत नाही, मतपेटीचे राजकारण करता, तुष्टीकरण करता, साठ वर्षात त्यांना तुम्ही काय दिले ? चहाचा ठेला, पान टपरी, कबाडी, ट्रक ड्रायव्हर, क्लिनर यापेक्षा सहावा धंदा आपण त्यांना दिला नाही. माझी विनंती आहे की, जमिनीच्या चौकशीसंबंधी टाईम बाऊंड प्रोग्रॅम जाहीर करा, किती दिवसात कार्यवाही करणार याबाबत निश्चित कार्यक्रम जाहीर करा. या जमिनी म्हणजे, "Wakf means a property donated with religious and pious purpose for the welfare of the Society" हे जे दान केले आहे त्याच्या उद्देशाप्रमाणे जर कृती झाली तर ख-या अर्थाने मुस्लीम समाजाला मदत केल्यासारखे

.....3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.........

होईल. हे उद्देश कृतीत कधी आणणार आहात ? हे केले तरच काम करता, असे होईल. साठ वर्षे मुस्लिम समाजाने खूप पाहिले आहे. मालेगावमध्ये काय झाले, भिवंडीमध्ये काय झाले, समाजाचा काय विचार केला, हे देखील माहिती आहे. जे आहेत ते दु:खी आहेत, दिल्लीमध्ये जे आहेत तेही दु:खी आहेत. त्यामुळे प्रत्यक्षात काय आहे, ते करुन दाखवावे, एवढीच विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----------------

यांनतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ प्रथम श्री.रोझेकर ........ 12:05

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी त्यांच्या भाषणामध्ये माझा नामोल्लेख करुन मी जे काही बोललो त्याबद्दल त्यांनी भावना व्यक्त केल्या. मी त्यांना एवढेच सांगतो की, तुमच्या विरोधात बोलणे, तुम्हाला दुखावणे असा विषय नव्हता. तुम्ही जो विषय आता मांडला तोच विषय होता. त्या जमिनी लवकर मोकळया करुन तेथे कॉलेजेस् बांधा. प्रायमरी एज्युकेशनच मुळात मिळत नाही तर कॉलेज बांधून कोण येणार, हा विषय होता. तुष्टीकरण हा शब्द मी वापरलाच नाही आणि आता विषय अब्दुल कलाम आणि शिवसेना प्रमुखांच्या भूमिकेचा आहे. त्यावेळी आपण केलेत. पण त्यानंतर पुन्हा अब्दुल कलाम राष्ट्रपती पदाचे उमेदवार झाले त्यावेळी शिवसेनेने धोरण जाहीर केले की, ज्यांनी अफजल गुरुच्या फाशीच्या शिक्षेच्या फाईलवर सही केली नाही त्यांना शिवसेना पाठिंबा देणार नाही. पार्लमेंटवर हल्ला करणा-याला फाशीची शिक्षा होणार नसेल तर देशभक्त म्हणून मी राष्ट्रपती पदाचा राजीनामा देतो एवढे तरी त्यांनी बाणेदारपणे बोलावयास पाहिजे होते. परंतु ते अफजल गुरुच्या बाबतीत बोलले नाहीत. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, राष्ट्रपतींनी अफजल गुरुच्या फाशीच्या शिक्षेच्या फाईलवर सही केली नसेल आणि ते पुन्हा राष्ट्रपती पदाचे उमेदवार म्हणून उभे राहिले तर शिवसेना त्यांना पाठिंबा देणार नाही, हेही धोरण शिवसेना प्रमुखांनी जाहीर केले होते. शिवसेनाप्रमुख आपल्या मतांवर आणि आपल्या भूमिकेवर कायम ठाम असतात आणि ते कधीच बदलत नाहीत.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.अनिस अहमद : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक 8 संमत करावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2007 चे वि.प.वि.क्र. 8 संमत झाले आहे.

--------

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LXXV OF 2007

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.)

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 75-महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 75 महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 च्या कलम 73 चच मधील खंड पाचमध्ये असे म्हटलेले आहे की, संस्था चालवित असलेल्या धंद्यासारखाच धंदा त्या व्यक्तीने स्वत:च्या नावे किंवा आपल्या कुटुंबीयांपैकी कोणाच्याही नावे चालविला असला तर अथवा संस्था चालवित असलेल्या धंद्यासारखाच धंदा चालविणा-या अशा एका भागीदारी संस्थेत ती किंवा तिच्या कुटुंबीयांपैकी कोणताही सदस्य भागीदार असेल किंवा अशा एखाद्या कंपनीत संचालक असेल तर अशा कोणत्याही व्यक्तीस समितीचा सदस्य म्हणून नेमणूक होण्यास, नामनिर्दिष्ट होण्यास, निवडून येण्यास, स्वीकृत केली जाण्यास किंवा सदस्य म्हणून राहण्यास पात्र असणार नाही.

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत/प्रसिद्धीपूर्व नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावंकर......

सभापती महोदय, यामध्ये दोन सुधारणा केलेल्या आहेत. कारण या बाबीमुळे अनेक चांगले पात्र लोक या सहकारी संस्थेपासून दूर जात होते. जे अपात्र आहेत, त्यांच्यामुळे इलेक्शन डिस्प्यूट्स होतात. उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण या पार्श्वभूमीवर सहकार चळवळ सुध्दा अनुभवी लोकांच्या मदतीने चांगली चालावी यादृष्टीने ज्या काही सुधारणा करण्यात आलेल्या आहेत,त्या मान्य करण्यात याव्यात, अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

( **सभापतीस्थानी : माननीय तालिका सभापती श्री.उल्हास पवार** )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी असा आग्रह धरतो की, अशाप्रकारचे विधेयक ज्या वेळेला या सदनामध्ये येते त्यावेळेला सरकार अशा विधेयकावर वर्षभर विचार करीत असते. अशाप्रकारे काही घटना घडतात आणि नंतर एवढया घडलेल्या घटनांमधून ज्यावेळेला नाईलाज होतो त्यावेळी असे करणे भाग होते व त्यावेळेला नस्ती तयार होते आणि त्या नस्तीवर विविध विभागाचे निरनिराळे अभिप्राय घेतले जातात. असे करुन नंतर मंत्रिमंडळासमोर हा विषय येतो आणि मग ते विधेयक तयार होते, ते विधेयक लॉ ॲण्ड ज्युडिशियरीकडे म्हणजे कायदे विभागाकडे जाते. अशाप्रकारे विधेयक बनण्यामागे वर्षभर तरी तरतूद असते एखादे विधेयक घाईघाईने आणावे लागते. जसे बारबालांचे विधेयक घाईघाईमध्ये आणून ते पास केले. त्यानंतर त्या विधेयकाच्या विरोधात, त्या कायद्याच्या विरोधात लोक कोर्टात गेले. अशा प्रकारे घाईघाईने केलेले कोणतेही कृत्य अंगाशी येते. सरकार हे नेहमीच सावध चालते आणि प्रशासन त्यापेक्षाही सावध चालते, असे आम्ही गृहित धरलेले आहे. या सरकारची मानसिकता तशीच असली पाहिजे. परंतु ती कृतीत दिसत नाही. हा माझा आक्षेप आहे. सरकारला हे विधेयक मांडावयाचा नैतिक अधिकार नाही, हा माझा आणखी आक्षेप आहे. माझ्याकडे आता महाराष्ट्रातील 14 बँकांची प्रकरणे आहेत. जी या अंतर्गत येतात. हे विधेयक त्यांच्याचसाठी आहे. ज्यांनी या बँकांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार केला. ज्यांनी बँका लुटून खाल्ल्या. ते सर्व पुन्हा पुन्हा बँकांच्या निवडणूकीला उभे राहतात आणि निवडून येतात. ज्यांनी साखर कारखाने उध्वस्त केले त्यांच्या कलम 88 खाली चौकशा होऊन त्यांच्यावर दोषारोप दाखल केले गेले. तरी ते सरकारचेच सगे-सोयरे आहेत म्हणून त्यांना वाचविणे आवश्यक आहे या भावनेखाली त्यांना संरक्षण देण्याचे काम सरकारने केले आणि त्याचा परिणाम सहकार क्षेत्र उध्वस्त होण्यामध्ये झालेला आहे. हे मी वेगळे सांगण्याची गरज नाही. यात हजारो कोटी रुपयांचा अपहार झालेला आहे. लोक तुरुंगात जाऊन येतात आणि बेशरमपणे पुन्हा बँकांच्या निवडणूकीला उभे राहून निवडून येतात. काही लोक येथे आमदार म्हणून उपस्थित राहतात. त्यांच्याबद्दल वर्तमानपत्राचे रकाने भरले जातात. जीवावर उदार होऊन वर्तमानपत्रांचे वार्ताहर अशा गोष्टी बेधडकपणे लिहितात परंतु त्याची नोंद घेतली जात नाही. याचा मला खेद होतो म्हणून हे प्रकरण मी मुद्दाम मांडतो. सरकारचा जर हे विधेयक मांडण्यामागे काहीतरी प्रामाणिक व सत्शील हेतू असेल तर आणि ख-या अर्थाने सहकार

.....3



JPK/ प्रथम श्री.बोरले..... 12:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

क्षेत्रामधील कै.वसंतदादा पाटील यांना सन्मानित करुन खरी आदरांजली द्यावयाची असेल तर त्यांनी उभे केलेले हे सहकार क्षेत्र वाचवा. त्यांनी उभा केलेल्या कारखान्यांपैकीही काही कारखाने तुम्ही बुडविले, आहे का अशी नैतिकता तुमची, हे सहकार क्षेत्र वाचविण्याची ? परवा सन्माननीय श्रीमती शालिनीताई पाटील यांना भेटल्यावर ज्यावेळी त्यांना मी नमस्कार केला त्यावेळी मला स्व.वसंतदादा पाटील यांनाच नमस्कार केल्यासारखे वाटले. आपण कारखाने बुडविता म्हणजे शेतक-याला बुडविता हे तुम्हाला कळत नाही का ?

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ पूर्वी कु.खर्चे 12:15

श्री.दिवाकर रावते .....

सभापती महोदय, श्रीमती शालिनीताई पाटील यांची कोंडी करण्याकरिता शासनातील लोक हे करीत आहेत. ज्यांनी मुलभूत पाया निर्माण केला त्या स्व.वसंतदादा पाटील यांच्या स्मृतिवर आपण आघात करीत आहोत, त्यांना तुम्ही विसरला आहात. कशासाठी हे राजकारण करता ? त्यांचा कारखाना आता डबघाईला आला म्हणून माननीय मंत्री महोदय श्री.विनय कोरे यांनी घेण्याचा प्रयत्न केला. श्री.विनय कोरे यांनी विदर्भ व मराठवाडयातही कारखाने चालविण्यासाठी घेतले आहेत. श्री.विनय कोरे कारखाना चालवित आहेत, चांगले काम करीत आहोत म्हणून मी त्या भागात त्यांच्या विरोधात गेलो नाही. त्यावेळी त्यांच्या विरोधात उभे राहण्यासाठी सर्वजण वातावरण तयार करीत होते. बंद पडलेला व एका आमदाराने लुटून खाल्लेला कारखाना श्री.विनय कोरे हे लिजवर घेऊन चालवित आहेत. शेतकऱ्यांच्या उसाचे गाळप झाले पाहिजे, त्यांचा कारखाना चालविण्याचा चांगला अनुभव आहे. त्यांनी या कारखान्यात 4 लाख टनाचे गाळप केलेले आहे, याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. शेतकऱ्यांना पक्षाचे देणे-घेणे नाही. आमच्या लोकांना डावलले, तुमच्या लोकांना घेतले यापेक्षा सर्व शेतकऱ्यांचा उस गाळप झाला याला महत्व आहे. यावर्षी तुम्ही तीन कारखाने चालविले. मला मनापासून बरे वाटले आणि मी दूरध्वनीवरुन तुमच्याशी बोलले आहे. माझी प्रवृत्ती चांगली आहे. शेतकऱ्यांबरोबर तुमची बांधिलकी असेल तर तो कोणत्या पक्षाचा आहे हे पाहण्यापेक्षा तुमचा हेतू महत्वाचा असतो. या वर्षी पुन्हा कारखाने चालवा. अडचणी आल्या तर शेतकऱ्यांच्या हिताकरिता मी तुमच्यासोबत उभा राहीन. तुमच्या विरोधात एकही आंदोलन मी करु दिले नाही. पण तुमच्या विरोधकांनी तुमच्यावर मात करण्यासाठी मिळेल त्या क्षणाची वाट पाहिली. खरे किंवा खोटे, योग्य की अयोग्य याची शहानिशा करुन तुमच्या मागे लागले पाहिजे. ही राजकीय धारणा जेथे निर्माण झाली पाहिजे. शासनाने प्रामाणिकपणे शेतकऱ्यांच्या हिताकरीता काही केले पाहिजे. तुम्ही सर्व सरकारमध्ये आहात. श्रीमती शालिनीताई पाटील तुमच्याच आहेत. श्री.विनय कोरे यांनी ॲग्रीमेंट केले होते की, त्यांचा कारखाना चालविण्यासाठी धेणार, परंतु त्यांच्यावर मोठा दबाव आणला, मंत्रीपद जाईल असे सांगितले त्यामुळे हे ॲग्रीमेंट त्यांना रद्द करावे लागले. याबाबत मी सांगू इच्छितो की, तुमची कोणाशी राजकीय दुष्मनी असेल तर निवडणुकीत ती काढा, त्यांना पाडून दाखवा. कै.वसंतदादा पाटील यांची पुण्याई एवढी मोठी आहे की, श्रीमती शालिनीताई पाटील यांना कोणी किती संपवायचा प्रयत्न केला तर त्या संपणार नाहीत.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/

श्री.दिवाकर रावते.....

तेथे श्री.मदन पाटील आज आहेत. सभापती महोदय, शासनातील या लोकांनी सभागृहात सांगावे की, आम्ही असे काही केले नाही. होय म्हटले तर लगेच श्रीमती शालिनीताई पाटील हया प्रेसवाल्यांना घेऊन चालतील. शेतकऱ्यांच्या हिताकरिता एखादा माणूस काम करीत असेल तर, केवळ आपल्या वैयक्तिक राजकारणाकरिता सहकार क्षेत्रातील एखादा कारखाना संपला तरी चालेल ही आपली नैतिकता आहे का ? हे मी विचारु इच्छितो.

सभापती महोदय, यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादीत येथील विद्यमान संचालक मंडळाची यादी माझ्याकडे आहे. येथे किती भ्रष्टाचार झालेला आहे हे मला मांडावयाचे आहे. श्री.विजयराव भोपासिंग चव्हाण अध्यक्ष आहेत. श्री.वसंतराव विश्वासराव घुईखेडकर व श्री.सुरेश नरसिंगराव लोणकर उपाध्यक्ष आहेत. संचालक मंडळामध्ये श्रीमती छायाताई अशोकराव शिर्के, श्री.विलास रामभाऊजी भोयर, श्री.मारोतराव नानाजी पाचभाई, श्री.ताराचंद किसनराव चव्हाण, श्री.रामचंद्र धनु राठोड, श्री.चंद्रकांत रामरावजी गाडे पाटील, श्री.चंद्रशेखर बापुरावजी वानखेडे, श्री.माणिकराव गोविंदराव ठाकरे, श्री.जवाहर त्र्यंबकराव देशमुख पारवेकर, श्री.नरेंद्र अनंतरेड्डी बोतकुरवार, श्री.विनायकराव पुंडलिकराव एकरे, श्री.अनिरुध्द अरविंदराव लोणकर, श्री.डी.एम. उर्फ रवींद्र देशमुख हे संचालक आहेत, रवींद्र देशमुख यांच्याबाबत मी माहिती मांडणार आहे. तसेच  संचालक मंडळामध्ये श्री.शंकरराव गो.राठोड, श्री.पंजाबराव शंकरराव माने, श्री.चंद्रशेखर दादाराव मडावी हे संचालक आहेत. आणखी खूप संचालक आहेत. जे या प्रकरणाशी संबंधित आहेत, त्यांचीच सर्व नावे मी वाचली आहेत.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्री. गागरे... 12:20

श्री. दिवाकर रावते.......

आपल्याला काही स्थानच नाही. माननीय मंत्रीमहोदय, श्री. वसंत पुरके मी नेहमीच आपली बाजू घेत असतो. आपण आदिवासी आहात, प्राध्यापक आहात,सुशिक्षित आहात, आपली धोरणे काही वेळेला चुकतात तरी मी आपली बाजू घेत असतो. मी आपणास सांगू इच्छितो की, सहकारी बँकेमध्ये घोटाळा झाला. याची मापल्याला माहिती असेलच. इथे झालेला घोटाळा गंभीर आहे. सभापती महोदय, वेळेअभावी मी येथे थोडक्यात बोलणार आहे.

याठिकाणी 60 कोटी रुपयांचा घोटाळा झालेला आहे. तरी हा घोटाळा कमीच आहे. उस्मानाबाद,नांदेड, अकोला, नागपूर या सहकारी बँकांमध्ये यापेक्षा किती तरी अधिक रकमेचा घोटाळा झालेला आहे. हे घोटाळे काही वेळेला 3 आकडी असतात, 4 आकडी देखील असतात. सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव, आपली एक शाळा मराठवाडयामध्ये आहे.ती अतिशय चांगली आहे मी तेथे गेलो होतो ती शाळा पाहताना मला अतिशय अभिमान वाटला. त्या शाळेमध्ये एवढा प्रामाणिकपणे व्यवहार होतो की, आपल्याला माझा आमदार निधी द्यायला मला आवडेल. तुम्ही कॉंग्रेस पक्षामध्ये कशाला आहात हेच मला कळत नाही. विठठलाला कोणतीही वीट चालते. सहकारी साखर कारखान्यांचा 15 कोटी रुपयांचा घोटाळा हा खरे तर संशोधनाचा विषय आहे. रोजंदारीवर काम करणारे कर्मचारी यांना देण्यात आलेल्या पगाराचा काहीही हिशोब ठेवलेला नाही. 4 कोटी रुपये अशी फक्त कागदावर नोंद करण्यात आली. दिनांक 28/5/2002ला यासंदर्भात चौकशी करण्यात आली. नियम 83 अंतर्गत चौकशी करण्यासाठी श्री. दाते, तत्कालिन जिल्हा उपनिबंधक यांची नेमणूक करण्यात आली. नियम 83 अंतर्गत चौकशी करण्यता आली. या चौकशीचा अहवाल दिला गेला.त्यानंतर नियम 88 अंतर्गत चौकशी करण्याचे ठरविण्यात आले. यासाठी डॉ. ए.बी, जोगदंडकर तत्कालिन उपजिल्हा निबंधक, यवतमाळ यांची नेमणूक केली. याप्रकरणात भ्रष्टाचार झालेला आहे असा अहवाल श्री. दाते यांनी दिली होता. सन्माननीय मंत्री महोदय, श्री. पतंगराव कदम यांना मी विचारले की, या भ्रष्टाचारामध्ये काही हस्तक्षेप करण्यात आला काय ? त्यावर त्यांनी उत्तर दिले की, भ्रष्टाचाराच्या कोणत्याही प्रकरणामध्ये शासन हस्तक्षेप करीत नाही. कोणत्याही परिस्थितीमध्ये शासन भ्रष्टाचार करणाऱ्या संस्थेला माफ करीत नाही. कोणीही असले तरी शासन भ्रष्टाचाराचे समर्थन करणार नाही. माननीय मुख्यमंत्री देखील

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.......

भ्रष्टाचारास समर्थन करणार नाही. हे सर्व मी त्यांच्याकडून काल वदवून घेतले होते. हे सर्व रेकॉर्ड करुन घेण्यात आले आहे. या बँकेच्या गैरव्यवहाराच्या प्रकरणामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी, त्यावेळी सहकार मंत्री असताना हस्तक्षेप केला होता.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

श्री.दाते यांनी जो भ्रष्टाचार बाहेर काढला आणि आरोपपत्र केलेले आहे ते बरोबर नाही असे सांगितले. आता मला हे कळत नाही की, श्री.दाते यांनी केलेले आरोपपत्र बरोबर नाही हे माननीय मुख्यमंत्र्यांना म्हणजेच तत्कालीन सहकार मंत्र्यांना कसे कळले ? कारण माननीय मुख्यमंत्र्यांचे आवडते श्री.माणिकराव ठाकरे त्यात होते म्हणून त्यांनी लगेच त्याबाबत आदेश दिले. आणि श्री.संजय कदम, तत्कालीन जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,बुलढाणा यांची नियुक्ती पुन्हा याबाबत नियम 83 ची चौकशी करण्यासाठी केली. कारण काय तर श्री.दाते यांनी जे काही केले, जो काही निष्कर्ष काढला तो चूक आहे म्हणून. म्हणजेच तत्कालीन सहकार मंत्री म्हणून आताच्या मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी यामध्ये ढवळाढवळ केली. सभापती महोदय, श्री.संजय कदम, तत्कालीन डीडीआर यांनी 83 चा चौकशी अहवाल 5.2.2004 ला दिला. श्री.कदम यांनी केलेल्या चौकशीत मंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशांचे पालन न झाल्यामुळे, सखोलपणे विवेचन न केल्याचे दिसून आले. त्यांचे शब्दप्रयोग जे काही त्यांनी केले होते त्यामुळे त्यांना तसे वाटले. म्हणजे मंत्री महोदयांनी निर्देश दिले असतील की, असे करू नका, असे असे झाले पाहिजे. पण ही सगळी चौकशी झाली पण तिचा अहवाल मुदतीत सादर न केल्यामुळे, मुख्यमंत्र्यांच्या 2002 च्या आदेशा नुसार पूर्तता व्हावी म्हणून श्री.कदम यांच्या ऐवजी सेवानिवृत्त डीडीआर श्री.मानकर यांच्याकडे ही चौकशी दिली. सभापती महोदय, म्हणजे हा भ्रष्टाचार संपविण्यासाठी, खरे तर भ्रष्टाचाराला उत्तेजन देण्यासाठीच ही 83 ची चौकशी करण्यासाठी तिसरा माणूस नेमला. तत्कालीन सहकार मंत्र्यांच्या म्हणण्यानुसार अहवाल येत नाही म्हणून मग श्री.मानकर, सेवानिवृत्त डीडीआर यांना 6.4.2005 च्या आदेशानुसार नेमण्यात आले. त्यांनी श्री.दाते, श्री.कदम यांचे अहवाल तपासले आणि जसेच्या तसे प्रकरण आहे असे सांगितले. श्री.दिवाकर पांडे, माजी विधान परिषद सदस्य यांनी या संदर्भात लेखी कळविले की, हा भ्रष्टाचार शोधण्यासाठी कोणी विदर्भातील व्यक्ती न नेमता विदर्भाबाहेरील व्यक्ती नेमली पाहिजे. तरी देखील यवतमाळचे असलेल्या श्री.मानकर यांनाच चौकशी अधिकारी म्हणून नेमले. सभापती महोदय, भ्रष्टाचार लपविण्यासाठी युक्त्या-प्रयुक्त्या कशा केल्या जातात, कशासाठी विधेयक आणले आहे ? तत्कालीन सहकार मंत्र्यांना अपेक्षित गोष्ट चौकशी अहवालत नव्हती म्हणून एका मागोमाग एक अशा तीन अधिकाऱ्यांकडे चौकशी दिली. तर

...... डीडी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

अशा प्रकारे हे सर्व प्रकरण श्री.मानकर यांचेकडे चौकशीसाठी आले. त्यांनी आपला अहवाल 30.11.2005 ला दिला. त्यांनी भ्रष्टाचार आहे असा खात्रीपूर्वक अहवाल दिला. मग नियम 88 ची चौकशी करावयाची म्हणून श्री.पाठक यांना 1.2.2006 ला नियुक्त केले. त्या श्री.पाठक यांचा अहवाल 21.4.2007 ला आला आणि त्यांनी अगोदरच्या आरोपपत्रावर शिक्कामोर्तब केले.

( यानंतर श्री. सरफरे ..... इइ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री. दिवाकर रावते...

त्यांनी आपल्या अहवालामध्ये भ्रष्टाचारासंबंधी मुद्देसूद मांडले आहे. त्यामध्ये कोण-कोण संचालक दोषी आहेत, ते सर्व यामध्ये आले आहे. त्यामध्ये माजी आमदार, माजी मंत्री आले आहेत. आपले सन्माननीय मित्र श्री. माणिकराव ठाकरे हे सुध्दा आले आहेत. सभापती महोदय, या अहवालामध्ये "वरीलप्रमाणे ठेवलेल्या रकमांचा गोषवारा." हे सर्व आरोप वाचण्यास खूप वेळ जाईल. प्रत्येक बाबनिहाय आरोप कसे आहेत ते मला वाचावयाचे होते, परंतु ते आपल्याकडेही आहेत. हे सर्व आरोप सहकार खात्याकडे आहेत. त्या अहवालांची छाननी केली पाहिजे. "रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांचा खर्च 4 लाख 56 हजार 392, जाहिरात खर्च 1 लाख 91 हजार 50, वेंतनाचा अतिरिक्त बोजा 1 कोटी 98 हजार, युनियन फंडाला दिलेली रक्कम 18 लाख 184, बँकेचे केलेले संगणकीकरण 1 कोटी 23 लाख 2 हजार 955" या संगणकीकरणाचा मोठा घोटाळा यवतमाळमध्ये गाजला. या घोटाळयाबाबत वर्तमानपत्रामध्ये रकानेच्या रकाने छापून आले होते. "संचालक भत्ता 3197, अहवाल तपासणी आक्षेप 1 लाख 23 हजार 119, एकूण 2 कोटी 59 लाख 74 हजार 887 चा घोटाळा झाल्याचे दोषारोप अंतिम झाले." हे अंतिम झाल्यानंतर आता आपल्याला कारवाई करणे भाग आहे. तुम्ही कारवाई केली काय? तुमची सांगण्याची हिंमत होणार नाही. तुम्ही कारवाई केली नाही. कां कारवाई केली नाही? त्यावेळी नेमक्या निवडणुका जाहीर झाल्या. हे सर्व संचालक कलम 88 अन्वये दोषी ठरल्यानंतर ते बाद होतात. सहा वर्षापर्यंत त्यांना निवडणूक लढविण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. त्यांच्याकडून भ्रष्टाचाराची ही सर्व रक्कम वसूल केली पाहिजे. अशाप्रकारचा निर्णय देणे आवश्यक असते. निवडणूक चालू झाल्याबरोबर ते ताबडतोब आले. आणि साहेबांना भेटले, साहेबांना म्हणाले की, आमच्या लोकांचे काय होणार? जिल्हयामध्ये एकच बँक आहे, ही बँक आपल्या ताब्यात राहिली पाहिजे. आणि मग दिनांक 21.4.2007 ला हा अहवाल सादर झाला होता. निवडणुकीचे कारण सांगून कलम 88 खाली कारवाईचे आदेश दिले ते वाचून दाखवितो. " तोंडी पुरावा प्राधिकरण अधिकाऱ्यास पत्र लिहिले. तसे श्री. पाठक यांना सांगण्यात आले ". त्यांनी असे लिहिले की, "वर संदर्भीत पत्रातील क्रमांक 12 ते 24 वरील संचालकांच्या वतीने डॉ. एस.व्ही. पारीख यांनी दिनांक 3.8.2007 रोजी वरील विषयाचा अर्ज सादर करुन खालीलप्रमाणे कळविले आहे." त्यांच्या वकिलांनी श्री. पाठक यांना कळविले. "यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळाच्या निवडणुकीचा कार्यक्रम सुरु आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. दिवाकर रावते...

तात्पुरती मतदार यादी प्रसिध्द झाली आहे. आणि म्हणून निवडणूक प्रक्रिया सुरु झाली. आणि वर उल्लेखित पत्र 19.7.2007 ला पाठविलेल्या व्यक्ती या विद्यमान व माजी संचालक आहेत. आणि म्हणून दि. 6.8.2007 ते 8.8.2007 पर्यंत पुरावा दाखल करण्यास असमर्थ आहेत. संचालक मंडळाची निवडणूक दोन महिन्यापर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे वरील कारणासाठी न्यायाच्या हितासाठी दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी" या अहवालाच्या कारवाईला, भ्रष्टाचाराच्या कारवाईला, त्यांना घरी पाठविण्याच्या कारवाईला, वसूलीच्या कारवाईला सहा वर्षासाठी यांना सहकार क्षेत्राच्या निवडणुकीतून बाद करण्याच्या कारवाईला, अर्जदाराच्या विनंतीनुसार अर्जामध्ये दिलेल्या कारणासाठी तोंडी पुरावा व साक्षीदार तपासाचे यापूर्वी ठरविलेले 6.8.2007 ते .8.8.2007 चे दिनांक पुढे ढकलण्यात येत आहेत. कारवाईचे पुढील दिनांक स्वतंत्रपणे कळविण्यात येत आहे."

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

या भ्रष्टाचाऱ्यांना संरक्षण का दिले ? त्यांना निवडणूक लढवण्याची संधी का दिली ? हे सिध्द झाल्यावर या निवडणुकीत पुन्हा जे निवडून आले, ज्यांची नावे वाचली त्यांना पुन्हा घरी जावे लागेल. भ्रष्टाचाराला संरक्षण देणारे आपले खाते आहे. अशा अनेक बँकांची प्रकरणे आहेत. मी हा एक नमुना वाचला. सभापती महोदय, यामध्ये सर्वात वाईट काय घडले ? आमच्या शिवसेनेने पॅनल लढवले होते. एक महिला उमेदवार चार मतांनी पडली. आपण काय करणार आहात ते सांगावे. बँकेमध्ये सर्वसामान्य ठेवीदारांचे पैसे असतात. निवडणुकीचा हा खर्च बँक करते म्हणजे त्या ठेवीदारांच्या पैशातून हा खर्च होतो. सर्वसामान्य जनतेच्या पैशाचा हा अपव्यय आहे. या निवडणुका जर उद्या बाद झाल्या तर श्री. फाटक यांच्यासह सर्वांना कोर्टात खेचण्याची पाळी येईल. तुम्ही सवलत का दिली आणि कशासाठी हा पैशाचा अपव्यय केला ? त्यांना निवडणुकीला उभे राहण्याचा कोणताही अधिकार नसताना केवळ अशा तांत्रिक बाबी निर्माण केल्या. मघाशी मी म्हणालो ते श्री. रवींद्र देशमुख हे खास आहेत. त्यांचे नाव डी.एस. उर्फ रवींद्र देशमुख असे आहे. डी.एस आणि रवींद्र याचा काहीच मेळ होत नाही. श्री. डी.एस. उर्फ रवींद्र देशमुख हे जिल्हाधिकारी कार्यालयातील शासनाचे कर्मचारी आहेत. त्यांचे पद कोणतेही असेल. त्यांनी बँकेच्या संचालक पदाची दोन वेळा निवडणूक लढवली. ते दोनदा संचालक झाले. कालच्या निवडणुकीमध्येही उभे राहिले. त्यांच्या युनियनला 1 कोटी रुपये दिल्याचा यामध्ये उल्लेख आहे. ते निवडून आले. काल हायकोर्टाने रिमार्क पास केलेले आहेत की, श्री. रवींद्र देशमुख हे जे सद्‌गृहस्थ आहेत ते जिल्हाधिकारी कार्यालयात सरकारचे काम करतात आणि सरकारची परवानगी न घेता ते निवडणुकीला उभे राहिले, ते बेकायदा आहे. त्यांचे असे शब्द आहेत की " It's a grave mis-conduct". असे ॲस्पर्शन हायकोर्टाने पास केलेले आहेत. हायकोर्टाने राज्य सरकारकडे असा निर्णय दिला की, त्यांच्यावर ताबडतोब कारवाई करा. ते सरकारची परवानगी न घेता संचालक पदाची निवडणूक लढवून दोन वेळा संचालक झाले. त्या भ्रष्टाचारामध्ये त्यांचे नाव आहे. परत तिसऱ्यांदा संचालक झाले. म्हणून त्यांचे निवडून आलेले पद ताबडतोब रद्द करावयाचे आहे आणि त्यांच्यावर कारवाई करावयाची आहे. परवानगी न घेतल्याबाबत मिसकंडक्टच्या संदर्भात ताबडतोब

...2..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

कारवाई करावयाची आहे. श्री. देशमुख हे माननीय मुख्यमंत्र्यांच्या मर्जीतील आहेत. त्या भागातील एका आमदाराच्या मर्जीतील आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्याचे धाडस तुमच्यामध्ये आहे काय असा प्रश्न मी आज उपस्थित करीत आहे. हे विधेयक मंजूर करण्याची तुमची नैतिकता असेल तर माननीय मंत्रिमहोदयांकडे हे प्रकरण आहे आणि आपल्याला हे माहीत आहे. श्री. रवींद्र देशमुख यांच्या ताबडतोब निलंबनाची जर आपण घोषणा केली तर मी म्हणेन की, आपल्याला हे विधेयक मनापासून पास करावयाचे आहे. म्हणून ही राहिलेली चौकशी अमुक दिवसांमध्ये पूर्ण करीत आहोत, दोषींवर कारवाई करीत आहोत, पुन्हा पुन्हा मंत्री हस्तक्षेप करणार नाही, पुन्हा पुन्हा माननीय मुख्यमंत्री निदेश देणार नाहीत, सहकार मंत्री यामध्ये पडणार नाहीत, आपल्या लोकांना भरती करण्यासाठी जे अनेक कारखाने उद्ध्वस्त केले तसे विदर्भ आणि मराठवाड्यातील कारखाने उदध्वस्त करणार नाही असे सांगावे. आम्ही आजन्म किंवा तहहयात अध्यक्षपदी राहू अशा प्रकारचे बिल पास झाले. माननीय मंत्रिमहोदय श्री. दांडेगावकर साहेब, आपण याबाबतीत सुधारणा आणावी. बँकेच्या निवडणुकीमध्ये हे जे मतदारांचे पुंजके निर्माण केले आहेत त्याऐवजी बँकेच्या प्रत्येक सभासदाला मतदान करु द्यावे. मग काय चमत्कार घडतो ते बघावे. तुमची सत्ता आणि सामर्थ्य उखडले जाते की नाही ते बघा. इतके लोक संतापलेले आहेत. आपण मतदार संघच असे बनवले आहेत की, आपल्याला निवडून येता येईल. आपली हिंमत असेल तर त्यांना मोकळे करा आणि जो बँकेचा सभासद असेल त्याला सार्वजनिक निवडणुकीप्रमाणे मतदान करु द्या. लोकांना पाहिजे तो संचालक निवडता येईल. आपल्याला हवा तो संचालक निवडून येणार नाही. त्यामुळे आपण ते करणार नाही. सत्तापालट झाल्यावर आम्ही ते करु. सामान्य लोकांच्या हातामध्ये सत्ता आणि सामर्थ्य देण्याच्या गप्पा ज्यावेळी मारल्या जातात त्यावेळी आमच्या शेतकऱ्यांचे हक्क हिरावून घेऊन मतदानाच्या नको त्या मार्गाने सहकारी बँकांवर आपले वर्चस्व निर्माण केले आहे ते थांबवा.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

वेळेअभावी मी खोलात जात नाही. हे विधेयक फार चांगले आहे, ते मंजूर झाले पाहिजे. परंतु मी जे मुद्दे उपस्थित केले त्यासंदर्भात आपले धोरण काय राहील ते सांगा. श्री.रवींद्र देशमुख याने दुस-यांदा निवडणूक लढविलेली आहे. त्याबाबतीत काय करणार आहात ते सांगा. संचालकांच्या बाबतीत 88ची चौकशी करुन ते प्रकरण कधी पूर्णत्वास नेणार आहात ते सांगा. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील हे आता सभागृहामध्ये आले. ते आपणास अशा अनेक बँकांची नावे सांगू शकतील. सहकारी चळवळीतील अपप्रवृत्तींना थांबविणारे हे चांगले विधेयक आहेत. परंतु जे घडलेले आहे तो चिखल कधी साफ करणार एवढे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

...जीजी-2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 12:40

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय सन 2007चे वि.स.वि. क्रमांक 75, महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयकावर बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सहकार चळवळीतील काही दोषांचा उल्लेख केला. ही सहकार चळवळ महाराष्ट्रामध्ये सर्व क्षेत्रामध्ये पहावयास मिळते. बँकिंग, कारखानदारी, शेतकरी, दूधसंघ, गृहनिर्माण, पतसंस्था, अर्बन बँका या क्षेत्रामध्ये ही चळवळ वाढली 1990-95 नंतर माणसाच्या वागण्यामध्ये बदल होत गेला, त्यांनी या कायद्यातून पळवाटा शोधल्या. म्हणून काही संस्थामध्ये अनियमितता झाल्या, काही संस्थांमध्ये चुकीचे वागल्यामुळे सर्वच चळवळ ही चुकीची आहे असे म्हणता येणार नाही. त्यातल्या त्यात सहकार चळवळीचा जास्त संबंध हा शेतीशी आहे. परवा या ठिकाणी चर्चा करीत असताना शेतीच्या बाबतीत दोन-तीन उदाहरणे दिली गेली. चीनमध्ये शून्य टक्क्याने शेतीसाठी कर्ज दिले जाते. अमेरिकेमध्ये 30 टक्के सबसिडी दिली जाते. जगभरामध्ये शेती परवडत नाही हे आपण उदाहरण देऊन सांगितले. शेतीच्या मालाची किंमत ही दिवसेंदिवस कमी-कमी होत गेली. जेथे निसर्गावर उत्पादन होते, बाजार भाव मिळत नसतो अशी शेती करणा-या शेतक-यांचा संबंध हा सहकार चळवळीशी जोडला गेलेला आहे. दुसरे असे की, या चळवळीमध्ये व्यवस्थापनामुळे काही तोटा येतो. काही तोटा मिसमॅनेजमेंटमुळे येतो. सन्माननीय सदस श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, काही बँकामध्ये चुकीच्या पध्दतीने वागले गेले. सरकार चुकीच्या पध्दतीने वागणा-या कार्यकर्त्याला किंवा नेत्याला मग तो कोणत्याही पक्षाचा असला तरी पाठीशी घालत नाही. बँका आणि शुगर इंडस्ट्री माझ्याकडे येत नाही. परंतु त्या संदर्भातील सामूहिक जबाबदारी येते. म्हणून मी सांगू इच्छितो की, चुकीच्या पध्दतीने वागणा-या कोणत्याही कार्यकर्त्याला, नेत्याला शासन संरक्षण देणार नाही. ग्रामीण भागातून ही चळवळ वाढीस लागली तरी ग्रामीण भागाचा विकास हा शून्यच आहे. या चळवळीमध्ये लोक चुकीच्या पध्दतीने वागतात म्हणून त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. जे चुकीच्या पध्दतीने वागतात त्यांना सहकार चळवळीमध्ये निवडणुकीसाठी अपात्र कसे करता येईल याचा अभ्यास करुन मार्चच्या अधिवेशनामध्ये कायद्यात आम्ही बदल करणार आहोत . सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाला पाठिंबा दिला त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

..3..

श्री. दिवाकर रावते : रवींद्र देशमुखाच्या बाबतीत हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. त्याबाबतीत आपण काय कारवाई करणार आहात ? 88ची चौकशी एक-दोन महिन्यामध्ये पूर्ण केली जाईल एवढे तरी सांगा..

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : या स्टॅटयूटरी प्रोव्हिजन्स असतात. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे माजी सहकार मंत्री आहेत. त्यांना माहीत आहे की, 88च्या चौकशी नंतर 6 स्टेप्स घ्याव्या लागतात.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर.......

तर संबंधित अधिकाऱ्यांना जलद गतीने निर्णय घेण्यासाठी सांगण्यात येईल आणि दोषी व्यक्तीवर कारवाई करण्यात येईल. नियमाप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्याला निवडणुकीसाठी उभे राहता येत नाही, तसे जर काही झाले असेल, ते निवडणुकीला उभे राहिले असतील तर त्यासंबंधी सुध्दा कारवाई करण्यात येईल. मी सभागृहाला विनंती करतो की, हे विधेयक संमत करावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक-75 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक-75 संमत झाले आहे.

---------

**उपसभापती** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत असून नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 47 मिनिटांनी स्थगित झाली.)

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे**

**वाशी (जि.उस्मानाबाद) येथील एका मनोरुग्ण महिलेवर वाशी पोलीस ठाण्याच्या आवारात रात्रीच्या वेळी एका पोलीस शिपायाने अत्याचार केल्याची घडलेली घटना**

**(१) * ३३५०९ श्री.विक्रम काळे , श्रीमती उषाताई दराडे , प्रा. फौजीया खान , श्री. वसंतराव चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी (जि.उस्मानाबाद) येथील एका मनोरुग्ण महिलेवर वाशी पोलीस ठाण्याच्या आवारात रात्रीच्या वेळी एका पोलीस शिपायाने अत्याचार केल्याची घटना दिनांक १० ऑगस्ट, २००७ रोजी घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषी पोलीस शिपायाविरुद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) दिनांक ५/०८/२००७ रोजी दुपारी वाशी शिवारातील एका शेतात पोलीस कर्मचाऱ्यांने वेडसर महिलेचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे.

(२) व (३) दिनांक ६/०८/२००७ रोजी ग्रामस्थांनी तहसिलदार वाशी यांना दिलेल्या निवेदनात पोलीस कर्मचाऱ्याने बलात्कार केला असून कार्यवाही करावी असे नमूद केले होते दिनांक ७/०८/२००७ रोजी सदर निवेदन तहसिलदारांकडून प्राप्त झाल्यानंतर सदर पोलीस कर्मचाऱ्यांविरुध्द वाशी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ८१/०७ भा.दं.वि. कलम ३५४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येऊन दिनांक ९/८/२००७ रोजी त्यास अटक करुन त्याची व बळीत महिलेची वैद्यकिय तपासणी करण्यात आली व नमुने रासायनिक तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. आरोपीस दिनांक १३/८/२००७ पासून सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास चालू आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, वेडसर महिलेवर खुद्द एका पोलीस शिपायाने बलात्कार केलेला आहे व यासंदर्भात लेखी उत्तरात तशा प्रकारची माहिती सुध्दा दिलेली आहे. ज्यांच्या हातामध्ये जनतेचे रक्षण करण्याची जबाबदारी दिलेली आहे अशांनीच जर असे प्रकार केले तर त्याचे भविष्यात किती विपरीत परिणाम होतील ? त्यामुळे असा गुन्हा भविष्यात होणार नाही, या संदर्भात शासन काही ठोस पाऊले उचलणार आहे काय ? अशा प्रकारचे गुन्हे करण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही याबाबत शासन कोणते पाऊल उचणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 33509........

श्री. आर.आर.पाटील सभापती महोदय, अशा प्रकारचे गुन्हे लक्षात आल्यानंतर शासनाने यासंदर्भात कठोर पाऊले उचलून निर्णय सुध्दा घेतलेले आहेत. भविष्यामध्ये अशा प्रकारच्या घटना कोणाच्याही हातून घडल्या तरी त्याची गय केली जाणार नाही. या कर्मचा-याला दारु पिण्याची सवय होती अशी माहिती मिळालेली आहे. दारु पिणा-या पोलीस कर्मचा-यांची यादी तयार केली जाणार असून त्यासंदर्भात काही सूचनाही देण्यात आलेल्या आहेत. त्याच बरोबर अशा कर्मचा-यांना सेवेतून कमी करण्याचाही निर्णय घेण्यात येईल.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी त्या पोलीस कर्मचा-याला दारु पिण्याची सवय होती अशा प्रकारचे उत्तर या ठिकाणी दिलेले आहे. ही घटना घडली तेव्हा संबंधित पोलीस कर्मचारी दारुच्या नशेत होता काय ? यासंदर्भात मेडीकल रिपोर्ट मागविण्यात आला आहे काय?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, संबंधित पोलीस कर्मचारी दारु प्यायल्याचे आढळून आले होते परंतु बलात्काराच्यावेळी तो दारुच्या नशेत होता की नाही यासंदर्भातील रिपोर्ट अजून प्रलंबित आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, दारु पिणा-यांची यादी तयार करण्यात येईल असे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेले आहे. परंतु विशेषत: मुंबईमध्ये रात्री वायरलेसच्या गाडया फिरतात त्या गाडयांमध्ये बहुधा दारुच्या बाटल्या आढळून येतात. तसेच रात्रीच्या वेळेस पोलीस स्टेशनमध्ये दारु प्यायली जाते. त्यामुळे जे पोलीस ऑन डयुटी दारु पितात त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आता दारु पिऊन वाहन चालविणा-यांचे चेकअप ट्रॅफिक पोलिसांकडून केले जात आहे. त्यामुळे अशा गाडयांची चेकींग करण्याच्या सूचना दिल्या जातील. तसेच ऑन डयूटी पोलीस स्टेशनमध्ये जर कोणी दारु पीत असेल तर तेथील वरिष्ठ अधिका-याला यासंदर्भात जबाबदार धरण्यात येईल.

ॲड. अनिल परब :सभापती महोदय, रात्रीच्या वेळेस ऑन डयुटी पोलीस दारु प्यायलेला आढळून आला व त्यासंदर्भात तक्रार द्यावयाची झाली तर वरिष्ठ अधिकारी रात्रीच्या वेळेस सापडत नाहीत. आणि दुस-या दिवशी तक्रार द्यावयाची झाली तर संबंधिताची दारु उतरलेली असते त्यामुळे यासंदर्भात तक्रार द्यावयाची झाली तर ती तक्रार कोणाकडे द्यावयाची ?

....3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 33509........

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, अशा प्रकारची तक्रार वरिष्ठ अधिका-यांकडे आपल्याला देता येईल. उदा. एस.पी., डी.एस.पी. यांच्याकडे आपण अशा प्रकारची तक्रार करु शकता.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, सदर घटना 5 तारखेला घडली व त्यानंतर ग्रामस्थांनी पालीस कर्मचा-याच्या विरोधात 6 तारखेला तक्रार नोंदवली व संबंधित पोलीस कर्मचा-याला 9 तारखेला अटक झाली.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 13:20

ता.प्र.क्र. 33509.............

डॉ.नीलम गोऱ्हे...........

घटना घडल्यानंतर चार दिवस लोटले, दरम्यानच्या काळात साक्षीपुरावे नष्ट होण्याची शक्यता आहे.मनोरुग्ण महिला आता कुठे आहे ? ती सुरक्षित आहे का ? तिच्यावर मानसिक उपचार करण्याची गरज असेल तर ते करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा तिला दोन रेल्वे स्टेशनच्यामध्ये कुठेतरी सोडून दिले जाते. दोन रेल्वे स्टेशनच्या मध्ये अशाप्रकारच्या वेडसर महिला फिरताना दिसून येतात. तेथे सुध्या लोकं अत्याचार करतात. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, ती वेडसर महिला आता कुठे आहे, ती सुरक्षित आहे का ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ती महिला सुरक्षित असून तिला पुणे येथील मेन्टल हॉस्पीटलमध्ये ठेवलेले आहे. दिनांक 5 ऑगस्ट 2007 रोजी ही घटना घडली. दिनांक 6 ऑगस्ट रोजी काही राजकीय कार्यकर्त्यांनी तहसीलदारांकडे तक्रार केली. दिनांक 7 ऑगस्ट रोजी तहसीलदारांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली. ज्यांनी गुन्हा प्रत्यक्ष घडताना पाहिला त्यांचा पोलिसांनी शोध घेण्याचा प्रयत्न केला. परंतु ते सापडले नाहीत. दिनांक 8 ऑगस्ट रोजी ज्यांनी तक्रार केली त्यांचा पोलिसांनी शोध घेतला. त्यांच्याकडून माहिती घेऊन दिनांक 9 ऑगस्ट रोजी गुन्हेगाराला अटक करण्यात आलेली आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, घटना के पाँच दिन बाद अपराधी को गिरफ्तार किया गया है.महिला की वैद्यकीय जांच के नमूने रासायनिक जांच के लिए भेजे गए हैं. जांच में क्या निष्पन्न होने के चांस है और तीन महीने हो गए हैं, अब तक रिपोर्ट प्रलंबित क्यों है ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, फॉरेन्सीक लॅबकडून रिपोर्ट येण्यास थोडा विलंब लागतो. संबंधितांचे कपडे जप्त करून तपासासाठी पाठविण्यात आलेले आहेत त्यात पुरावा मिळण्याचे चान्सेस आहेत. ज्या महिलेवर हा अत्याचार झाला ती मनोरुग्ण होती, त्यामळे ती तक्रार करु शकत नव्हती. ज्यांनी तहसीलदारांकडे तक्रार केली, त्यांनी आम्ही पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करणार नाही, आम्हाला कोर्टकचेऱ्यामध्ये गुंतायचे नाही, अशाप्रकारची भूमिका घेतली. तेव्हा पोलीस इन्स्पेक्टर स्वत: फिर्यादी बनले. पोलिसांनी हे चांगल्याप्रकारचे काम केलेले आहे. त्यांनी साक्षीदारांना शोधून, त्यांचा जबाब घेऊन आरोपीला अटक केलेली आहे. पोलिसांनी चांगल्या प्रकारचे काम केलेले आहे.

..........

30-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) JJ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर शहरातील सक्करदरा भागातील ममता को.ऑप.हौ.सो. प्लॉट बनावट स्वाक्षरी व बनावट अध्यक्ष दुय्यम निबंधकासमोर उभा करुन विक्री केल्याबाबत**

**(2) * 34075 श्री. नितीन गडकरी , श्री.सागर मेघे , श्री.केशवराव मानकर , श्री.सय्यद पाशा पटेल** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक 11 सप्टेंबर, 2007 रोजी वा त्या सुमारास नागपूर शहरातील सक्करदरा भागातील ममता को.ऑप.हौ.सो. प्लॉट बनावट स्वाक्षरी व बनावट अध्यक्ष दुय्यम निबंधकासमोर उभा करुन विक्री केल्याची तक्रार सदर हौ.सो.चे मूळ सभासद श्री.आनंद चंद्रनारायण चौधरी ह्यांनी पोलिसात केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय, असल्यास, तपासाचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार दोषी व्यक्तिविरुध्द काय कारवाई करण्यांत आली वा येत आहे,

(3) या प्रकरणी दुय्यम निबंधकांनी त्यांची फसवणुक केल्या प्रकरणी पोलिसात केव्हा गुन्हा नोंदविण्यांत आला आहे,

(4) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (1) नाही. याबाबतची कोणतीही तक्रार सक्करदरा पोलीस ठाण्यात नोंद केल्याचे आढळून आले नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, आपल्या परवानगीने मला उत्तरात थोडी दुरुस्ती करावयाची आहे. पहिल्या उत्तरात "सक्करदरा" पोलीस ठाण्यात या शब्दाऐवजी "सदर पोलीस ठाण्यात" असे वाचावे व त्यापुढे अशा स्वरुपाच्या 18 गुन्ह्यांची नोंद आहे व त्याबाबत तपास सुरु आहे असे वाचावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तरात दुरुस्ती केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. मुळात सक्करदरा पोलीस स्टेशन नसून सक्कदरा सोसायटी आहे आणि गुन्हा सदर पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आलेला आहे. सर्वश्री.पांडुरंग राजाराम आंबिलोले, शरद गंगाधर सोरटे, रामकृष्ण केशव समर्थ, संजय पुरुषोत्तम माटे, मुकुंद वासुदेव फुले, दिनकर दत्तात्रय समथ यांच्या विरोधात 18 गुन्हे दाखल आहेत. त्यांच्या विरुध्द 420, 417,419, 468, 469, 477, 120-ब व 32 असे गुन्हे दाखल आहेत. या लोकांनी रजिस्ट्रारच्या ऑफीसमध्ये अध्यक्ष म्हणून बोगस व्यक्ती उभी केली होती. संबंधितांवर गुन्हा रजिस्ट्रर झाल्यानंतरही अजूनपर्यंत त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. या प्रकरणात बनावट स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत. पोलीस त्यांना संरक्षण का देत आहे ?

...3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 34075** ....

श्री गडकरी ....

अशाप्रकारे अनेक भूखंडाची विक्री करण्याचे अनेक बोगस प्रकार झालेले आहेत. हे सुस्पष्ट प्रकरण असताना पोलीस त्यांना संरक्षण का देत आहेत, त्यांना अटक का करण्यात येत नाही, त्यांच्यावर कारवाई न होण्याची कारणे काय आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणात विलंब लागण्याची प्रमुख कारणे आहेत. बोगस व्यक्ती रजिस्ट्रारसमोर उभी करुन खरेदी पत्र बोगस पध्दतीने केले, अशा स्वरुपाची तक्रार आहे. उभी केलेली व्यक्ती बोगस होती का, त्यांनी केलेल्या सह्यांचे नमुने तपासून येणे या सर्व टेक्निकल बाबी असल्यामुळे त्यास थोडा विलंब होत आहे. पण केसच्या बाबतीत विलंब लागू नये म्हणून या केसचा सर्व तपास ईओडब्ल्यू डी.सी.पी.कडे देण्यात येईल. तीन महिन्यात या संपूर्ण केसची चौकशी पूर्ण केली जाईल.

यानंतर श्री पुरी .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34075....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी एकच विनंती आहे की, नागपूर शहरामध्ये अशाप्रकारे बोगस प्लॉट विक्रीचे मोठे रॅकेट असून त्यासंबधीच्या अनेक तक्रारी पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या आहेत. परंतु दुर्दैवाने त्याची दखल घेतली जात नाही. याबाबतची चौकशी होत असतानाही बोगस कागदपत्रांच्या आधारे प्लॉट विक्रीच्या संदर्भात इतर ज्या तक्रारी असतील त्यांची देखील चौकशी करुन संबंधितावर कारवाई करावी. तसेच, यासंबंधी गुन्हा नोंद असल्यामुळे संबंधितास अटक करण्यास काय अडचण आहे ? हा नॉन बेलेबल गुन्हा आहे. गुन्हा झाल्याचे सिध्द झालेले आहे. आपण याबाबतीत स्वाक्षरी वगैरे तपासा परंतु संबंधितांस आपण ताबडतोब अटक करावी व इतर तक्रारींच्या संदर्भातही आपण चौकशी करुन योग्य ती कारवाई करावी.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही केस कोर्टाकडून नोंदविण्यात आलेली आहे. अन्यथा गुन्हयांच्या बाबतीत आपण पुराव्यांची छाननी करतो त्यानंतर गुन्हा नोंदवत असतो. कोर्टाच्या आदेशानुसार सदरचा गुन्हा नोंदविला आहे. पुराव्यांची छाननी सुरु असून याबाबतीत आम्ही तातडीने कारवाई करु. तसेच बोगस खरेदीपत्राच्या आधारे घेतलेल्या भूखंडासंबंधी नागपूरच्या विविध पोलीस स्टेशनमध्ये जी प्रलंबित प्रकरणे आहेत ती सर्व एकत्रित करुन एका वरिष्ठ अधिका-याचा सेल तयार करुन अशा बोगस खरेदी पत्राच्यासंबंधी कठोर आणि तातडीने कारवाई करण्याच्या सूचना देण्यात येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले की, हायकोर्टाच्या आदेशानुसार हा गुन्हा नोंदविला गेला आहे. माझा असा प्रश्न आहे की, सदरहू प्रकरणांसंबंधीची तक्रार किती तारखेला आली, कोर्टाचे आदेश कधी आले व गुन्हा केव्हा नोंदविण्यात आला ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, यासंदर्भातील सर्व तारखा मी पटलावर ठेवतो.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, ममता को-ऑप.हौसिंग सोसायटी या संस्थेचे सन 1989 ते 2006 पर्यंत श्री.आनंद त्रिवेदी अध्यक्ष होते. सदर सोसायटीत श्री.पांडुरंग आंबिलहुले व श्री.शरद सोरटे हे कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. आरोपी श्री.पांडुरंग आंबिलहुले व श्री.शरद

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34075....

श्री.केशवराव मानकर...

सोरटे यांनी संस्थेच्या मालकीचा भूखंड क्र.225 व 226 हे भूखंड श्री.रामकृष्ण समर्थ रा.खामला यांना विकला याकरिता दुय्यम निबंधकांसमोर बोगस अध्यक्ष उभा करुन बनावट स्वाक्षऱ्या मारुन प्लॉटची विक्री केलेली आहे. यासंदर्भात दुय्यम निबंधकांनीसुध्दा गुन्हा नोंदविला आहे, त्यामुळे याबाबत आपण काय कारवाई करणार ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, गुन्हा नोंदविला असून आवश्यक असेल ती सगळी कारवाई केलेली आहे, यामध्ये कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. या केसमध्ये भविष्यात विलंब होणार नाही, यादृष्टीने दक्षता घेतली जाईल. तसेच बोगस खरेदीखताच्या बाबतीतील ज्या तक्रारी नागपूरच्या विविध पोलीस स्टेशन आलेल्या आहेत, त्या सर्व एकत्रित करुन त्यासंदर्भात एका वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत सुपरविजन करुन चार्जशिट लवकर जातील व आरोपींवर लवकरात लवकर कारवाई केली जाईल व हे सगळे बघितले जाईल.

----------

..3....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**राज्यात कुपोषीत बालकाचे मृत्युचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(३) * ३३५४८ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.सय्यद जामा , श्री.परशुराम उपरकर , श्री. अरविंद सावंत , श्री. सुरेश जेथलिया , डॉ. दिपक सावंत , प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. प्रकाश शेंडगे , श्री.सागर मेघे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. धनाजी साठे , मेजर सुधीर सावंत , श्री. शरद रणपिसे , श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर , श्री. धोंडीराम राठोड , श्री. सुधाकर गणगणे , श्री.राजन तेली , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. सदाशिवराव पोळ , डॉ. वसंत पवार , श्री.भास्कर जाधव , श्री. राजेंद्र जैन , प्रा. फौजीया खान , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. दिवाकर रावते , श्री. अनिल परब , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. सुरेश जेथलिया , श्री.केशवराव मानकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: ठाणे जिल्ह्यात जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर, २००६ या कालावधीत सुमारे ५०० बालकांचा मृत्यू झाला तसेच एप्रिल, २००७ या महिन्यात ३५७ कुपोषित बालकांचे मृत्यू झाले असल्याचे दिनांक २६ जुलै, २००७ रोजी उघडकीस आले आहे, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण वाढत असल्याने त्यावर नियंत्रण आणण्यासाठी राज्यशासनाने उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ठाणे जिल्हा नवसंजीवन योजना समिती सप्टेंबर, २००४ वा त्या सुमारास स्थापन केली आहे, सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुपोषण निमूर्लन अभियान राबविले जात असतानाही माहे ऑगस्ट, २००७ अखेरपर्यंत जिल्ह्यात श्रेणी-३ मध्ये ४४ मुले तर श्रेणी ४ मध्ये एका मुलांचा समावेश असून सावंतवाडी तालुक्यात ५, कणकवली तालुक्यात ६ वेंगुर्ला तालुक्यात ८, मालवण तालुक्यात ९ कुडाळ तालुक्यात ७, देवगड तालुक्यात १० अशी एकूण ४५ मुले असून त्यामध्ये सुध्दा १२ मुले दुर्धर आजाराने पिडीत असल्याचे निदर्शनास आले आहे, मुंबईतील ४० टक्के बालके कुपोषित असल्याची धक्कादायक माहिती इंटरनॅशनल ऑफ पॉप्युलेशन स्टडीज या संस्थेने केलेल्या राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणामध्ये आढळून आलेली आहे, देवणी (जि.लातूर) तालुक्यात माहे ऑगस्ट, २००७ मध्ये ४८ बालके कुपोषित असल्याचे आढळून आले आहे तसेच नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यातील श्रेणी-३ ची २८ व श्रेणी-४ ची २ असे एकूण ३० बालके कुपोषित आढळून आल्याची घटना माहे ऑक्टोबर, २००७ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू रोखण्यासाठी राज्य शासनाने केलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी वेळेवर व प्रभावीपणे होत नसल्याने बालमृत्यूचे प्रमाण कमी न झाल्याचे माहे सप्टेंबर, २००७ च्या सुमारास निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील सर्व प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) असल्यास, राज्यातील कुपोषणामुळे होत असलेले बालमृत्यू तात्काळ रोखण्याबाबत शासनाने कोणती प्रभावी उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

..४...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**श्री.धर्मरावबाबा आत्राम, श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता :** (१) ठाणे जिल्ह्यात माहे जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर, २००६ या कालावधीत १०८ व जानेवारी ते एप्रिल, २००७ या दरम्यान ९२ कुपोषित श्रेणीतील बालकांचा मृत्यू झालेला आहे. सदरची बाब जुलै, २००७ रोजी उघडकीस आली व त्यामुळे सप्टेंबर, २००४ वा त्या सुमारास नवसंजीवन समिती स्थापन केली आहे हे खरे नाही. आदिवासी भागात कुपोषण व बाल मृत्यू कमी होण्यासाठी सन १९९५ पासून नवसंजीवन योजना राबविण्यात येत आहे. त्याप्रमाणे ठाणे जिल्ह्यातील ७ आदिवासी व ४ अंशत: आदिवासी अशा ११ तालुक्यात सदर योजनेची अंमलबजावणी करण्यत येत आहे.

माहे ऑगस्ट, २००७ च्या मासिक प्रगती अहवालानुसार सिंधुदूर्ग जिल्ह्यात एकूण वजन घेतलेल्या मुलांची संख्या ५९५६५ असून श्रेणी- ३+४ मधील कुपोषित बालकांची संख्या ५७ असून देवगड तालुक्यात-१०, कणकवली-६, कुडाळ-१३, मालवण-१३, सावंतवाडी-५ व वेंगुर्ला-१० अशी आहे.

मुंबईतील माहे जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, २००६ व २००७ मधील कुपोषणाची सद्य:स्थिती जुलै, २००६ मध्ये श्रेणी-१ ची ३५.५७ टक्के, श्रेणी-२ ची १७.४३, व श्रेणी-३ व ४ ची ०.२६ टक्के, माहे ऑगस्ट, २००६ मध्ये श्रेणी-१ ची ३५.७३ टक्के, श्रेणी-२ ची १६.३९ टक्के व श्रेणी-३ व ४ ची ०.२४ टक्के माहे सप्टेंबर, २००६ मध्ये श्रेणी-१ ची ३४.०६ टक्के, श्रेणी-२ ची १५.५२ टक्के, श्रेणी-३ व ४ ची ०.२१ टक्के, माहे जुलै, २००७ मध्ये श्रेणी-१ ची ३३.८४ टक्के, श्रेणी-२ ची १६.६० टक्के व श्रेणी-३ व ४ ची ०.२१ टक्के, माहे ऑगस्ट, २००७ मध्ये श्रेणी-१ ची ३३.६१ टक्के, श्रेणी-२ ची १६.८९ टक्के, व श्रेणी-३ व ४ ची ०.२० टक्के व माहे सप्टेंबर, २००७ मध्ये श्रेणी-१ ची ३५.१२ टक्के, श्रेणी-२ ची १६.७८ टक्के व श्रेणी-३ व ४ ची ०.२१ टक्के सद्य:स्थिती आहे.

देवणी, जिल्हा लातूर तालुक्यात माहे ऑगस्ट, २००७ मध्ये श्रेणी-३ व ४ मधील एकूण वजन घेतलेल्या मुलांची संख्या ११२९२ असून त्यापैकी श्रेणी-३ व ४ च्या कुपोषित बालकांची संख्या ५२ आहे.

नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यातील माहे सप्टेंबर, २००७ मध्ये एकूण वजन घेतलेल्या मुलांची संख्या १०८०८ असून त्यापैकी श्रेणी-३ व ४ च्या कुपोषित बालकांची संख्या ३९ आहे.

(२) हे खरे नाही. कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी राज्यामध्ये वेळेवर व प्रभावीपणे होत असून, त्यामुळे बालमृत्यू नियंत्रणात आलेले आहेत.

(३), (४) व (५) बालमृत्यू पूर्वीपेक्षा कमी होत आहेत.

० ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांना लसीकरण, आरोग्य तपासणी, संदर्भ आरोग्य सेवा, अनौपचारिक शक्षिण, आरोग्य आणि सकस आहार प्रशिक्षण तसेच पूरक पोषण आहार देण्यात येतो.

सन २००५ मध्ये राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य पोषण मिशन यांची स्थापना करण्यात आली आहे. या मिशनद्वारे प्रशिक्षण देवून व विशेष प्रयत्न करुन श्रेणी-३ व ४ चे कुपोषण कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जात आहे.

..५..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३३५४८....

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, बालमृत्यूचे प्रमाण कमी होत आहे असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. असे जर असेल तर २००७ मध्ये ते प्रमाण कसे वाढले व याला जबाबदार कोण आहे तसेच यासंबधी शासनाची भूमिका काय ? महाराष्ट्रामध्ये प्रत्येक जिल्हयांमध्ये बालमृत्यूचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे यास कोण जबाबदार आहे व बालमृत्यू कसे वाढले ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, बालमृत्यू कमी करण्याकरिता राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य पोषण मिशनची स्थापना करण्यात आलेली आहे. त्या माध्यमातून या पाच जिल्हयातील कुपोषण कमी करण्याच्या दृष्टीने काम होत आहे. मागच्या वर्षी बालमृत्यूमध्ये वाढ झाली होती, परंतु यावर्षी ते कमी करण्याच्या दृष्टीने काम झालेले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न व्यापक असून सभागृहातील जवळपास ४२ सन्माननीय सदस्यांनी तो विचारलेला आहे. सभापती महोदय, उत्तर देताना नेहमी सांगण्यात येते की, कुपोषणाचा संबंध असेल तर त्यामध्ये अनेक विभाग संलग्न असतात. गेल्या अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात उत्तर देताना माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले होते की, कुपोषण आणि बालमृत्यू कमी करण्यासाठी विवाहित स्त्रिया आणि गरोदर माता यांच्यामधील क्षयाचे प्रमाण कमी करण्यासाठी लोहयुक्त गोळया आणि सिरप देण्याची घोषणा करण्यात आली होती.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**ता.प्र.क्र.33548 पुढे सुरु..........**</u>

डॉ.दीपक सावंत.........

आदिवासी विकास विभाग 10 टक्के निधी देणार होता. परंतु, हा निधी आरोग्य विभागाने मागितला नाही आणि आदिवासी विकास विभागाने दिला नाही. ताबडतोब हा निधी आदिवासी विकास विभागाकडून दिला जाईल काय ?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य पोषण मिशनची स्थापना शासनाने केली. या मिशनच्या संचालकपदी मेडिकल सायन्समधील व्यक्तिची नेमणूक होणे अपेक्षित असतांना आय.ए.एस.दर्जाच्या अधिका-याची नियुक्ती केली गेली, कार्यालय औरंगाबाद येथून इतरत्र हलविण्यात आले. त्यामुळे नेमकी या मिशनची कार्यप्रणाली काय आहे, याचा अहवाल मी गेल्या तीन अधिवेशनांमध्ये मागत आहे. हा अहवाल सभागृहाला केव्हा सादर करण्यात येईल ?

सभापती महोदय, माझा तिसरा प्रश्न असा आहे की, गेल्या अधिवेशनामध्ये अर्धा-तास चर्चेला उत्तर देतांना महिला व बालकल्याण मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी असे सांगितले होते की, यासंदर्भातील श्वेतपत्रिका काढण्यात येईल. ही श्वेतपत्रिक शासन केव्हा काढणार आहे ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आंगणवाडीमध्ये दोन वेळा आणि घरी दोन वेळा जेवण या योजनेतून देण्यात येते. भूकवाढीसाठी एमॲक्ट सिरप आणि प्रो-व्हिटॅमिन सिरप देखील घरी देण्यात येते. तसेच, नवसंजीवन योजनेमध्ये लिक्विड प्रोटिन देण्याचे काम हाती घेतले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, संबंधित मंत्रीमहोदयांनीच घोषणा केली होती की, 10 टक्के निधी आदिवासी विकास विभागाकडून मागण्यात येईल. हा निधी कधी मिळणार, हे स्पष्टपणे मंत्रीमहोदयांनी सांगावे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, 10 टक्के निधी देण्याबाबत आदिवासी विकास विभागाला सांगण्यात येईल. तसेच, राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य पोषण मिशनचा अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात येईल. श्वेतपत्रिकेबाबतही लवकरात लकवर निर्णय घेऊन ती प्रसिध्द केली जाईल.

...2........



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.33548 पुढे सुरु..........**

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मागील अधिवेशनात पुरवणी मागणीच्या वेळी माननीय मंत्रीमहोदयांनीच श्वेतपत्रिका काढण्यात येईल, असे सांगितले होते. त्याचे काय झाले ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कुपोषणाबाबत माननीय उच्च न्यायालयाने एक नवीन समिती गठीत केली आहे व त्या समितीला आदेश दिलेले आहेत, विषयही ठरवून दिलेले आहेत व त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. विभागाने यासंदर्भात जे प्रयत्न केले आहेत त्याबाबत विस्तृत माहिती देण्याची आमची तयारी आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, कुपोषणाबाबतचा हा तारांकित प्रश्न जवळ जवळ 40 सन्माननीय सदस्यांनी प्रभावीपणे विचारला आहे. ठाणे जिल्हयातील मृत्युंबद्दल उत्तरातच असे सांगितले आहे की, ठाणे जिल्हयात जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर 2006 या कालावधीत सुमारे 500 बालकांचा मृत्यू झाला तसेच एप्रिल 2007 या महिन्यात 357 कुपोषित बालकांचे मृत्यू झाले, असल्याचे निष्पन्न झाले आहे. एकीकडे शासन नवसंजीवन योजना राबवित आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी मला ज्यावेळी या समितीवर नियुक्त केले त्यावेळी राज्याचा दौरा करीत असतांना सर्व परिस्थिती मी बघितली आहे. शासनाच्या अनेक योजना आहेत, शासन या योजनांवर निधी खर्च करीत आहे, या योजना कुपोषित बालकांसाठी आपण राबवित आहोत. ज्या संस्था आदिवासी भागामध्ये कार्यरत आहेत त्यांच्याव्दारा या सर्व उपाययोजना योग्य प्रकारे पोहोचवित आहोत काय, या योजनांचा फायदा इतर लोकांना होतो आहे का, या बाबींची शासनाने एकदा चौकशी केली पाहिजे. अशाप्रकारची चौकशी शासन करणार काय ?

सभापती महोदय, त्याचप्रमाणे ज्या जिल्हयांमध्ये मोठया प्रमाणावर कुपोषण आहे त्या जिल्हयातील लोकप्रतिनिधींबरोबर, संबंधित अधिका-यांसह, संस्थांसह मंत्रीमहोदयांनी बैठक घेतली पाहिजे. अशाप्रकारची बैठक मंत्रीमहोदय घेणार काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, हे काम संस्थेला दिलेले नाही, आंगणवाडीमार्फत ही योजना राबविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी विनंती केल्याप्रमाणे स्थानिक लोकप्रतिनिधींबरोबर बैठक घेण्याची आमची तयारी आहे.

यानंतर श्री.बोरले.......

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.33548**........

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न विचारलेला आहे त्यामुळे हा प्रश्न किती गंभीर आहे हे आपल्या लक्षात येईल. कुपोषण कमी व्हावे म्हणून आपण सभागृहात डॉ.अभय बंग यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती. त्या समितीने प्राथमिक अहवाल दिला होता. माझा प्रश्न असा आहे की, त्या समितीने दुसरा अहवाल दिलेला आहे काय ? त्या समितीने अतिशय उपयुक्त अशा सूचना केल्या होत्या. डॉ.अभय बंग समितीने कोणत्या सूचना केल्या होत्या, त्यापैकी कोणत्या सूचना शासनाने स्वीकारल्या आणि त्यावर शासनाने कोणती कारवाई केली ? शासनाने जर कारवाई केली असती तर हे घडले नसते.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, डॉ.अभय बंग समितीने सर्व बालकांची कम्पलसरी नोंदणी करा, त्यांचे वजन करा, अशा सूचना केल्या होत्या. तसेच, आरोग्य तपासणी करण्याबाबत सुध्दा त्यांनी सूचना केली होती आणि इतर काही सूचना केल्या होता. त्या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी आपण जिजाऊमाता बाल कुपोषण मिशनची स्थापन केलेली आहे. डॉ.अभय बंग समितीचा दुसरा अहवाल शासनाला प्राप्त झालेला नाही. माननीय उच्च न्यायालयात पिटीशन दाखल झालेले आहे. माननीय उच्च न्यायालयाने समिती गठित केलेली आहे आणि त्याची कार्यकक्षा ठरवून दिलेली आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, या सभागृहात डॉ.अभय बंग यांची समिती नियुक्त झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाने डॉ.अभय बंग यांचा महाराष्ट्र भूषण म्हणून सत्कार केलेला आहे. माननीय श्री.धर्मरावबाबा आत्राम यांना याची माहिती आहे. डॉ.अभय बंग गडचिरोली जिल्हयात, आदिवासी क्षेत्रात चांगले काम करीत आहेत. त्या भागात कुपोषण कमी व्हावे म्हणून त्यांनी केलेले प्रयत्न संपूर्ण महाराष्ट्राला माहीत आहेत. डॉ.अभय बंग समितीच्या बैठकीला अधिकारी उपस्थित राहत नाहीत. शासन त्यांना रिस्पॉन्स देत नाही. त्यांनी केलेल्या शिफारशी शासनास अडचणीच्या आहेत. हायकोर्टाची समिती नियुक्त केली म्हणून डॉ.अभय बंग समितीच्या शिफारशी पूर्ण करु नये असे नाही. त्यांचा दुसरा रिपोर्ट पूर्ण करुन घेण्यासाठी शासन का मदत करीत नाही ? दोन्ही रिपोर्ट एकत्र करुन उच्च न्यायालयाला सादर केले तर त्याचा उपयोग होईल.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.33548 .....**

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, उच्च न्यायालयाची समिती गठीत झालेली आहे. डॉ.अभय बंग समितीच्या शिफारशी श्रेणी 3 आणि श्रेणी 4 च्या बालकांच्या संदर्भात आहेत. औषधोपचारासंदर्भात जिल्हा स्तरापासून तालुका स्तरावर आरोग्य विभाग, आदिवासी विभाग, महिला व बालविकास विभागाने एकत्र येऊन कुपोषणाचा कार्यक्रम तयार केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सूचना केल्याप्रमाणे आपल्याला उच्च न्यायालयासमोर रिपोर्ट सादर करण्यास अडचण येणार नाही.

श्री.राजेंद्र जैन :सभापति महोदय, मैं यह जानना चाहता हूं कि भंडारा और गोंदिया जिले में कुपोषित बच्चों की संख्या बढ़ रही है, क्या इस संबंध में कोई व्यवस्थित जानकारी है और आदिवासी क्षेत्र में जहां कुपोषित बच्चों की संख्या बढ़ रही है वे नक्सलग्रस्त क्षेत्र है, तो वहां यह समस्या दूर करने के लिए क्या उपाययोजना की जाएगी तथा इस कार्य के लिए क्या एनजीओ की मदद ली जाएगी ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, कुपोषणाचा प्रश्न अतिशय गंभीर आहे. यासंदर्भात शासन एन.जी.ओ. ची मदत घेत आहे. नक्षलग्रस्त भागात, आदिवासी भागात, स्लम एरियात जेथे कुपोषणाचे प्रमाण आढळून येते तेथे शासन खबरदारी घेऊन सूचना देईल.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, गेल्या 10 वर्षापासून हा विषय सतत चर्चेला येत आहे. या विषयावर सभागृहात परवा माझी 93 ची सूचना येऊन गेली.

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33548.....

श्री.अरविंद सावंत......

जसे आपण दारुबंदी,पोलिओ,देवी यासारख्या साथीच्या रोगांचे तातडीने उच्चाटन करण्याचा प्रयत्न करतो. त्यात शासनाने खूप प्रगती केली. दुर्देवाने कुपोषण कमी करण्याच्या संदर्भात आपण तशी प्रगती करु शकलेलो नाही. यासंदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, कुपोषण कमी करण्याच्या संदर्भात एक कालबध्द अशा प्रकारचा कार्यक्रम आखून त्या कार्यक्रमाच्या माध्यमातून येत्या दोन वर्षात महाराष्ट्रात एकही कुपोषित बालक व माता आढळून येणार नाही, अशा प्रकारचा शासन प्रयत्न करणार आहे का ? इंटिग्रेटेड अशा प्रकारच्या एखाद्या कार्यक्रमाची देखील याकरिता आवश्यकता आहे.दुसरा प्रश्न असा आहे की, श्वेतपत्रिका आपण सभागृहात केव्हा देणार आहात ? तिसरा प्रश्न असा आहे की, उत्तरामध्ये आपण कुपोषित बालकांची श्रेणीनिहाय जी टक्केवारी दिलेली आहे उदा.ऑगस्ट मध्ये कुपोषित बालकांचे प्रमाण 35.57 इतके होते. ही टक्केवारी अपूर्णांकाच्या स्वरुपात कशाच्या आधारावर काढली ? अपूर्णांकात कुपोषित बालके मृत्युमुखी पडतात का ?

श्री.हर्षवर्धन पाटील : यासंदर्भात राज्यस्तरावर एक टास्क फोर्स करुन आपण उल्लेख केला त्याप्रमाणे टाईम बाऊण्ड प्रोग्रॅम आखून दोन किंवा तीन वर्षात राज्यात कोठेही एकही कुपोषित माता व बालक आढळणार नाही अशा प्रकारचा प्रयत्न शासनामार्फत केला जाईल. येणा-या काही वर्षांमध्ये या राज्यामधील कुपोषणाचे प्रमाण 100 टक्के नष्ट होईल. ही जी टक्केवारी आहे ती राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य पोषण मिशन च्या माध्यमातून श्रेणी -1,2,3,4 अशा पध्दतीच्या आकडेवारीने काढण्यात आली. या आकडेवारीच्या माध्यमातून आपण ही टक्केवारी काढलेली आहे. आकडेवारी वाढली की कमी झाली, हा मुद्दा महत्वाचा नसून ख-या अर्थाने ही जी कुपोषित मुले आहेत,त्यांच्या कुपोषणाची मूळ कारणे आहेत अशिक्षितपणा,बेरोजगारी,दारिद्रय बालविवाह वगैरे. बालविवाहाच्या संदर्भामधील प्रश्नाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर, जर माता कुपोषित असेल तर पुढची पिढी कशी असेल ? यासंदर्भामध्ये उपाययोजना करण्याकरिता राज्यस्तरावर एक टास्क फोर्स निर्माण करुन जिल्हास्तरावर कमिटया नेमण्याचा निर्णय झालेला आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.... ता.प्र.क्र.33548.........

आपण सर्वांनी मिळून महाराष्ट्रातील कुपोषण निर्मूलनाचे काम टॉप प्रायोरिटीवर करणे आवश्यक आहे. शासन यासंदर्भात प्रयत्न करीत आहे.

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, या कुपोषणाच्या प्रश्नाच्या संदर्भात विचार करीत असतांना मला असे म्हणावयाचे आहे की, हा प्रश्न आदिवासी विभागापुरताच मर्यादित राहिलेला नसून सोलापूर जिल्हयामध्ये देखील श्रेणी 3 आणि 4 ची कुपोषित बालके आढळून आलेली आहेत. सोलापूर जिल्हयातील हे प्रमाण कमी करण्यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे का ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, सोलापूरमध्ये अशाप्रकारच्या केसेस आढळलेल्या आहेत. नोंदणी विभागाकडून पूरक पोषण आहाराच्या संदर्भामध्ये विशेष लक्ष दिले जाते. फक्त सोलापूरच काय संपूर्ण राज्यामध्ये कुपोषणाचे संपूर्णतः मुळापासून उच्चाटन करण्याकरिता विभाग प्रयत्न करणार आहे.

श्री.जगदीश गुप्ता : सन 1992-1993 मध्ये नागपूर खंडपीठाने कुपोषण दूर करण्याच्या दृष्टीकोनातून निर्णय दिला होता, त्या निर्णयानुसार शासनाच्या वेगवेगळया विभागाच्या माध्यमातून ज्या योजना आहेत, त्यांच्यामध्ये समन्वय राहावा म्हणून प्रकल्प अधिकारी उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर नियुक्त करण्यात आले होते,असे कारण दिले होते. परंतु या पदावर आय.ए.एस.अधिकारी असले पाहिजे,असे उच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये म्हटले होते. आज आदिवासी विभागामध्ये या विभागांतर्गत एकही आय.ए.एस.अधिकारी प्रकल्प संचालक म्हणून नेमण्यात आलेला नाही,अशी माझी माहिती आहे. या दृष्टीकोनातून सर्व विभागांच्या निरनिराळया योजनांमध्ये समन्वय राहावा म्हणून शासन प्रयत्न करणार आहे का ?

श्री.हर्षवर्धन पाटील : यामध्ये आय.ए.एस. अधिकारी प्रकल्प संचालक म्हणून नेमावा अशी यामध्ये तरतूद नाही.

श्री.जगदीश गुप्ता : होय. नागपूर खंडपीठाच्या आदेशामध्ये अशीच तरतूद आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : यासंदर्भामध्ये प्रकल्प संचालकांच्या बाबतीत उच्च न्यायालयाने काय म्हटले आहे यासंदर्भात माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही. निश्चितपणाने या प्रश्नामध्ये मध्यंतरीच्या काळामध्ये सी.डी.पी.ओ.हे वर्ग 2 चे पद वर्ग 1 चे करणे महत्वाचे आहे, म्हणून शासन शिफारस करणार आहे.

यानंतर श्री.गागरे....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ पूर्वी कु.खर्चे 13:45

ता.प्र.क्र.33548.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांनी हायकोर्टात रिट पिटीशन दाखल केले होते. हायकोर्टाने शासनाला असे निर्देश दिले आहेत की, मेळघाट, चिखलदरा येथील अधिकारी प्रकल्प संचालक आहेत. त्याऐवजी येथे कार्यवाही करण्यासाठी आय.ए.एस. अधिकारी असावा. हायकोर्टाचे निर्देश शासनावर बंधनकारक आहेत. हायकोर्टाच्या आदेशाचे पालन केले नाहीतर कोर्टाचा अवमान होईल. हायकोर्टाचे अशा प्रकारचे निर्देश आहेत, असे मी ठामपणे सांगतो. हया निर्देशाप्रमाणे आय.ए.एस. अधिकाऱ्याची नियुक्ती त्वरीत करण्याचे आदेश का देण्यात आले नाहीत ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती ग्राहय धरुन यासंबंधीचे हायकोर्टाचे आदेश तपासून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, उत्तर में कुपोषित बच्चों की संख्या दी गई है. आंगणवाडी से कुपोषत बच्चों की संख्या की जानकारी ली जाती है. आयसीडीएस प्रोग्राम के अन्तर्गत श्रेणी 3 एवम् श्रेणी 4 के कितने बच्चे हैं ? चूंकि शहरी भागों में आयसीडीएस प्रोग्राम हर क्षेत्र में लागू नहीं किया जाता है, इसलिए ये आंकड़े कितने सही है ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, याबाबत माझ्याकडे आकडेवारी प्राप्त झालेली आहे. राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य पोषण मिशन यांचेकडून प्रत्यक्ष कार्यवाही केलेली आहे, त्यांच्याकडून जी आकडेवारी आलेली आहे, ती उत्तरामध्ये नमूद केलेली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याबाबतचा अहवाल देण्यात यावा. आम्हाला याची आकडेवारी, अहवाल व माहिती मिळत नाही. बरेच दिवसापासून मी या बाबींची मागणी केलेली आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य मिशनकडून आकडेवारी आलेली आहे. माननीय सदस्यांना माहिती पाठविण्यात येईल. मूळ प्रश्न कुपोषणावर असून त्यावर फोकस करणे आवश्यक आहे, यासाठी आम्ही चांगल्या उपाययोजना करीत आहोत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, दोन प्रश्नांकडे मला लक्ष वेधावयाचे आहे. मागील अधिवेशनात आपण म्हटले होते की, 12 कोटी रुपयांचे माल्ट कुपोषीत बालकांसाठी खरेदी केलेले आहे व ते प्रत्येक वाडीवस्तीपर्यत पोहोचविण्याची व्यवस्था होईल्. यासाठी 12 कोटी रुपयांची

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33548.....

डॉ.नीलम गोऱ्हे.....

तरतूद पुरवणी मागण्यामध्ये केली होती. या सरबतचा आपण कशा प्रकारे उपयोग केलेला आहे ?. कुपोषण विरोधी मिशनचे मुख्य कार्यालय विदर्भात झाले पाहिजे. संपूर्ण महाराष्ट्राचे हे कार्यालय सध्या औरंगाबाद येथे आहे. नागपूर विभागात कुपोषीत बालके मोठया प्रमाणावर आहेत. त्यामुळे याचे मुख्य कार्यालय नागपूर, अमरावती किंवा गडचिरोली येथे पाहिजे. आपण नागपूर विभागात याबाबतचे मुख्य कार्यालय कधी सुरु करणार ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आदिवासी विभागाच्या वतीने मागच्या अधिवेशनात सिरपचा उल्लेख सरबत असा झाला आहे. याबाबत माझ्याकडे सर्व माहिती उपलब्ध आहे. या सिरपचा कोणकोणत्या आंगणवाडयांना पुरवठा केला आहे, सिरपमध्ये कोणते कंन्टेंट आहेत, याची माहिती माझ्याजवळ आहे. ही माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना पत्र लिहिले होते की, सदरील सिरपबाबत माहिती देण्यात यावी. परंतु अद्याप मला पत्र किंवा माहिती मिळाली नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, 12 कोटी रुपयांचे सरबत कोण प्याले ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सदरील सिरप राज्यातील 374 गावे, संबंधित प्रकल्प,आंगणवाडया येथे पोहोच करण्यात आले आहे. आदिवासी विभागाकडून सिरप ऐवजी सरबत असा उल्लेख झालेला आहे. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना मी सांगू इच्छितो की, आपले पत्र मला मिळाले आहे. आपण मागितलेली माहिती मी पत्राद्वारे आपणास पाठविली आहे.

..... यानंतर कु.धनश्री.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

30-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) PP

DVG/ 13:50

30-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) PP

DVG/ 13:50

ता.प्र.क्र.33548.....

श्री. हर्षवर्धन पाटील....

डॉ. दिपक सावंत यांनी पाठविलेल्यापत्राला उत्तर देखील देण्यात आले होते. अंगणवाडयामधील जी बालके आहेत त्यांना पोषण आहाराचा पुरवठा करण्यात आलेला आहे. जिजाऊ बाल आरोगय पोषण मिशन या योजनेचे कार्यालय औरंगाबाद येथे विचारपूर्वक निश्‍चित केलेले आहे. आदिवासी विभागातील 5 जिल्हे, व इतर 10जिल्हे या सर्व 15 जिल्यांचा विचार करुन हा निर्णय घेण्यात आला आहे. अमरावती व नागपूर या जिल्हयामध्ये असे कार्यालय सुरु करण्यासंदर्भात विचार करण्यात येईल

श्री संजय केळकर : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये आदिवासी भागामध्ये कुपोषित बालकांची संख्या मोठया प्रमाणात आहे. ठाणे जिल्हयामध्ये एक हजार पेक्षा अधिक कुपोषित बालके मृत्युमुखी पडलेली आहेत. तत्कालिन माननीय मुख्यमंत्री श्री. सुशिलकुमार शिंदे यांनी त्यावेळी जिल्हा विभाजनाची घोषणा केली होती. ठाणे जिल्हयाच्या एका बाजुला आदिवासी दुर्गम भाग आहे. यासंदर्भात शासनाचे काय धोरण आहे ? अशाप्रकारे ठाणे जिल्हयाचे विभाजन करण्याचा शासनाकडे काही प्रस्ताव आहे काय त्यासंबंधी काही विचार करण्यात आला आहे काय ?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मघाशी सांगितल्याप्रमाणे, बंग समितीने दुसरा अहवाल दिला होता. युतीच्या काळामध्ये नव संजीवनी योजना व राजमाता जिजाऊ बाल आरोग्य पोषण मिशन या योजनांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आणि आदिवासी बालकांना कुपोषणातून मुक्त करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या काही योजना विचाराधीन आहे काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ठाणे जिल्हयाच्या प्रश्नाचा, या प्रश्नाशी काहीही संबंध नाही. ठाणे जिल्हा हा मोठा जिल्हा झालेला आहे. तेथे मतदारसंघ वाढला आहे. साधारणत: एक हजार लोकसंख्येला एक अंगणवाडी देण्यात येणार आहे तसेच याबाबत शासनाचे जे निकष आहेत ते बदलण्याकरिता केंद्र शासनाला विनंती केलेली आहे. आदिवासी विभागाकरिता 600 लोकसंख्येला एक अंगणवाडी सुरु करण्यात येणार आहे.यासंदर्भात राज्य पातळीवर एक टास्क फोर्स सुरु करण्यात येईल व युद्ध पातळीवर कुपोषण निर्मुलनाचा कार्यक्रम सुरु करण्यात येईल.

................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सावंतवाडी (जि.सिंधुदूर्ग) येथील राजेश शशिकांत साळगावकर या तरुणाने एका शाळकरी मुलीला फसवून मोबाईल व कॅमेऱ्याद्वारे व्हीडीओ क्लिप घेतल्याबाबत**

**(४) * ३४२०९ श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथील राजेश शशीकांत साळगावकर या तरुणाने देवदर्शनासाठी जाऊ या असे त्याच्या सोबत शिकणाऱ्या मुलीला खोटे सांगून, सावंतवाडी येथून जवळ असलेल्या नरेंद्र डोगरावर नेऊन अश्लिल वर्तन करित असताना मोबाईच्या कॅमेऱ्याद्वारे त्याच व्हीडीओ क्लिप घेतले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तरुणीने या क्लिपवर आक्षेप घेताच ती क्लिप मोबाईलमधून काढून टाकली असे खोटे सांगून सदर व्हिडीओ क्लिप इंटरनेटद्वारे प्रसारीत केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणाशी संबंधित गुन्हेगारावर पोलीसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) होय,

(२) सदर तरुणीने क्लिपवर आक्षेप घेताच सदरच्या अश्लील व्हिडीओ क्लिप मोबाईलवरुन काढून टाकल्या असे सांगून सदर क्लीपवरुन सी.डी. तयार केल्याबाबत तपासात पुरावा हस्तगत आहे. परंतू इंटरनेटद्वारे सदर अश्लील क्लिपचे प्रसारण केल्याबाबत तपासात निष्पन्न झालेले नाही.

(३) व (४) सदर प्रकरणातील मु.शिरोडा, डोंगरवाडी, तालूका वेंगुर्ला येथे राहणाऱ्या अत्याचारीत तरुणीने दिलेल्या फिर्यादीवरुन सावंतवाडी, पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ७५/२००७, भा.दं.वि.क. २९२, ३५४ सह The Idecent Representation of women (Prohibition) Act, १९८६ U/s ३,४ sec. ६ Information Technology Act २००० U/s ६७ प्रमाणे गुन्हा दिनांक १३.९.२००७ रोजी १०.०० वा. दाखल केला आहे.

गुन्ह्याच्या तपासामध्ये आरोपी राजेश शशिकांत साळंगावकर वय २२ वर्षे, रा.हरसावंतवाडा, माजगाव, सावंतवाडी, यांस दिनांक २२.९.२००७ रोजी १०.४५ वा. अटक करण्यात आली. आरोपीस दिनांक २२.९.२००७ ते २८.९.२००७ पर्यंत ७ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्यात आले व त्यानंतर दिनांक २८.९.२००७ रोजी न्यायदंडाधिकारी वर्ग-१, सावंतवाडी यांनी आरोपीस जामीन मंजूर केला आहे. गुन्ह्याचा तपास सावंतवाडी पोलीस स्टेशन मार्फत चालू आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांना मी विचारु इच्छितो की, हल्ली अशाप्रकारे मुलींच्या हॉस्टेलमध्ये अश्लील चित्रणांचे प्रसारण करण्याच्या घटना वाढत आहेत. माननीय मंत्री महोदयांना लेखी उत्तरामध्ये काही सुधारणा करावयाच्या आहेत काय ?

श्री. आर. आर पाटील : नाही.

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 34209.....

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, उत्तरामध्ये शेवटी असे म्हटले आहे की, इंटरनेटद्वारे सदर अश्लील क्लिपचे प्रसारण केल्याबाबत तपासात निष्पन्न झालेले नाही. तेथील जे पोलीस अधिकारी श्रीमती तेजल शिरोडकर यांनी पत्रकारांना याबाबत मुलाखतीमध्ये असे सांगितले होते की, बेळगावमध्ये अशाप्रकारे अश्लील चित्रण करुन ती किलप केबलद्वारे टिव्हीवर दाखविण्यात आल्या ही माहिती खरी आहे काय ? माझा आपल्याला दुसरा प्रश्न आहे की, आयटी 2000 या कायद्यानुसार दोषी व्यक्तीस 3 वर्षाची शिक्षा करण्याची तरतूद आहे व इंडेसन्ट रिप्रेझेंटेशन ऑफ वुमेन 1986 या कायद्याअंतर्गत दोषी व्यक्तीस 2 वर्षाची शिक्षा करण्याची तरतूद आहे. हानराधम 7 दिवसांमध्ये बाहेर आला. ती केस आता 7 - 8 वर्ष चालेल. त्यामुळे त्या मुलीला 10 -1 वर्ष कोर्टाचे हेलपाटे घालावे लागेल. म्हणून मला येथे असे विचारावयाचे आहे की, प्रस्तुत कायद्यामध्ये बदल करुन आरोपीची शिक्ष वाढविली जाईल काय? अशा आरोपीस कमीत कमी 6 महिन्यासाठी जामीन मिळणार नाही अशी तरतूद केली जाईल काय ?

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ कु. गायकवाड नंतर --- 13:55

ता.प्र.क्र.34209 ...

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, अशा गुन्ह्यांच्यासाठी शिक्षा किती वाढवावयाची, जामीन किती दिवस मिळता उपयोगी नाही याचा जरूर विचार केला जाईल पण अशा पद्धतीचे वाढते प्रकार लक्षात घेता पोलिसांचा, कायद्याचा वचक वाढविण्यासाठी याबाबत अभ्यास करून केंद्र सरकारला शिफारस करण्यात येईल.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, अशा प्रकारचे गुन्हे मालवणमध्ये देखील घडले आहेत आणि त्याबाबत तपास करण्यासाठी आपण महिला डीवायएसपी त्या भागाला देणार काय ? त्याचप्रमाणे मालवाणी खाजा आणि मालवणी मसाला नावाची वेबसाईटदेखील साऱ्या देशात विकली गेली आहे हे खरे आहे काय ? तसेच या संदर्भात कॉम्प्युटर आणि मोबाईल सेट जप्त करून अधिक तपासासाठी ते पाठविले आहेत त्याचा अहवाल येण्यास विलंब लागतो आहे, त्याबाबत प्रयत्न करून असे अहवाल लवकर मिळण्यासाठी आपण काय करणार आहात ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, कॉम्प्युटर, मोबाईल तपासणीसाठी जे पाठविले आहेत त्यांचे अहवाल लवकर येण्याच्या दृष्टीने जरूर प्रयत्न केले जातील. तसेच जी माहिती आपण आता मागितली आहे ती माझ्याकडे उपलब्ध नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जो प्रश्न विचारला आहे तो बरोबर आहे. सदर व्हीडीओ क्लिप बाहेर दाखविण्यासाठी विकण्यात आल्याचे या प्रकरणातील आरोपी श्री.साळगावकर याच्या तपासातून उघडकीस आल्याची माहिती श्रीमती तेजल शिरोडकर यांनी पत्रकारांना दिली अशी बातमी तरूण भारत, सकाळ आणि पुढारी या तीन वर्तमानपत्रात दिलेली आहे. सभापती महोदय, एका नाही तर तीन वृत्तपत्रातून ही माहिती आली आहे परंतु आपल्या उत्तरात तसे काही आढळून आले नसल्याचे म्हटले आहे. तेव्हा ही बाब नंतरच्या तपासात निष्पन्न झाली आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही बाब तपासून पाहण्यात आली आणि अशी काही माहिती इंटरनेटवर गेल्याचे तपासात आढळून आले नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या तपासात आणखी कोणी त्याचा साथीदार असल्याचे निष्पन्न झाले आहे का ?

..... क्यूक्यू 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.34209 ...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणातील आरोपीचा अन्य कोणी साथीदार असल्याचे तपासात निष्पन्न झालेले नाही. केवळ हा साळगावकरच त्यात असल्याचे निष्पन्न झालेले आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयात अशा प्रकारच्या घटना घडल्या आहेत आणि त्याचा उल्लेख आताच सन्माननीय सदस्य श्री.उपरकर यांनी केला आहे. सिंधुदुर्ग जिल्हा आणि तेथील लहान लहान गावे असल्याने अशा प्रकारात कोठली मुलगी पीडित आहे हे लगेच इतरांच्या लक्षात येते म्हणून अशा केसेस चालविण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची खास करून सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी म्हणून निर्मिती करून त्यांच्याकडे या केसेस दिल्या जातील का ? थोडक्यात सांगावयाचे तर हे सगळे गुन्हे फास्ट ट्रॅक कोर्टाखाली घेण्यात यावेत अशी माझी सूचना आहे आणि विशेष करून सिंधुदुर्ग जिल्हयासाठी अशी कोर्ट आपण निर्माण करणार का ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, फास्ट ट्रॅक कोर्टची मागणी काही स्पेसिफिक महिलांसाठी नेहमी केली जाते आणि हायकोर्टाच्या मान्यतेने ती नेमली जातात. हे गुन्हे वेगळे आहेत आणि त्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टांची आवश्यकता नाही.

***

..... क्यूक्यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात दरोड्यांचे व घरफोड्याचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(5) * 33560 श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. नितीन गडकरी, श्री. विनोद तावडे, श्री. मधुकर चव्हाण, डॉ. निलम गोऱ्हे, श्री.परशुराम उपरकर, श्री. रमेश निकोसे, श्री. संजय दत्त, श्री. धनाजी साठे, श्री.सय्यद पाशा पटेल, श्री. गुरुमुख जगवानी, श्री. रामनाथ मोते, श्री. प्रकाश शेंडगे, श्री. प्रतापराव सोनवणे, श्री. जयंत पाटील, प्रा. शरद पाटील, श्री. गोविंदराव आदिक, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री.जैनुद्दीन जव्हेरी, श्री.केशवराव मानकर, श्री. संजय केळकर, श्री.सुधाकर गणगणे, श्री.अरविंद सावंत** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात विशेषत: मुंबईतील काळाचौकी पोलीस स्थानकाच्या हद्दीत दिनांक 25 सप्टेंबर, 2007 रोजी महिलांच्या अंगावरील दागिने खेचून पसार होण्याचे चार प्रकार एकाच दिवशी घडले, माहे ऑगस्ट, 2007 मध्ये पुणे व सांगली जिल्ह्यात सराफांच्या दुकानांवर दरोडे टाकून दरोडेखोरांनी लाखो रुपयांचे ऐवज लुटले, अमरावती शहरात राजापेठ चौकाजवळ दिनांक 23 सप्टेंबर, 2007 रोजी वा त्या दरम्यान एकाच दिवशी तीन दुकाने फोडून लाखो रुपयांचा माल लुटला, अहमदनगर शहरातील केडगाव येथील श्री.कपारे व श्री.शेख कुटूंबियांच्या घरावर दिनांक 20 मार्च, 2007 रोजी रात्रौ 12.30 च्या सुमारास दरोडा पडला व मच्छिंद्र कपारे यांचा घटनास्थळी मृत्यु होऊन उक्त दरोड्यात दोन्ही कुटूंबातील अनेक जण जखमी झाले, वाशिम जिल्ह्यातील अनसिंग, सेलुबाजार, मालगांव, रिजोड (मोप) इत्यादी ठिकाणी सोन्याचांदीच्या दुकानांवर माहे जुलै ते सप्टेंबर, 2007 दरम्यान चोरी, लूटमार व दरोडे पडले, वाई शहरातील फुलेश्वर (चौडापाट) (जि.सातारा) येथे दिनांक 6 ऑगस्ट, 2007 रोजी वा त्या सुमारास भीषण दरोडा पडून घरातील दागदागिने चोरुन तरुण दाम्पत्यालाही क्रूरपणे गळा दाबून ठार मारले, 3 ते 5 सप्टेंबर, 2007 या दरम्यान बोर्ली पंचतन (ता.श्रीवर्धन,जि.रायगड) येथे देवळे दोन ज्वेलर्स व किराणा मालाचे दुकान फोडून चोरट्यांनी लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला, तसेच ठाणे शहरात माहे जुलै, 2007 मध्ये 101 घर फोडीच्या घटना घडल्या, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, वरील सर्व घटनांची शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दरोडेखोरांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,
(4) राज्यात वाढत्या दरोड्यांना भविष्यात आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.आर.आर. पाटील** : (1) मुंबईतील काळाचौकी पोलीस स्थानकाच्या हद्दीत दिनांक 24.9.2007 रोजी महिलांच्या अंगावरील दागिने खेचून पसार होण्याचे 4 प्रकार एकाच दिवशी घडले आहे, हे खरे आहे.

मात्र, पुणे शहरात ऑगस्ट, 2007 मध्ये सराफांच्या दुकानांवर दरोडे टाकून लाखो रुपयांचा ऐवज लुटण्याची घटना घडलेली नाही.

सांगली जिल्ह्यातील पलुस येथे दिनांक 17 ऑगस्ट, 2007 रोजी सराफाच्या पेढीवर दरोडा घालून अंदाजे 25 लाख किंमतीचे दागीने चोरुन नेले, हे खरे आहे.

.... क्यूक्यू 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33560 ...

अमरावती शहरातील राजापेठ चौकाजवळ दिनांक 23 सप्टेंबर, 2007 च्या मध्यरात्रीनंतर अज्ञात चोरटयांनी 2 दुकानात प्रवेश करुन एकूण 19,82,435 रुपयांचा माल चोरुन नेला, हे खरे आहे.

अहमदनगर शहरातील केडगाव येथील श्री. कापरे व श्री. शेख यांच्या कुटूंबियांच्या घरावर दिनांक 20.3.2007 रोजी रात्रौ 12.30 वा. दरोडा पडला व त्यामध्ये मच्छिंद्र बहिरु कापरे यांचा जागीच मृत्यू होवून, श्रीमती कल्पना कापरे हिचा ससून हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असताना, मृत्यू झाला आहे. तसेच कापरे व शेख वस्तीवरील दरोडयामध्ये 11 जण जखमी झालेले आहेत, हे खरे आहे.

वाशिम जिल्ह्यात माहे जुलै, 2007 ते सप्टेंबर, 2007 मध्ये पोलीस स्टेशन रिसोड अंतर्गत मोप येथे व मालेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत मालेगाव शहरात चोरीच्या घटना घडल्या आहेत. तसेच सेलु बाजार येथे दिनांक 3.10.2007 रोजी सराफाच्या दुकानातून चोरीची घटना घडली आहे, हे खरे आहे.

वाई शहरातील चवडापाट, शहाबाग येथे दिनांक 6.8.2007 च्या दरम्यान भीषण दरोडा पडून घरातील दागदागिने चोरुन तरुण दांम्पत्याला गळा दाबून ठार मारले हे खरे आहे.

दिनांक 3 ते 5 सप्टेंबर, 2007 च्या दरम्यान बोर्ली पंचायतन, श्रीवर्धन, जि.रायगड येथे मंदिरामध्ये दोन ज्वेलर्सची दुकाने व किराणामालाचे दुकान फोडून चोरटयांनी लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला हे खरे आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालायाच्या हद्दीत माहे जुलै, 2007 मध्ये 101 घरफोडयांच्या घटना घडल्या हे खरे आहे.

(2) होय.

(3) मुंबईतील काळाचौकी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या गुन्ह्याबाबत 1) 225/07 2) 226/07 3) 227/07 4) 228/07 अन्वये चार गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

पुणे शहरात सराफाच्या दुकानावर दरोडा टाकण्याची कोणतीही घटना न घडल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

सांगली येथे दिनांक 17 ऑगस्ट, 2007 रोजी पडलेल्या दरोडयामध्ये पलूस पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. 60/2007 दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यात 11 दरोडेखोरांना निष्पन्न आरोपी म्हणून अटक करण्यात आली आहे. त्यांचेकडून चोरीस गेलेल्या मालापैकी रुपये 19,53,086/- किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम जप्त करण्यात आले आहे. सदर दरोडेखोरांविरुध्द दिनांक 17.11.2007 रोजी न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले असून, गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

..... क्यूक्यू 5 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33560 ...

अमरावती शहरातील राजापेठ चौकाजवळील गुलशन प्लाझा मार्केटमध्ये द वर्ल्ड ऑफ टायटन आणि नोकीया केयर या दोन दुकानाच्या समोरील शटर वाकवून अज्ञात चोरांनी 938 मनगटी घडयाळ आणि 19 नोकीय कंपनीचे मोबाईल फोन असे एकूण 19,82,435/- रुपयाचा माल चोरुन नेल्याची फिर्याद दाखल केल्यानुसार राजापेठ पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. 331/2007 नोंदवून गुन्ह्याचा तपास करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात सक्रिय गुन्हेगारांची विचारपूस करुन, त्यांच्या घर झडत्या घेऊन तसेच नागपूर येथे तपास पथक पाठवून तेथील गुन्हेगारांबाबत माहिती घेऊन गुन्हा उघडकीस आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच चोरीस गेलेल्या मोबाईल फोनची आयएमईआय नंबर देऊन ते नंबर फोन कोणत्या क्षेत्रात कार्यरत आहेत याबाबत देखील माहिती मिळविण्यात येत आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

अहमदनगर येथे घडलेल्या घटनेबाबत कोतवाली पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. 64/07 दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात 8 संशयितांना अटक करुन चौकशी करण्यात आली तथापि, चौकशीमध्ये काहीही निष्पन्न न झाल्याने त्याला सोडून देण्यात आले. मात्र अशाच प्रकारच्या दुसऱ्या गुन्ह्यात अटक केलेल्या 6 आरोपींनी गुन्हा केल्याची शक्यता कबूली दिल्याने व त्यांनी सदर गुन्हा केल्याची शक्यता असल्याने सदर आरोपींना ट्रान्सफर करुन घेवून अधिक तपास करण्यात येत आहे.

वाशिम जिल्ह्यातील मोप, तालुका रिसोड येथे घडलेल्या चोरीच्या घटनेबाबत रिसोड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. 123/07 दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील तपासामध्ये 4 आरोपींना अटक करण्यात येवून त्यांचेकडून दागिने व रोख रक्कम स्वरुपात एकूण रुपये 1,93,9008/- हस्तगत करण्यात आला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार सदर मुद्देमाल फिर्यादीस सुपूर्द करण्यात आला आहे. तसेच मालेगाव येथील चोरीच्या घटनेबाबत मालेगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. 136/07 दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात तपास करुनही आरोंपीचा शोध न लागल्याने गुन्हा "अ" वर्ग समरी करुन न्यायालयात पाठविण्यात आला आहे. तसेच सेलुबाजार येथे चोरीच्या घटनेबाबत मंगरुळपीर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. 178/07 दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेमध्ये आरोपीस अटक करण्यात आली असून, चोरुन नेलेली रुपये 55,000/- किंमतीची बॅग आरोपीकडून हस्तगत करण्यात आली आहे.

वाई येथे घडलेल्या घटनेबाबत वाई पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.83/07 दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये 4 आरोपींना अटक करण्यात आली असून, इतर पंचाच्या साक्षी नोंदविण्यात आल्या आहेत. तथापि, आरोपींनी गुन्ह्यांची कबूली दिली नसल्याने अटक आरोपींची नार्को चाचणी घेण्याची परवानगी वाई न्यायालयाने दिली असून, त्याबाबत न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोग शाळा, सांताक्रुझ यांचेकडे दिनांक 30.10.2007 रोजी विनंती करण्यात आली आहे.

रायगड येथील मंदीरात काही अज्ञात चोरटयांनी रुपये 6,070/- चा ऐवज चोरुन नेल्याप्रकरणी दीघी सागरी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. 11/2007 दाखल करण्यात आला असून,

...... क्यूक्यू 6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33560 ...

तपास चालू आहे. तसेच काही अज्ञात चोरटयांनी दोन ज्वेलर्सच्या दुकानाचे कुलूप तोडून रुपये 2,10,057/- चे सोन्या चांदीचे दागिने चोरुन नेले. याप्रकरणी दीघी सागरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करुन दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचेकडून चोरीस गेलेले दागिने हस्तगत करण्यात आलेले आहेत. तसेच एका किराणा मालाचे दुकानाचे कुलूप तोडून चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने सदर गुन्ह्यास भा.दं.वि.सं. कलम 511 लावण्यात आला असून गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत घरफोडीच्या एकूण 101 दाखल गुन्ह्यांपैकी 39 गुन्हे उघडकीस आले असून त्यात 76 आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यांमध्ये एकूण 54,17,053/- रुपयांचा माल घरफोडी/चोरी करुन नेला असून, त्यापैकी 8,00,191/- रुपये चा माल हस्तगत करण्यात आला आहे. दाखल गुन्ह्यांपैकी 35 गुन्हे 'अ' फायनल केले आहेत व उर्वरीत 33 गुन्हे न्यायप्रविष्ठ असून त्यांचा तपास चालू आहे.

(4) राज्यात वाढत्या दरोडयांना भविष्यात आळा घालण्यासाठी पुढील उपाययायेजना करण्यात आल्या आहेत : काळाचौकी पोलीस ठाणेमार्फत महत्वाच्या ठिकाणी बीट मार्शल नेमून गस्त अधिक वाढविण्यात आली आहे. तसेच अपर पोलीस महासंचालक (का.व सु.) मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली दरोडयांना आळा घालण्याकरीता राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांसह बैठक आयोजित करण्यात येवून अहमदनगर, पुणे ग्रामीण, बीड, उस्मानाबाद, सोलापूर ग्रामीण यांची संयुक्त दरोडा पथक तयार करण्यात आलेले आहे. तसेच दरोडयासारखे गुन्हे घडू नये म्हणून सशस्त्र बीट मार्शल पेट्रोलिंग, क्रॉस पेट्रोलिंग सुरु करण्यात आली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न एकूणच महाराष्ट्र राज्यामध्ये पडत असलेल्या दरोड्यांच्या तसेच घरफोड्यांच्या बाबतीतील आहे. या उत्तरात आपण मुंबईतील काळाचौकी विभागामध्ये एकाच दिवशी दोन तासाच्या अंतरात 4 ठिकाणी दरोडे पडले असल्याचे तसेच महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून नेल्याच्या घटना घडल्या असल्याचे मान्य केले आहे. सांगली जिल्हयामध्ये देखील घडलेला दरोड्याची घटना देखील खरी असल्याचे मान्य केले आहे., अहमदनगर मध्ये देखील दोन दरोड्याच्या घटना घडल्याचे मान्य केले आहे., वाशिम जिल्ह्यातही अशीच घटना घडल्याचे मान्य केले आहे. ठाणे पोलीस ठाण्याच्या अंतर्गत 101 घरफोड्यांच्या घटना घडल्याचे मान्य केले आहे. वाई शहरातही दरोडा पडल्याचे मान्य केले आहे. म्हणजे दरोड्याच्या आणि जबरी चोरीच्या घटना राज्यात सातत्याने होत असल्याचे आपण कबूल केले

..... क्यूक्यू 7 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर (पुढे चालू... ) ता.प्र.क्र. 33560 ...

आहे. तेव्हा राज्यात एकूणच दरोड्याचे प्रमाण इतक्या मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे हे यातून दिसून येते. आम्ही काही प्रमुख घटना येथे सांगितल्या आहेत आणि त्या खऱ्या असल्याचे आपण मान्य केले आहे. परंतु जिल्ह्याजिल्ह्यात, तालुक्यातालुक्यात या घटना घडत आहेत मात्र यातील आरोपी सापडत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. मुंबईतील काळाचौकी विभागात महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून नेण्याच्या प्रकारातील आरोपीही पकडले जात नाहीत. म्हणून माझा नेमका प्रश्न असा आहे की, .....

( यानंतर श्री. सरफरे .... 2आर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ 14:00

ता.प्र.क्र. 33560...

श्री. पांडुरंग फुंडकर...

आतापर्यंत किती आरोपींना अटक केली? किती दरोडयातील आरोपी सापडले? जे आरोपी सापडले नाहीत त्यांच्याबाबतीत पोलिसांना आतापर्यंत तपास कां लागला नाही?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, दरोडयामध्ये थोडीशी वाढ झाली आहे ही गोष्ट कबूल करावी लागेल. परंतु राज्यभरात पडलेल्या दरोडयांची वर्षनिहाय संख्या बघितली तर सन 2003 मध्ये 504 दरोडे पडले...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्यावेळी कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा केली जाते त्यावेळी मागील आकडेवारी दिली तर आम्ही समजू शकतो.परंतु नजिकच्या काळात पडलेल्या दरोडयासंबंधीचा हा प्रश्न आहे.आम्ही याठिकाणी मागील आकडेवारी ऐकावयास बसलो नाही...

श्री. आर. आर. पाटील : मागील पडलेल्या दरोडयांची संख्या पाहिली तर ॲबनॉर्मल दरोडयांची संख्या वाढली आहे असे या आकडेवारीवरुन दिसत नाही. आजपर्यंत राज्यामध्ये दरोडयाचे आणि डिटेक्शनचे प्रमाण पाहिले तर दरोडयांची संख्या फार वाढलेली नाही. परंतु डिटेक्शनचे प्रमाण वाढले आहे. 84.23 टक्के दरोडयांचा तपास करण्यामध्ये आपल्याला यश मिळाले आहे. आजपर्यंतच्या रेकॉडप्रमाणे दरोडयामध्ये गेलेली हायेस्ट मालमत्ता रिकव्हर केली आहे. जवळ जवळ 46 टक्के मालमत्ता आपण जप्त केली आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रश्न विचारला की, एकूण दरोडयाच्या केसेसमध्ये किती लोकांना अटक केली. आतापर्यंत 4734 लोकांना अटक केली आहे. तसेच, इतर राज्यातील टोळयांना नेस्तनाबूत करण्यात पोलीस दलाला यश मिळाले आहे. त्याचा परिणाम म्हणून ऑक्टोबर 2007 मधील दरोडयाचे प्रमाण बघितले तर ते मोठया प्रमाणावर घटले आहे. म्हणून पोलिसांनी घेतलेल्या ॲक्शनचा चांगला परिणाम बघायला मिळत आहे. आतापर्यंत गुन्हयांचे जे काही डिटेक्शन झाले नाही त्यासाठी विशेष पथके तयार केली आहेत व गुन्हांचा तपास सुरु आहे.

श्री. नितीन गडकरी : राज्याच्या सी.आय.डी.ने गृहमंत्र्यांना रिपोर्ट दिला असे वर्तमानपत्रात वाचायला मिळाले.त्यामध्ये दर सहा दिवसांनी एका महिलेचा खून होतो असे अहवालात म्हटले आहे. हे खरे आहे काय? दुसरा प्रश्न असा की, आम्ही प्रश्न विचारतांना काही जिल्हयांचा उल्लेख केला. त्यामधील काही जिल्हे याठिकाणी राहिले आहेत. ज्याठिकाणी दरोडे पडले अशा जिल्हयांची नावे आपण घेतली नाही. याकरिता त्याची आगाऊ माहिती आपण सांगणार काय?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

ता.प्र.क्र. 33560...

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, पडलेल्या दरोडयांची एकूण संख्या दिली आहे. सरकारला ही माहिती लपवून ठेवण्यासारखे काही नाही. राज्यात पडलेल्या दरोडयांच्या संख्येत फार मोठया प्रमाणात वाढ झाली नाही हे मी वेळोवेळी सांगितले आहे. सरासरी पाहिली तर दरवर्षी 500 पेक्षा अधिक दरोडे महाराष्ट्रामध्ये नेहमी पडत असतात. गेल्या वर्षी हे प्रमाण 20 ने घटले तर यावर्षी 28 ने घटले. डिटेक्शनचे प्रमाण वाढल्यामुळे आणि अशाप्रकारची कारवाई केल्यामुळे दरोडयाचे प्रमाण घटले आहे. माननीय सदस्यांनी सी.आय.डी.ने दिलेल्या माहिती संदर्भात प्रश्न विचारला. सभापती महोदय, महाराष्ट्रातील जनतेसाठी ही माहिती मी स्वत: प्रसिध्द केली आहे. त्या माहितीचे प्रकाशन माझ्या हस्ते झाले आहे. शासनाला घडलेल्या घटनेची माहिती लपवून ठेवण्याची आवश्यकता नाही. जे गुन्हे घडत आहेत त्यामध्ये पोलिसांच्या अकार्यक्षमतेमुळे हे गुन्हे घडत आहेत असा निष्कर्ष काढणे बरोबर नाही. काही गुन्हयांच्या पाठीमागे सामाजिक, आर्थिक कारणे आहेत, बेकारी आहे, नैतिक मूल्यांची घसरण आहे. अशा अनेक कारणांमुळे हे गुन्हे घडत आहेत. पोलिसांनी कितीही डिटेक्शन केले तरी ही पोलिसांची जबाबदारी आहे. दिवसे दिवस डिटेक्शनचे प्रमाण वाढत आहे. मी आकडेवारी प्रकाशित केली आहे. त्यामध्ये राजकीय कार्यकर्त्यांवरील हल्ले घटले आहेत, दलितांवरील हल्ले घटले आहेत, पत्रकारांवरील हल्ले घटले आहेत. ज्या गुन्हयांमध्ये वाढ झाली आहे, ते गुन्हे कमी करण्यासाठी योग्य ती उपाय योजण्याचे काम सुरु आहे.

(यानंतर श्री. बरवड)

अस्सुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता. प्र. क्र. 33560 ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आतापर्यंत नऊ वेळा सांगितले की, गुन्ह्यांपेक्षा डिटेक्शनचे प्रमाण वाढलेले आहे. गुन्ह्यांचे प्रमाण म्हणावे तसे वाढलेले नाही असे त्यांनी सांगितले. दादरमध्ये 10 मे रोजी भर दुपारी 12.00 वाजता डॉ. देशपांडे यांच्या घरी चोरी झाली आणि 5 लाख रुपये चोरीला गेले. त्यांनी पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवली. पाच सहा वेळा फोन केले. आता डिसेंबर महिना उजाडत आहे तरी डिटेक्शनच्या संदर्भात काहीही हालचाल झालेली नाही. माहिती देण्यासाठी त्यांना बोलवले सुध्दा नाही. त्यांचे 5 लाख रुपये गेले. शेवटी ते आता बाहेरच्या लोकांना सांगतात की, काही करता येईल काय ते बघा. डी.वाय.एस.पी. श्री. धारिया यांच्याकडे चौकशी आहे. ते त्यांना बोलवून काही सांगत नाहीत. याबाबतीत असे होत असेल तर इतर गुन्ह्यांच्या बाबतीत काय होत असेल ? त्याबाबतीत डिटेक्शन झालेले नाही. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी विचारले की, ज्या जिल्ह्यांची नावे यामध्ये दिलेली नाहीत त्या ठिकाणी किती गुन्हे घडलेले आहेत ? त्याची माहिती द्यावी. ही जी चोरी झाली त्याचे डिटेक्शन अजून का होत नाही ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, मी सांगितले की, एका बाजूला चोऱ्या आणि दरोडे यांच्या डिटेक्शनचे प्रमाण निश्चितपणे वाढलेले आहे. चोरी, जबरी चोरी, अग्निशस्त्रे घेऊन दरोडे घालणे अशा बाबतीत 30 हजार लोकांना अटक करण्यात आली. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे काही लोक जामिनावर सुटले. परंतु मोठ्या प्रमाणावर अटकसत्र घेतल्यामुळे आणि आरोपींना पकडल्यामुळे दरोडे आणि चोऱ्यांचे प्रमाण घटत आहे. मी उत्तरामध्ये सांगितले की, अजून काही चोऱ्या आणि दरोड्यांचे डिटेक्शन व्हावयाचे राहिलेले आहे. ते करण्याच्या दृष्टीने आमचा प्रयत्न सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक दरोड्यासंबंधी सांगितले आहे. त्याबाबतीत वरिष्ठ अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येईल. तसेच तपास न लागलेले गुन्हे सुध्दा ताबडतोब तपासासाठी सोपवले जातील.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, दरोड्यांच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये बाहेरचे लोक नोकरीसाठी येतात. त्यांच्याकडे पाहुणे मंडळी येतात.

...2...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता. प्र. क्र. 33560 .... श्री. जैनुद्दीन जव्हेरी ....

त्या ठिकाणी दरोडे पडतात. जे लोक दरोड घालतात त्यांची नावे क्रिमिनलमध्ये असूनही त्यांच्यावर तडीपारीची कारवाई होत नाही. ती कारवाई करणार काय ? बल्लारपूर हे शहर बॉर्डरवर आहे. रेल्वेमध्ये गुंगीचे औषध देऊन काही महिलांचे दागिने चोरीला जातात. जी.आर.पी.एफ. त्या केसेस महाराष्ट्र पोलिसांकडे हस्तांतरित करतात. त्याबाबतीत कोणती प्रगती झालेली आहे याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, बाहेरच्या राज्यातून असे जे गुन्हेगार येतात त्यांच्यावर पोलिसांचे बारकाईने लक्ष असते. असे गुन्हेगार पकडण्यामध्ये काही प्रमाणात यश मिळालेले आहे. काही गुन्ह्यांची शैली कानपूर बेस असलेली आहे. राज्यामध्ये मध्यंतरी मोठ्या प्रमाणात ज्वेलर्सवर दरोडे पडले. त्यामध्ये मध्यप्रदेशमधील झाबुवा मधील गुन्हेगार आढळून आले. हे गुन्हेगार पकडण्याच्या कामी मध्यप्रदेश सरकारने सहकार्य करावे यासाठी तेथील माननीय मुख्यमंत्र्यांना सुध्दा विनंती केलेली आहे आणि त्यांनी याबाबतीत मदत करण्याची तयारी दाखवलेली आहे. आंतरराज्य टोळयांकडून जे दरोडे पडतात त्याबाबतीत शेजारच्या सगळ्या राज्यांबरोबर आमचे को-ऑर्डिनेशन आहे. रेल्वे प्रवासात, बस प्रवासात चॉकलेटसारखे गुंगी आणणारे पदार्थ देऊन चोरी करण्याची प्रकरणे होतात. प्रवाशांना सुध्दा शासनामार्फत विनंती करण्यात येते की, त्यांनी अनोळखी माणसांकडून अशा खाद्य वस्तू स्वीकारु नयेत जेणेकरुन चोऱ्या होतील. या ठिकाणी लोकप्रतिनिधींकडे झालेल्या चोऱ्यांचा उल्लेख झाला. लोकप्रतिनिधींनी सुध्दा प्राथमिक दक्षता घ्यावी. प्रामुख्याने दोन चोऱ्यांच्या बाबतीत या ठिकाणी उल्लेख झाला. डॉ. पतंगराव कदम यांच्या घरी जी चोरी झाली त्यामध्ये लोकांनी प्रेझेंट दिलेल्या वस्तू ज्या दर्शनी भागात ठेवल्या होत्या त्यातील एक वस्तू गायब झाली. तपास करणाऱ्या पोलिसांनी मुख्य दरवाज्याकडे पाहिल्यानंतर असे दिसले की, खिडकी उघडलेली नव्हती.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 14:10

(ता.प्र.क्र. 33560... (श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...

मुख्य दरवाजाजवळ वॉचमन बसविलेला होता. त्यामुळे ही चोरी कुणी अभ्यागताने किंवा घरातील नोकराने केलेली आहे काय याचा तपास घेतला जात आहे. सन्माननीय उपसभापती श्री. वसंतरावजी डावखरे यांच्या घरी 20 लाखाची चोरी झाली होती. अत्यंत शिताफीने चोर पकडला गेला. तो माजी नोकर निघाला. ओळखीचा फायदा धेऊन आणि माहितीचा आधार घेऊन चो-या केल्या जात आहेत. मुंबईतील एकंदरीत दरोडे पडलेले बघितले तर परप्रांतातील माणसे कमी पगारावर नोकर म्हणून ठेवले जातात, पगारातली बचत पाहिली जाते. परंतु एक दिवस ते नोकर त्यांचा सगळा पगार वसूल करतात आणि पोलिसांचा त्रास वाढवतात. घरामध्ये ज्या माणसाला नोकर म्हणून ठेवले जाते त्या माणसाचे नाव, फोटो, पत्ते इत्यादी माहिती पोलीस स्टेशनला द्यावी असे आवाहन केलेले आहे. काही ठिकाणी लोक सहकार्य करतात. मी सदनाच्या माध्यमातून आवाहन करतो की परराज्यातील लोक कामावर ठेवले तर त्यांची माहिती, पत्ते पोलिसांना दिले तर ती माहिती पोलीस व्हेरिफाय करु शकतील. आतापर्यन्तच्या ज्या चो-या सापडल्या त्यातील बहुसंख्य चो-या हया नोकरांनी केलेल्या होत्या. अशा चो-या होतात त्याबाबतीत लोकांनीसुध्दा सावधानता बाळगून पोलिसांना सहकार्य करण्याची आवश्यकता आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : उत्तराच्या भाग एक मध्ये मुंबईतील काळाचौकी पोलीस स्थानकाच्या हद्दीत दिनांक 24.9.2007 रोजी महिलांच्या अंगावरील दागिने खेचून पसार होण्याचे 4 प्रकार एकाच दिवशी घडले असे म्हटलेले आहे. एप्रिल 2007 पासून देखील असे प्रकार घडलेले आहेत. दोन्ही प्रकरणी तपास लागलेला नाही. काळाचौकी पोलीस स्टेशनपासून 5-10 मिनिटांच्या अंतरावर हे प्रकार घडलेले आहेत. त्यामुळे पोलीस आणि चोर यांच्यातील संगनमतामुळे असे प्रकार घडत नाही ना, अशी शंका येते. एप्रिल 2007 पासून या काळाचौकी पोलीस स्टेशनच्या हद्दीत दागिने आणि मोबाईल चोरीच्या घटना घडलेल्या आहेत. मोबाईल चोरीला गेल्यानंतर त्याबाबतची तक्रार पोलीस नोंदवून घेत नाहीत. त्याबाबत आयएमईआय नंबर मागितला जातो. एखाद्या कल्याणमधील माणसाचा मोबाईल चोरीस गेला असेल तर तो आयएमईआय नंबर कसा आणणार ? निदान अशा वेळी पोलिसांना तक्रार तरी नोंदवून घेण्यास सांगावे. माझा प्रश्न असा आहे की, या पोलीस

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्टेशनच्या हद्दीमध्ये एप्रिल 2007 पासून दागिने आणि मोबाईल चोरीच्या ज्या घटना घडल्या त्यातील किती धटना उघडकीस आल्या ? किती प्रकरणी मुद्देमाल परत करण्यात आला ?

श्री. आर.आर.पाटील : ज्या चार घटना घडल्या त्यामधील एक घटना उघडकीस आली आहे. राजू दुर्गज आणि रामजी पोटदुखे या दोघांना पकडण्यात आलेले आहे. अन्य घटनांच्या बाबतीतही तपास करण्यात येत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : मोबाईलची चोरी झाल्यानंतर आयएमईआय नंबर आणण्यास सांगितले जाते. आयएमईआय नंबर नसतानाही तक्रार नोंदवून घेण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात येतील काय ?

श्री. आर.आर.पाटील : तक्रार नोंदवून घेण्यास आयएमईआय नंबरची आवश्यकता नसते. परंतु तपासासाठी त्याची आवश्यकता असते. तशा सूचना पोलिसांना दिल्या जातील.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर येथे बनावट फायनान्स कंपनी स्थापन करुन तेथील नागरिकांना लाखो रुपयांना फसविल्याबाबत**

**(६) * ३५०३४ श्री. राजेंद्र जैन , श्री. गिरीश गांधी , प्रा. फौजीया खान , श्रीमती उषाताई दराडे डॉ. एन. पी. हिराणी :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे बनावट फायनान्स कंपनी स्थापन करुन तेथील नागरिकांना लाखो रुपयांना फसविल्याची घटना माहे सप्टेंबर, २००७ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) होय.

(२) होय.

(३) याप्रकरणी दिनांक १०.९.२००७ रोजी सदर पोलीस ठाण्यात अप क्र. ३६७/०७, कलम ४२०, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला असून गुन्ह्यातील तीनपैकी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास चालू आहे.

श्री राजेंद्र जैन : माननीय सभापति जी, इस तरह के गुनाह बड़े पैमाने पर हो रहे हैं. ये लोग आम लोंगों को बुरी तरह से फंसाते हैं. नागपुर में जो गुनाह हुआ है उसमें बताया गया है कि जो तीन आरोपी थे उनमें से एक आरोपी नहीं पकड़ा गया है. मुझे पूछना है कि वे तीन आरोपी कौन थे. दूसरा प्रश्न मेरा यह है कि ग्रामीण भाग में यह बनावटी कंपनियां अपने नाम का बोर्ड लगाती हैं और लोगों को लालच देती हैं कि बहुत फायदा आपको होगा. ये कंपनी अपना रजिस्ट्रेशन नहीं कराती हैं. मैं कहना चाहता हूं कि जिन्होंने अपना रजिस्ट्रेशन नहीं कराया है और यह व्यवसाय कर रही हैं शासन उनके खिलाफ कुछ कार्रवाई करेगा क्या ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...नंतर श्री. भोगले...

SGB/ 14:15

ता.प्र.क्र.35034..........

श्री.आर.आर.पाटील : या गुन्हयातील तीन मुख्य आरोपी दिपक पाटील,नागपूर; दिपाली राणे, दिल्ली; व सीमा सय्यद खान, नागपूर हे असून सोहम कन्सलटंट या नावाची फर्म सुरु करुन एक ते चार लाख रुपयापर्यंत कर्ज उपलब्ध करुन दिले जात असे. मात्र कर्ज देण्यापूर्वी प्रोसेसिंग फी 5 टक्के अगोदर भरावी लागत असे. अशा प्रकारे प्रोसेसिंग फी म्हणून गोळा केलेले 22 लाख घेऊन त्यांनी पोबारा केला. कंपनी चालविणारे गायब झाले त्यावेळी पोलिसांकडे तक्रार करण्यात आली. या कंपनीची खुलेआम वृत्तपत्रातून जाहिरात प्रसिध्द केली जात होती. जाहिरात वाचून अनेक लोकांनी आपले पैशाची गुंतवणूक या कंपनीमध्ये केली होती. जी महानगरे आहेत त्या ठिकाणी इओडब्ल्यू आणि जिल्हा स्तरावर क्राईम शाखा अशा पध्दतीने वृत्तपत्रात खुलेआम जाहिरात दिली जात असेल तर त्यावर यापुढच्या काळामध्ये लक्ष ठेवून राहतील.

--------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वसमत तालुक्यात (जि.हिंगोली) पोषण आहाराचे पैसे थकल्याबाबत**

**(७) * ३३५७८ प्रा. फौजीया खान , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. वसंतराव चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगणकीय आर्थिक तरतूद प्रणालीच्या प्रचंड घोळामुळे जून ते सप्टेंबर, २००७ अशा चार महिन्याचे एकूण ३९ लाखांच्या वर अनुदानाचे पैसे वसमत तालुक्यात अद्याप देय झाले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरम्यान या कालावधीमध्ये उसनवारी करुन मुख्याध्यापकांनी ही योजना कशी बशी चालू ठेवली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे संबंधित शाळेचे मुख्याध्यापक आर्थिक विवंचनेत सापडले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पोषण आहार योजना सुरळीत राबविण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांच्याकरीता** : (१) व (२) नाही.

वसमत तालुक्यासाठी माहे जून २००७ मध्ये रुपये ११.०० लक्ष एवढा निधी देण्यात आला होता. त्यानंतर दिनांक २४.१०.२००७ रोजी रुपये ३९.०० लक्ष एवढा निधी देण्यात आलेला आहे. संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणालीमधील अडचणीमुळे निधी देण्यास काही अंशी उशिर झालेला आहे.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, ता.प्र.क्र.३३५७८.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पॉईंट ऑफ प्रोसिजरसंबंधी

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये सूचना दिली होती. या संदर्भात सभागृहामध्ये दोन मिनिटे माझे मनोगत मांडण्यास आपण मला संधी दिली होती. या सूचनेसंबंधी शासनाने निवेदन करावे असे आपण निर्देश दिले होते. अद्यापही निवेदन आलेले नाही. अधिवेशन उद्या संपणार आहे.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, आम्ही देखील नियम 93 अन्वये सूचना दिलेल्या आहेत. अमरावती जिल्हयातील अचलपूर येथील दंगल घडली. त्या संदर्भात निवेदन करावे असे आपण निर्देश दिले होते.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अचलपूर येथील दंगलीबाबत आज सभागृहात निवेदन केले जाईल असे आपण सांगितले होते. या दंगलीबाबत आम्ही लक्षवेधी सूचना दिली होती, अनेक आयुधांचा वापर केला होता. परंतु तो विषय सभागृहाच्या पटलावर आलेला नाही. अचलपूर येथील दंगलीच्या संदर्भातील निवेदन आजच आले पाहिजे अशी आमची विनंती आहे.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, दोन दिवसापासून सातत्याने अमरावती जिल्हयातील आदिवासी भागातील शिक्षणाशी संबंधित असलेल्या बांधकामाला बंदी घालण्यात आली आहे. कायद्याचे पूर्णपणे उल्लंघन केलेले आहे. दोन्ही विषयाचे आजच निवेदन केले पाहिजे.

**सभापती** : आज किंवा उद्या अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन केले जाईल. अचलपूर येथील दंगलीसंबंधी निवेदन आज कसे होईल यादृष्टीने गृहमंत्र्यांना मी सांगेन.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एक गंभीर बाब आपल्याशी संबंधित आहे. परवा या सभागृहाचे माननीय उपसभापती श्री.वसंतराव डावखरे यांच्यासंबंधी सभागृहात प्रश्न उपस्थित झाला होता. त्यांना एका पोलीस अधिकाऱ्याने शिवीगाळ केली आणि त्याच कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांनी तसे ॲफिडेव्हीट करुन त्यांच्यापर्यंत पोहोचविले. हा प्रश्न सभागृहात उपस्थित झ ााल्यानंतर माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, मी सकाळी आदेश दिले. तुमच्या मनाप्रमाणे तो अधिकारी निलंबीत होईल. त्यांच्या निलंबनाचा आदेश माझ्या हातात आहे. या निलंबनाच्या आदेशामध्ये आपल्या सभागृहात घडलेल्या चर्चेचा कुठेही उल्लेख केलेला नाही. मी या आदेशातील तीन ओळी आपल्याला वाचून दाखवितो. ज्याअर्थी पोलीस निरीक्षक श्री.बी.आर.आंधळकर यांना स्वत:च्या विनंतीवरुन या कार्यालयाचे आदेश क्रमांक-पोलीस-3/10/06 नुसार बदली पुणे ग्रामीण येथून सोलापूर शहर येथे संलग्न करण्यात आली होते......... (नंतर श्री.जुन्नरे...

श्री. पांडुरंग फुंडकर....

पोलीस अधीक्षक पुणे, ग्रामीण यांना सोलापूर शहर येथे हजर होणे कामी 15.10. रोजी कार्यमुक्त केलेले आहे. तथापि श्री. आंधळकर हे सोलापूर शहर येथे हजर झाले नाहीत. अशा प्रकारे आंधळकर यांनी वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न करता आदेशाची अवहेलना केली म्हणून त्यांचे हे गैरवर्तन आदेशाची अवहेलना करणारे आहे हे समजण्या इतकी माझी पूर्ण खात्री झालेली आहे. त्यांच्या सदर गैरवर्तणूकी विरुध्द मुंबई पोलीस नियम 1956 मधील नियम क्रमांक 3(1)(अ) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारान्वे श्री. आंधळकर यांना शासकीय सेवेतून सदरचे आदेश मिळाल्या दिनांकापासून निलंबित करण्यात येत आहे."

सभापती महोदय, या ठिकाणी त्या दिवशी या प्रकरणाच्या संदर्भात बरीच चर्चा होऊन सभागृहाचा अमूल्य वेळ खर्ची पडला होता. त्या दिवशी माननीय गृहमंत्र्यांनी सभागृहाची दिशाभूल केलेली असून, अशा प्रकारचा आदेश काढून संबंधित अधिका-याला पाठीशी घालण्यात आलेले आहे. या वरिष्ठ सभागृहाच्या सन्माननीय उपसभापतींना जर अशा प्रकारची वागणूक दिली जात असेल तर ही बाब फार गंभीर आहे. माननीय सभापती किंवा माननीय उपसभापतींच्या बाबतीत असा प्रकार होत असेल तर लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्य लोकांची काय अवस्था असेल याचा विचारच केलेला बरा असे मला वाटते. हा प्रश्न गंभीर असल्यामुळे या प्रकरणाची आपण गंभीर दखल घेतली पाहिजे. संबंधित अधिकारी बदलीच्या ठिकाणी गेला नाही म्हणून हा आदेश काढलेला आहे. माननीय श्री. डावखरे साहेबांना शिवीगाळ केली म्हणून हा आदेश काढलेला नाही. त्यामुळे आमचा आग्रह आहे की, संबंधिताच्या विरुध्द जी ऑर्डर काढलेली आहे ती आजच्या आज बदलून, ही ऑर्डर दुरुस्त करुन आजच संबंधित अधिका-याला दिली गेली पाहिजे. अन्यथा माननीय गृहमंत्र्याच्या वक्तव्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही एवढेच मला या निमित्ताने बोलावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी या विषयाच्या संदर्भात आपण जी भावना व्यक्त केली ती महत्वाची आहे. आपण म्हणाला होता की, "सभापती म्हणून माझ्या अखत्यारीत विचार करुन योग्य तो निर्णय घेंईन." काल परवा माननीय उप मुख्यमंत्र्याना सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार बोलले तर त्यांना त्यासंदर्भात राग आला होता. उप मुख्यमंत्रीपद वैधानिक पद नसले तरी त्यांना राग आला होता. या सदनात जे कामकाज चालते त्या संदर्भात पावित्र्य राखण्याची व त्यासंदर्भात वागण्याची जबाबदारी माननीय उप मुख्यमंत्र्याचीही

...2

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आहे. श्री. आंधळकर यांचे त्वरित निलंबन केले जावे अशी सदनाची तीव्र भावना होती. हे प्रकरण जुलै मधील असतांना डिसेंबर येऊन गेला तरी त्या बाबतीत काही सुध्दा कारवाई झाली नव्हती तरी आम्ही त्यासंदर्भात जास्त काही बोललो नाही. असे असतांना अशाप्रकारे सदनाची दिशाभूल करणे माननीय उप मुख्यमंत्र्यांना योग्य वाटते काय ? सदनाची दिशाभूल करणे त्यांना शोभते काय असे मी म्हणणार नाही. या प्रकारामुळे या सदनाचा अवमान झालेला नाही काय? ज्या कारणास्तव निलंबनाचे आदेश काढण्यात आलेले आहे त्याची माहिती देण्यासाठी मा.गृहमंत्र्यांना सभागृहात पाचारण करावे, वाटले तर त्यासाठी सभागृह थोडयावेळ स्थगित करावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री प्रा. श्री. वसंत पुरके या ठिकाणी उपस्थित आहेत . शिक्षण विभागाच्या संदर्भात त्यांनी काही आदेश काढलेले आहेत. त्या आदेशामध्ये अजून पर्यंत इंग्रजीमध्येच नावे दिलेली आहेत. या ठिकाणी श्री. बी.आर.आंबेकर असे नाव दिलेले आहे. त्यामुळे मराठीकरण करण्याच्या संदर्भात अजूनही खालपर्यंत आपल्या सूचना गेलेल्या नाहीत असे दिसून येते. त्यामुळे यासंदर्भातील कारवाई कोण करणार ? सदनामध्ये यासंदर्भात चर्चा झालेली असतांना शासनाने दुर्लक्ष करणे योग्य नाही. त्यामुळे आपण यामध्ये जी शास्ती जाहीर करणार आहात ती येथे जाहीर करावी. सन्माननीय उपसभापतींना सन्मान मिळत नसेल तर कठीण आहे तसेच या विषयाच्या संदर्भात जी शास्ती केली जाणार आहे त्याची सुध्दा माहिती मिळावी एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, श्री. आंधळकर हे आता मॅटमध्ये गेलेले असून त्यांना स्टे मिळावा यासाठी शासकीय यंत्रणा राबवली जात आहे अशी माहिती मिळालेली आहे. त्यामुळे आपण या वरिष्ठ सभागृहाचे सभापती म्हणून तातडीने लक्ष घालण्याची गरज आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी म्हटल्या प्रमाणे श्री. आंधळकर यांना मॅटमध्ये स्टे मिळू शकेल. ऑर्डरमध्ये असे म्हटले आहे की, "स्वत:च्या विनंतीवरुन त्यांनी बदली मागितली व ते बदलीच्या ठिकाणी गेले नाहीत". संबंधितांनी जर मेडिकल सर्टिफिकेट दिले की, मी या या कारणामुळे उपस्थित होऊ शकलो नाही तर ते मॅटमधून सुटतीलच. यामुळे सभागृहाचा तसेच मा. उपसभापतींचा अवमान झालेला आहे. या विषयाच्या



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे......

संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. त्या भावना अप्पर पोलीस महासंचालक श्री. वर्मा यांनी पाळल्या नसतील तर मला वाटते की, ही बाब खूपच सिरीअस आहे. या सभागृहात चालणाऱ्या कामकाजाला महत्व नाही, हम करेसो कायदा चालत असेल तर त्याला कोठे तरी अटकाव झाला पाहिजे.

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे ग्रामीण पोलीस विभागा संदर्भातील हा प्रश्न आहे. माननीय उप सभापती यांच्या संदर्भातील विषय उपस्थित होण्या अगोदरचा हा विषय आहे. पुणे ग्रामीण पोलीस विभागाने महिलांच्या संदर्भात जे बेपर्वाईचे वर्तन केले त्या संदर्भातील तक्रारींबाबत चर्चा करण्यासाठी आम्ही ग्रामीण पोलीस अधीक्षक यांना बोलाविले होते. परंतु लग्नाचा वाढदिवस आहे असे सांगून ते बैठकीस उपस्थित राहिले नाहीत. मी मागील अधिवेशनात सुध्दा हा मुद्दा मांडला होता. तेव्हा माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले होते की,...

**सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी कृपया खाली बसावे. मी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना बोलण्यास परवानगी देत आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, पुणे ग्रामीण पोलीस स्टेशनचे इन्स्पेक्टर श्री.आंधळकर यांच्या संदर्भातील विषय मी सभागृहात उपस्थित केला होता. या सदनाचे माननीय पीठासीन अधिकारी श्री.वसंत डावखरे यांच्या संदर्भात माझ्याकडे पत्र आले होते, त्या पत्रातील परिच्छेद मी वाचून दाखविला होता. पीठासीन अधिकारी कोणीही असो, पीठासीन अधिकाऱ्यांच्या संदर्भात अवमानकारक मजकूर लिहून तो अन्य आमदारांना देणे हा प्रकारसुध्दा हक्कभंगाचा विषय होऊ शकतो. हे सर्व माहीत असून सुध्दा या सभागृहाचे नेते व माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी निलंबनाचे अभिवचन दिल्यावरही त्यादिवशी इन्स्पेक्टरचे निलंबन झाले नाही. दुसऱ्या दिवशीही निलंबन झाले नाही. तिसऱ्या दिवशीही निलंबन झाले नाही. आज चौथ्या दिवशी निलंबनाचे आदेश दिले. परंतु त्या आदेशामध्ये "बदलीच्या ठिकाणी रिपोर्ट केला नाही" म्हणून निलंबन करण्यात येत आहे असा उल्लेख करण्यात आला आहे. हे वरिष्ठ व सार्वभौम सभागृह आहे. या सदनामध्ये जे निदेश दिले जातात त्याची अंमलबजावणी आपण दिलेल्या निदेशाप्रमाणे होते. तेव्हा या आदेशामध्ये "वरिष्ठ सभागृहाच्या सूचनेप्रमाणे" अशाप्रकारचा उल्लेख असावयास पाहिजे होता, परंतु तसे झालेले नाही. पोलीस विभागाची निलंबनाची पध्दत काहीही असेल, परंतु याठिकाणी जे कारण दिलेले आहे जे योग्य नाही असे वाटते. संबंधित पोलीस अधिकाऱ्यांचे निलंबन होणे आवश्यक होते ते झालेले नाही. ते अजूनही त्याच पदावर कार्यरत आहेत. अशाप्रकारच्या आदेशामुळे संबंधितांना मॅटमध्ये जाण्याची संधी मिळेल आणि शासनाच्या

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

आदेशास स्थगिती मिळेल. मग याठिकाणी जी चर्चा झाली, त्या अनुषंगाने आपण निदेश दिले त्याचा अनादर झाला असा त्याचा अर्थ होतो. तेव्हा आपण या सभागृहाची प्रतिष्ठा सांभाळावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, गट नेते सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार व अन्य सन्माननीय सदस्यांनी या सार्वभौम सभागृहाच्या प्रतिष्ठेच्या प्रश्नाबाबत एक अत्यंत महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. या सदनाचे उपसभापती श्री.वसंत डावखरे यांच्या बाबतीत जी चर्चा झाली या चर्चेच्या अनुषंगाने सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्याला सस्पेंड केले आहे असे सांगितले. याठिकाणी ज्या भावना व्यक्त करण्यात आल्या त्या अत्यंत महत्वाच्या आहेत. जुलै पासून नोव्हेंबर महिन्यांपर्यंत माननीय उपसभापतींनी संबंधित अधिकाऱ्याच्या बाबतीत तक्रार व गंभीर आरोप होते, त्याअनुषंगाने याठिकाणी चर्चा देखील झाली. ही चर्चा झाल्यानंतर माननीय गृहमंत्र्यांनी "त्या अधिकाऱ्याला सस्पेंड करतो" असे सांगितले. याचाच अर्थ असा की, याठिकाणी माननीय उपसभापतींच्या संदर्भात मांडलेले प्रकरण गंभीर होते. त्या अनुषंगाने गृहमंत्र्यांनी तातडीने केलेली ती कार्यवाही होती आणि अशा पध्दतीची सदनाची भावना होती आणि ती योग्य होती. आता माननीय विरोधी पक्ष नेते व अन्य सन्माननीय सदस्यांनी जी कागदपत्रे वाचून दाखविली याचा अर्थ असा होतो की, त्या अधिकाऱ्याला अन्य कोणत्या तरी कारणाकरिता जर निलंबित केले असेल आणि या ठिकाणी चर्चा होण्या अगोदर ते निलंबन झाले असेल तर समजू शकतो. परंतु जे निलंबन केलेले आहे ते या ठिकाणी झालेल्या चर्चेनंतर होणार असेल किंवा झाले असेल तर ते योग्य नाही.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

यासंबंधी सभागृहात आपण अतिशय गंभीरपणे चर्चा केली. सभापती म्हणून मी आपल्या सर्वांच्या भावना समजून घेऊन याबाबतीतील माझा निर्णय मी सांगितलेला आहे. या प्रकरणाच्या दृष्टीने अत्यंत गांभीर्याने त्याची नोंद मीही घेतलेली आहे, असे त्यावेळी मी सांगितले. म्हणून मी याठिकाणी सन्माननीय गृहमंत्र्यांना सांगेन की, आत्ताच सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी गोष्ट माझ्या निदर्शनास आणली, ती अशी की, त्या अधिकाऱ्याला निलंबित केलेले आहे. परंतु ते "सोलापूरला हजर झाले नाहीत," या कारणाकरिता त्यांना निलंबित केले आहे, असे असेल तर ज्या पध्दतीने या सदनामध्ये याबाबतीतील गांभीर्याने चर्चा झाली त्यावेळी सन्माननीय उपसभापती महोदयांनीही अतिशय तीव्र शब्दात आपल्या भावना सदनामध्ये व्यक्त केल्या. त्यानुषंगाने त्या अधिकाऱ्यावर जी कारवाई होणे गरजेचे होते, ती झालेली नाही असे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचे व अन्य सन्माननीय सदस्यांचे मत आहे.सन्माननीय गृहमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. याबाबतची जी वस्तुस्थिती आहे ती त्यांनी जरुर सांगावी.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, एका पीएसआयच्या निलंबनाची चर्चा येथे पुन्हा पुन्हा होणे हे मी योग्य मानत नाही. घडलेली वस्तुस्थिती अशी आहे की, सस्पेंशन ही छोटी गोष्ट असून, सरकारने ती कधीच केलेली आहे. परंतु याबाबत येथे वेळोवेळी चर्चा करावी लागत आहे. पहिल्यांदा हा प्रश्न खालच्या सभागृहात उपस्थित करण्यात आला. मी इतकेच सांगितले होते की, एका दिवसात आम्ही पूर्ण चौकशी करुन निलंबित करु. जसे, मी डी.जीं.च्या संपर्कात होतो, तसे, माननीय उपसभापती महोदयही त्यांच्याशी संपर्क ठेऊन येथे झालेली चर्चा सांगत होते. सभापती महोदय, शासनामध्ये एक पध्दत आहे की, विधानसभा सभागृहामध्ये एखाद्या गोष्टीसंबंधी आश्वासन दिल्यानंतर विधानसभेचे प्रोसिडिंग पहिल्यांदा संबंधित विभागाला जाते व त्यानंतर प्रोसिडिंग बघून त्याबाबतचे निर्णय मंत्रालयामध्ये घेतले जात असतात. अजून येथे झालेल्या कुठल्याही चर्चेचे प्रोसिडींग अद्याप विभागाला मिळालेले नाही आणि विभागाने तशापध्दतीचे....(अडथळा).. माझे ऐकून घ्या. ते सारखी हरकत घेणार आणि आम्ही ते ऐकून घेणार, हे बरोबर नाही. माझे ऐकून घ्यावे.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी शांत बसावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, अशाप्रकारे ऐकून न घेताच हरकत घेणे योग्य नाही. मला प्रथम बोलू द्यावे.

सभापती महोदय, मीही त्यादिवशी सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन सूचना दिल्या की, त्यांच्या बाबतीतील बाकीचीही कारणे बघा व त्यांना निलंबित करण्याच्या दृष्टीने जे दोष असतील त्याप्रमाणे तातडीने कारवाई करा तसेच विधानसभेचे प्रोसिडींग आल्यानंतर त्याची माहिती आपल्याला कळविण्यात येईल. त्यांना चार्जशीटही देण्याबाबतच्या सूचना मी केल्या. सभापती महोदय, विधानसभेची सगळी चर्चा, माननीय उपसभापतींबाबतचे अवमानकारक शब्द, तसेच यासंदर्भातील सगळया गोष्टी आपले प्रोसिडींग मिळाल्यानंतर, प्रोसिडींगमधील शब्दाबरहुकूम त्यांना कळविण्यात येईल. आता जे सस्पेन्शन केलेले आहे, ते आदेश काढल्यानंतर....माननीय उपसभापती महोदयांनी तक्रार केल्यानंतरच बदलीचे आदेश काढलेले होते, हेही मी येथे सांगितलेले आहे. बदली केलेल्या ठिकाणी ते उपस्थित झालेले नाहीत, त्यांनी डी.जीं.चा आदेश मानले नाहीत म्हणून त्यांना निलंबित केलेले आहे. याठिकाणी जी चर्चा झाली आणि माननीय उपसभापती महोदयांच्या बाबतीत जे अपशब्द काढले या सगळया गोष्टी त्यामध्ये असतील. आम्ही आज प्रोसिडिंग घेऊ आणि गृहमंत्रालयामार्फत डी.जीं.ना तशा पध्दतीच्या सूचना देऊ. सभापती महोदय, त्यांच्यावर दोषारोपपत्रही तयार करण्यात आलेले असून, त्यामध्ये या सगळया गोष्टींचा समावेश करण्यात येईल.

**सभापती** : सन्माननीय गृहमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, याबाबतीत एक गोष्ट स्पष्ट होणे गरजेचे आहे की, त्या दिवशी सन्माननीय उपसभापती महोदय बोलले, विरोधी पक्षनेत्यांनी व अन्य सन्माननीय सदस्यांनी याबाबतीमध्ये येथे चर्चा केली त्यादरम्यान गृहमंत्री या नात्याने आपण उठून सांगितले की, ही कारवाई मी पूर्ण केलेली आहे.

नंतर श्री.रोझेकर....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...........

त्यानंतर तुम्ही जे भाषण केले, ज्या भावना व्यक्त केल्या, त्या भावनांच्या अनुषंगाने मी विवेचन केले. त्याअगोदर ही कार्यवाही पूर्ण केली आहे, असे माननीय गृहमंत्री महोदयांनी सांगितल्यामुळे मी एखाद्या अधिका-याला निलंबित करा, असे वेगळे सांगण्याची आवश्यकता नव्हती. कारण ती ॲक्शन तुम्ही त्याअगोदरच पूर्ण केली होती.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, वस्तुस्थिती अशी आहे की, अगोदरच्या दिवशी विधानसभेमध्ये चर्चा झाली. निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले. त्याप्रमाणे डी.जी.यांनी निलंबनासंबंधीची टिप्पणीही फायनल केली आणि दुस-या दिवशी या सदनामध्ये चर्चा झाली. म्हणजे या सदनामध्ये चर्चा होण्यापूर्वी सस्पेंन्शन रेकॉर्डवर केले होते आणि दुस-या दिवशी ऑर्डर पाठविली.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या सदनामध्ये चर्चा झाल्यानंतर, विधानसभेमध्ये चर्चा झाल्यानंतर सुध्दा ऑर्डरमध्ये माननीय उपसभापतींचा उल्लेख झालेला नाही. आमचे तेच म्हणणे आहे. जर माननीय उपमुख्यमंत्री सांगतात त्याप्रमाणे विधानसभेमध्ये चर्चा झाल्यानुसार निलंबनाची कार्यवाही झाली असेल तर निलंबन आदेशामध्ये तसा उल्लेख न करता बदलीसंदर्भातील उल्लेख केला आहे, यालाच आमची हरकत आहे. विधानसभेत, विधानपरिषदेत जी चर्चा झाली ती जाणूनबुजून बाजुला ठेऊन, बदलीचे प्रकरण पुढे करुन निलंबित करणार असाल तर ते योग्य नाही. हा या सभागृहाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. म्हणून आपण याचा फेरविचार करावा आणि ती ऑर्डर बदलावी. माननीय उपसभापतींचा अवमान केला, शिविगाळ केली, या कारणास्तव निलंबित करण्यात आले आहे, अशा प्रकारची ऑर्डर दिली गेली पाहिजे, अशी आमची मागणी आहे. यापेक्षा दुसरा कोणताही मुद्दा नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी जे वक्तव्य केले तेवढयापुरतेच मला बोलावयाचे आहे. हा कोणत्याही एका पी.एस.आय.च्या सस्पेनशनचा विषय नाही. माननीय उपमुख्यमंत्री असे म्हणाले की, एका पी.एस.आय.चा विषय तीन-तीन वेळा निघावा ? परंतु, हा केवळ पी.एस.आय.चा विषय नाही तर हा माननीय उपसभापतींच्या अवमानाचा विषय आहे, म्हणून आम्ही तो काढतो आहोत. एका पी.एस.आय.चा विषय तीन-तीन वेळा काढत आहात, असे माननीय सभागृह नेत्यांच्या तोंडी वक्तव्य राहणे म्हणजे या ठिकाणी ज्या भावना व्यक्त झाल्या

....2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याचा अवमान करणारे राहील. त्यामुळे ते जे काही बोलले आहेत, ते आपण कार्यवृत्तातून काढून टाकू. कारण हा विषय माननीय उपसभापतींच्या अवमानाचा आहे, एवढेच मला म्हणावयाचे आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, गृह विभागाने संबंधितांना निलंबनाचे जे आदेश दिलेले आहेत त्यामध्ये असे म्हटले आहे की, "बदलीच्या ठिकाणी हजर न राहून वरिष्ठांच्या आदेशाचा भंग केला आहे त्यामुळे त्यांना निलंबित करण्यात येत आहे." आता माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सर्व चर्चा ऐकल्यानंतर विधानसभेतील व विधानपरिषदेतील चर्चेचा उल्लेख करुन निलंबित करण्यात येईल, असे सांगितले आहे. नियमाप्रमाणे एका अधिका-याला अशाप्रकारे दोन वेळा निलंबित करता येईल का ? त्याला पहिली ऑर्डर दिल्यानंतर, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितल्याप्रमाणे, तो अधिकारी कोर्टात जाईल आणि मी आजारी होतो म्हणून येऊ शकलो नाही, असे सांगेल. कदाचित स्टे घेईल. आता तुम्ही त्याला पुन्हा दुसरी निलंबनाची ऑर्डर द्याल, त्यामध्ये कारण वेगळे असेल. ही ऑर्डर घेऊन तो पुन्हा मॅटमध्ये जाईल. आता मला अशी माहिती मिळाली आहे की, तो मॅटमध्ये गेला आहे. पुन्हा गृह विभाग असे सांगेल की, माननीय श्री.वसंत डावखरे, सभापती, विधान परिषद यांचा अवमान केला वगैरे वगैरे म्हणून तुम्हाला निलंबित करता येते. या दोन्ही ऑर्डर घेऊन तो कोर्टात जाईल. शासनाला, त्याला पूर्वग्रहदुषितपणे निलंबित करावयाचे होते, शासन हे पूर्वग्रहदुषित आहे, असे सिध्द करण्याचा, सांगण्याचा तो प्रयत्न करील, एवढाच तांत्रिक मुद्दा मला मांडावयाचा आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, बदलीविरुध्द मॅटमध्ये जाण्याचा अधिकार आहे. संबंधित अधिकारी मॅटमध्ये गेला आहे. आता आपण त्याला निलंबित केले आहे. निलंबनासंबंधी मॅटकडून स्टे देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. कारण, निलंबन ही शिक्षा नाही, ती प्रशासकीय बाब आहे. त्यामुळे निलंबन रद्द होणार नाही आणि रद्द झाले तर सरकार सर्वोच्च न्यायालयातही जाऊ शकेल आणि जाईल. फक्त आपण आपल्या सचिवांना आदेश द्यावेत की, आज संध्याकाळपर्यन्त कार्यवृत्त मिळाले तर सस्पेनशनचे पहिले कारण कायम ठेऊन विस्तारित, ज्या कारणासाठी पुन्हा सभागृहात आश्वासन देण्यात आले, त्याचा समावेश करुन त्यांच्यावर आरोपपत्र ठेवण्यात येईल आणि हे कारण त्याला जोडण्यात येईल. पध्दत अशी आहे की, जोपर्यन्त प्रोसिडिंगची कॉपी मिळत नाही तोपर्यन्त विधानसभा किंवा विधानपरिषदेत काय घडले हे केवळ ऐकून कागदपत्रांची प्रक्रिया

...3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.........

सुरु होत नाही. एकदा कार्यवृत्त आल्यानंतर प्रक्रिया सुरु होते. गृह विभागानेही कार्यवृत्त मिळावे, असा प्रयत्न केला आहे. आपण आपल्या सचिवांना आदेश द्यावेत म्हणजे त्याप्रमाणे तातडीने कार्यवाही करुन घेण्यात येईल, एवढीच विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय गृहमंत्र्यांचा आदर ठेवून मी एवढेच सांगेन की, ही कारवाई मी पूर्ण केली आहे, असे गृहमंत्र्यांनी या सदनामध्ये सांगितलेले आहे. याचा अर्थच असा होतो की, निलंबित अधिका-याच्या निलंबनाबाबत माननीय गृहमंत्र्यांनी स्वत: या सदनामध्ये सूचना केली होती. ती सूचना केल्यानंतर सभापती म्हणून या सदनामध्ये मी या चर्चेचा समारोप केला, त्या समारोपामध्ये "संबंधित अधिका-यावर सभापती या नात्याने कोणती ॲक्शन घ्यायची त्याचा मी जरुर निर्णय घेईन," एवढेच मी बोललो होतो. सन्माननीय गृहमंत्र्यांनी कारवाई पूर्ण केलेली आहे, असे सांगितले आहे. म्हणून त्या अधिका-याबाबत असे करा, निलंबित करा, अशी चर्चा या ठिकाणी झाली नाही. जरुर सन्माननीय सदस्यांनी, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि माननीय उपसभापतींनी ती मागणी केली होती. पण त्या मागणीच्या दरम्यान माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, हे झाले आहे. आज या ठिकाणी "अधिकृत पद्धतीचे कार्यवृत्त मिळाले नाही", असा उल्लेख माननीय गृहमंत्र्यांनी केला आहे. खरे म्हटले तर कार्यवृत्त आपल्या विभागाच्या अधिका-यांनी कलेक्ट केले असते तरी चालले असते. या ठिकाणी मी अशी ऑर्डर दिलेली नाही. मी माझ्या तोंडून अशी ऑर्डर दिलेली नाही. कारण इन द मिन व्हाईल तुम्ही उठून सांगितले की, ॲक्शन पूर्ण झाली आहे. विरोधी पक्षनेते व अन्य सन्माननीय सदस्यांनी आणि माननीय उपसभापतींनी मागणी केली, त्यातील तो एक भाग आहे. तरी आज दुपारपर्यन्त कार्यवृत्त गृह विभागाला पाठविण्याची मी व्यवस्था करीन. पण या ठिकाणी तुम्ही आहात, राज्यमंत्री येथे आहेत. आपण ती गोष्ट कबूल केली असेल तर ॲक्शन थांबण्याचे काही कारण नाही.

-----------------

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे.

**मु.शी.**: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

विशेष कार्य अधिकारी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 19 नोव्हेंबर, 2007 ची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**सभापती** : दिनांक 19 नोव्हेंबर, 2007 ची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

---------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांचा सन 2006-07 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादितचा सन 2005-06 चा चौथा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मर्यादितचा सन 2005-2006 चा बत्तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.जयंत पाटील (वित्तमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीच्या सन 2001-2002 च्या आठव्या अहवालातील परिच्छेद क्रमांक 1.28 अनुसार सर्व मंत्रालयीन विभागांनी सन 2005-2006 या वर्षातील पुनर्विनियोजनाच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-------

यानंतर कु.जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ प्रथम श्री.बोरले.... 14:45

**महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे**.

श्रीमती सुधा जोशी ( समिती सदस्य ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीचा कोल्हापूर महानगरपालिकेच्या व कोल्हापूर जिल्हापरिषदेच्या सेवेतील महिला अधिकारी / कर्मचारी यांच्या भरती,आरक्षण,अनुशेष व पदोन्नती,तसेच त्यांच्यासाठी राबवण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजना आणि पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती,कोल्हापूर याबाबतचा बारावा अहवाल सभागृहाला सादर करते.

**सभापती** : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

**औचित्याचे मुद्दे.**

श्री.संजय केळकर : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती महोदय, औचित्याच्या मुद्दयाच्या माध्यमातून मी एका सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सरकारचे लक्ष वेधू इच्छितो. राज्यात विशेषत: कोकण किना-यावर वाढत्या अनधिकृत वसाहतीबाबत व अतिरेकी कारवायाबाबत राज्यशासनास पुरेशी कल्पना देण्यात आलेली आहे,असे असतांना गत एक महिन्यात कोकण किनारपट्टीवर विना परवाना खाजगी हेलीकॉप्टर राज्यशासनाचा कोणताही प्रोटोकॉल न पाळता थळ-नवगांवच्या किना-याजवळील उंदेरी किल्ल्यात सुर्यास्तानंतर उतरणे व सुर्योदयापूर्वी निघून जाणे व याबाबतची कोणतीही माहिती जिल्हा प्रशासनाला नसणे,सन 1993 साली झालेले बॉम्बस्फोट प्रकरणात वापरलेले स्फोटके कोकण किनारपट्टीवरच उतरविण्यात आलेले स्पष्ट असतांना प्रशासनाचे त्याकडे होणारे दुर्लक्ष हे सुरक्षिततेच्या दृष्टीने फार गंभीर असल्याने औचित्याच्या मुद्दयाद्वारे सदरची बाब शासनाच्या निदर्शनास आणत आहे. याबाबत शासनाने तातडीने कारवाई करावी.

------

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....3

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

माननीय सभापती महोदय,मी या औचित्याच्या उल्लेखाच्या माध्यमातून पेढी प्रकल्पाच्या संदर्भामध्ये सदनामध्ये झालेल्या चर्चा त्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांना मदत करण्याच्या अनुषंगाने आपल्या दालनामध्ये बैठक झाली होती,या बैठकीमधून प्रकल्पग्रस्तांच्या हिताच्या दृष्टीने चितळे समितीसमोर निर्णय घेण्याबद्दल केलेला प्रयत्न या सर्वांबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. यासंदर्भात शासनातर्फे अद्याप काहीही कारवाई झालेली नाही. यासंदर्भात समितीची नियुक्ती होऊन देखील सर्व प्रकल्पग्रस्त संभ्रमित आहेत. या औचित्याच्या माध्यमातून मी आपल्याला विनंती करतो की, आपण अत्यंत चांगल्या अशा पध्दतीचा निर्णय घेऊन प्रकल्पग्रस्तांना दिलासा देण्याचे केलेले काम आणि त्यासंदर्भात विशेष समितीच्या नियुक्तीबाबत योग्य ते निर्देश आणि आदेश देण्यास सांगणे,संबंधित अधिका-यांकडून त्यासंदर्भात लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी,अशी मी विनंती करतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....4

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

औष्णिक वीज निर्मिती केंद्र परळी वैजनाथ ता.परळी,जि.बीड या केंद्रातून बाहेर पडणारी पलाय ॲश सिमेंट कंपन्यांच्या ट्रकमध्ये भरण्यासाठी ॲशसिली यंत्रणा वापरण्यात येणे. या औष्णिक वीज निर्मिती केंद्रातून रोज शहराच्या मुख्य मार्गावर हे प्रदुषण होणे,त्याचबरोबर थर्मल पॉवर स्टेशनच्या चिमणीमधून बाहेर येणा-या धुरामध्ये राख असणे,यामुळे त्या परिसरातील नागरिकांच्या स्वच्छ धुतलेल्या भांडयांवर मोठया प्रमाणावर राख जमा होऊन त्यांचे आरोग्य धोक्यात येणे. या परिसरातील पिकांवर,पिण्याच्या पाण्यावर पर्यायाने नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम,त्यामुळे नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष,यावर शासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....5



श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

राज्यशासनाने या राज्यामध्ये सन 2000 पासून शिक्षणसेवक योजना लागू केल्यापासून त्या त्या कॅटेगरीचे शिक्षक मिळाले नाही तर अप्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक करण्याची तरतूद केलेली आहे. आज राज्यामध्ये अनेक मागास वर्गीय अप्रशिक्षित शिक्षक शिक्षण सेवक म्हणून काम करीत आहेत. त्यांच्या सेवेची तीन चार वर्षांची मुदत पूर्ण होऊन देखील त्यांच्या प्रशिक्षणाची सोय झालेली नाही. या मागच्या अधिवेशनामध्ये यासंदर्भात चर्चा झाली होती,तसेच यासंबंधी आपण बैठक घेऊनही दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी झालेली नाही. यासंदर्भात शासनाने ताबडतोब कारवाई करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.गागरे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ पूर्वी कु.खर्चे 14:50

श्री.रामनाथ मोते .....

सभापती महोदय, याबाबत आपल्या दालनामध्ये बैठक झाली होती. शासनाने त्या संदर्भात तातडीने निर्णय घ्यावा, जी.आर.काढावा, त्यांच्या सेवेला संरक्षण द्यावे, प्रशिक्षणाची सोय करावी अशा प्रकारचे निर्देश आपण त्या बैठकीत दिले होते. या निमित्ताने मी विनंती करतो की, शासनाने या संदर्भात तातडीने आदेश काढावा. अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय टर्मिनेट केलेली आहे. त्यांना सेवेचे संरक्षण द्यावे, तसा जी.आर.काढावा अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी दिनांक 23 नोव्हेंबर, 2007 रोजी एक औचित्याचा मुद्दा मांडला होता. श्री.महादेव दगडू ठाकरे मु.बोरजवळा, ता.खामगाव, जि.बुलढाणा या तरुणाने ज्या परिस्थितीमुळे आत्महत्या केली, ती परिस्थिती मी सदर औचित्याच्या मुद्दयाद्वारे विस्तृतपणे सभागृहात मांडली होती. श्री.ठाकरे व त्याच्या आई-वडीलांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या आडमुठेपणामुळे व अटवादी भूमिकेमुळे दारिद्रय रेषेचे कार्ड, घरकुल व जलपूर्ती योजनेपासून वंचित व्हावे लागले आहे. त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ कसा चालणार ही चिंता मनात सतत घर करुन राहिली होती. यामुळे 12 वी पर्यत शिकलेला व कुटुंबातील सर्वात मोठा मुलगा आत्महत्या करतो, ही मन विषण्ण करणारी घटना ऐकल्यानंतर मी ताबडतोब माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना कार्यवाही करण्याबाबत विनंती केली होती. माननीय सभापती महोदयांनी निर्देश दिले होते की, मी माननीय गृहमंत्री यांना डी.ओ. लेटर लिहून याबाबत चौकशी व कारवाई करण्याबाबत कळविण्यात येईल. त्याप्रमाणे आपण स्वत: मंत्री महोदयांना डी.ओ. लेटर पाठविले होते.

सभापती महोदय, आपण घेतलेल्या निर्णयानंतर चौकशीचे चक्रे वेगाने फिरतील व तातडीने काही कारवाई होईल असे सर्वांनाच वाटत होते परंतु याबाबत उलटे झाले आहे. आपण घेतलेल्या निर्णयानंतर स्वत: जिल्हाधिकारी मृत व्यक्तीच्या घरी गेले व म्हणाले की, मदत देणारे आम्ही आहोत, तहसीलदार व तलाठी आहेत, आमदार प्रत्यक्ष काही मदत देत नाही, असे त्या मृताच्या आईस बजावून सांगितले. ही दडपशाही आहे. माननीय गृहमंत्री काही कारवाई करीत नाहीत. त्या महिलेने पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली आहे, त्यात अधिकाऱ्यांच्या नावांचा उल्लेख आहे. परंतु चौकशी करुन गुन्हा रजिस्टर केलेला नाही. मृत व्यक्तीच्या आईला जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, "लोकप्रतिनिधीकडे जाण्याची काय गरज आहे. ही सर्व मदत व योजना आमच्यामार्फत दिल्या जातात". विधिमंडळाकडून न्याय मिळावा म्हणून स्पष्ट माझ्या नावाचा उल्लेख मृत व्यक्तीने केला होता. माननीय गृहमंत्री यांना आग्रहाची विनंती आहे की, पुन्हा असे प्रकार घडू नयेत म्हणून या प्रकरणामध्ये गुन्हा दाखल करुन योग्य ती कारवाई तातडीने करावी, अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो.

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय गृहमंत्री यांना या प्रकरणाची कल्पना आहे की, विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, आपण स्वत:, या प्रश्नावर माझ्या दालनामध्ये चर्चा केलेली आहे. माननीय गृहमंत्री गांभीर्याने याचा विचार करीत आहेत ही वस्तुस्थिती आहे. श्री.पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे अधिक माहिती दिलेली आहे, त्या अनुषंगाने तातडीने याबाबतची कारवाई करावी.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सदरील प्रकरणामध्ये मी स्वत: लक्ष घालीन.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....4

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो. रत्नागिरी को-ऑपरेटीव्ह स्पिनिंग मिल्स लि.इन्सुली, जि.सिंधुदुर्ग यांना इन्सुली क्षेत्रफळ ता.सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग येथील शेतकऱ्यांनी आपली जमीन कवडीमोल किंमतीस दिली. ही जमीन घेताना या कंपनीत भूधारकांना नोकऱ्या देण्याचे आश्वासन दिले होते. याकरिता शासनाच्या अनुदानित योजनेतून कोटयावधी रुपयांचा निधी हडप करुन गिरणी बंद पाडली. सन 1995 पासून ही सूतगिरणी बंद पडल्याने संचालक, हातमाग व वस्त्रोद्योग यांनी 2004 मध्ये ती अवसायनात काढली. बँकेकडून कर्ज घेतले असल्याने राज्य सहकारी बँकेने या गिरणीची चल व अचल मालमत्ता दिनांक 3.3.2005 रोजी जप्त केली आणि कर्जवसूलीकरिता लिलाव प्रक्रिया सुरु केली आहे. यामुळे या गिरणीकरिता संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीही जात असून त्यांना उद्योगधंदाही नाही. परंतु या लिलाव प्रक्रियेतसुध्दा अनागोंदी कारभार करुन लिलाव करण्यापूर्वी अवसायक व वस्त्रोद्योग विभागाने याची योग्य ती मान्यता घेणे आवश्यक असूनही तशी परवानगी न घेता करोडो रुपयांची मालमत्ता 2 कोटी 30 लाखास बिल्डरच्या घशात घातली. या सर्व प्रकारामुळे तेथील शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झ ाला असून या सर्व प्रकाराची सखोल चौकशी करुन कारवाई करावी, अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

-----

नंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, मी या ठिकाणी आपल्या परवानगीने एक औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो.

सन्माननीय सभागृहाचे सदस्य श्री. परशुराम उपरकर विधानपरिषद सदस्य यांच्या जिविताला धोका असल्यामुळे गृह विभागाचे त्यांना संरक्षण असून त्यांनी स्वत:च्या आत्मसंरक्षणासाठी बंदूक परवाना मिळण्यासाठी जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांच्याकडे अर्ज केला होता. तेथील जिल्हाधिकारी व एस.पी. हे पती पत्नी असल्याने त्यांनी या बाबीमध्ये राजकारण आणून श्री. उपरकर यांना बंदूक परवाना नाकारण्यात आला आहे. सदर बंदूक परवान्याचे अपील आयुक्त, मुंबई यांच्याकडे केले असता आयुक्तांनीही व जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालावरुन बंदूक परवाना नाकारला आहे. आयुक्तांच्या निर्णयानंतर मंत्रालय पातळीवर अपील करण्याची नियमात तरतूद नाही. आयुक्तांच्या निर्णयावर मंत्रालयात अपील करण्याची नियमात तरतूद करुन अथवा खास बाब म्हणून श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांना परवाना मिळण्याबाबत शासनाला आपण आदेश द्यावेत ही विनंती.

**सभापती** : शासनाने याची नोंद घ्यावी.

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, नोंद घेतलेली आहे.

...................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने येथे औचित्याचा मुद्दा मांडीत आहे. खरे पाहता हा विषय लक्षवेधी सूचनेचा आहे परंतु मी आता तो औचित्याच्या मुद्दयाद्वारे मांडत आहे.

औषधे खरेदी बाबत लेंटिन आयोगाची काही मार्गदर्शक तत्वे आहेत.राज्य शासनाने नियम धुडकावून पॉलिसी डिसिजन घेऊन एक शासन निर्णय काढलेला आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, ज्या कंपनीचे रेट कमी असतील त्यांना प्राधान्य देण्यात येईल.अशा प्रकारचे रेकमेंडेशन या जी आर मध्ये करण्यात आले. वस्तुत: हिंदुस्तान लॅटेक्स ही कंपनी कंडोम बनविणारी कंपनी आहे. या प्रश्नासंदर्भात गेल्या 2 वर्षापूर्वी विधीमंडळाच्या अधिवेशनामध्ये गदारोळ झाला होता. यासंबंधी चौकशी समिती देखील नियुक्त करण्यात आली होती. महाराष्ट्राचे माननीय प्रधान सचिव, आरोग्य खाते यांनी हा जीआर काढलेला आहे. माझी आपणास विनंती आहे की, आपण ताबडतोब याबाबत स्टे आणावा व अशाप्रकारची अवैध खरेदी ताबडतोब थांबवावी. कारण ही कंपनी स्वत: औषध बनवित नाही. लेंटिन आयोगाच्या तरतुदी नुसार एखादी कंपनी जर स्वत: उत्पादन करीत असेल तरच त्यांनी औषध पुरवठा करावा. लोन लायसन्सची जी पद्धत आहे ती ताबडतोब बंद करावी. शासनाच्या एका अधिकाऱ्याने असा जीआर काढला आहे की, 1 ते 4 वर्ष वयोगटातील मुलांना सिरप न देता गोळया देऊन त्यांच्यावर काय परिणाम होतो, या गोळया त्यांच्या पोटात जातात की नाही अशा प्रकारचा नवीन अभ्यास करण्यात येत आहे. याबाबत आपण लक्ष घालून त्वरीत कार्यवाही करावी एवढी विनंती मी आपणास करीत आहे. धन्यवाद.

............

..3..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी येथे आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा मांडीत आहे.

सभापती महोदय, 26/12/2006 रोजी सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये धान्य घोटाळा झाला त्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी 20 जुलै 2007 रोजी सभागृहामध्ये अर्धातास चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी राज्य मंत्र्यांनी उत्तर दिले होते की, यासंदर्भात कोकण आयुक्तांमार्फत चौकशी करण्यात येईल व कारवाई करण्यात येईल. या घोटाळयामध्ये दोषी कर्मचाऱ्यांना 28 तास अटक झाली. त्यांना त्यानंतर निलंबित करण्यात आले. परंतु तहसीलदार श्री. बी.बी. सावंत आणि जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. एस.एम पालशेतकर यांना कुडाळ येथील जेलमध्ये 48 तास अटक होऊनही याबाबत काही कारवाई झालेली नाही. यासंदर्भात माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेख केला. दिनांक 23 नोव्हेंबर रोजी सदनामध्ये आदेश देण्यात आले होते की, यासंदर्भात कारवाई करावी व त्या अधिकाऱ्यांना ताबडतोब निलंबित करावे. परंतु अजूनही यासंदर्भात कोणतीही कारवाई झालेली नाही. महाराष्ट्र नागरी सेवा 1989 यामधील कलम 4 अनुसार 48 तास जर एखादा शासकीय कर्मचारी यास तुरुंगवास झाला तर त्याला निलंबित करण्याची तरतूद असतानाही कोणतीही कारवाई अजूनही करण्यात आली नाही. 26 डिसेंबर 2007 रोजी झालेला गुन्हयाबाबत माननीय सभापतींनी आदेश देऊनही त्याचे पालन करण्यात आले नाही. याठिकाणी शासनाने कारवाई करावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्दयाद्वारे व्यक्त करतो. धन्यवाद.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक हिताच्या दृष्टीने एक औचित्त्याचा मुद्दा येथे मांडत आहे. सभापती महोदय, जीवनदायी योजना ही अत्यंत चांगली असून गरीब लोकांना या योजनेचा खरोखरी उपयोग होत आहे. ही योजना प्रभावीपणे राबवावी अशी माझी आग्रहाची विनंती आहे. मात्र या योजनेमध्ये काही त्रुटी आहेत त्या आपण दूर कराव्यात यासाठी मी औचित्त्याच्या मुद्याद्वारे आपले लक्ष वेधू इच्छितो. सभापती महोदय, सुरूवातीला राज्य शासनाने या योजनेचा जो जी.आर.काढला होता त्यात 'औषधोपचार' हा शब्दप्रयोग होता. पण नंतर त्यांनी औषधोपचारा दरम्यान येणारे सर्व खर्च यामध्ये अंतर्भूत होतात. म्हणून त्यातील 'औषधोपचार' हा शब्द वगळला आणि "औषधी सामान आणि डिस्पोजेबलस्" असा शब्दप्रयोग वापरला. त्यामुळे रूग्णांच्या शस्त्रक्रियेसाठी 1 लाख रूपये जरी देत असले तरी प्रत्यक्षात रूग्णाला केवळ 30 ते 35 हजार रूपयेच मिळताहेत. त्यामुळे अनेक रूग्णांची ऑपरेशन्स वगैरे थांबलेली आहेत. काहींना तर त्यासाठी आपली घरे विकावी लागत आहेत अशी परिस्थिती आहे. रूग्णाला ऑक्सिजन, पॅथॉलॉजी टेस्टस्, ब्लड गॅस, ॲनलेसिस, आयसीयू केअर ऑपरेशन थिएटर, ए.सी., इलेक्ट्रॉनिक्स, एक्सरे, रूग्णालयाचा खर्च या बाबी शासन निर्णयामध्ये अंतर्भूत नसल्यामुळे या गोरगरीब लोकांना, जे दारिद्र्य रेषेखाली जगत आहेत त्यांना एक लाख रूपयांऐवजी फक्त 30-35 हजार रूपये मिळताहेत. सभापती महोदय, केंद्र सरकारकडून बायपास सर्जरी आणि जन्मताच दोष असलेला हार्टडिसीज याला 1 लाख 30 हजार रूपये आणि व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट करता 1 लाख 50 हजार रूपये याप्रमाणे पॅकेज देण्यात येते. तेथे ही अडचण येत नाही. पण महाराष्ट्रात जीआर मध्ये एका शब्दामध्ये गोंधळ केल्यामुळे अडचण येत आहे. म्हणून माझी या निमित्ताने मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपल्या जीवनदायी योजनेमध्ये केंद्र शासनाच्या पॅकेजप्रमाणे निर्णय करावा म्हणजे गरीब लोकांना अडचण येणार नाही. गरिबांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असल्याने आपण स्वत: यामध्ये लक्ष द्यावे अशी मी या औचित्त्याच्या मुद्याद्वारे विनंती आपल्याला करतो.

**

...... 3डी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा येथे मांडत आहे. आद्य क्रांतिकारक लहूजी साळवे यांनी इंग्रजांविरूद्ध क्रांतीचा मंत्र दिला व क्रांतिकारकांची फौज निर्माण केली. अशा लहूजी साळवेची पुणे ही कर्मभूमी आहे. ज्यांनी इंग्रजांविरूद्ध क्रांतीचा जनक म्हणूनही मान्यता मिळविली अशा या क्रांती वीराचे पुणे येथे राष्ट्रीय स्मारक उभे रहावे अशी महाराष्ट्रातील तमाम मातंग समाजाची मागणी गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. पुणे नगरीत लहूजी साळवे यांचे राष्ट्रीय स्मारक राज्य शासनाने करून आद्य क्रांतिवीर लहूजी साळवे यांच्या कार्याचा गौरव करावा याकडे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

***

..... ३डी ३ ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, मी उपस्थित करीत असलेला औचित्याचा मुद्दा हा जवळजवळ 10 विभागा संबंधातील आहे. महाराष्ट्र राज्याची जी परंपरा आहे त्यामध्ये विविध विष्यांवर पूर्वीदेखील स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने अनेक विभागाने कार्यक्रम राबविला आहे. या संदर्भात नव्याने जी घटना घडली आहे ती म्हणजे केंद्र सरकारच्या राष्ट्रीय नियोजन मंडळाने, म्हणजे नियोजन मंडळाच्या व्हॉलंटरी ॲक्शन विभागाने 'नॅशनल पॉलिसी ऑन व्हॉलंटरी सेक्टर' म्हणजेच "स्वयंसेवी क्षेत्रासाठी राष्ट्रीय धोरण" जाहीर केले आहे आणि त्यामुळे आपल्याकडील 160 स्वयंसेवी संस्थांनी मागणी केलेली आहे की, महाराष्ट्र राज्याने देखील अशा प्रकारचे आपले धोरण जाहीर करावे. सभापती महोदय, हा एका विषयाशी संबंधित प्रश्न नाही. त्यात भारतीय लोकविकास कार्यक्रम, पीएडीआय, आदर्श गाव समिती, वनजमीन महामंडळे, पडिक जमीन विकास महामंडळ, मानव अधिकार आयोग, महिला आयोग, यांची अत्यंत दूरावस्था असून स्वयंसेवी भावना व संस्था प्रज्वलित व प्रभावी होण्याची यंत्रणा माननीय सभापती व माननीय अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनानुसार धोरण तयार करण्यात यावे. या धोरणाची इंग्लिश व हिंदी प्रत www.vanindia.org वर उपलब्ध असून याची प्रत मी आपल्यामार्फत राज्य शासनाकडे देत आहे. उद्या या अधिवेशनाचा शेवटचा दिवस असल्याने 160 स्वयंसेवी संस्थांसाठी स्वतंत्र धोरणाची मागणी जी त्यांनी केली आहे तिचा स्वीकार करावा अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

**

( यानंतर श्री. सरफरे .... 3इ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा मांडतो. सभापती महोदय, वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये जे सरकारी कर्मचारी राहतात त्या वसाहतीमध्ये मटक्यासंबंधी अतिशय गंभीर तक्रार आहे आणि त्या विषयीच मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करणार आहे. सभापती महोदय, वेळ कमी असल्याने मी ही तक्रार आपल्याला वाचून दाखवितो.

"We the Central Government employees working in various departments, located at Bandra Kurla Complex, wish to bring to your kind notice the following few lines for your favourable action. Recently one of our Colleague lost his purse containing cash and other important documents. With great difficulty, we located the culprit inside a Matka den located at Maharashtra Nagar, Bandra Kurla Complex under Kherwadi Police Station. Then we made a complaint to the Senior Inspector, Kherwadi Police Station and informed him about the matter. He took little interest and never carried out the raid nor he arrested the culprit. We have seen police personnel from police station, DCP (Zone VIII) and Additional C.P. (North west) visit the place to collect their haftas, DCP (Zone VIII) office is located nearby. We have made several written complaints to DCP (Zone-VIII), Smt. Archana Tyagi, IPS, Addl. C.P. (Law & Order). Till date nobody took any action to smash this den permanently. We have been informed that the Operator of the den is the Police informer. That is why the police is afraid of carrying out the raid..."

मला असे वाटते की, ज्या ज्याठिकाणी मटक्याचे अड्डे आहेत त्या बाबतीत तेथील लोकांचे असे म्हणणे आहे की, आमच्या भर वस्तीमध्ये हा मटका चालतो. त्याठिकाणी 200 लोक जमतात. याची गंभीरपणे नोंद घेण्यासाठी मी हे कागदपत्र माननीय गृहमंत्र्यांकडे सुपूर्द करतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडतो.

" सांगली शहरामध्ये काही दिवसापूर्वी महाराष्ट्राला काळीमा फासणारी घटना घडली आहे. त्याबाबतची माहिती वर्तमानपत्रामध्ये छापून आली आहे. सांगली येथे श्री. भिडे नावाच्या गृहस्थाने महाराष्ट्राचे दैवत आणि सामाजिक क्रांती घडविणारे महात्मा फुले यांच्या बाबतीत अत्यंत मानहानी करणारी अपमानास्पद अशी वक्तव्ये केली आहेत. याबाबतची नोंद महाराष्ट्राच्या अनेक जिल्हयांमध्ये लोकांनी घेतली आहे, आणि त्यांचा निषेध केला आहे. यानिमित्ताने माझी माननीय गृहमंत्र्यांना आणि शासनाला विनंती आहे की, महाराष्ट्रामध्ये अशाप्रकारे महात्मा फुले यांच्याविरुध्द बोलणाऱ्या प्रवृत्तीवर कारवाई होऊन त्यांना अटक करावी अशाप्रकारे औचित्याचा मुद्दा मी उपस्थित करीत आहे."

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा उपस्थित करतो.

"रोहे तालुक्यातील (जि.रायगड) कुंडलिका उजवातीर कालवा गळतीमुळे पुगाव, मढाळी बु. व पुई येथील रब्बी हंगामातील भातशेतीची मोठया प्रमाणात नुकसानी होते. सन 1985 सालापासून ही नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने जरुर ती उपाय योजना केलेली आहे. परंतु असे असतांना संबंधित शेतकऱ्यांना सन 2004, 2005, 2006 व 2007 साली झालेल्या भातशेतीच्या नुकसानीची रक्कम मिळाली नाही. याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांनी दि.20.7.2006 रोजी डोलवहाल संघर्ष समिती अध्यक्ष, संबंधित कंपन्यांचे अधिकारी, सरपंच पुगांव यांच्या समवेत बैठक घेतली व त्या बैठकीमध्ये रब्बी व खरीप हंगामातील 3 वर्षाची नुकसानीची सरासरी काढून त्यानुसार वस्तुनिष्ठ नुकसान भरपाईची रक्कम ठरवावी. परंतु अद्यापही शेतकऱ्यांच्या या मागणीचा विचार झाला नाही. याबाबत मी जिल्हाधिकारी, रायगड यांना दि.15.9.2006 रोजी पत्र देऊन पंचनामे करुन तातडीने नुकसान भरपाई देणेबाबत कळविले होते. मा.ना. बाळासाहेब थोरात, कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी देखील त्यांचेकडील दि.24.7.2007 अन्वये जिल्हाधिकारी, रायगड यांना लेखी पत्र देवून नुकसान भरपाई संबंधीची कार्यवाही पूर्ण करण्यास सांगितले आहे. तरी देखील अद्यापही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही. त्यामुळे शेतकरी आंदोलनाच्या पवित्र्यात असून या कालव्यातून पुरवठा होणारे पाणी बंद करण्याचे मन:स्थितीत आहेत. शेतकऱ्यांनी ही कृती केल्यास ज्या कंपन्यांना पाण्याचा पुरवठा होतो त्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होणार आहे. शिवाय कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार आहे. याबाबत मी गेल्या अधिवेशनापासून लक्षवेधी सूचना, नियम 92 अन्वये चर्चेची अनुमती मागितली आहे. दि.31 मे 2004 रोजी नुकसान भरपाईसाठी सभागृहात नियम 93 अन्वये चर्चा झाली. त्यानुसार भरपाई देण्याचे आश्वासन दिले गेले. मात्र अद्यापही 4 वर्षाची भरपाई मिळाली नाही."

सभापती महोदय, डोलवहाल बंधाऱ्यामधून पाण्याची गळती होऊन शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले. त्याबाबत आर.सी.एफ. ही फर्टिलायझर कंपनी नुकसान भरपाई देते. परंतु नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम महसूल व कृषि खात्याकडून केले जाते. गेल्या चार वर्षापासून हे पंचनामे झाले नाहीत. 1985 सालापासून त्या शेतक-यांना सातत्याने नुकसान भरपाई देण्यात येते. गेल्या चार वर्षामध्ये अनेक वेळा पंचनामे करण्याचे आदेश संबंधित मंत्र्यांकडून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. जयंत प्र. पाटील...

जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. त्याबाबत या सभागृहात अनेक वेळा प्रश्न उपस्थित करण्यात आला. परंतु जिल्हाधिकाऱ्यांकडून त्याबाबत अद्यापही कारवाई करण्यात आली नाही.  त्यामुळे शासनाने याबाबत त्वरीत कार्यवाही करावी. आणि ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना संबंधित खात्याच्या मंत्रिमहोदयांनी आदेश द्यावेत अशी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे मागणी करीत आहे.

---

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : याठिकाणी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून अत्यंत महत्वाच्या, तातडीच्या व गंभीर मुद्यांना माननीय सदस्यांकडून स्पर्श करण्यात आला आहे. या निमित्ताने सन्माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, त्यांनी आपल्या विभागाशी संबंधित असणाऱ्या औचित्याच्या मुद्दयांची नोंद घेऊन तातडीने कारवाई करण्याबाबत प्रयत्न करावेत.

त्याचप्रमाणे विधानमंडळ सचिवालयाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सन्माननीय सदस्यांनी सभागृहात मांडलेल्या औचित्याच्या मुद्यांचे टाचण विधानमंडळ सचिवालयामार्फत संबंधित विभागाच्या मंत्रिमहोदयांकडे पाठविण्याची व्यवस्था करावी. विशेषत: सन्माननीय सदस्य सर्वश्री. सुधाकर गणगणे, नितीन गडकरी यांनी मांडलेले औचित्याचे मुद्दे अत्यंत महत्वाचे आहेत. याचा अर्थ अन्य सन्माननीय सदस्यांनी मांडलेले औचित्याचे मुद्दे महत्वाचे नाहीत असा गैरसमज करुन घेऊ नये. सर्वच मुद्यांचा जरुर परामर्श घेण्यात यावा. त्याचबरोबर या दोन औचित्याच्या मुद्यांबाबत मंत्रिमहोदयांनी स्वत: लक्ष घालावे. यामध्ये दारिद्रय रेषेखालील सामान्य माणसांना त्यांच्या ऑपरेशनकरिता पैसे देण्याची आवश्यकता आहे.त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांनी सांगितल्याप्रमाणे महात्मा फुले यांच्यासंबंधी जे लिखाण लिहिले गेले आहे, त्याबाबत संबंधिताविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याच्या दृष्टीने मंत्रिमहोदयांनी स्वत: लक्ष घालून जरुर प्रयत्न करावेत.

मघाशी सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे सभागृहामध्ये उपस्थित नव्हते, आता सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित आहेत. तेव्हा त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

---

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यामध्ये शिक्षण विभागाने एकाच वेळी कनिष्ठ महाविद्यालयातील ऐच्छिक विषयांना सन 2000-2001 मध्ये मान्यता दिलेली आहे. त्याचवेळी राज्यातील कोल्हापूर आणि अमरावती विभागात त्याच अतिरिक्त विषयांना अनुदान तत्वावर मान्यता दिलेली आहे. या राज्यामध्ये समान कायदा, समान शिक्षण असे धोरण असताना मराठवाडा विभागातील औरंगाबाद आणि लातूर विभागीय उपसंचालकांच्या अंतर्गत असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अतिरिक्त विषयांना सन 2000-01 मध्ये जी मान्यता दिलेली आहे ती विनाअनुदानित तत्वावर दिलेली आहे. असा जो भेदभाव झालेला आहे त्यामुळे त्या विषयावर काम करणारे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक आहेत त्यांच्यामध्ये असंतोष पसरलेला आहे. हा असंतोष लवकरात लवकर दूर व्हावा अशी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करतो. त्याच बरोबर सन 2005-06 मध्ये जी काही वाढीव पदे दरवर्षी मान्य केली जातात ती 2007 पर्यंत अजून मान्य केलेली नाहीत. ती कनिष्ठ महाविद्यालयांची वाढीव पदे सुध्दा मान्य करावीत अशी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करतो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी "सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर यांच्या अधिपत्याखाली अपदवीधर व अर्हताधारक कनिष्ठ अभियंता यांना सुधारित दिनांकापासून शाखा अभियंता म्हणून राजपत्रीत दर्जा प्रदान करण्याबाबत शासनाला दिनांक 6 सप्टेंबर, 2005 रोजी सादर केलेल्या प्रस्तावावर शासनाने अद्यापपर्यंत निर्णय न घेतल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, केशवराव मानकर यांनी "राज्यातील हजारो मागासवर्गीय शिक्षण सेवकांना प्रशिक्षित करुन सेवेत संरक्षण देण्याबाबत तसेच नक्षलग्रस्त भागातील शिक्षक -शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबत सभागृहात आश्वासन देऊनही प्रत्यक्षात अद्यापही कार्यवाही न केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांनी "केंद्र व राज्य पातळीवर लाल गव्हाचा प्रश्न गाजत असताना अकोट, जि. अकोला उप विभागात मात्र सातत्याने रेशनचा गहू घोटाळा सुरु असल्याचे प्रकार उघडकीस येणे, हिवरखेड ता. अकोट येथेही 98 पोती गहू गोदामाबाहेर जात असताना पकडण्यात येणे, रास्त भाव दुकानदाराने दुकानांचे राजीनामे दिल्यामुळे सदर दुकाने इतर दुकानदार चालवित असल्याने एका दुकानदाराकडे 3-4 दुकानांचा गहू जमा होत असल्याबद्दल" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. आज लाल गव्हाच्या संदर्भात सदनामध्ये चर्चा आहे. या नियम 93 च्या सूचनेबाबत आपण निवेदन करा असे सांगितले तरी आज अडीच तासाची चर्चा असल्यामुळे मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, लाल गव्हासंबंधीची चर्चा आपण तीन नंबरवर ठेवलेली आहे. अंतिम आठवडा प्रस्ताव शेवटी यावयास पाहिजे. लाल गव्हाच्या संदर्भातील कालची



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

RDB

श्री. पांडुरंग फुंडकर .....

चर्चा पुढे ढकलल्यामुळे ती चर्चा आधी दाखवयास पाहिजे होती आणि त्यानंतर अंतिम आठवडा प्रस्ताव दाखवावयास पाहिजे होता.

**सभापती** : अंतिम आठवडा प्रस्ताव अधिवेशन संपण्याच्या आदल्या दिवशी येतो. शेवटी आपण सांगाल त्या पध्दतीने आपण चर्चा धेतो. हे दोन्ही प्रस्ताव विरोधी पक्षाच्या वतीने देण्यात आलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये असे ठरले की, शासकीय विधेयके शनिवारला घ्यावीत. आपण शासकीय विधेयके आज सकाळी ठेवली.

**सभापती** : आतापर्यंत एकही विधेयक पारित झाले नव्हते म्हणून आज सकाळी शासकीय विधेयके ठेवली होती.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, पाशा पटेल यांनी "संभा (टंकारपाडा) ता. तलासरी, जि. ठाणे या आदिवासींची वस्ती असलेल्या गावातील लोकांची बोलीभाषा मराठी असूनही तेथील मुलांना गुजराती भाषेत शिक्षण दिले जात असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो विषय नियम 93 चा होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मला असे वाटते की, हा विषय अनावधानाने पुन्हा आलेला आहे. परवा याबाबत निवेदन करण्यास सांगितलेले आहे. तसे सांगितले नसेल तर या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयातील 21 उप प्रादेशिक अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून या पदावर काम करीत असलेल्या अधिकाऱ्यांना शासनाची मंजुरी नसतानाही पदोन्नती दिल्याने मंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये तीव संताप निर्माण झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

---

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदनासंबंधी**

**सभापती** : आज माझ्याकडे एकंदर 16 निवेदने प्राप्त झालेली आहेत. सन्माननीय उप मुख्यमंत्री यांना विधानसभा सभागृहात काम असल्यामुळे त्यांच्या विभागाशी संबंधित निवेदने आधी घेण्यात यावीत अशी त्यांनी विनंती केली आहे. तेव्हा आता निवेदन क्रमांक 8 आधी घेऊ.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, आपण क्रम बदलून आधी निवेदन घेत आहात. त्यास आमची काही हरकत नाही. निवेदन क्रमांक 8 हे सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी विचारलेल्या सूचनेसंबंधी आहे. ते आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. त्यांना निरोप पाठविण्यात येत आहे. त्यांचे निवेदन नंतर घ्यावे. तोपर्यन्त गृहविभागाशी संबंधित असलेले निवेदन क्रमांक 10 घेण्यात यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मेळघाटातील युवतींची परप्रांतात होत असलेली विक्री

**मु. शी.** : मेळघाटातील युवतीची परप्रांतात होत असलेली विकी याबाबत डॉ. नीलम गो-हे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री): सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोरे यांनी "मेळघाटातील युवतींची परप्रांतात होत असलेली विक्री" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : महाराष्ट्र राज्यामध्ये या प्रकारच्या घटना वारंवार घडत आहेत. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, असा प्रकार घडल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही. मी आपले लक्ष दिनांक 26 नोव्हेंबर 2007च्या तरुण भारत वृत्तपत्रातील बातमीकडे वेधू इच्छिते. पत्रकार श्री. रवींद्र नवलाखे यांनी या संबंधातील बातमी प्रसिध्द केलेली आहे. मुली परप्रांतात पाठविल्या जात असल्याच्या बातम्या वर्तमानपत्रामध्ये वारंवार येत असताना देखील अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. ब-याच वेळा ही कुटुंबे अतिशय गरीब असल्यामुळे आईवडिल तक्रार करण्यास धजावत नाहीत. मेळघाटमध्ये दलाल खुले आम फिरत असतात. ॲण्टीट्रफिकींगच्या संदर्भात नोडल ऑफिसर म्हणून मीरा बोरवणकर यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. हा वेश्या विक्रीचा प्रश्न आहे. यासंदर्भात उच्चस्तरीय समिती करावी असे न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. तेव्हा अशी एखादी उच्चस्तरीय समिती शासन नेमील काय ? मेळघाट मधील घटनांच्या संदर्भत तपास करण्याची जबाबदारी एखाद्या अधिका-यावर सोपवली तर आम्हाला देखील त्यांना त्यामध्ये सहकार्य करता येईल.

श्री. आर.आर.पाटील : दिनांक 26.11.2007च्या तरुण भारत वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या वृत्तानुसार संपूर्ण चौकशी केलेली आहे. त्यामध्ये तथ्य आढळले नाही. एका मुस्लिम मुलीचे हिंदू तरुणावर प्रेम होते. तिच्या घरच्यांनी तिच्या बहिणीच्या प्रसुतीच्या निमित्ताने तिला मध्यप्रदेशला पाठविले. त्यांचा असा विचार होता की, ती दोन-तीन महिने प्रियकराला भेटली नाही तर त्यांच्या संबंधात खंड पडेल आणि तिचा विवाह त्यांच्या धर्मातील मुलाशी करता येईल. पण ही गोष्ट प्रियकराला समजली. सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींना घेऊन मुलीची सुटका करण्यात आली. दोघांचे लग्न देखील झालेले आहे. ही एक घटना सोडली तर अशा प्रकारची घटना घडल्याचे आढळून आले नाही. मेळघाट आणि त्या परिसरामध्ये तेथील गरीब कुटुंबांचा त्यांच्या आर्थिक परिसिथतीचा गैरफायदा घेऊन कोणी अनुचित प्रकार करणार नाही म्हणून गुप्तचर आणि खब-यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. एखादी जरी घटना आढळली तरी त्यांची गांभीर्याने चौकशी करण्यात येईल.

श्री. जगदीश गुप्ता : हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. अमरावती जिल्हयातील मेळघाट परिसरामध्ये अशा प्रकारची मोठी गँग कार्यरत आहे. चांदूरबाजार आणि मेळघाट भागात अशा लोकांच्या टोळ्या निर्माण झालेल्या आहेत. दर दोन-तीन दिवसांनी वर्तमानपत्रातून अशा प्रकारच्या बातम्या वाचावयास मिळतात. या टोळयांनी अमरावतीमध्ये आपले लक्ष केन्द्रीत केलेले आहे. विशेषत: चांदूरबाजार भागामध्ये त्यांची मोठी गँग कार्यरत आहे. तेव्हा यामध्ये लक्ष घालून शासन चौकशी करणार आहे काय ?

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : एस.पी.ना सूचना देण्यात येतील. अशी घटना घडलेली आहे का याची पूर्णपणे तालुकानिहाय माहिती घेण्यात येईल. घटना घडल्याचा संशय जरी आला तरी पूर्ण चौकशी केली जाईल.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वर्धा जिल्हयात कलर लॅबमध्ये झालेला भीषण स्फोट

**मु.शी.**: वर्धा जिल्हयात कलर लॅबमध्ये झालेला भीषण स्फोट याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, यांनी "वर्धा जिल्हयात कलर लॅबमध्ये झालेला भीषण स्फोट" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : या निवेदनामध्ये म्हटले आहे की, श्री.हनुवंते दवाखान्यामध्ये भरती असल्याने त्यांना अटक करण्यात आली नाही, गुन्हा पोलीस तपासावर आहे वगैरे. यासंदर्भात जी स्फोटके निष्काळजीपणे हाताळल्याने गुन्हा दाखल करण्यात आला असे म्हटले आहे, त्या ज्वालाग्राही पदार्थाबद्दल निष्काळजीपणा झाला होता का? कित्येक वेळेला हा बहाणा म्हणून सांगितले जाते की दुसऱ्या कामासाठी स्फोटके नेत असताना घटना घडली. वारंवार सभागृहात स्फोटके सापडल्याची उदाहरणे समोर येतात. त्यावेळी सन्माननीय सदस्यांची मागणी असते की, या स्फोटकांवर बंदी आणावी. फॉरेन्सिक लॅबने अनेकदा सूचना केलेली आहे, परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. अनैतिक संबंधाच्या आकसाने स्फोट घडविला असे जे निवेदनात म्हटले आहे याची स्पष्टता होत नाही. वैयक्तिक वादामधून आकसाने स्फोट घडविला का? ही स्फोटके कशी उपलब्ध होतात? हा माणूस दवाखान्यात भरती असल्याने अटक केली नाही, असे आणखी किती लोक आहेत?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, फोटो डेव्हलप करण्यासाठी जी केमिकल्स लागतात त्याचा हा स्फोट आहे. अनेकदा काही केमिकल्सची नितांत आवश्यकता असते. त्यांचा स्फोट होऊ शकते. त्यामुळे अशा स्फोटकांवर पूर्णपणे निर्बंध आणणे शक्य होत नाही. हे पदार्थ व्यवस्थित हाताळले तर स्फोट होण्याची शक्यता नाही. स्फोट होऊ शकतात अशा दुकानांना लायसन्स देत असताना यापुढच्या काळात काय दक्षता घेता येऊ शकतील याची पूर्ण माहिती घेऊ. यापुढच्या काळात अशी स्फोटके ज्या उद्योगांमध्ये, व्यवसायामध्ये वापरली जातात ती हाताळण्याचे तंत्रज्ञान अवगत केले आहे का हे लायसन्स देण्यापूर्वी बघण्यात येईल.

डॉ.नीलम गो-हे : स्फोटके मिळाली कुठून?

श्री.आर.आर.पाटील : स्फोटके याचा अर्थ नेहमी बॉम्ब असू शकतो असे होत नाही. आपण एखाद्या बाटलीमध्ये शेण आणि पाणी जरी 15 दिवस ठेवले तर तो बाटली बॉम्ब होऊ शकतो. आत गॅस तयार होऊन स्फोट होऊ शकतो. प्रत्येक स्फोटकावर बंधने आणणे कसे शक्य आहे? सरकारला देखील काही मर्यादा आहेत. ज्याचा स्फोट होऊ शकतो अशी स्फोटके यापुढे वापरायला देताना हाताळण्याचे योग्य प्रशिक्षण आहे की नाही हे आम्ही तपासून बघू.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नव्याने बांधण्यात येणाऱ्या बहुमजली इमारतींना अग्निशमन यंत्रणा बसविणे सक्तीचे करणे.

**मु.शी.**: नव्याने बांधण्यात येणाऱ्या बहुमजली इमारतींना अग्निशमन यंत्रणा बसविणे सक्तीचे करणे याबाबत सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी, यांनी "नव्याने बांधण्यात येणाऱ्या बहुमजली इमारतींना अग्निशमन यंत्रणा बसविणे सक्तीचे करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

--

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सागर मेघे : सभापती महोदय, हा अत्यंत गंभीर विषय आहे. नागपूर शहरातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ज्या नव्याने बांधण्यात येत असलेल्या इमारती आहेत त्यामध्ये अग्निशमन सुरक्षिततेबाबतचे सर्व नियम पायदळी तुडविले जात आहेत. अग्निशमन यंत्रणेबाबत महानगरपालिकेकडून एनओसी दिली जाते. एखादी गंभीर घटना घडल्यानंतर मोठया प्रमाणात जीवितहानी होते, नंतर त्यावर चर्चा केली जाते. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, यासंदर्भात एखादा कडक कायदा आणणार आहात का?

श्री.राजेश टोपे : या संदर्भात डी.सी.रुल्स असतात. प्रत्येक महानगरपालिका त्यांचे डी.सी.रुल्स शासनाकडून मंजूर करुन घेत असतात. सन्माननीय सदस्यांची सूचना आहे त्याप्रमाणे निश्चितपणे विचार करुन या ठिकाणच्या डी.सी.रुल्समध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यात येईल.

-------

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: सिमी संघटनेच्या पदाधिकाऱ्याला महानगरपालिकेच्या शाळेत

नियुक्ती दिल्याबाबत

**मु.शी.**: सिमी संघटनेच्या पदाधिकाऱ्याला महानगरपालिकेच्या शाळेत नियुक्ती दिल्याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, यांनी "सिमी संघटनेच्या पदाधिकाऱ्याला महानगरपालिकेच्या शाळेत नियुक्ती दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, सिमीसारख्या अतिरेकी संघटनेशी संबंधित त्याचबरोबर एका मोठ्या आतंकवादी घटनेशी संबंधित असलेले हे दोन इसम आहेत. प्रश्न असा आहे की, एवढ्या मोठया राष्ट्रविघातक कारवायांशी ज्यांचा संबंध आहे अशा दोघांना महानगरपालिकेमध्ये नोकरी देणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे काय आहेत?

(नंतर श्री.जुन्नरे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जुन्नरे प्रथम श्री. भोगले... 3.25

श्री. जगदीश गुप्ता ....

त्यांच्यावर देशविघातक कारवाया केल्या म्हणून आपण खटले दाखल करणार आहात काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, शिक्षणाधिकारी श्रीमती सुलताना यांनी त्या कर्मचा-यांची नेमणूक केलेली आहे. ही बाब निदर्शनास आल्याबरोबर संबंधित शिक्षण अधिका-याला सस्पेंड करण्यात आले असून डेप्युटी म्युनिसिपल कमिशनर यांची ट्रान्सफर करुन विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली असून म्युनिसिपल कमिशनरांना शो कॉज नोटीस इस्यू करण्यात आलेली आहे.

श्री. जगदीश गुप्ता : एवढे मोठे गुन्हेगार असतांना त्यांना शासकीय सेवेत घेणे ही गंभीर बाब आहे. आपले कायदे कमजोर असल्यामुळे मोठया गुन्हेगारांनाही त्वरित जामीन मिळतो ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे खतरनाक गुंडांना आळा बसावा, खतरनाक आतंकवाद्यांना वचक बसावा म्हणून पोटा सारखा कायदा हे शासन अंमलात आणणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : तसा विचार करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, जसा एका गुन्हयामध्ये एखादा आरोपी सापडला की, सर्व प्रकरणाची कडी उलगडली जाते परंतु तसा प्रकार या ठिकाणी मात्र झालेला दिसत नाही. या ठिकाणी एकाचे निलंबन करण्यात आले, दुस-याची चौकशी सुरु केली तर तिस-याची ट्रान्सफर करण्यात आलेली आहे. या प्रकरणाच्या संदर्भात वर्तमानपत्रात अगोदर बरीच माहिती छापून आलेली आहे. सगळयांना या प्रकरणाची चांगली माहिती होती. गुजरातच्या मुख्यमंत्र्यांनी आपल्याला पारितोषिक देऊन आपली पाठ थोपटली आहे. असे असतांना जर गुन्हेगारांना शासकीय सेवेत संधी मिळत असेल तर हा प्रकार फार भयानक आहे. जेव्हा कर्मचा-याची नियुक्ती होते तेव्हा आयुक्तांपर्यंत फाईल जात असते, असे असतांनाही आयुक्तांनी या फाईलकडे दुर्लक्ष केलेले आहे. त्यांना केवळ शोकॉज नोटीस देण्यात आलेली आहे. त्यामुळे हे सरकार अशा अधिका-यांना संरक्षण देण्याची भूमिका घेत आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रकरणाच्या संदर्भात 3 अधिका-यांचा संबंध आलेला आहे. 13 विषय तज्ञांची दीड महिन्याच्या कालावधीपासून ॲडव्हॉक बेसीसवर नेमणूक करण्यात आली होती. चुकीची माहिती दिल्यामुळे या प्रकरणात शिक्षण अधिकारी प्रमुख दोषी आहेत त्यांनी चुकीची माहिती देऊन नेमणुका केलेल्या आहेत. या प्रकरणामध्ये शिक्षणाधिकारी मुख्य

...2



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. राजेश टोपे....

दोषी आहेत. त्यामुळे शिक्षण अधिका-याला निंलबित करण्यात आलेले असून डेप्युटी म्युनिसिपल कमिशनर यांची बदली करुन त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

श्री. विनोद तावडे : या आरोपींचा आतंकवाद्यांशी संबंध असल्यामुळे या प्रकरणातील तीनही अधिकारी गंभीर दोषी आहेत.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, नेमणुका करण्याचे अधिकारी चेअरमनला असतात. सर्व शिक्षा अभियानामध्ये चेअरमन हा शिक्षणाधिकारी असतो. म्हणून शिक्षणाधिका-यांनी या नेमणुका केलेल्या आहेत. मान्यता देण्याचे काम डेप्युटी म्युन्सिपल कमिशनरांचे आहे. माझ्याकडे यासंदर्भातील पूर्ण फाईल आहे. तत्कालीन आयुक्त श्री. रोकडे यांनी "फॉर रिमार्क्स ऑन अबाऊ" दिले आहे. शिक्षणाधिका-यानी जे रिमार्क्स दिले होते त्यावर रिमार्क्स देऊन सही केली आहे. शिक्षणाधिका-यांनी डेप्युटी म्युन्सिपल कमिशनरांकडे यासंदर्भात प्रस्ताव दाखल केला होता त्यामुळे दोन्ही अधिका-यांवर कारवाई केलेली आहे. व तत्कालीन आयुक्तांची बदली केलेली आहे.

(अडथळा)

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे..........

त्यानंतर श्री.पठाण यांची आयुक्त म्हणून नियुक्ती झालेली आहे. त्यांनी दीड महिन्यांच्या कालावधीत एक दिवसाचा गॅप देऊन 11 महिन्यांसाठी ही पदे भरली. ( अडथळा ) श्री.पठाण यांना शोकॉज नोटीस दिलेली आहे. ( अडथळा ) मी सर्वांची नावे सांगितलेली आहेत. शिक्षणाधिकारी श्रीमती सुलताना, उपायुक्त श्री.मकासे, सध्याचे आयुक्त श्री.पठाण (अडथळा ) ...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी गोलमाल उत्तरे देण्याचे ठरविलेले दिसते. स्पष्ट बाब अशी आहे की, सर्व्हीस रेग्युलेशन 1994 मधील नियम 18 मध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, " जी पदे सेवा भरतीच्या प्रक्रियेप्रमाण् तातडीने भरता येत नाहीत अशी पदे तदर्थ वेतनावर योग्य त्या उमेदवारांतून सभापतींच्या मान्यतेच्या प्रक्रियेने उमेदवार उपलब्ध होईपर्यंत भरण्यात येईल." असे असताना आयुक्तांनी दीड महिन्यांची नियुक्ती दिली व त्यांची बदली झाली. नवीन आलेल्या आयुक्तांनी त्यांना एक दिवसाचा गॅप देऊन 11 महिन्यांची ऑर्डर दिली. याठिकाणी सांगण्यात आले की, अशाप्रकारची भरती शिक्षण विभागामार्फत केली जाते. या संदर्भात जी टिप्पणी झाली ती माझ्याकडे आहे. त्यावर आयुक्तांची सही आहे. महानगर पालिकेचा सर्वाच्च अधिकारी हा आयुक्त असतो. सभापतींनी चूक केली असेल तर ती चूक आयुक्त दुरुस्त करु शकतात. परंतु त्यांनी चूक दुरुस्त केली नाही. या टिप्पणीवर आयुक्तांनी सही केली व त्यांच्या सहीने ऑर्डर निघाली. नागपूर संघ कार्यालया जवळील चौकात पाईप बॉम्ब पेरण्याच्या दोन गुन्ह्यात श्री.वकारुल हुसेनवर विविध कलमाखाली गुन्हे दाखल झालेले आहेत. तो अखिल भारतीय सिमी संघटनेचा सरचिटणीस आहे. अकोला सिमी शहर अध्यक्ष आहे. श्री.हुसेन याच्यावर गुन्हे दाखल झालेले असताना त्यास दहा हजार रुपये मानधनावर नोकरीत ठेवण्यात आले. उपायुक्तांची दुसऱ्या ठिकाणी बदली करण्यात आली असे सांगण्यात आले. याठिकाणी उपायुक्तांचा कुठेही संबंध नाही. शिक्षणाधिकाऱ्याकडून ती टिप्पणी आयुक्तांकडे सहीसाठी गेली आणि आयुक्तांची सही झ ाल्यानंतर ऑर्डर काढण्यात आलेली आहे. यामध्ये आयुक्त जबाबदार आहेत. त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागविण्याची अजिबात आवश्यकता नाही. आयुक्तांनी त्या फाईलवर सही केलेली आहे तेव्हा आयुक्तांना ताबडतोब सस्पेंड करणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, आयुक्तांनी ज्या टिप्पणीवर सही केली आहे त्यातील शेवटच्या ओळी वाचून दाखवितो. "उपरोक्त प्रमाणे व्यवस्थापनेतील कर्मचाऱ्यांमध्ये बदल केल्यास शैक्षणिक सन 2007-08 चे काम गतीने पार पाडण्यास मदत होईल व सर्व शिक्षा अभियानाचे लक्ष्य गाठता येईल. करिता माहिती व पुढील आदेशार्थ सविनय सादर." त्यावर आयुक्तांनी लिहिले आहे, "for remarks on above." माननीय विरोधी पक्ष नेते आपल्याला माहीत आहे की, माझा कुणालाही पाठिशी घालण्याचा स्वभाव नाही. (अडथळा ) यामध्ये राजकरण करण्याचा हेतू असेल..... ( अडथळा ) मी स्वच्छपणे सांगितले आहे की, आयुक्तांनी प्रस्तावावर सही केली असली तरी त्यांनी त्याबाबत रिमार्क्स मागविलेले आहेत. या प्रकरणी शिक्षणाधिकाऱ्यांना सस्पेंड केलेले आहे.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : त्यांना आपण नोकरीतून काढून टाका.

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी म्हटल्याप्रमाणे, त्यांना नोकरीतून काढून टाकले पाहिजे हे योग्य आहे. परंतु ही प्रोसिजर येथे येत नाही. त्यांना आपण सस्पेंड करुन त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु केलेली आहे. त्यानंतर ज्यांची सही आहे त्या डेप्यूटी म्युनिसिपल कमिशनर यांचीही चौकशी सुरु केलेली आहे. ...(अडथळा) ...

श्री.नितीन गडकरी : त्यांचा काय संबंध ?

श्री.राजेश टोपे : त्यांचा संबंध नसेल तर त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्याचा प्रश्नच येणार नाही.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देतात. )

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीनजी गडकरी साहेबांना यासंदर्भात राजकारण करावयाचे असेल तर मला काहीही म्हणावयाचे नाही. परंतु यामध्ये शासन कोणालाही पाठीशी घालणार नाही. जे दोषी असतील....(अडथळा)

श्री.नितीन गडकरी : ...त्यांना 10 हजार रुपयांची नोकरी दिली. त्यांना कमिशनर आणि शिक्षणाधिकाऱ्यांनी नोकरी दिलेली आहे. असे असतानाही आपण त्यांच्यावर कारवाई करत नाही, हे बरोबर नाही.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, याबाबतीत नगरविकास विभागाकडून प्रिव्हेंशन ॲक्शन झालेली आहे. तदर्थ पध्दतीची एखादी नोकरी द्यावयाची असेल तर पहिल्यांदा पोलिसांचा रिपोर्ट मागविला जातो, त्याशिवाय नोकरी देऊ नये अशाप्रकारचे सर्क्यूलर नगरपालिकांना व महानगरपालिकांना नगरविकास विभागाच्या वतीने देण्यात आलेले आहे. परंतु या प्रकरणामध्ये नोकरी देत असताना पोलीस रिपोर्ट मागवावयास हवा होतो, तो मागविला नाही, हाच निग्लिजन्स यामध्ये झालेला आहे. त्यामुळे याबाबतीत आपण संबंधितांस निलंबित केले असून कमिशनर यांनाही शो-कॉज नोटीस काढलेली आहे. त्यामुळे त्यांचे उत्तर येणार आहे, ते समाधानकारक नसेल तर त्यांचीसुध्दा विभागीय चौकशी करण्यात येईल व चौकशीच्या आधारे त्यांच्यावरही कारवाई करण्यात येईल. यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्याचा विषय नाही.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, आपण ज्या शिक्षणाधिकाऱ्यांस निलंबित केलेले आहे, तो सिमी संघटनेशी संघटीत आहे, त्याचे सिमी संघटनेशी संबंध आहेत. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, आपण याबाबत तपास घेणार का व त्यासंदर्भातील चौकशीचे आदेश आपण पोलिसांना देणार का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अतिशय गंभीर मुद्दा मांडला. जरुर याबाबतीत चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, सध्याचे कमिशनर, श्री.पठाण यांना मी गेल्या 20 वर्षापासून ओळखतो. मी ज्यावेळी विधानसभा सभागृहाचा सदस्य होतो त्यावेळी ते आमच्याकडे 5 वर्षे सी.ई.ओ. म्हणून कार्यरत होते. आजपर्यंतचे त्यांचे सी.आर. एक्सलेंट आहेत. ते अतिशय कर्तबगार अधिकारी असल्यामुळे....

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**उपसभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी शांत रहावे.

श्री.सुधाकर गणगणे : ते अधिकारी अत्यंत चांगले असल्यामुळे....(अडथळा) या प्रकरणाची नोंद घेऊन....

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.सुधाकर गणगणे : ते सिमीशी संबंधित असतील तर....

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

नंतर श्री.रोझेकर....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सदर निवेदन राखून ठेवतो असे मी म्हणणार नाही. पण सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे प्रश्न उपस्थित केले आहेत ते पुन्हा तपासून ॲक्शनसंदर्भातील निवेदन उद्या सभागृहात करावे, एवढेच सांगतो.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, होय.

--------------

....2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : चराई क्षेत्र निश्चित करुन मेंढपाळांना पासेस उपलब्ध करणे

**मु. शी**. : चराई क्षेत्र निश्चित करुन मेंढपाळांना पासेस उपलब्ध करणे याबाबत सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितिन गडकरी, वि.प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बबनराव पाचपुते ( वन मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितिन गडकरी यांनी "चराई क्षेत्र निश्चित करुन मेंढपाळांना पासेस उपलब्ध करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------------

...3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, घोडयाच्या पाठीवर संसार घेऊन डोंगरकपारीत फिरणा-या धरगर, मेंढपाळ समाजाचा हा प्रश्न आहे. गेल्या अनेक वर्षापासून या प्रश्नावर न्याय मागण्याचा प्रयत्न होत आहे. गेल्या 40 वर्षांपासून या समाजावर जंगल खात्याने अन्याय केलेला आहे. हक्काची चराई कुरणे काढून घेतल्यामुळे हा समाज उद्धस्त झाला, भटकंती करु लागला, ऊसतोड कामगार झाला, अशा प्रकारे धनगरांच्या दोन पिढया उद्धस्त करण्याचे काम जंगल खात्याने केले आहे. सन 1968 साली मेंढपाळांना चराई कुरणे द्यावीत, असा आदेश दिला, परंतु हा आदेश शासनाने पाळला नाही. सन 1971 साली एक रुपया घेऊन मोफत पासेस द्यावेत, असा आदेश दिला, तोही फेटाळण्यात आला. सन 2003 साली वनक्षेत्र नक्की करुन मेंढपाळांना पासेस द्यावेत, असा आदेश काढला होता, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. सन 2005 मध्ये आणखी एक आदेश काढला, चराईबंदी आदेश काढून पासेस द्यावेत, पण न्याय मिळाला नाही. सन 2006 च्या हिवाळी अधिवेशनामध्ये, गेल्या 30 जानेवारीला मंत्री महोदयांनी आश्वासन दिले की, महाराष्ट्रातील सव वन विभागातील चराई अहवाल फायनल करुन 30 जानेवारी 2007 पर्यन्त सर्व क्षेत्र नक्की करुन धनगर समाजाच्या मेंढपाळांना पासेस देऊ. आता दुसरे हिवाळी अधिवेशन आले आहे, मेंढपाळांना पासेस मिळालेले नाहीत. माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, महाराष्ट्राचे वन क्षेत्र निश्चित करुन किती दिवसात मेंढपाळांना पासेस देण्यात येतील ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, 19 विभागामध्ये ज्या ज्या ठिकाणी चराई क्षेत्र आहे त्या ठिकाणी असे आदेश दिलेले आहेत. पासेस देण्यासंदर्भात आदेश दिलेले आहेत. हे पासेस मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, 19 जिल्हयात पासेस देणार, असे आदेश आहेत. उर्वरित 29 जिल्हयांनी काय करायचे, मेंढपाळांनी काय करायचे, त्यांनाही पासेस देणार काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ज्या ठिकाणी चराई क्षेत्र आहे त्याच ठिकाणी आपण पासेस देऊ शकतो, इतर ठिकाणी देऊ शकणार नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, चराई कुरण, बकरा, बकरी, मंत्री की प्रशासन, कोणासाठी निश्चित केले आहे ?

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : माननीय मंत्री महोदयांनी मागच्या वेळी जे उत्तर दिले होते ते मी वाचून दाखवितो. त्यांनी असे उत्तर दिले होते की, "सन्माननीय सदस्यांनी ज्या गोष्टी सांगितलेल्या आहेत त्यातील बऱ्याच गोष्टी खऱ्या आहेत. मी जरी या खात्याचा मंत्री असलो तरी ही बाब सकाळी माझ्या लक्षात आली आणि तोपर्यंत सर्क्युलेशन झालेले होते. त्यानंतर पुन्हा बैठक झाली. 1971 चा कायदा आहे. त्यामध्ये 23 डिसेंबर, 2003 मध्ये बदल झाला आणि ही बाब महसूल विभागाकडून काढून वन अधिकाऱ्यांकडे द्यावयाची असे ठरले. पूर्व मेळघाट, पश्चिम मेळघाट, परतवाडा येथील सहाय्य वनरक्षक यांच्याकडे काम दिले. त्यांना काम देत असताना त्यांचे नियमित काम त्यांच्याकडे ठेवून हे जादाचे काम त्यांना दिले होते. हे काम आमच्याकडे नाही असा त्यांचा समज झाला. त्यासंदर्भात मी सूचना दिलेल्या आहेत. आपण सांगितल्याप्रमाणे एकूण चराईचे वन विभाग 45 आहेत. यामध्ये सगळ्या राज्याच्या बाबतीत निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. ही गोष्ट खरी आहे की, वनाचे क्षेत्र आणि प्रत्यक्ष जनावरांची संख्या यामधील संतुलन बरेच बिघडलेले आहे. जनावरांना चरण्यासाठी जी जागा पाहिजे ती एक जनावर एक युनिट किंवा एक नांगर एक युनिट असे धरले तरी जे क्षेत्र उपलब्ध आहे त्यामध्ये आपल्याकडे या घटकांसाठी 2 लाख 23 हजार 570 हेक्टर क्षेत्र चराईसाठी लागेल आणि आपल्याकडे फक्त 51,897 हेक्टर जमीन आहे. त्यामध्ये आपण सर्वांना पासेस देऊ शकत नाही. हा विषय घेण्याच्या आधी ही बाब माझ्याही लक्षात आली. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, एक महिन्याच्या आत म्हणजे 30 जानेवारीपर्यंत हे पासेस देण्याची व्यवस्था करु. ज्या अधिकाऱ्यांनी कुचराई केलेली आहे, ज्यांनी काम केलेले नाही त्यांची उच्च अधिकाऱ्यांकडून, ॲडिशन पी.सी.एफ. कडून चौकशी करु. ज्यांनी हलगर्जीपणा दाखविला असेल त्यांच्यावर कठोर कारवाई करु. यामध्ये कोणालाही माफ केले जाणार नाही. जे क्षेत्र राखून ठेवावयाचे आहे ते सुध्दा डिक्लेअर करण्यात येईल." हे मागच्या वेळी दिलेले उत्तर आहे. मग हा विषय का संपत नाही.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, राज्यामध्ये जे वन आहे त्याची वर्गवारी केलेली आहे. ज्या ठिकाणी नवीन लागवड होत आहे किंवा वेगळे वन आहे त्या ठिकाणी मेंढया चारायला परवानगी देता येत नाही. जेथे जास्त वन नाही किंवा झाडे नाहीत, अशाच ठिकाणी मेंढया चारण्यासाठी परवानगी दिली जाते. इतर जनावरांचे आणि मेंढयांचे वेगळे आहे. जेथे मेंढया

..2...

श्री.बबनराव पाचपुते .........

चरतात तेथे गवत वाढत नाही, ही वस्तुस्थिती आहे. मेंढयांच्या खुरातील वजनामुळे तेथे पुन्हा गवत वाढत नाही, हे आता सिद्ध झालेले आहे. म्हणून एक क्षेत्र आपण निश्चित केलेले आहे आणि प्रत्येक तीन वर्षांनी बदल करुन, आता आपण असे ठरविले आहे की, त्यांना वा-यावर सोडावयाचे नाही. ज्या ठिकाणी मागणी आहे तेथील क्षेत्र आपण निश्चित केलेले आहे. आता पर्यंत क्षेत्र निश्चित झालेले नव्हते. आता आपण कायम स्वरुपी क्षेत्र निश्चित केलेले आहे. जे क्षेत्र निश्चित झालेले आहे तेथे प्रत्येक वेळेस मेंढपाळांना फ्री पास दिले जातील. कारण मेंढी हा एक घटक आहे आणि गायी, म्हशी यासारखी मोठी जनावरे असतील तर चार घटक आहेत. जे क्षेत्र उपलब्ध आहे त्यामध्ये घटकाप्रमाणे किती जनावरे चरु शकतील, हे पाहिले जाते. नगर जिल्हयाचे क्षेत्र कमी आहे. मी नगर जिल्हयातील आहे. नगर जिल्हयामध्ये मेंढपाळ कमी आहेत. तेथे मेंढपाळ बाहेरुन येतात. बाहेरुन येणा-या मेंढपाळांना मेंढया चारण्यासाठी बंदी नाही. कारण ते लोकांच्या खाजगी जमिनीवर मेंढया चारतात. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे जर मेंढपाळ असतील तर चांगलीच गोष्ट आहे. परंतु माझी माहिती अशी आहे की, आपल्याकडे मेंढया नाहीत.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, सांगली जिल्हयामध्ये क्षेत्र नक्की झालेले आहे, असे आपल्या अहवालात नमूद केलेले आहे. परंतु जी.आर. मध्ये सांगली जिल्हयाचे नाव वगळलेले आहे. जी.आर. मध्ये सांगली जिल्हयाचे नाव वगळण्याचे कारण काय आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी सांगितल्याप्रमाणे तपासून निर्णय घेतला जाईल.

--------

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून होणारी टोल वसुली व त्याबदल्यात प्रवाशांना मिळणा-या सुविधा कोलमडणे

**मु. शी**. : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून होणारी टोल वसुली व त्याबदल्यात प्रवाशांना मिळणा-या सुविधा कोलमडणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून होणारी टोल वसुली व त्या बदल्यात प्रवाशांना मिळणा-या सुविधा कोलमडणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मुंबई महानगरामध्ये जे उड्डाण पूल बांधण्यात आले त्यासाठी 2027 पर्यंत टोल गोळा करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. परंतु जो खर्च झालेला आहे तो जवळ जवळ 10 वर्षामध्येच जमा झालेला आहे. 9 कोटी रुपये जास्त जमा झालेले आहेत. युती शासनाच्या काळामध्ये मोठया प्रमाणावर उड्डाण पूल बांधण्यात आले. त्यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने आंदोलने केली. तरी देखील आम्ही उड्डाण पूल बांधले आणि त्याचे चांगले परिणाम आता जाणवत आहेत. टोल वसुली बंद करावी, अशी आमची मागणी नाही. परंतु मुंबईकरांच्या वतीने जो ॲडीशनल पैसा गोळा होतो तो पैसा मुंबईच्या प्रकल्पांवरच खर्च होणार आहे की पश्चिम महाराष्ट्र किंवा इतर ठिकाणी वळविला जाणार आहे, असा स्वाभाविक प्रश्न मुंबईकरांच्या मनामध्ये आहे. माझ ा प्रश्न असा आहे की, पुढच्या 20 वर्षात जवळ जवळ 3 हजार कोटी रुपये जमा व्हावयाचे आहेत. खर्च आधी झालेला आहे. त्यामुळे हे पैसे मुंबईतील प्रकल्पांवर खर्च होणार आहेत काय ? जो ॲडीशनल पैसा गोळा होतो तो उड्डाण पुलांच्या सुशोभिकरणावर खर्च केला तर मुंबई जगातील जागतिक दर्जाचे शहर होईल.

यानंतर कु.जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

माननीय मंत्रिमहोदय,आपण ज्यावेळी मे महिन्याच्या सुट्टीच्या कालावधीमध्ये विदेश पर्यटनासाठी सिंगापूर,मलेशियाला जातात, त्यावेळी तेथे जी ग्रीनरी आपण पाहतो,त्याचप्रमाणे टोलच्या माध्यमातून हा जो ॲडिशनल पैसा शासनाकडे येतो, त्यातून आपण मुंबईतील फ्लायओव्हर सुशोभित करण्याचे काम करणार का ? सभापती महोदय,ज्यावेळी आपण पुण्यावरुन पनवेलपर्यंत येता त्यावेळी फक्त दीड तास प्रवास करावा लागतो आणि पनवेलपासून मुंबईपर्यंत येण्यासाठी मात्र दोन ते अडीच तास प्रवास करावा लागतो. यापूर्वी शासनातर्फे सायन -पनवेल महामार्गाची घोषणा करण्यात आली होती. हा महामार्ग कोणत्या पध्दतीने एम.एस.आर.डी.सी.करणार आहे याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे.

श्री.अनिल देशमुख : मुंबईमध्ये युती शासनाच्या आणि आघाडी शासनाच्या वेळेस जे उड्डाण पूल बांधण्यात आले होते,त्याकरिता एकूण 1308 कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. आपण यापूर्वी सांगितलेल्या आकडेवारीमध्ये आणि या आकडेवारीमध्ये तफावत आहे. सन 2007 पर्यंत त्यापैकी 1185 कोटी रुपये वसूल झालेले आहे,उर्वरित 123 कोटी रुपये वसूल व्हायचे आहेत. त्याच्या व्यतिरिक्त या उड्डाणपूलांकरिता 16 टक्के दराने एम.एस.आर.डी.सी.ने फायनान्शियल इन्सिटिटयूटकडून पैसे उचलले आहेत, त्याचे व्याज जर कॅल्क्यूलेट केले तर 1800 -1900 कोटी रुपये एवढे होते. हे व्याज आणि पूल बांधण्याकरिता जेवढा खर्च लागला तेवढे पैसे ज्या दिवशी वसूल होतील त्या दिवशी मुंबईचा टोल बंद करण्यात येईल. मुंबईतील उड्डाणपूलांच्या सुशोभिकरण्यासंदर्भात जो प्रश्न विचारला गेला, त्याबद्दल बोलावायचे झाले तर मी असे सांगू इच्छितो की, माहीम येथील फ्लायओव्हर सुशोभित करण्याचे काम सुरु करण्यात आल्याचे आपल्याला दिसून येईल. त्याचप्रमाणे मुंबईतील अन्य उड्डाण पूलांच्या सुशोभिकरणाचे काम प्लँटेशन्स आणि लॉन तयार करण्यास सुरुवात करुन करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी जे सायन - पनवेल महामार्गाविषयी सांगितले ते खरे आहे. युती शासनाच्या काळामध्ये बॉम्बे एक्सप्रेस हायवे बांधण्यात आला होता. आता या हायवेला सायनपासून पनवेलपर्यंत 30 किलोमीटरचे एक्स्टेन्शन देऊन या महामार्गाचे काम हाती घेतले आहे. त्यानंतर

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख.......

सायन ते पनवेल 14 लेनचा रोड तयार होणार आहे. हा प्रकल्प अंदाजे 600 - 700 कोटी रुपयांचा आहे. या प्रकल्पासाठी निविदा मागविण्यास सुरुवात करण्यात येणार असून सदर प्रकल्प बी.ओ.टी.तत्वावर राबवण्याचा शासनाचा निर्णय आहे.

श्री.नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा सेस किती आहे व त्यापैकी किती वसूल झालेला आहे ? सायन -पनवेल महामार्गाचा प्रकल्प बी.ओ.टी. तत्वावर राबविणे योग्य नाही, कारण यामुळे एकूण 4,000 कोटी रुपये नुकसान होणार आहे. सदर प्रकल्प एन.एच.आय.च्या पॉलिसीप्रमाणे एन.यु.आय.टी.या तत्वावर राबविला तर 4,000 कोटी रुपयांचा फायदा त्यामध्ये आहे. या दोघांचा हिशोब तपासून ज्यामधून हा प्रकल्प करणे स्वस्त पडेल त्यातून शासनाने हा राबवावा. या नुकसानाची काळजी माननीय मंत्रिमहोदय घेणार आहेत.

श्री.अनिल देशमुख : पेट्रोल आणि डिझेलचा सेस आतापर्यंत 1158 कोटी रुपये एवढा आहे,त्यापैकी आतापर्यंत फक्त 522.36 लाख रुपये वसूल झाले आहेत.

श्री.नितीन गडकरी : यापैकी एकूण एम.एस.आर.डी.सी.कडे किती रुपये आले ?

श्री.अनिल देशमुख : या सेसपैकी जेवढे पैसे शासकीय वित्त विभागाकडे वसूल होऊन जमा होतात तेवढे सर्व एम.एस.आर.डी.सी.कडे येतात. सायन - पनवेल महामार्गाच्या प्रकल्पाबद्दल बोलावयाचे झाले तर तो एक एक्प्रेस कंट्रोल अर्बन रोड राहणार आहे.

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख ......

सदरील रोड तयार करण्यासाठी कॅश कॉन्ट्रक्ट किंवा बी.ओ.टी. किंवा बी.ओ.टी. एम.यु.आय.पी. यापैकी जो पर्याय योग्य राहील त्याप्रमाणे शासन कार्यवाही करील.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, याबाबत गुंतागुंत आहे, तुम्ही बी.ओ.टी. तत्वावर काम केले तर 4 हजार कोटी रुपयांचे नुकसान होणार आहे. तुम्ही मुंबई शहरात सर्व ठिकाणी टोल लावलेला आहे. त्यातून दरवर्षीचा इन्कम शासनाला मिळत आहे. मी तुम्हाला विनंती करतो की, बी.ओ.टी. तत्वावर या रस्त्याचे काम करु नका. हा रोड बी.ओ.टी. केला तर आणखी नवीन टोल लागेल. त्यामुळे फार मोठे बर्डन येईल व अडचणी निर्माण होतील. त्यामुळे हा रोड एम.यु.आय.पी.च्या पॉलिसीप्रमाणे बी.ओ.टी. एम.यु.आय.पी. वर करावा, हे आपण कराल का ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, बी.ओ.टी.चे दोन प्रकार आहे. रेग्युलर बी.ओ.टी. व बी.ओ.टी. एम.यु.आय.पी. असे दोन प्रकार आहेत. कोणत्या पध्दतीने हा रोड करणे योग्य राहील हे आम्ही तपासून पाहात आहोत. याबाबत फायनल निर्णय अद्याप घेतलेला नाही. सध्या फायनान्स डिपार्टमेंटकडे हा प्रस्ताव आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हया दोन्ही पध्दती एकत्र करता येणार नाहीत.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, कन्सेप्टप्रमाणे बी.ओ.टी. चे दोन प्रकार आहेत. रेग्युलर बी.ओ.टी. व बी.ओ.टी. एम.यु.आय.पी. आमचा बी.ओ.टी. एम.यु.आय.पी. या पध्दतीने रस्ता करण्याचा विचार चालू आहे. परंतु याबाबतचा फायनल निर्णय अद्याप घेतलेला नाही. कारण फायनान्स डिपार्टमेंटकडे प्रस्ताव असून त्यांच्याकडून कोणत्या बी.ओ.टी.प्रकारामध्ये कॅश फ्लो येईल व हा रोड उत्तम पध्दतीने कसा करता येईल हे पाहिले जाईल. याबाबतचा फायनल निर्णय लवकरात लवकर घेतला जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, फ्लायओव्हरच्या सुशोभीकरणाबाबत आपण वेगळी व्यवस्था करणार आहात. मी विचारु इच्छितो की, अंधेरी येथे मोठा फ्लायओव्हर असून या फ्लायओव्हरखाली अनेक अवैध धंदे चालतात. येथे आपण नक्की काय करणार आहात ?

.....2

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मुंबईमध्ये जेवढे फ्लायओव्हर आहेत, त्यातील काही आमच्या विभागाकडे, काही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे, काही महानगरपालिकेकडे आहेत. अंधेरी येथील फ्लायओव्हर आमच्या विभागाकडे नाही, तरीही शासन म्हणून याबाबतची माहिती मागवून घेण्यात येईल व सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मागील वर्षी डिसेंबरमध्ये पेडर रोड फ्लायओव्हरचा आपण नारळ फोडणार असल्याचे सांगितले होते, त्याचे पुढे काय झाले ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, पेडर रोड फ्लायओव्हरबाबत शासनाकडून सर्व प्रकारची तयारी झालेली आहे. फक्त केव्हा उद्‌घाटनाचा नारळ फोडायचा किंवा शुभमुहुर्त काढायचा तेवढेच बाकी आहे. मी याबाबत मागे अडचण सांगितली आहे की, एकाच वेळी दक्षिण मुंबई आणि उपनगरे यामध्ये एकमेव दुवा सायन कॉजवे आहे. येथे आपण पेडर रोड व डॉ.आंबेडकर रोडवरील फ्लायओव्हरचे काम एकाच वेळी सुरु केले तर दक्षिण मुंबईमध्ये एकाच वेळी वाहतुकीमध्ये फार मोठया अडचणी निर्माण होतील. हे दोन्ही फ्लायओव्हर अशा पध्दतीने पूर्ण करावयाचे आहेत की, जेणेकरुन दक्षिण मुंबईमधील वाहतुकीवर फार ताण येणार नाही. याबाबत आम्ही सर्व बाबी पडताळून पाहात आहोत. पेडर रोड बाबत सर्व एन.ओ.सी. व डिझाईन तयार झालेले आहेत. आमची वरील अडचण दूर झाली तर लवकरात लवकर हे काम सुरु करण्यात येईल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, सध्या विविध रस्त्यावर टोल नाके आहेत, रस्त्यावर वाहनांची संख्या वाढल्यामुळे या टोल नाक्याचे रुपांतर ऑक्ट्राय नाक्यामध्ये झालेले आहे, इतका वेळ टोल नाक्यावर लागत आहे. यामध्ये काही आधुनिकीकरण करुन वाहतुक लवकर सुरळीत करण्याच्या दृष्टीने काही सुधारणा होणार आहे का ? टोल नाक्यावर पथकर घेतला जातो, तो दरवर्षी कमी होण्याची काही योजना आहे का ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, आपण जो पथकर घेत आहोत. दरवर्षी हा पथकर वाढविण्याची योजना आहे. दर 3 ते 4 वर्षानी हया पथकरामध्ये 10 ते 25 टक्के वाढ करावी लागते. रस्त्यावरील वाहनांची संख्या वाढत असताना पथकराची रक्कम वाढवावी लागते. माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना याबाबतची कल्पना आहे.

.....3

श्री.अनिल देशमुख .....

माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी सांगितले की, वाहनांची संख्या वाढल्यामुळे टोल कलेक्शनमध्ये अडचणी येत आहेत. यासाठी आधुनिक पध्दत टोल कलेक्शनसाठी वापरता येईल. सध्या सेन्सर ॲटोमॅटीक पध्दतीचा आपण 1-2 ठिकाणी उपयोग करीत आहोत.

-----

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्री. गागरे... 16:00

**पृ.शी.** राज्यपुनर्रचनेमुळे मध्यप्रदेश राज्यातून आलेल्या वाटपप्राप्त शासकीय कर्मचाऱ्यांना निवासस्थानातून निष्कासित करणे.

**मु.शी.**: राज्यपुनर्रचनेमुळे मध्यप्रदेश राज्यातून आलेल्या वाटपप्राप्त शासकीय कर्मचाऱ्यांना निवासस्थानातून निष्कासित करणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. राजेश टोपे ( नगर विकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदिश गुप्ता, वि.प.स.यांनी "राज्य पुनर्रचनेमुळे मध्यप्रदेश राज्यातून आलेल्या वाटपप्राप्त शासकीय कर्मचाऱ्यांना निवासस्थानातून निष्कासित करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.2...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, राज्य पुनर्रचनेमुळे मध्यप्रदेश राज्यातून तेव्हाच्या मुंबई व आताच्या महाराष्ट्र राज्यात आलेल्या वाटप प्राप्त कर्मचाऱ्यांना वांद्रे येथील शासकीय वसाहतीतील निवासस्थाने देण्यात आली. या कर्मचाऱ्यांनी अनेक वर्ष शासनाची सेवा केलेली आहे त्यामुळे या कर्मचाऱ्यांची पर्यायी निवासाची व्यवस्था करण्याबाबत शासन सहानुभूतीपूर्वक कार्यवाही करण्याबाबत काही विचार करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या इमारतीमध्ये जे कर्मचारी राहत आहेत, ते राज्य पुनर्रचनेमुळे मध्यप्रदेशराज्यातून आलेले आहेत. यासंदर्भात उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात निवेदन देण्यात आले होते. त्यांनी असा निर्णय दिला की, या लोकांना निष्कासित केले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी आता सांगितल्याप्रमाणे, सहानुभूतिपूर्वक विचार करुन माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर चर्चा करून मार्ग काढण्यात येईल .

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, स्वातंत्र्यानंतर राज्य पुनर्रचनेमुळे मध्यप्रदेश व हैद्राबाद राज्यातून हे कर्मचारी महाराष्ट्र राज्यामध्ये आले होते. या लोकांची निवासाची व्यवस्था करण्यात येईल असे शासनाने त्यांना सांगितले होते. महाराष्ट्र शासनावर विश्वास ठेवून हे लोक त्या राज्यातून महाराष्ट्र राज्यामध्ये आले होते. आणि आता शासन त्यांना बेघर करीत आहे, त्यांचे सामान बाहेर फेकले जात आहे. या कर्मचाऱ्यांनी अनेक वर्ष शासनाची सेवा केलेली आहे. प्रदीर्घ काळ सेवा करणाऱ्या व्यक्तीला अशा पद्घतीने रस्त्यावर आणणे, त्याचे सामान बाहेर फेकणे हे कितपत उचीत आहे ? 70-70 वर्षाचे वयोवृध्द लोक तेथे राहत आहेत. माणुसकी नावाचा धर्म या राज्यामध्ये आहे की नाही ? अशाप्रकारे सहानुभूतीपूर्व या लोकांची काही तरी पर्यायी व्यवस्था शासनाने करावी अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या लोकांच्याबाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल असे उत्तर माननीय राज्यमंत्र्यांनी दिले आहे. पण माझे या बाबतीत असे म्हणणे आहे की, मध्य प्रदेश मधून हे लोक त्यावेळी आपल्या संयुक्त महाराष्ट्रात आले हा काही त्यांनी गुन्हा केलेला नाही. माझ्याकडे विदर्भ आणि मराठवाड्यातील अशा अनेक केसेस आहेत की, जे लोक त्यावेळी मध्य प्रदेश आणि हैद्राबाद मधील त्यांची सर्विस सोडून आपल्या राज्याच्या सेवेत आले. पण त्यांनी त्या अगोदर मध्यप्रदेश आणि हैद्राबाद मध्ये केलेली सर्विस हे शासन जमेस धरतच नाही. श्री. म.दा.जोशी नावाचे ज्येष्ठ प्राध्यापक आणि साहित्यिक आहेत. त्यांनी मला सांगितले की, येथे महाराष्ट्र शासनाच्या सेवेत येण्यापूर्वी ते जुन्या मध्य प्रदेश शासनाच्या सेवेत होते पण ती सेवा जमेस धरणार नाही म्हणून त्यांना सांगण्यात आले आहे. अशा केसेस आम्ही आपल्या लक्षात आणून दिल्या तर त्याबाबत आपल्याकडून, शासनाकडून योग्य असा निर्णय शासन करील का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, शासन याबाबत जरूर विचार करील.

***

.... 3क्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अमरावती जिल्ह्यातील संत्र्याचे अतिवृष्टीमुळे झालेले प्रचंड नुकसान.

**मु.शी.** : अमरावती जिल्ह्यातील संत्र्याचे अतिवृष्टीमुळे झालेले प्रचंड नुकसान याबाबत डॉ.नीलम गोऱ्ह,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

---

श्री. विनय कोरे (फलोत्पादन मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "अमरावती जिल्ह्यातील संत्र्याचे अतिवृष्टीमुळे झालेले प्रचंड नुकसान." या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

...... 3क्यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मा.फलोत्पादन मंत्र्यांच्या नियम 93 खालील निवेदनानंतर ...)

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपल्या या अधिवेशनाकडे लोकांच्या ज्या अपेक्षा आहेत आणि हे अधिवेशन विदर्भातील नागपूर शहरामध्ये की ज्याला 'ऑरेंज सिटी' म्हणून ओळखले जाते, त्या शहरामध्ये होत आहे. उद्या हे अधिवेशन संपेल तेव्हा अधिवेशनासाठी आलेले लोक येथून संत्री घेऊन आपापल्या घरी जातील. परंतु या विदर्भात्‍ील, विशेषत: अमरावतीतील संत्रा उत्पादक आहेत त्यांचे संत्र्याचे पीक अतिवृष्टी झाल्यामुळे नष्ट झाले आहे. त्यामध्ये त्यांना प्रचंड नुकसान सहन करावे लागत आहे. त्यांचे त्यात 50 टक्क्याच्या वर नुकसान झालेले आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, त्या नुकसानीची भरपाई म्हणून किंवा त्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा म्हणून आपण काही द्याल का ? निदान त्यांना दिलासा मिळेल अशी घोषणा तरी आपण या निमित्ताने करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, 50 टक्के पेक्षा जास्त नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी 10 हजार रूपये प्रमाणे नुकसान भरपाई देण्यात येईल.

***

..... 3क्यू 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : वर्धा शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक नगरपालिकेने उद्ध्वस्त करणे.

**मु.शी.** : वर्धा शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक नगरपालिकेने उद्ध्वस्त करणे याबाबत सर्वश्री प्रकश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : : महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "वर्धा शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक नगरपालिकेने उद्ध्वस्त करणे." या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

...... 3क्यू 5 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मा. नगरविकास राज्यमंत्र्यांच्या नियम 93 खालील निवेदनानंतर .... )

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, वर्धा येथे गेल्या 30 वर्षांपासून नगरपालिकेचा रितसर ठराव घेऊन बांधकाम केलेले पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक मंदिर नगरपालिका शासनाने 13 सप्टेंबरला उद्ध्वस्त केले आहे. सभापती महोदय, चोंडी येथील स्मारक देखील अर्धवट करण्यात आलेले आहे. मात्र हे स्मारक तेथे गेल्या 30 वर्षापासून असून त्याचे पूर्ण बांधकाम त्याचवेळी झालेले आहे. तेथे त्यांचा पुतळा होता तो नगरपालिकेने जप्त केला असून तेथील मंदिर पाडून टाकण्यात आले आहे. एका पेट्रोलपंप मालकाला ती जागा पाहिजे होती म्हणून नगरपालिकेच्या सीइओने हे कारस्थान केलेले आहे. तेव्हा त्या बद्दल प्रथमत: त्याला अटक केली जावी आणि 30 वर्षांपासून तेथे असलेले हे स्मारक शासन पुन्हा बांधून देणार आहे का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी हे स्मारक बांधण्याचा जो विषय आहे त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, बाधित रस्त्यावर खऱ्या अर्थाने हे स्मारकाचे ठिकाण आहे. या प्रकरणासंबंधात मला एवढेच सांगावयाचे आहे की, तेथील सध्याची प्रगती अशी आहे की, वर्धा नगरपालिकेने ठराव केलेला आहे त्यानुसार तेथे मायनर मॉडिफिकेशन करावयाचे आहे. आणि त्या इकाणी सार्वजनिक किंवा निमसार्वजनिक असे मॉडिफिकेशन केल्याशिवाय त्या बांधकामास अधिकृत परवानगी देता येऊ शकत नाही. त्यामुळे या स्मारकासंबंधात जनतेकडून सूचना व हरकती मागविल्या असून तसे गॅझेटही प्रसिद्ध झाले आहे. त्या संबंधातील वैधानिक कारवाई पूर्ण करून राज्य सरकारच्या पातळीवर हा निर्णय घेतला जाईल. या संबंधात धनगर समाजाच्या भावना अतिशय तीव्र असून त्यांचा मोठा मोर्चादेखील येथे आला होता. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या विषय हा त्यांच्या दृष्टीने भावनिक विषय आहे आणि त्यामुळेच या बाबतीत निश्चितपणे सहानुभूतीपूर्वक निर्णय घेतला जाईल. सभापती महोदय, त्या ठिकाणी नगरपालिकेच्या सीईओने जी काही कारवाई केली आहे ती कोर्टाच्या निर्णयानुसार केलेली आहे. त्यामुळे हे स्मारक व्हावे ही जी आपली इच्छा आहे त्या संबंधात जरूर विचार करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला हे मान्य आहे की, कोर्टाच्या आदेशाचा आधार घेऊन ही कारवाई तुम्ही केलेली आहे. परंतु इतक्या वर्षांचे स्मारक, तेथील पुतळा व मंदिर पाडून उद्ध्वस्त करण्यामुळे खरे म्हणजे संपूर्ण समाजामध्ये त्याबद्दल तीव्र भावना आहेत. ....

( यानंतर श्री.सरफरे ....3आर 1 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

तुम्ही सांगितले तर या डी.सी. रुलमध्ये बदल करता येण्यासारखे आहे. माझी आपणास विनंती आहे की, आता अधिवेशन सुरु आहे आणि नगरपालिकेने ठराव संमत केला आहे. डी.सी. रुल दुरुस्त करण्यासंबंधी आपण माननीय मुख्यमंत्र्यांशी बोलावे. आणि त्यांची परवानगी घेऊन या समाजाची जी रिॲक्शन आहे ती दूर करण्यासाठी त्यांना थोडी जागा देऊन ते स्मारक उभे करावे. त्यांच्या जखमेवर मलम चोळण्याचे काम करा, मीठ चोळण्याचे काम करु नका व तातडीने काम करा. आज लोकांच्या या बाबतीत भावना प्रक्षुब्ध झाल्या आहेत, तीव्र झाल्या आहेत, त्यांचे आंदोलन सुरु आहे. म्हणून आपण त्यांना तातडीने दिलासा द्यावा अशी विनंती करतो.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, कायदेशीर बाब अशी आहे की, याठिकाणी मायनर मॉडिफिकेशन होणे आवश्यक आहे. त्यासाठी महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्टच्या तरतुदीप्रमाणे हरकती आणि सूचना मागवून निर्णय घेण्यात येतो. हरकती व सूचना आता प्राप्त झ ााल्या आहेत. याबाबत डायरेक्टर, टाऊन प्लॅनिंग यांचा अभिप्राय घेऊन शासनाने मायनर मॉडिफिकेशन करण्याचा निर्णय घ्यावयाचा आहे.तो लवकरात लवकर घेतला जाईल. अशाप्रकारची वैधानिक कारवाई पूर्ण झाल्यानंतर शासनाच्या वतीने व नगर विकास विभागाच्या वतीने दोन पावले पुढे जाऊन सांगतो की, "वैशिष्टयपूर्ण निधी" नावाची योजना आहे . त्या योजनेमधून हे काम घेण्यासंबंधी वर्धा नगरपालिकेने प्रस्ताव दाखल केला तर संपूर्ण सभागृह बांधून देण्याचे काम शासनाच्या खर्चाने करण्यात येईल असे आश्वासन देतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शासनाकडून नागपूर महानगरपालिकेचे 30 कोटी रुपयांचे थकीत अनुदान न मिळणे

मु.शी. : शासनाकडून नागपूर महानगरपालिकेचे 30 कोटी रुपयांचे थकीत अनुदान न मिळणे याबाबत सर्वश्री. सागर मेघे, पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री सागर मेघे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, वि.प.स. यांनी "शासनाकडून नागपूर महानगरपालिकेचे 30 कोटी रुपयांचे थकीत अनुदान न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, आज माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत नागपूर महानगरपालिकेसंबंधी बैठक झाली. त्या बैठकीमध्ये आम्ही हा विषय मांडला होता. नागपूर महानगरपालिकेला शासनाकडून 30 कोटींचे अनुदान येणे बाकी आहे. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबत पूर्ण हिशेब करावा लागेल, आणि येणे असलेल्या रकमेमधून पैसे देण्यात येतील असे सांगितले. याठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी निवेदनात म्हटले आहे की, 30 कोटी 53 लक्ष रुपये द्यावयाचे आहेत. नागपूर महानगरपालिकेकडून शासनाला 4 कोटी 33 लाख रुपये द्यावयाचे आहे. याबाबत हिशेब केला तर असे दिसते की, शासनाने नागपूर महानगरपालिकेला 26 कोटी रुपये देणे आहेत. आपण निवेदनामध्ये म्हटले आहे की, "सन 2007-08 मध्ये एकूण रु.265.28 लक्ष अनुदान वितरीत केले आहे" अशाप्रकारे नागपूर महानगरपालिकेला काही प्रमाणात अनुदान उपलब्ध केले गेले असले तरी शासनाकडून 26 कोटी रुपयांचे अनुदान मिळणे बाकी आहे ते ताबडतोब देण्याची व्यवस्था आपण करणार काय?

त्याचप्रमाणे नागपूर शहरासह राज्याच्या दोन शहरामध्ये हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येतो. या योजनेंतर्गत शासनाने 7 कोटी रुपये द्यावयाचे होते ते अजूनपर्यंत दिले नाही.. निवेदनामध्ये म्हटले आहे की. नागपूर महानगरपालिकेस सन 1999-2000 पासून आवश्यक ते प्रस्ताव दुरुस्तीसह फेर सादर करण्याविषयी कळविण्यात आले होते, याबाबत नागपूर महानगरपालिकेकडून वेळीच पूर्तता झाली असती तर, त्यांना काही प्रमाणात अनुदान देणे शक्य झ ााले असते" सभापती महोदय, मागील वर्षीपासून नागपूर महानगरपालिकेकडून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. तरीसुध्दा याठिकाणी प्रस्ताव पाठविण्यात आलेला नाही असे म्हटले आहे. तेव्हा अशा अधिकाऱ्यांवर आपण काय कारवाई करणार? प्रस्ताव सादर झाल्यानंतर आपण किती दिवसात पैसे देणार?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, जी काही वस्तुस्थिती आहे ती निवेदनात मान्य केली आहे. सर्वसाधारणपणे नागपूर महानगरपालिकेला 30 कोटी रुपये देणे बाकी आहे. याठिकाणी करमणूक कर, जमीन महसूल अनुदान आणि रस्ते अनुदान या तीन अनुदानांच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रस्ताव मागविले जातात. परंतु हे प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत न येता नागपूर महानगरपालिका थेट प्रस्ताव शासनाकडे पाठविते. जिल्हाधिकारी ही शासकीय ॲथॉरिटी असून ती खऱ्या अर्थाने कर गोळा करण्याचे काम करते. म्हणून हे पाठवावयाचे प्रस्ताव योग्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

आहेत की नाही याची तपासणी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत केल्यानंतर ते शासनाकडे पाठविण्यात येतात व ते प्रस्ताव अधिकृत असतात.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

मी सांगू इच्छितो की, जिल्हाधिकाऱ्यांमार्फत प्रस्ताव मागविण्यात येईल आणि सन 2007-08 मध्ये जो अनुशेष आहे तो तो जास्तीत जास्त पूर्ण करण्यासाठी रिव्हाईज एस्टीमेट आणि पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न करु.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, श्री. विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री झाल्यानंतर चिटणीस पार्कवर त्यांचा नागरी सत्कार झाला होता तेव्हा त्यांनी दरवर्षी 25 कोटी रुपये उपराजधानी म्हणून नागपूर शहराला देण्याचे जाहीर केले होते. त्यातील काही पैसे दिले पण गेल्या काही वर्षापासून हे अनुदान बंद आहे. आमच्या नागपूरमधील विशेषतः लोकमत दैनिकामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांबद्दल गौरवपूर्ण लेख आलेले आहेत परंतु पैसे काही आलेले नाहीत. माननीय मुख्यमंत्र्यांनी जे विशेष अनुदान देण्याचे जाहीर केले होते ते किती मिळणे बाकी आहे आणि ते पैसे केव्हा देणार ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, निवेदनामध्ये मान्य केले आहे की, साधारणपणे 30 कोटी रुपये वेगवेगळ्या अनुदानाचे देणे बाकी आहे.

श्री. नितीन गडकरी : ते कायदेशीर देणे आहे पण उपराजधानी म्हणून नागपूरला विशेष अनुदान देऊ असे सांगितले होते.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, नियम 93 च्या निवेदनात ही बाब नाही. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे. मी माहिती घेऊन पटलावर ठेवीन. या ठिकाणी करमणूक कर अनुदान, रस्ते अनुदान, जमीन महसूल अनुदान यासंदर्भात प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांचा अनादर न करता मी सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी जी घोषणा केलेली आहे त्यामधील अजून किती रक्कम बाकी आहे याची माहिती घेईन.

श्री. नितीन गडकरी : आपण एक तासानंतर उत्तर द्यावे. आपण त्यांना विचारावे. नागपूरमध्ये अधिवेशन होत आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी यासंदर्भात पॉझिटिव्ह उत्तर असे देऊ इच्छितो की,

...2..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

हे जे अनुदान राहिलेले आहे त्या प्रश्नाच्या अनुषंगाने निश्चितपणे मार्च महिन्यापर्यंत पार्टली जे पैसे वाटप करावयाचे आहेत त्यातील जास्तीत जास्त हिस्सा देण्याचा प्रयत्न करु. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य ज्या विशेष अनुदानाबाबत विचारत आहेत त्यासंदर्भात सुध्दा निश्चितपणे सकारात्मक विचार केला जाईल.

श्री. नितीन गडकरी : याबाबत उद्या सांगणार काय ? उद्या नागपूरचे हे अधिवेशन संपत आहे. शासनाने विदर्भातील शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली. कर्ज माफ केले नाही. कापसाचे भाव वाढवून दिले नाहीत. लोड शेडिंग वाढवले. काही अवैध घोषणा केल्या. जाता जाता विशेष अनुदान द्यावे. ते न देता नागपूरला टर्क्यामायसीनची गोळी द्यावयाची आहे काय ? अनुदानाबाबत उद्या विचारुन सांगावे. माननीय मुख्यमंत्र्यांना या ठिकाणी भलेमोठे हार घातले. लोकमत दैनिकामध्ये गौरवाचे लेख लिहिले, कर्तबगार मुख्यमंत्री म्हणून त्यांचे कौतुक केले. त्यांनी आमच्या हातामध्ये भुरका मारला. आपण उद्या विचारुन सांगावे.

श्री. राजेश टोपे : मी उद्या माहिती देतो.

श्री. सागर मेघे : हत्तीरोगाच्या संदर्भात मी विचारणा केली होती. त्याचे उत्तर आलेले नाही.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत 50 टक्के पैसे केंद्र शासनाकडून दिले जात होते आणि 50 टक्के पैसे राज्य शासनाकडून दिले जात होते. ही योजना 1991 पासून केंद्र सरकारने बंद केली. यासाठी 7 कोटी रुपये लागतात. ते सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून वाटप करण्यात येते. या ठिकाणी जर नॉनप्लॅनमध्ये कमी पैसे असतील तर निश्चित प्रकारे अधिक पैसे वाढवून देऊन या योजनेला लागणारे पैसे देण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही करण्यात येईल.

----



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

RDB

**पृ. शी.** : नागपूर शहरातील गांधीबाग, महाल व सिव्हिल लाईन्स या विभागातील विद्युत वितरणाचे काम फ्रेन्चायसी तत्वावर देण्यात येणे.

**मु. शी.** : नागपूर शहरातील गांधीबाग, महाल व सिव्हिल लाईन्स या विभागातील विद्युत वितरणाचे काम फ्रेन्चायसी तत्वावर देण्यात येणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे-पाटील ( ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, जगदीश गुप्ता यांनी "नागपूर शहरातील गांधीबाग, महाल व सिव्हिल लाईन्स या विभागातील विद्युत वितरणाचे काम फ्रेन्चायसी तत्वावर देण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा विषय थोडासा तांत्रिक आहे. टेंडर काढताना ज्याप्रकारे उत्पन्न धरले गेले...

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारण्यापूर्वी मी थोडी माहिती देऊ इच्छितो. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी यासंदर्भामध्ये या सभागृहात नियम 93 अंतर्गत विषय उपस्थित केलेला होता. त्याचे निवेदन वितरित केलेले आहे. दरम्यानच्या काळामध्ये एक पी.एल.आय. नागपूर उच्च न्यायालयामध्ये दाखल झाली आणि आज यासंदर्भात नागपूर उच्च न्यायालयाने स्टेटस्कोच्या संदर्भात निर्णय दिलेला आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 16:20

(श्री. दिलीप वळसे पाटील...)

यासंबंधात विधानसभेतील सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस आणि सन्माननीय सदस्य श्री.एकनाथराव खडसे(पाटील) यांनी, ही बाब न्यायालयामध्ये असल्याने त्याबाबत सभागृहामध्ये चर्चा करणे शक्य होणार नाही, अशी भूमिका घेतलेली आहे. तेव्हा विधानसभेमध्ये जी भूमिका घेण्यात आलेली आहे तीच भूमिका या निवेदनावरील चर्चेच्या संबंधात घ्यावी, असे माझे मत आहे. आवश्यकता असेल तर सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर किंवा उद्या अधिवेशन संपल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे सांगतील त्या प्रमाणे, या प्रश्नासंबंधी त्यांच्या काही शंका कुशंका असतील तर त्याचे समाधन करुन देण्यासाठी, यामध्ये पारदर्शकता आहे किंवा नाही याची माहिती देण्याची माझी तयारी आहे. पण निवेदनाच्या संदर्भात चर्चा व्हावी की न व्हावी यासंबंधीचा निर्णय आपणा सर्वांच्या संमतीने झाला तर बरे होईल.

श्री. नितीन गडकरी : हायकोर्टामध्ये जेव्हा एखादा विषय सब्मीट होतो त्यावेळी तो सब्ज्युडिस होतो. या विषयावर स्टेटस्को मेण्टेन करण्याचा निर्णय झाला. दोन्ही बाजूंनी कारवाई करु नका असे सांगितले. यासंदर्भात प्रथा आणि परंपरा अशी आहे की एखादा विषय न्यायालयात गेला असेल तर न्यायालयाचा निर्णय प्रभावित करणारी कोणतीही चर्चा सभागृह करीत नाही. न्यायालयाचा निर्णय प्रभावित करणारी चर्चा करण्याचा आमचा उद्देश नाही. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, या प्रकरणी न्यायालयामध्ये जो काही निर्णय व्हायचा असेल तो होईल. परंतु टेंडर काढीत असताना नजर चुकीने ते झाले की मुद्दाम झाले हे मला माहीत नाही. वीज मंडळाच्या एमडीनी टेंडरबाबत हिशेब करीत असताना तो ज्या सालापासून करावयास पाहिजे होता ते साल न धरल्यामुळे फार मोठा फरक वाढलेला आहे. हे फारमोठे गौडबंगाल आहे. या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करावी. कारण सकृतदर्शनी टेंडर काढलेले आहे त्याबाबत माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या स्तरावर चौकशी करावी. मंत्री महोदयांनी जे सांगितले त्यामध्ये ही गोष्ट आलेली नाही. जे मूळवर्ष धरलेले आहे त्यामधून वीज चोरीचा धरलेला रेट आणि प्रत्यक्षातील वस्तुस्थिती यामध्ये मोठी तफावत आहे. पडणार फरक अडीच हजार कोटीपेक्षा जास्त आहे. हे प्रकरण म्हणजे भ्रष्टाचाराचे मोठे स्कॅण्डल आहे. आपण न्यायालयाच्या निर्णयाला प्रभावित करु नका. परंतु एम.डी.नी जो हिशेब लावलेला आहे तो चुकीचा आहे. त्याची उच्चस्तरीय चौकशी करणार आहात काय ?

==2==



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : मी आधीच सांगितले की, हा फ्रेन्चाईजचा विषय आहे. यामध्ये मोठया एण्ट्रीकसीज इन्व्हाल्व्ह आहेत. माझी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना विनंती आहे की, याबाबतीत त्यांच्या काही शंकाकुशंका असतील असतील तर त्या संबंधित अधिका-यांशी चर्चा करुन समजावून घेऊ. त्यातून काही प्रश्न अनुत्तरीत राहिले तर नंतरची कोर्स ऑफ ॲक्शन ठरविता येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : ज्या वेळी वीज मंडळाचे विभाजन करुन निरनिराळ्या कंपन्या स्थापन करण्यात आल्या त्यावेळी खाजगीकरण करणार नाही असे स्पष्टपणे सांगितले होते. परंतु आता उचललेले पाऊल हे खाजगीकरणाच्या दिशेने उचललेले असून तसे करणे योग्य आहे काय ?

श्री. दिलीप वळसे पाटील : यापूर्वीच्या काळामध्ये अशा प्रकारची फ्रेनचायजी भिवंडीमध्ये नियुक्त केलेली आहे. ही जी कंपनी नियुक्त करण्यात येईल या कंपनीने महावितरणाच्यावतीने काम करावयाचे आहे. त्यासाठी आवश्यक ती गुंतवणूक त्यांनी करावयाची, वीज आपण द्यायची, वीज दर आपण ठरावायचा, पण त्या संदर्भातील सुविधा देणे आणि कार्यक्षमतेने कारभार करणे ही त्यांची जबाबदारी आहे. आज असलेल्या उत्पन्नामध्ये किती उत्पन्न वाढवून देता येईल याचा निर्णय टेंडर पध्दतीने घेतला जातो. हे खाजगीकरण नाही. महावितरणाचे एजण्ट म्हणून त्यांची नेमणूक होईल. ते महावितरणाचे, वितरणाचे काम करतील.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 16:25

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

आपण डिटेल चर्चा केली तर अर्थ नाही. त्या संदर्भात त्यांनी कुठल्याही क्षणी करारातील अटींचा भंग केला तर त्यांना काढून टाकण्याचा अधिकार मूळ कंपनीकडे अबाधित आहे.

श्री.नितीन गडकरी : तुम्ही हळूहळू खाजगीकरणाकडे वाटचाल करीत आहात.

श्री.दिलीप वळसे पाटील : त्यादृष्टीने टाकलेले एक जरी पाऊल असेल तर मी सभागृहात मोकळेपणाने सांगितले असते.

श्री.नितीन गडकरी : हे सरकारीकरण नाही, खाजगीकरण नाही मग कोणते करण आहे?

श्री.दिलीप वळसे पाटील : टोल किंवा ऑक्ट्रॉय वसूल करण्यासाठी कार्यक्षम पध्दतीने एजन्सी नेमतो, त्याच पध्दतीने या कंपनीला सेवा देण्यासाठी नेमले आहे. केले तर हो म्हणेन, नाही केले तर हो म्हणणार नाही.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वीज वितरण कंपनीतील अधिकाऱ्यांनी केलेला भ्रष्टाचार

**मु.शी.**: वीज वितरण कंपनीतील अधिकाऱ्यांनी केलेला भ्रष्टाचार याबाबत सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, प्रा.शरद पाटील, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 ची सूचना.

श्री.दिलीप वळसे पाटील (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील, शरद पाटील, यांनी "वीज वितरण कंपनीतील अधिकाऱ्यांनी केलेला भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी मंत्रीमहोदयांना धन्यवाद देतो. त्यांनी विस्तृतपणे उत्तर दिलेले आहे. कुंपणच शेत खात आहे. आपल्यासारखे कार्यक्षम मंत्री असताना याठिकाणी पर्यायी पॉवर स्टेशन कर्मचारी उभे करतात, हे भूषणावह नाही. तुम्ही चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई केली. त्यांचे हात कुठपर्यंत पोहोचले आहेत? नाशिकमध्ये कर्मचाऱ्यांनी स्वत:च्या शेतामध्ये 250 एकर शेतीला पाणी घेण्यासाठी पर्यायी पॉवर स्टेशन उभे केले. अहमदनगरमध्ये तोच प्रकार घडला. जूने पोल कापून विकण्याची कामगिरी केली. याचे रॅकेट महावितरण कंपनीच्या कोणत्या टोकापर्यंत आहे?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, या निवेदनामध्ये चार घटना उल्लेखित केल्या आहेत. त्यामधील शेवगाव, अहमदनगर याठिकाणी पर्यायी पॉवर स्टेशन निर्माण केले नाही तर त्यांनी ट्रान्सफॉर्मर आणून बसविला आणि त्या माध्यमातून काही शेतक-यांनी अनधिकृत वीज घेण्याचा प्रयत्न केला होता. ही बाब लक्षात आल्यानंतर संबंधित शेतकरी आणि संबंधित असलेले सर्व कर्मचारी यांच्याविरुध्द कायदेशीरपणे जी कारवाई करावयाची ती करण्यात आली आहे. दुसरी घटना अकोले, अहमदनगर याठिकाणी घडलेली आहे. त्यामध्ये काही शेतकऱ्यांच्या घरी विजेच्या तारा, खांब सापडले. त्यामध्ये जे कर्मचारी सहभागी आढळून आले त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अकोले येथेच एका कार्यालयात घडलेली घटना आहे. एका कर्मचाऱ्याने पुस्तकाद्वारे लोकांचे पैसे घेतले. परंतु ते पैसे जमा केले नाहीत. त्या पैशांचा अपहार करण्याचा प्रयत्न केला. त्या संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द फिर्याद केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली, त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्यात आली आहे. धुळे येथे पवनचक्क्या आहेत. त्या पवनचक्क्यांमधून निर्माण होणारी वीज खरेदी केली जाते. ती खरेदी केल्यानंतर जे मालक आहेत त्या मालकांना त्याचे पैसे दिले जातात. ते पैसे स्थानिक डिव्हीजन कार्यालयाकडून दिले जातात. पैसे देताना आपण चेक देतो. कॅशियर तो चेक बँकेत नेतो आणि डीडी काढतो आणि वीज खरेदी ज्यांच्याकडून केली त्यांना त्या डीडीचे वितरण करतो. या घटनेमध्ये असे घडले की, संबंधित कॅशियर बँकेत गेलाच नाही. वेस्टास कंपनीच्या माध्यमातून 20 कंपन्या काम करीत होत्या. त्या कंपनीकडे त्यांनी चेक दिले. चेक बँकेत जमा झाले. कर्मचारी जो होता ज्याने पेमेंट करावयाचे होते त्याने यादी बदलली. ही घटना लक्षात आल्यानंतर संबंधित जे जे अधिकारी आहेत त्या सर्व

..4..

अप्रसिद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.दिलीप वळसे पाटील.....

अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे. अगदी निष्काळजीपणाच्या कारणाखाली सुध्दा कारवाई करण्यात आली आहे. एवढा मोठा वीज मंडळाचा कारभार असताना प्रत्येक डिव्हीजन, सबडिव्हीजनमध्ये मोठया प्रमाणात कर्मचारी काम करतात. अशा घटना घडत राहणार. अशा घटना घडत असताना बंदोबस्त करण्यासाठी कडक कारवाई करावयास पाहिजे, ती कारवाई त्याठिकाणी झालेली असल्यामुळे या संदर्भात धागेदोरे कुठे लांब जाण्याची शक्यता नाही. ते धागेदोरे तोडून टाकले जातील.

(नंतर श्री.जुन्नरे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : अशा प्रकारे कडक कारवाई केली तर चो-याचे प्रमाण कमी होऊ शकेल. त्यामुळे विद्युत मंडळातील कर्मचा-यांनी चोरी केली तर त्यांच्यावर मोक्का कायदा लावून कारवाई केली जाईल काय ?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, प्रचलित कायद्या प्रमाणेच आपल्याला कारवाई करावी लागते. कर्मचा-याला वेगळा न्याय आणि शेतक-याला वेगळा न्याय आपल्याला देता येणार नाही. परंतु तरी सुध्दा आपण केलेली सूचना जरुर तपासण्यात येईल.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : जळगाव जिल्हयातील हातनुर कालव्यावर लाखो रुपये खर्च होऊन सुध्दा शेतक-यांना पाणी न मिळणे.

**मु. शी**. जळगाव जिल्हयातील हातनुर कालव्यावर लाखो रुपये खर्च होऊन सुध्दा शेतक-यांना पाणी न मिळणे याबाबत श्री. दिलीपराव सोनावणे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. अनिल देशमुख ( सार्वजनिक उपक्रम मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री दिलीपराव सोनवणे यांनी "जळगाव जिल्हयातील हातनुर कालव्यावर लाखो रुपये खर्च होऊन सुध्दा शेतक-यांना पाणी न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, जळगाव जिल्हयातील हातनुर कालवा 91.50 कि.मी. पासून अनवर्दे-भवाळे वितरिका व शाखा कालवा गलवाडे वितरिका 2 कि.मी.अंतराच्या कामावर शासनाचे लाखो रुपये खर्च झालेले असून गेल्या 20 वर्षापासून या कालव्यातून शेतक-यांना शेतीसाठी पाण्याचा थेंबही मिळालेला नाही. या ठिकाणी पाणी असतांनाही शेतक-यांना पाणी मिळत नाही. शेतक-यांनी पाण्याची मागणी केलेली असतांनाही पाणी मिळत नाही. या ठिकाणी बांधकाम आणि रेग्युलर इरिगेशन ही दोन डिपार्टमेंट आहेत. परंतु बांधकाम विभागाने त्यांचे काम पूर्ण केलेले नाही. बांधकाम विभाग टेस्टींग करुन देत नसल्यामुळे शेतकरी वर्गाचे नुकसान होत आहे. पाणी असतांनाही लाखो, करोडो रुपयांचे शेतक-यांचे आर्थिक नुकसान होत आहे. पाटबंधारे विभागाने टेस्टींग करुन दिले असते तर शेतक-यांना पाणी पुरवठा होऊ शकला असता. पाटबंधारे विभाग टेस्टींग करुन देत नसल्यामुळे शेतकरी पाण्यापासून वंचित राहिलेले आहेत तसेच या ठिकाणी जे उत्तर देण्यात आलेले आहे त्यामध्ये माहिती बरोबर आलेली दिसत नाही. त्यामुळे या ठिकाणच्या शेतक-यांना पाणी कधी उपलब्ध करुन दिले जाणार आहे?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, 3 महिन्याच्या आत चेकींग करुन शेतक-यांना पाणी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**उपसभापती** : राहिलेल्या नियम 93 च्या सूचना मध्यंतरानंतर घेण्यात येतील. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी 5.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

-----------------

( दुपारी 4.32 ते 5.00 वाजेपर्यंत मध्यंतर.)

-------------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप.

**उपसभापती** : आता आपण निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप देणार आहोत. आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येतील.

आपण ज्या सन्माननीय सदस्यांना निरोप देणार आहोत त्यांची नावे मी वाचून दाखवितो.

1. श्री.अब्दुल सत्तार (दिनांक 29 ऑगस्ट 2007 रोजी निवृत्त झाले. )
2. डॉ.एम.ए.अझीज
3. श्री.जितेंद्र आव्हाड
4. श्री.गुरुनाथ कुलकर्णी
5. प्रा.फौजिया खान
6. श्री.वसंतराव चव्हाण
7. श्रीमती सुधा जोशी
8. श्री.रमेश निकोसे
9. श्री.धोंडीराम राठोड
10. श्री.जगन्नाथ शेवाळे
11. श्री.धनाजी साठे
12. मेजर सुधीर सावंत
13. श्री.गिरीष गांधी

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, या 13 सन्माननीय सदस्यांपैकी श्री.अब्दुल सत्तार हे दिनांक 29 ऑगस्ट 2007 रोजी निवृत्त झालेले आहेत. तेव्हा त्यांना आता निरोप देता येणार नाही.

**उपसभापती** : ठीक आहे. श्री.अब्दुल सत्तार यांना आपण नंतर निरोप देऊ.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, या सदनाच्या बारा सन्माननीय सदस्यांची मुदत पुढील अधिवेशन सुरु होण्यापूर्वी संपत असून त्यांना निरोप देण्याच्या प्रस्तावाच्या निमित्ताने मी बोलण्यास उभा आहे.

माननीय राज्यपालांनी नियुक्त केलेल्या बारा सन्माननीय सदस्यांची मुदत संपत असल्यामुळे ते निवृत्त होणार आहेत. या सर्व सन्माननीय सदस्यांनी केलेले काम आपण सर्वांनी पाहिलेले आहे. या सदनामध्ये माननीय राज्यपालांनी सदस्य नियुक्त करण्याची प्रथा आहे. याचे प्रमुख कारण असे की, विविध क्षेत्रातील तज्ज्ञमंडळी राजकारणामध्ये येणे पसंत करतातच असे नाही. पण अशा तज्ज्ञांच्या विचारापासून राज्य व देश वंचित राहू नये म्हणून राज्यसभेत व राज्यांच्या विधानपरिषदेत अशाप्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे. समाजातील विविध क्षेत्रातील तज्ज्ञ याठिकाणी यावेत आणि त्यांच्या अनुभवाचा फायदा, मार्गदर्शनाचा फायदा लोकशाही प्रक्रिया अधिक प्रगल्भ होण्यासाठी व्हावा म्हणून ही अत्यंत चांगल्या प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.पुरी..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

साहित्य, कला अशी अनेक क्षेत्रे आहेत की, ज्या क्षेत्रांसाठी प्रतिनिधीत्वसुध्दा देण्याची आवश्यकता आहे. या सन्माननीय सदस्यांनी अनेक क्षेत्रांसाठी योगदान दिलेले आहे. 6 वर्षाच्या कालावधीनंतर आज काही सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, डॉ.एम.ए.अझीज यांचे या सदनातील आणि बाहेरचे काम पाहिले तर ते पुढीलप्रमाणे आहे. सन 2003 पासून ते चेअरमन, उर्दू एज्युकेशन सोसायटी, औरंगाबाद,1985 पासून विश्वस्त, खैरुल इस्लाम हायर एज्युकेशन सोसायटी,1989 पासून व्हाईस चेअरमन, कॉलेज ऑफ एज्युकेशन खिलापत कमिटी,1985 पासून कार्यकारी विश्वस्त ऑल इंडिया खिलापत कमिटी,1996 पासून कार्यकारी विश्वस्त, हिंदू-मुस्लीम सेंटर ऑफ युनिटी, मुंबई,2003 पासून व्हाईस चेअरमन, कॉम्प्यूटर सेंटर (एनसीपीयुएल) माहिती तंत्रज्ञान व मानव विकास मंत्रालय,भारत सरकार,1997 पासून चेअरमन, सेंटर ऑफ हिस्टॉरिकल स्टडिज इन इंडिया,1977 मानद अधिव्याख्याता,मुंबई येथील होमगार्डस् अँड सिव्हील डिफेन्स स्वयंसेवक संस्था,1984 मध्ये उत्कृष्ट समाज सेवा कार्याबद्दल त्यांना राष्ट्रपतीपदकही प्राप्त झालेले आहे. त्यांनी वेगवेगळया क्षेत्रामध्ये चांगले काम केलेले आहे. अल्पसंख्यांकाच्या दृष्टीने त्यांनी मांडलेले प्रश्न, राज्याच्या धर्मनिरपेक्षतेच्या बाबतीतील त्यांची भूमिका ही देखील निश्चितपणे आठवणीत राहण्यासारखीच आहे.

सभापती महोदय, तरुण सन्माननीय सदस्य म्हणून ज्यांची ओळख आहे ते श्री.जितेंद्र आव्हाड हेसुध्दा निवृत्त होत आहेत. वयोमानानुसार जे सनमाननीय सदस्य निवृत्त होतात त्यावेळी ते निवृत्त होत आहेत असे म्हणण्यास काही कठीण वाटत नाही. परंतु श्री.जितेंद्र आव्हाड यांना निरोप देताना थोडेसे कठीण वाटत आहे. कारण ते तरुण आहेत. आपण सिनेसृष्टीतील एका जितेंद्रांना पाहतो व येथे या जितेंद्रांना पाहतो. ते ज्यावेळी सभागृहात सदस्य म्हणून आले तेव्हापासून ते तसेच आहेत. आता त्यांचे वय थोडे वाढलेले आहे,परंतु ते आता देखील तसेच दिसतात. त्यांच्याकडे पाहिल्यानंतर सगळया बाबतीत ते तसेच पूर्वीसारखे वाटतात. काही बाबतीत वय सील करण्याचा फायदा आहे.अशाप्रकारचे एक एव्हरग्रीन व्यक्तिमत्व निवृत्त होत आहे. ते निवृत्त होत आहेत,असे म्हणायला थोडेसे वेगळे वाटते,परंतु ती वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याची प्रोव्हीजन या सदनामध्ये आहे. विधानसभेमध्ये अशाप्रकारची प्रोव्हीजन

..2....

श्री.आर.आर.पाटील....

नाही. त्या सभागृहातील सदस्य केव्हा निवृत्त होणार हे अनिश्चित आहे. त्याठिकाणचे सदस्य एकाचवेळी निवृत्त होत असल्यामुळे निरोप समारंभाचा प्रश्न तेथे येत नाही. परंतु येथे एकाच वेळी 1/3 ...

**उपसभापती** : ते सभागृह आपल्याला निरोप देत नाही, जनता आपल्याला निरोप देते.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, हे खरे आहे. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी या सदनात अतिशय चांगले काम केलेले आहे. परंतु लोकशाहीत पक्ष हासुध्दा तितकाच आवश्यक आणि महत्वपूर्ण असतो. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात त्यांनी केलेल्या कामाच्या अनुभवाचा, ठाणे महापालिकेत नगरसेवक म्हणून केलेल्या कामाच्या अनुभवाचा एनएसयुआय विद्यार्थी संघटनेमध्ये केलेल्या कामांच्या अनुभवाचा व इतर क्षेत्रामध्ये त्यांनी केलेल्या कामाच्या अनुभवाचा निश्चितच या सदनाला आणि राज्याला फायदा झालेला आहे. आज त्यांनाही निरोप देण्याचा प्रसंग आलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ शांताराम कुलकर्णी यांनाही आपण निरोप देणार आहेत, परंतु आज ते सभागृहात उपस्थित नाहीत. मध्यंतरी त्यांना एका गंभीर आजाराला तोंड द्यावे लागले. आता त्यांची प्रकृती चांगली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा आणि माननीय श्री.पवार साहेबांचा एक निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून आणि जून्या कॉंग्रेसमध्ये असताना एक कुशल संघटक, हजरजबाबी आणि स्पष्ट बोलणारा नेता म्हणून त्यांची वेगळी प्रतिमा नेहमीच आपल्याला दिसून आलेली आहे. अनेक प्रश्नांच्या निमित्ताने त्यांनी व्यक्त केलेली माहिती, सभागृह शांतपणे चालत असताना आपल्या स्पष्ट स्वभावामुळे निर्माण झालेल्या तात्विक संघर्षाच्या प्रश्नांवर मांडलेली भूमिका आपल्याला आठवतच असेल. अशाप्रकारे एक लक्षात राहणारे व्यक्तिमत्व आज निवृत्त होत आहे. 6 वर्षे या सदनाला त्यांनी खूप मोठे योगदान दिलेले असून ते आज निवृत्त होत आहेत.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.......

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या प्रा.श्रीमती फौजिया तहसीन खान यांनाही आज आपण निरोप देत आहोत. मला आठवते की, राष्ट्रवादी काँग्रेसचा सक्रीय कार्यकर्ता म्हणून कामात असतांना परभणीमध्ये मी नगरपालिकेच्या प्रचारासाठी जाणार होता. तत्कालीन अध्यक्षांकडे मी विनंती केली होती की, परभणीमध्ये पक्षाचे युनिट कमकुवत आहे, त्या ठिकाणी सभेसाठी वेळ कशाला घालविता, उपयोग होईल अशा ठिकाणी सभा आयोजित करावी. मी सभासुध्दा टाळण्याचा प्रयत्न केला होता, ओझरता दौरा केला, निवडणुकीचा निकाल लागला त्यावेळी प्रा.फौजिया खान यांचा अतिशय कमी मताने पराभव झाला होता, अपेक्षेपेक्षा धक्कादायक मते त्यांना मिळाली होती. परभणीच्या जनतेने त्यांना भरभरुन मते दिली होती याचे प्रमुख कारण असे होते की, त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील त्या शहरातील योगदान. अनेक वेळा वेगवेगळया क्षेत्रातून राजकारणासारख्या मुख्य क्षेत्रामध्ये लोक येतात. पण अन्य क्षेत्रामध्ये प्रभावीपणे काम करणारे लोक या क्षेत्रामध्ये प्रभावी ठरतातच, असे नाही. तसे बघावयास गेले तर नगरपालिकेला उभ्या राहीपर्यन्त राजकारण हे त्यांच्यादृष्टीने नवखे क्षेत्र होते. एकदा विधानपरिषदेमध्ये संधी मिळाल्यानंतर आणि लोकांचे संघटन करण्याची आवड निर्माण झाल्यानंतर महिलांचे बचत गट, महिलांचे प्रश्न, अल्पसंख्यांकांचे प्रश्न, उपेक्षितांचे प्रश्न, अलिकडच्या काळामध्ये आमच्या पक्षात, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये महिलांच्या बाबतीत मेळावे असोत, बचत गट असो, त्यांनी घेतलेले कार्यक्रम लाखोंच्या संख्येने होते. केवळ सहा वर्षाच्या कालावधीमध्ये खूप प्रभावी काम करतांना सभागृहामध्ये वेगवेगळया विषयामध्ये मते मांडून आणि सभागृहाबाहेर आपले संधटन कौशल्य त्यांनी सिध्द केले आहे. त्यांनाही या निमित्ताने मी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव बळवंतराव चव्हाण यांना माननीय राज्यपालांनी नियुक्त केले होते, ते त्यांच्या शैक्षणिक आणि राजकीय कामगिरीतून. नायगाव एज्युकेशन सोसायटी, त्याचबरोबर सामाजिक एकता व सलोखा राखण्याचे कार्य, वेगवेगळया सहकारी संस्थांमध्ये तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि पक्ष अनेक पातळयांवर एक यशस्वी संघटक म्हणून त्यांनी केलेले काम लक्षात घेऊन माननीय राज्यपाल महोदयांनी शासनाच्या शिफारशीतून त्यांची नियुक्ती केली होती. या सदनामध्ये शेतक-यांचे प्रश्न मांडत असतांना, ग्रामीण

...2.......

श्री.आर.आर.पाटील.........

भागाचे प्रश्न मांडत असतांना, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रश्न उपस्थित करीत असतांना त्यांनी आपल्या चांगल्या कामाची वेगळी चुणूक दाखविली आहे. त्यांनाही मी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा विजय जोशी याही निवृत्त होणार आहेत. त्यांनाही आज आपल्याला निरोप द्यावा लागत आहे. सभागृहात मी बोलत असतांना नेहमीच सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब त्यांना चिडविण्याच्या दृष्टीने म्हणावयाचे की, तुम्हाला मंत्री होण्याची संधी मिळाली नाही. लोकशाहीसारख्या प्रक्रियेत कोणाची संधी कधी येते, कुठल्या दाराने येते आणि किती मोठी येते, हे सांगता येत नाही. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी ज्या अपेक्षा व्यक्त केल्या त्या कधीतरी साकार होवोत, अशा शुभेच्छा यानिमित्ताने मी त्यांना देऊ इच्छितो. पीठासीन अधिकारी म्हणून आणि विशेषत: महिलांच्या आणि शिक्षणाच्या प्रश्नांवर त्यांनी व्यक्त केलेली मते ही नेहमीच आठवणीत राहतील. त्यांचे पक्षातील प्रचारकाचे काम प्रभावी आहे. राज्याच्या बाहेर केलेले राजकीय व सामाजिक काम, योग्य कामाची दखल घेऊन त्यांची या सदनामध्ये निवड झाली होती. मी त्यांनाही शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रमेश मोतीरामजी निकोसे हे देखील निवृत्त होत आहेत. शैक्षणिक क्षेत्रामध्ये आणि साहित्य क्षेत्रामध्ये त्यांनी खूप प्रभावीपणे काम केले आहे. उपेक्षितांच्या व्यथा या सदनामध्ये मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला तसेच साहित्यिकाच्या भूमिकेतूनही उपेक्षितांच्या व्यथा त्यांनी मांडल्या आहेत.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील .........

सफाई कामगारांच्या जीवनावरील "जळते आँसू" व "कल की दुल्हन आज की दुश्मन" या हिंदी नाटकांचे लेखक, प्रयोगाचे दिग्दर्शक व भूमिका, "बदली" व "लग्न माझं आहे" या नाटकांच्या प्रयोगांचे दिग्दर्शक व भूमिका, "अश्रूतील भावना अंतरीच्या यातना" या नाटकाचे लेखक असा त्यांचा प्रवास आहे. "गांधी, आंबेडकर, रमाई" या एकपात्री नाटकात त्यांची भूमिका गाजलेली आहे. चरित्रलेखन, कविता, छंद, मराठी आणि हिंदी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व असे फार कमी विषय आहेत की ज्यावर त्यांनी सभागृहात आपले मत व्यक्त केलेले नाही. या सभागृहातील प्रत्येक प्रश्नाच्याबाबतीत जागरुकतेने आपली मत मांडणारा हा सदस्य आज निवृत्त होत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम हरीनाईक राठोड हे सुध्दा आज निवृत्त होत आहेत. त्यांचे शिक्षण क्षेत्रातील, सामाजिक क्षेत्रातील, अस्पृश्यता निवारणातील, मराठवाडयातील प्रगतीच्या बाबतीत पाठीमागे राहिलेल्या जालना जिल्हयातील त्यांचे काम लक्षात घेऊन त्यांची सभागृहात नियुक्ती झाली होती. सभागृहाचे सदस्य म्हणून त्यांनी आपल्या अनुभवाची प्रचिती सभागृहाला दिलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ आनंदराव शेवाळे हे पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष होते. त्यांची कृषी क्षेत्रातील कामगिरी उल्लेखनीय आहे. थोर व्यक्तींच्या जयंती-पुण्यतिथी दिनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करुन त्या थोर पुरुषांचे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी केलेले आहे. शेती मालाला योग्य भाव मिळावा म्हणून त्यांनी घेतलेली संघर्षाची भूमिका आणि कृषी औद्योगिक समाज रचनेमध्ये, सहकारी संस्थांमध्ये प्रभावीपणे त्यांनी केलेले काम लक्षात घेऊन त्यांची या सभागृहाचे सदस्य म्हणून निवड झाली होती. त्यांनी वेगवेगळया विषयावर आपली मते सभागृहात मांडलेली आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धनाजी गणपतराव साठे, व्यवसायाने वकील असलेले हे व्यक्तिमत्व मुख्यमंत्र्यांच्या अत्यंत जवळचे आहे. शिक्षण, सहकार आणि कृषी क्षेत्रात त्यांनी केलेले उल्लेखनीय काम आणि सोलापूर जिल्हयाच्या डेव्हलपमेंटमध्ये त्यांनी दिलेले योगदान लक्षात घेऊन त्यांची या सभागृहाचे सदस्य म्हणून निवड झाली होती. त्यांचे काम आपण सर्वांनी बघितलेले आहे. आजही शेतीतील त्यांचे प्रयोग सुरुच आहेत. सहकारी संस्था उभ्या करण्यासाठी त्यांची धडपड सुरुच आहे, अशा एका सेवाभावी कार्यकर्त्याला आपण आज निरोप देत आहोत.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ..........

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मेजर सुधीर सिताराम सावंत हेही निवृत्त होत आहेत. पण ते आता निवृत्त होतात की राजीनामा देतात, नेमका काय उल्लेख करावा हा माझ्या पुढे प्रश्न आहे. सभापती महोदय, याचा उल्लेख प्रोसिडिंगवरील वस्तुस्थिती बघून आपणच करावा, अशी मी आपल्याला विनंती करतो. भारतीय सैन्य दलात कमांडो इन्स्ट्रक्टर आणि कर्नल म्हणून त्यांनी खूप प्रभावी काम या देशाच्या सीमेचे रक्षण करण्यासाठी केलेले आहे. राजकारणातील आपली आवड लक्षात घेऊन त्यांनी तेथील मुदत संपल्यानंतर राजकारणासारख्या महत्वपूर्ण क्षेत्रामध्ये काम केले. पक्षाबरोबर असलेली निष्ठा लक्षात घेऊन त्यांची या सभागृहाचे सदस्य म्हणून निवड झाली होती. आज त्यांनी राजीनामा दिलेला आहे, अशी बातमी आहे आणि त्यांची नियुक्तीही संपलेली आहे. मिलीटरीसारख्या महत्वाच्या क्षेत्रात काम करणा-या मेजर सुधीर सावंतांनी सभागृहाला चांगले मार्गदर्शन केलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गिरीष माणिकलाल गांधी हेही आज निवृत्त होत आहेत. काही लोकांना आपण फार तरुण वयात निरोप देतो तर काही लोकांना आपण फार कमी कालावधीत निरोप देतो. श्री.गिरीष माणिकलाल गांधी हे त्यापैकी एक आहेत. मे, 2007 मध्ये त्यांची विधानपरिषदेवर निवड झाली होती. या सभागृहात त्यांना फार कमी कालावधी मिळालेला आहे.

यानंतर कु.जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

वास्तविकत: या सदनामधीलच नाही तर बाहेर सुध्दा त्यांच्या कामाचा आवाका खूप मोठा आहे. नागपूरच्या आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक जीवनाशी एक खूप निगडित असलेले प्रभावी व्यक्तिमत्व म्हणून आपल्याला त्यांच्याकडे बघावे लागेल. आज नागपूरच्या सांस्कृतिक जीवनावर एक प्रकारे ठसा उमटविण्याचे काम सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांनी आपल्या कर्तुत्वाने केलेले आहे. नागभूषण पुरस्काराने सन्मानित श्री. गांधी साहेबांचा विदर्भातील साहित्याशी, सहकारी संस्थांशी निकटचा संबंध आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षावरोपणाशी संबंधित असलेले वेगवेगळे पुरस्कार तर त्यांना मिळालेले आहेतच पण त्याचबरोबर श्री.गिरीष गांधी हे एक असाधारण व्यक्तिमत्व आहे. राज्यपालांनी करावयाच्या नियुक्तीमधून या अशा व्यक्तिमत्वाचीच माणसे यावीत अशीच घटनाकारांची अपेक्षा असते. योग्य व्यक्ती योग्य ठिकाणी अशा स्वरुपाचाच निर्णय त्यांची नियुक्ती करताना घेतला गेलेला आहे. पण हा निर्णय घ्यायला सुध्दा थोडासा प्रदीर्घ कालावधी लागला. मी मनापासून सांगतो की, आतापर्यंत त्यांना मिळालेली मुदत व त्यांचा कार्यकाल हा खूप कमी आहे. एवढया कमी कालावधीमध्ये देखील त्यांनी विविध संसदीय आयुधांचा अभ्यास करुन येथे सुध्दा त्यांनी आपल्या कामाचा ठसाच उमटविलेला आहे. सहा वर्षाचा पूर्ण कालवधी त्यांना मिळाला असता तर अधिक चांगले झाले असते. पण मी गिरीष भाई आपल्याला शुभेच्छा देऊन हा कालावधी पूर्ण करण्याची संधी आपल्याला मिळावी अशी माझी निश्चितपणाने अपेक्षा राहील.

सहा वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर आपण या सदस्यांना निरोप देत आहोत. हा निरोप देत असतांना एक गोष्ट मला राहून राहून वाटते की, आपण त्यांना आता निरोप देणार आणि निरोप घेतलेल्या सदस्यांपैकी जर काही सदस्य पुन्हा निवडून आले तर मात्र आपण दिलेला निरोप त्यांच्याकडून परत घेता येत नाही. कारण आपण तो निरोप त्यांना दिलेला असतो. ते पुन्हा आल्यानंतर त्यांचे स्वागत मात्र आपण जरुर करतो. यामध्ये काही बदल करुन पुढच्या नियुक्त्या झ ाल्यानंतर पुन्हा निवडून न आलेल्या सदस्यांना पुन्हा पाचारण करुन हा समारंभ पार पाडण्यात यावा. निवृत्त होणा-या सदस्यांना शुभेच्छा देऊन त्यांनी पुन्हा या सदनामध्ये निवडून यावे, अशी मी सदिच्छा व्यक्त करतो.

**उप सभापती** : ठीक आहे, आपण या समारंभाला सदिच्छा समारंभ म्हणू या.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : महोदय, प्रथेप्रमाणे आम्ही आपल्या सर्वांना निरोप देत आहोत. विशेषत: महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेच्या वतीने आपल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन लोकशाहीसाठी आपण जे योगदान दिले त्याबद्दल आपले ऋण मानतो. म्हणूनच हा कृतज्ञता सोहळा हवा असतो. निवृत्त होणा-या सदस्यांपैकी काही सदस्य जर पुन्हा निवडून आले तर आम्हाला आनंदच होईल व आम्ही त्यांचे स्वागत करु. पण जे येऊ शकणार नाहीत, त्यांना मी मनापासून सर्वांच्या वतीने शुभेच्छा देतो. या देशाकरिता आपण खूप मोठे योगदान दिले. लोकशाहीच्या माध्यमातून जर राज्य आणि देश मोठा व्हायचा असेल तर काम करणा-यांची जशी आवश्यकता असते त्याचप्रमाणे मार्गदर्शन करणा-यांची आणि दिशा दाखविणा-यांची सुध्दा आवश्यकता असते. म्हणून यापुढे आमच्या मार्गदर्शकाचे काम आपल्याकडून घडावे, अशी मी अपेक्षा करतो. तसेच सर्वांच्या वतीने निवृत्त होणा-या सर्व सन्माननीय सदस्यांना पुन्हा एकदा शुभेच्छा देतो व त्यांना दीर्घायुष्य लाभो ही परमेश्वरचरणी प्रार्थना करतो आणि त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुन्हा एकदा कृतज्ञता व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

--------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ( विधानसभेने निवडलेले ) : सन्माननीय सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी निवृत होणा-या विधानपरिषद सदस्यांना निरोप देण्याच्या संदर्भातील चर्चा या सभागृहात उपस्थित केलेली आहे. या चर्चेला मी पाठिंबा देण्यासाठी उभा आहे. डॉ.एम.ए.अझीज, सर्वश्री.जितेंद्र आव्हाड, गुरुनाथ कुलकर्णी, प्रा.फौजिया खान, श्री.वसंतराव बळवंतराव चव्हाण, श्रीमती सुधा जोशी, सर्वश्री. रमेश निकोसे, धोंडीराम राठोड, जगन्नाथ शेवाळे, धनाजी साठे, मेजर सुधीर सावंत, श्री.गिरीष गांधी हे बारा सन्माननीय विधानपरिषद सदस्य.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

13 वे सदस्य श्री.अब्दूल सत्तार असून ते 29 ऑगस्ट 2007 रोजी निवृत्त झाले आहेत, त्यांचाही आपण उल्लेख केलेला आहे. या सभागृहातून हे सदस्य निवृत्त होणार आहेत. आपल्या लोकशाही परंपरेमध्ये निरोपाची चांगली प्रथा विधानपरिषद व राज्यसभा या दोन्ही सभागृहात परंपरागत सुरु आहे. एखादा सदस्य 6 वर्षे काम करुन ज्यावेळेला निवृत्त होतो तेव्हा त्याच्या कामगिरीचे मूल्यमापन या निरोप समारंभाच्या रुपाने आपण करीत असतो. हे सर्व सदस्य राज्यपाल महोदयांनी नियुक्त केलेले असतात. संकेत असा आहे की, राज्यपाल या सभागृहामध्ये जे सदस्य नियुक्त करतात ते समाजातील विविध क्षेत्रातील असतात. ती समाजातून लोकशाही पध्दतीने प्रत्यक्ष निवडणूक न लढविता समाजाच्या विविध क्षेत्रात काम करणारी मंडळी असतात. त्यांनी समाजाचे प्रबोधन करुन प्रभावीपणे काम केलेले असते. समाजाला चांगली दिशा देऊन समाज बलवान करण्यासाठी, समाज सुदृढ करण्यासाठी, समाज चांगल्या प्रकारे उभा करण्यासाठी ही मंडळी काम करीत असतात. अशा मंडळीची, कार्यकर्त्यांची, साहित्य, पत्रकारिता, कला, विविध क्षेत्रातील व्यक्तींची राज्यपाल महोदयांच्या माध्यमातून नियुक्ती केलेली असते. सध्या निवृत्त होणारी जी टीम आहे ती याच पध्दतीने नियुक्त झालेली होती. मी माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या मुद्दयाची पुनरावृत्ती करणार नाही. त्यांनी प्रत्येक सदस्यासंबंधी जे वक्तव्य केले आहे, ते वारंवार करणार नाही. परंतु हया सदस्यांबरोबर मी पाच-साडेपाच वर्षे या सभागृहात काम केलेले आहे.

माननीय सदस्य श्री.एम.ए.अझिज हे आपल्यातून निवृत्त होत आहे. त्यांनी विविध पदावर काम केलेले आहे. कॉंग्रेसचे निष्ठावान सदस्य म्हणून त्यांनी अव्याहत पक्षाची सेवा केलेली आहे. पक्षाची सेवा करीत असतानाही विविध संस्थेच्या माध्यमातून समाजाची सेवा अविरत करण्याचे काम ते करीत आहेत. अतिशय अबोल आणि महत्वाच्या विषयावर नेमके बोलणारे व्यक्तिमत्व असा त्यांचा उल्लेख करावा लागेल. मला आठवते की, वक्फ बोर्डाच्या एकंदरीत कारभारावर या सदनात चर्चा झ ाली होती. मनाला अतिशय बोचणारी टीका येथे होत असताना मी त्यांच्याकडे बघत होतो.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

अतिशय शांतपणे त्यांनी त्या चर्चेमध्ये भाग घेतला व त्यांची बाजू अतिशय चांगल्या पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न केला. चिडखोरपणा नाही, रागावणे नाही इतक्या शांतपणे त्यांनी त्यांची भाषणे या सभागृहात नोंदविली आहेत. समाजात काम करीत असताना शांत व्यक्तिमत्वाची माणसे पुढे पुढे जात असतात.

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.उल्हास पवार )**

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांचा उल्लेख उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी एव्हरग्रीन असा केलेला आहे. "दहीहंडी फेम" असे मी त्यांना म्हणणार नाही. परंतु समाजाचे जी विविध क्षेत्र आहेत, त्या प्रत्येक क्षेत्रात आपण असले पाहिजे व ठसा तेथे उमटविला पाहिजे. सामाजिक व सांस्कृतिक कार्यातही आपला सहभाग असला पाहिजे. समाजात समरस झाले पाहिजे, अशी त्यांची भूमिका आहे. त्यांनी दहीहंडीचा कार्यक्रम अत्यंत चांगल्या पध्दतीने केला होता. मी त्यांचा मागील 4-5 वर्षापासून अभ्यास केला आहे. अतिशय वादळी व निर्भय असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. एखाद्या प्रश्नावर चर्चा होत असताना त्या प्रश्नातून सरकार अडचणीत येईल किंवा काय याचा विचार त्यांनी कधी केला नाही.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

त्यांनी समाजाला न्याय देण्याच्या भूमिकेतून या सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घेतला. निवृत्त होण्याचे त्यांचे वय नाही. सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणारा कार्यकर्ता हा कधीच निवृत्त होत नाही. शेवटपर्यंत तो लोकांच्या सेवेकरीता विविध क्षेत्रामध्ये काम करीतच असतो. त्यामुळे निवृत्त हा शब्द फक्त सभागृहापुरता मर्यादित आहे. सामाजिक कार्यकर्ता हा सामाजिक कार्यामधून कधीच निवृत्त होत नाही.

सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड हे देखील एक उभरते व्यक्तिमत्व आहे. त्यांना आपल्या जीवनामध्ये अजून खूप काही करावयाचे आहे. त्यांच्या सामाजिक कार्याचा निश्चितपणे जनतेला उपयोग होईल असे मला वाटते. आमची अपेक्षा आहे की, पुढील वेळी त्यांनी सभागृहामध्ये नक्की निवडून यावे त्यामुळे त्यांना निरोप द्यायचा की, शुभेच्छा द्यायच्या असा आम्हाला प्रश्न पडला आहे. सभागृहामध्ये त्यांच्यासारखे वादळी व्यक्तिमत्व असण्याची आवश्यकता आहे. आम्ही ज्या वेळी सामाजिक ठिकाणी वावरत असतो त्यावेळी लोक आम्हाला म्हणत असतात की, आपले सभागृह हे वरीष्ठ सभागृह आहे, येथील सन्माननीय सदस्य हे अतिशय शांत प्रवृत्तीचे आहेत.परंतु श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या वादळी व्यक्तिमत्वाची जाणीव अजून लोकांना नाही. त्यामुळे हे वादळी व्यक्तिमत्व पुन्हा सभागृहामध्ये येण्याची जबाबदारी सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांच्याकडे आहे.

अध्यक्ष महाराज,सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांची तब्येत आज ठीक नसल्यामुळे ते आज सभागृहामध्ये येऊ शकले नाही. मी आपणास सांगू इच्छितो की, मला त्यांचे व्यक्तिमत्व जवळून पाहण्याची चांगली संधी मिळालेली आहे. अतिशय खेळीमेळीने टीका करण्याची त्यांची शैली होती. त्यांचे भाषण हे अतिशय मुद्देसूद असावयाचे. कायदेशीर बाबी कशा मांडाव्यात व समोरच्या पक्षाला कसे हतबल करावे याची हातोटी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांच्याकडे आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये आणखी एक वैशिष्टय मला आढळून आले आहे. त्यांनी काहीही झाले तरी विचारांची तडजोड कधीही केली नाही. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री, मधुकर चव्हाण हे सभागृहामध्ये एकमेकांच्या गमती जमती करीत असत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे नेहमी त्यांना

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

माय लर्नेड ॲडव्होकेट असे म्हणावयाचे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे व सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे दोघेहीजण कोकणातील असल्यामुळे ते एकमेकांची गंमत करावयाचे. एखाद्या प्रश्नावरून रागावले तरी देखील लगेच ते शांत व्हायचे. ते अत्यंत अभ्यासू असून त्यांची अनेक अभ्यासपूर्ण भाषणे मी ऐकलेली आहेत. त्यांच्या चांगल्या व्यक्तिमत्वाचा या सभागृहाला 6 वर्षे लाभ झाला असून त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणाला हे सभागृह आता मुकणार आहे. तेही कदाचित पुन्हा निवडून येऊ शकतील.त्यांना मी माझ्याकडून पुढील आयुष्याकरिता शुभेच्छा देतो.

अध्यक्ष महोदय,सन्माननीय सदस्या प्रा.फौजीया खान या अतिशय शांत स्वभावाच्या आहेत. त्या प्राध्यापक असल्यामुळे त्यांना शिक्षकांच्या प्रश्नाबाबत विशेष जाण होती. त्या कधीही कोणावरही न रागावता अतिशय शांतपणे आपला मुद्दा रेटून न्यावयाच्या. आज या सभागृहामधून त्यांच्यासारखे एक अतिशय शांत असे व्यक्तिमत्व निवृत्त होणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. वसंत बळवंतराव चव्हाण यांच्या सदर्भात माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी त्यांचे विचार मांडले होते.

सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांच्याबाबत तर बोलावे तितके थोडेच आहे. त्या राज्यसभेमध्ये असताना मी देखील राज्यसभेमध्ये होतो.त्यामुळे त्यांच्या कामाची धडपड मी जवळून पाहिली आहे.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, मी त्यांना विचारले की, आपण राज्यसभेमधून विधानपरिषदेमध्ये कशासाठी आलात? त्यावेळी त्यांनी सांगितले की, पक्ष सांगेल त्याप्रमाणे काम केले पाहिजे. पक्षाचा आदेश मान्य करुन सतत कॉंग्रेस पक्षाबरोबर निष्ठेने राहून माजी पंतप्रधान कै. राजीव गांधी यांच्यापासून आतापर्यंत त्या राजकारणामध्ये निष्ठेने काम करतांना दिसतात. पक्ष आदेश देईल त्याप्रमाणे काम करीत असतांना सभागृहामध्ये त्या सतत हसतमुख असतात, कधीच गंभीर चेहरा करुन रहात नाहीत. गंमतीने त्यांना आम्ही नेहमी म्हणायचो की, ताई, आज माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदनाचा ठराव तुम्हालाच मांडावा लागेल. असे म्हणून आम्ही त्यांना चिडविण्याचा प्रयत्न करीत असलो तरी त्या देखील हसतमुख चेहरा ठेवून त्याच पध्दतीने उत्तर देत असत.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे हे विदर्भातील एक वादळी व्यक्तिमत्व आहे, दलितांचे प्रश्न घेऊन सतत झगडणारे, दलितांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराबाबत दाद मागणारे हे व्यक्तिमत्व आहे. दलित चळवळीमध्ये नेहमी सहभाग असलेले हे व्यक्तिमत्व, दलित साहित्यिक असलेले व्यक्तिमत्व अशाप्रकारे त्यांचे आपल्याला वर्णन करता येईल. सभागृहामध्ये भाषण करीत असतांना त्यांचे वेगवेगळे विचार आम्हाला ऐकावयास मिळतात

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड यांनी सिंचनाच्या प्रश्नासंबंधी, शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायासंबंधी अनेक वेळा ठराव मांडले आहेत. शेतकरी, दलितांचे प्रश्न अनेक वेळा त्यांनी सभागृहामध्ये मांडले आहेत. ज्या ज्या भागातील लोकांवर अन्याय झाला असेल, शेतकऱ्यांवर अन्याय झाला असेल त्यामध्ये सिंचनाचा प्रश्न असेल, ते विविध प्रश्न सभागृहामध्ये मांडून त्याची नोंद झाली पाहिजे. त्यांच्या अन्यायाला वाचा फोडली पाहिजे. अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर निष्ठेने काम करणारा कार्यकर्ता अशी जर त्यांच्यासंबंधी टिपणी केली तर ती वावगी होणार नाही. माननीय सदस्य श्री. राठोड हे खरे म्हणजे कालच परत जाणार होते. त्यांनी काल माननीय सभापतींच्या दालनामध्ये आम्ही बसलो असतांना विनंती केली की, सदस्यांचा निरोप समारंभ दररोज पुढे ढकलला जात असेल तर मी आता थांबत नाही, किती दिवस आम्ही थांबावयाचे? मी त्यांना म्हटले की, राठोड साहेब आपल्याला थांबले पाहिजे. माननीय सदस्य श्री. राठोड साहेब हे देखील या सभागृहातून निवृत्त होत आहेत. ते निवृत्त होत असेल तरी त्यांनी पुन्हा या सभागृहामध्ये यावे अशी मी त्यांना शुभेच्छा देतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जगन्नाथ शेवाळे यांचे व्यक्तिमत्व नेहमी हसतमुख आहे. ते आपले विचार सतत आग्रहाने मांडीत असतात.

त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. धनाजी साठे यांच्यासंबंधी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. ते माननीय मुख्यमंत्र्यांच्या जवळचे जिवलग मित्र आहेत. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांच्या जवळचे मित्र म्हणून ते या सभागृहात आले नाहीत. त्यांच्या परिसरामध्ये त्यांनी आपल्या पक्षाचे काम केले आहे. मी सोलापूरला गेलो असतांना त्यांनी केलेल्या कामाची माहिती मला मिळाली. यामध्ये सहकार क्षेत्र असेल, शिक्षण क्षेत्र असेल अशा विविध क्षेत्रामध्ये साठे साहेबांचे उमदे व्यक्तिमत्व त्या भागामध्ये परिचित असल्याची अनुभूती मला मिळाली. अशाप्रकारे शिक्षण क्षेत्रासंबंधी, शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी चांगला अभ्यास असणारे, समाजाच्या विविध क्षेत्रात काम करणारे माननीय श्री. साठे साहेब या सभागृहामधून निवृत्त होत आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांना मी आणि माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार पूर्वीपासून ओळखत आहोत. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार आणि माझ्यासोबत त्यांनी लोकसभेमध्ये काम केले आहे. "जय जवान जय किसान" या पध्दतीने देशाच्या सीमेवर लढणाऱ्या या जवानाने आपला नोकरीचा बाँड पूर्ण झाल्यानंतर समाजाच्या वेगळया क्षेत्राकडे न जाता राजकीय क्षेत्रामध्ये पदार्पण करुन, राजकारणामध्ये आपले विचार बिंबविण्याचा प्रयत्न केला आहे. आणि या माध्यमातून जनतेचे प्रश्न सोडविण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. कोकणातील जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याकरिता त्यांच्यामध्ये असलेली तळमळ मला संसदेमध्येच नव्हेतर या सभागृहामध्ये देखील दिसून आली.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गिरीष गांधी हे तर माझे 25 वर्षापासून मित्र आहेत. विद्यार्थी चळवळीपासून अनेक ठिकाणी मी त्यांच्यासोबत काम केले आहे. खरे म्हणजे हे बहुआयामी व्यक्तिमत्व आहे. त्यांना या सभागृहामध्ये येण्याचा न्याय उशिराने मिळाला. असे असतांना आता लवकर जाण्याची त्यांना तयारी करावी लागत आहे. आबासाहेब, आपण मघाशी वर्णन केल्याप्रमाणे मी परमेश्वराला प्रार्थना करणार आहे की, असे काही लोक आहेत ज्यांना पुन्हा या सभागृहामध्ये आणण्याची गरज आहे त्यामध्ये माननीय सदस्य श्री. गिरीष गांधी हे आहेत. त्यांचे विदर्भाच्या विभागामध्ये फार मोलाचे योगदान आहे. विदर्भाच्या अनुशेषाचा प्रश्न असेल, मागासलेपणाचा प्रश्न असेल, विकासाचे प्रश्न असतील...

(यानंतर श्री. बरवड)

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

किंवा विदर्भाला उभे करण्याची भूमिका असेल या सर्व भूमिकेमध्ये तसेच विदर्भाच्या जनजीवनामध्ये आणि सामाजिक क्षेत्रामध्ये श्री. गिरीष गांधी यांचा मोलाचा वाटा आहे. विद्यार्थी चळवळीपासून सातत्याने धावपळ करणारे त्यांचे नेतृत्व आहे. समाजाच्या विविध क्षेत्रामध्ये त्यांना वेगवेगळे पुरस्कार सुध्दा मिळालेले आहेत. असे एक चांगले व्यक्तिमत्व थोड्या कालावधीसाठी या सभागृहामध्ये आले. आता ते निवृत्त होत आहेत, ही चांगली गोष्ट नाही. पण शेवटी आपण नियमाच्या पुढे जाऊ शकत नाही.

सभापती महोदय, या सर्व निवृत्त होणाऱ्या सदस्यांना मी विरोधी पक्षाच्या वतीने शुभेच्छा देतो. खरे म्हणजे आपल्याला या ठिकाणी आणणे आमच्या हातामध्ये नाही. आमच्या हातामध्ये असते तर शिफारस केली असती. परमेश्वराकडे विनंती करणे हेच फक्त आमच्या हातामध्ये आहे. या सदनासाठी, या सदनातून जनतेला चांगले संदेश देण्यासाठी, विधिमंडळाच्या माध्यमातून लोकशाही प्रगल्भ आणि मजबूत करण्यासाठी समाजाच्या विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांची निश्चितपणे गरज असते. आज ते आपल्यातून निवृत्त होत असले तरी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे काही सन्माननीय सदस्य या ठिकाणी परत येऊ शकतील आणि पुढची सहा वर्षे त्यांचा लाभ आपल्याला होणार आहे. निवृत्त होणाऱ्या या सर्व सन्माननीय सदस्यांना शुभेच्छा देऊन मी माझे भाषण संपवितो.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ D/

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्याच्या निरोप समारंभाची नोटीस 29 तारखेला मिळाली. हा निरोप समारंभ रोज पुढे ढकलला जात होता. पण आज तो योग आला. खरे म्हणजे निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप द्यावयाचा असेल तर एकदा दिवस आणि वेळ ठरला की पुन्हा त्याबाबतीत काही तडजोड होऊ नये. याचे कारण असे की, जे निवृत्त होणारे सदस्य असतात त्यांच्या मनाला अत्यंत वेदना होत असतात. त्यामुळे असे काही करु नये.

सभापती महोदय, या सदनाचे एक वैशिष्ट्य आहे. विधान परिषद असो किंवा राज्यसभा असो, त्या ठिकाणी निवडून गेलेल्या सन्माननीय सदस्यांना नेहमी निरोप दिला जातो. त्या निरोपाची वेळ आणि फोटोची वेळ त्यांना कळवली जाते. त्यांनी जे कार्य केले आहे त्याची नोंद या सदनाच्या सर्व सदस्यांनी आणि पक्षांनी घेतली आहे याची त्यांना जाणीव करुन द्यावी हा उद्देश असतो.. त्यांच्यात जे काही गुण असतात त्याची कल्पना त्यांच्या पक्षाला नसते असे नाही. त्याची कल्पना असल्यामुळेच ते या ठिकाणी येतात. परंतु त्यातील कोणत्या सन्माननीय सदस्यांना परत संधी मिळेल, पक्षाने कोणासाठी प्रयत्न करावा याबाबत या ठिकाणी इच्छा प्रदर्शित केली जाते. सन्माननीय सदस्य श्री. गिरीष गांधी यांच्याशी गेल्या सहा महिन्यांपासून संबंध आला. त्यांना अतिशय अल्पकाळ मिळाला. अल्पकाळचा परिचय सुध्दा महत्वाचा असतो. काल कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये मी सूचना केली की, निरोप समारंभाची तारीख आणि वेळ निश्चित करावी आणि जो दिवस ठरला असेल त्या दिवशी विधान परिषदेमध्ये कितीही महत्वाचे काम असले तरी ते बाजूला ठेऊन ठरलेल्या वेळी निरोप समारंभ व्हावयास पाहिजे असा नियम करावा आणि "One should strictly adhere to that point." तोच या सन्माननीय सदस्यांचा आणि सभागृहाचा सन्मान आहे. माननीय मुख्यमंत्र्यानी त्या ठिकाणी ते मान्य केले. आज एकंदर 12 सन्माननीय सदस्य निवृत्त होणार आहेत. खरे तर ही संख्या 13 आहे. या 13 सदस्यांपैकी एक सन्माननीय सदस्य अगोदरच निवृत्त झाले आहेत. श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी हे 29 ऑगस्ट, 2007 ला निवृत्त झाले. त्यांना आता निरोप देण्याचा प्रश्न येत नाही परंतु त्यांच्याबद्दल चार शब्द बोलावयास पाहिजे. परंतु ते या ठिकाणी उपस्थित नसल्यामुळे त्यांच्याबद्दल एवढाच धावता उल्लेख करतो.

आता जे निवृत्त होणारे सदस्य आहेत त्यामध्ये डॉ. एम. ए. अझिज हे निवृत्त होत आहेत.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

काही व्यक्तिमत्वे या ठिकाणी येतात आणि त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा या ठिकाणी उमटवून जातात. त्यांचा आदर्श इतरांच्या नजरेसमोर ते ठेवतात. या सदनामध्ये कसे काम करावे याचे मागदर्शन त्यांच्या व्यक्तिमत्वातून होते. हीच खरी मागदर्शक तत्वे आहेत. हे या सदनामध्ये येऊन शिकायचे असते. डॉ. एम.अे.अझिज हे जास्त बोलत नाहीत. पण जेव्हा बोलतात त्यावेळी ते मुद्याला धरुन बोलतात आणि विधानपरिषदेत काम करण्याचे हेच वैशिष्ट्य आहे. इंग्लडमध्ये ज्याला हाऊस ऑफ लॉर्डस् म्हणतात तशा प्रकारे ही विधानपरिषद आहे. निवडून येणारे सदस्य हे हाऊस ऑफ कॉमनमध्ये बसतात. सन्माननीय उपमुख्यमंत्री म्हणाले की, आम्हाला जनता निवडून देते. या सदनातील सन्माननीय सदस्य ही निवृत्त होणारी माणसे असतात म्हणून त्यांना निरोप दिला जातो. आपण या विधानपरिषदेमध्ये निरनिराळया क्षेत्रातून निवडून येतो. काही लोक विधानसभेतून निवडून येतात, काही शिक्षक मतदारसंघातून निवडून येतात. काही पदवीधर मतदारसंघातून निवडून येतात तर काही स्थानिक स्वराज्य संस्थामधून निवडून येतात. जीवनाच्या विविध क्षेत्रातून या ठिकाणी लोक निवडून येतात आणि त्यांच्या अनुभवाचा मोलाचा फायदा या सदनाला मिळतो. असे एक चांगले व्यक्तिमत्व डॉ.एम.अे.अझिज हे निवृत्त होत आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड हे देखील निवृत्त होत आहेत. ते आता माझ्या समोर बसलेले आहेत. खरे म्हणजे त्यांच्या पक्षाने त्यांना विधानपरिषदेमध्ये का आणले हे मला समजत नाही. त्यांचे काम विधानसभेमध्ये आहे. एक वादळी व्यक्तिमत्व म्हणण्यापेक्षा बंडखोर व्यक्तिमत्व असे मी त्यांच्या बाबतीत म्हणेन. अशा लोकांचे स्थान हे विधानसभेत असावयास पाहिजे. विधानसभेमध्ये कर्तृत्व गाजविले, तेथे अनुभव संपन्न झाले की नंतर त्यांनी विधानपरिषदेमध्ये यावे असे माझे मत आहे. याबाबतीत त्यांच्या पक्षाने तो विचार करावा. पक्षाला सुदृढ उमेदवार मिळाला की तो संघर्ष करुन निवडून येतो. विधानसभेमध्ये निवडून येणे ही आजच्या जमान्यात किमया आहे. जे निवडून आलेले आहेत त्याची त्यांना कल्पना आहे. एका जमान्यात पक्षाची निवडणूक लढविणे सोपे होते. आता पक्षाची निवडणूक लढविणे ही सजा आहे. आज ज्यांच्याकडे अमाप संपत्ती आहे तेच निवडून येऊ शकतात अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे असे माझे मत आहे. मी हे स्वानुभवावरुन सांगत आहे. भविष्यकाळातील या निवडणुकीच्या खर्चाबद्दल मला मुद्दाम बोलायचे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

आहे. यासंदर्भात श्री. इंद्रजित गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली लोकसभेची एक समिती नेमली होती. मी त्या समितीचा सदस्य होतो. आमच्या समितीने अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया या देशांचा अभ्यास दौरा केला. तेथील एम.पी.ना कोणकोणत्या सवलती दिल्या जातात, त्यांना कार्यालय कसे दिले जाते, त्यांना भत्ते कसे दिले जातात इत्यादी गोष्टींचा आम्ही अभ्यास केला. स्टेट फंडिग फॉर इलेक्शन या शीर्षकाखाली लोकसभेला समितीने अहवाल सादर केला. त्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी होणार होती. निवडणुकीचा खर्च शासनाने करावा अशी अहवालामध्ये शिफारस केलेली होती. योग्य उमेदवार निवडून यावा हा त्या शिफारशी मागचा उद्देश होता. म्हणून स्टेट फंडिग फॉर इलेक्शन या समितीने केलेल्या शिफारशीचा विचार व्हावा. मला हे सांगावयाचे आहे की, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्यासारखे वादळी व्यक्तिमत्व हे या सदनामध्ये चालेल कारण ते या सदनामध्ये उठून दिसते. परंतु ज्या सदनामध्ये सगळी वादळी व्यक्तिमत्वे असतात त्या सदनामध्ये असे वादळी व्यक्तिमत्व असणे हे जास्त क्रेडिटेबल असते. कारण त्या सदनामध्ये मी काम केलेले आहे. तेव्हा त्यांच्या पक्षाने त्यांना येथे का पाठविले हे मला माहीत नाही. तुम्ही मतदारसंघातून निवडून याल. ते शक्य झाले नाही तर विधानपरिषद आहे. तुमच्या पक्षाने हे निश्चित करावयाचे आहे म्हणून मी त्यासंदर्भामध्ये येथे बोललो.

...नंतर श्री.भोगले..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..........

तुमचे कार्य चांगले आहे. अभ्यास चांगला आहे. कामगार क्षेत्राचा अभ्यास आहे. ठाणे शहराचा आणि मुंबई शहराचा आपण अभ्यास केला. अनेक गोष्टींबद्दल, विविध आयुधांच्या माध्यमातून आपण सदनामध्ये प्रश्न उपस्थित केले. निरनिराळी आयुधे वापरली. त्यासाठी आग्रह धरला. महत्वाची भूमिका आपण स्वीकारली आणि ती आग्रहाने मांडली. पोटतिडकीने प्रश्न मांडून त्याचे रिझल्ट्स घेणे हे महत्वाचे असते. ते काम आपण केले त्याबद्दल धन्यवाद देतो. तुमच्या व्यक्तिमत्वाची ऊंची आणखी वाढावी अशी माझी मनापासून इच्छा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे माझे चांगले जूने मित्र आहेत. त्यांच्यावर मध्यंतरी शस्त्रक्रिया झाल्यामुळे ते आज सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांच्याबद्दल मला जरुर आदर आहे. त्यांचे गुण, त्यांचे कार्य, त्यांची पक्षावरील निष्ठा, त्यांची कार्यावरील निष्ठा, एकंदरीत सगळ्या गोष्टी विचारात घेऊन अभ्यासू वृत्तीने प्रश्न मांडण्याची वृत्ती याचा विचार केला तर त्यांच्या सेवेची आवश्यकता आहे. त्यांचा पक्ष त्यादृष्टीने जरुर विचार करील असे माझे मत आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी या सदनामध्ये पुन्हा येतील असे मला मनापासून वाटते् आणि त्यांनी यावे.

सभापती महोदय, प्रा.श्रीमती फौजिया तहसीन खान या देखील निवृत्त होत आहेत. या सदनामध्ये त्या एक अशा महिला आहेत, ज्या सुसंस्कृत आहेत, सुविद्य आहेत आणि सुविचारी देखील आहेत. या सगळ्यांचा एकत्रित विचार केला तर मुसलमान समाजामध्ये असे व्यक्तिमत्व उभे राहते हेच फार महत्वाचे आहे. या व्यक्तिमत्वाचा फायदा समाजाला व्हावा आणि राज्याला सुध्दा व्हावा यादृष्टीने मला असे वाटते की, त्यांनी जो आदर्श निर्माण केला त्या आदर्शाचा फायदा त्यांच्या समाजासाठी कसा होईल, समाज तुमच्याबरोबर कसा येईल यादृष्टीने प्रयत्न होणे महत्वाचे आहे. असे व्यक्तिमत्व उभे राहिले तर समाजासाठी आपण जो आग्रह धरता, सच्चर समितीच्या निमित्ताने या सवलती द्या, त्या सवलती द्या असे म्हटले जाते, त्या सवलती तुमच्या पाठिशी यायला हव्यात असे कार्य केले पाहिजे. मला त्यांच्याबद्दल खूप आदर आहे. माझ्या संपूर्ण लोकसभा मतदारसंघात खूप मुसलमान समाजाचे महिला पुरुष आहेत. त्यांच्या वस्तीतून मी फिरलेलो आहे. त्यांची काम करण्याची जिद्द पाहिली आहे. त्यांच्यावर शिक्षणाचे संस्कार खूप कमी होतात. महिलांना तर संधीच कमी मिळते. मुलांना तर मिळतच नाही. मुले शाळेत गेली तरी ती कधी

..2..

श्री.मधुकर सरपोतदार........

शाळा सोडतात आणि कोणकोणते धंदे व्यवसाय करतात हे कळतच नाही. अनेक प्रकारच्या कला त्या समाजाकडे आहेत. खूप मेहनतीने ती मुले काम करतात. मुंबई शहरातील या समाजाची मुले बघितली तर खूप मोठ्या प्रमाणात ते मेहनतीने काम करीत असतात. त्यांना चांगले मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीकडे जाणाऱ्या तरुणांची संख्या खूप मोठी आहे. त्याला वेळीच आवर घातला आणि योग्य दिशा दिली तर त्याचा देशाला आणि त्यांच्या कुटुंबाला फायदा होईल. प्रत्येक छोट्या छोट्या झोपडयांमध्ये त्यांचे व्यवसाय चालतात. घरातील महिला, लहान मुले काही ना काही व्यवसाय करीत असतात. मी दोन दिवसापूर्वी सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांना सांगितले, तुम्ही माझ्याबरोबर या. मी तुम्हाला या वस्त्यांमधून घेऊन जातो. या वस्त्यांमध्ये चाललेले काम पाहिले तर आपल्यालाही आनंद वाटेल. जो कष्ट करणारा समाज आहे त्या समाजाच्या पाठिशी कायम उभे राहिले पाहिजे. परंतु कष्ट न करता सगळे फुकट पाहिजे असे म्हणून जो समाज पुढे जायचा प्रयत्न करतो तो समाज कधीच पुढे जाऊ शकत नाही. "आधी कष्ट मग फळ आणि कष्ट नाही ते निर्फळ" या दृष्टीकोनातून मी पाहतो. सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांच्यासारख्या सुसंस्कृत, सुविद्य महिला पुढे आल्या तर या समाजावर आणि या सदनावर त्या चांगला प्रभाव पाडू शकतील आणि तसे घडेल असा विश्वास आहे. तुमचा पक्ष तुम्हाला या सदनामध्ये परत आणेल असे मला स्वत:ला वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.वसंत बळवंतराव चव्हाण हे आता निवृत्त होत आहेत. नामनियुक्त सदस्य म्हणून ते विधानपरिषदेत आले आहेत. बिलोली, ता.नायगाव, जि.नांदेड हे त्यांचे कार्यक्षेत्र आहे. मी बिलोली तालुक्यात खूप फिरलो आहे. निवडणुकीच्या निमित्ताने प्रत्येक खेडयापाडयात जायची मला संधी मिळाली. माझे भाग्य असे की, महाराष्ट्रातील खेडयापाडयांमध्ये फिरण्याची संधी मला मिळाली.

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

चांगल्या चांगल्या शेतक-यांच्या घरी जाण्याची संधी मला मिळाली, विद्वानांच्या घरी जाण्याची आणि त्यांचे विचार ऐकण्याची संधी मला मिळाली, त्यांची मते ऐकण्याची संधी मला मिळाली. कोणत्या समाजात कोणते काम चालते हे सर्व पाहण्याची संधी मला विधानसभा सदस्य असतांना मिळालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव चव्हाण हे फार कमी बोलतात आणि ते जेव्हा बोलतात तेव्हा त्यांचे म्हणणे सगळयांना पटते त्यामुळे त्यांना परत येण्याची संधी पक्षाने द्यावी अशी इच्छा मी व्यक्त करतो.

सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा विजय जोशी हया सतत हसतमुख राहणारे व्यक्तिमत्व आहे. त्यांना मी कधी रागावल्याचे पाहिलेले नाही. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिनंदनाच्या प्रस्तावावर त्या न चुकता विचार मांडत असतात. सन्माननीय सदस्या नेहमी काम करीत असतात. "संथ वाहते कृष्णामाई" असा त्यांचा प्रवाह निरंतन सुरु आहे. अशी व्यक्ती एकदा बोलायला लागली की, ती बोलतच राहते. आपल्याला जीवनामध्ये खूप पदे भूषवाव्यास मिळालेली आहेत. आपण जी पदे भूषवलेली आहे त्याची माहिती सांगावयास लागलो तर दम लागेल एवढी पदे आपण भोगलेली आहेत. काँग्रेसवर आपण सतत निष्ठा ठेवलेली आहे सभापती महोदय, यासंदर्भात मला एकच सांगावयाचे आहे की, आयुष्यामध्ये ज्याला निष्ठा नाही त्याला विष्ठा आहे. ज्याच्या जवळ निष्ठा नाही त्याचे आयुष्य विष्ठे सारखे होत असते. पक्षाचा झेंडा हातात घेऊन आपण पक्षाच्या बांधिलकीसाठी काम केलेले आहे. पक्षाला धोका देऊन दुसरीकडे जाणे कधीही योग्य नाही. आपल्याला तेवढया वेळेपुरता फायदा होऊ शकतो परंतु तो फायदा कायमचा कधीही नसतो. एकदा धोका दिल्यानंतर त्याच्यावर जो शिक्का बसतो तो कधीही जात नाही. पक्ष निष्ठा महत्वाची आहे. आपण विधान परिषद आणि राज्यसभेवर देखील गेला आहात. खरे म्हणजे तुम्ही विधानसभा, लोकसभेच्या निवडणुका लढवावयास पाहिजे होत्या. एक जमाना असा होता की, काँग्रेसच्या चिन्हावर जो कोणी निवडणूक लढवेल तो हमखास जिंकून येत असे. आम्ही हे सर्व अनुभवले आहे. आम्ही आयुष्यात खूप पराभव सहन केलेले आहेत. पराभव सहन करुन, पुन्हा जिंकण्यासाठी जो लढतो तो खरा माणूस असतो. आयुष्यामध्ये हार-जीत येतच असते. परंतु पराभवाने माणसाने कधीही खचू नये. आपण विधानसभा किंवा लोकसभेच्या निवडणूका लढवल्या

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

असत्या तर आपण त्या निश्चित जिंकल्या असत्या. मी सुध्दा माझ्या पक्षाला म्हणालो होतो की, मी राज्यसभेच्या जागा लढणार नाही आणि त्या प्रमाणे मी विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका लढलो आणि जिंकलोही. विधानसभेत मी दोन वेळेस व लोकसभेत 4 वेळा निवडून गेलेलो आहे. आपण जेव्हा विधानसभा किंवा लोकसभेच्या निवडणुका लढवतो तेव्हा समाजातील अडीअडचणी कोणत्या आहेत, त्यांना कशा प्रकारे काम करावे लागते, द्रारिद्रय रेषेखालील लोक कसे जीवन जगत आहेत, त्यांना कोणत्या साधनांची गरज आहे, मध्यमवर्ग किती आहे ? त्यांच्या अडचणी काय आहेत ? हे आपल्याला जवळून पहावयास मिळत असते व हाच अनुभव शेवटी त्याला विधानसभेत किंवा लोकसभेत प्रश्न मांडण्याच्या वेळी कामी येत असतो. त्यामुळे सुधाताई एकंदर पार्श्र्वभूमी पाहिल्यानंतर असे वाटते की, आपल्याला काँग्रेसपक्ष पुन्हा विधान परिषदेत पाठविल्या शिवाय राहणार नाही. आपण या सदनात पुन्हा याल असा मला विश्र्वास आहे. सभापती महोदय, मागच्या वेळेस जेव्हा सदस्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्यावेळेस माननीय वसंतराव डावखरे हे सुध्दा निवृत्त होणार होते त्यावेळेस मी त्यांना म्हणालो होतो की, आपण लोकसभेत गेलात तर चांगले राहील परंतु आपण लोकसभेत न जाता पुन्हा याच ठिकाणी येणार, आणि सभापती महोदय, तसेच घडले. सुधाताई आपण सुध्दा या सदनात आलात तर आपलेच स्वागतच राहील. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई यांनी शैक्षणिक क्षेत्रात तसेच निरनिराळया क्षेत्रात खूप काम केलेले आहे. त्यामुळे आपण विधान परिषदेत परत आल्यावर आम्ही आपले स्वागतच करु.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश मोतीरामजी निकोसे हे सुध्दा निवृत्त होणार आहेत. वाङःमय क्षेत्रात आपण खूप काम केलेले आहे. आपण एक कवी, नाटककार, कादंबरीकार आहात. आपण शेरोशायरी चांगल्या प्रकारे करु शकता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर आपली अढळ निष्ठा आहे. निष्ठा ही कधीही अढळच असली पाहिजे. माणसाजवळ अढळ निष्ठा असते त्यावेळेस त्याला अढळपद प्राप्त होत असते. त्यामुळेच आपण अढळ राहणार आहात.

यानंतर श्री. अजित.......

श्री.मधुकर सरपोतदार.............

श्री.रमेश निकोसे हे उत्तम लेखक आहेत. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची प्रत ते आम्हाला आवर्जून देतात. त्यांनी सफाई कामगारांच्या जीवनावरील "जळते आँसू" व "कल की दूल्हन आज की दुश्मन" या हिंदी नाटकांचे लेखन केलेले आहे. तसेच मराठीत "काही शल्य काही व्यथा" या नाटकाचे लेखन केलेले आहे. "गांधी, आंबेडकर, रमाई " या एकपात्री नाटकात त्यांनी भूमिका केलेली आहे. काही नाटकांचे त्यांनी दिग्दर्शन केलेले आहे. याचा अर्थ ते उत्कृष्ट लेखक, नाटककार व उत्कृष्ट कलावंत आहेत. अशा विविध भूमिकेतून काम करुन समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी विधानपरिषदेवर त्यांची नियुक्ती झाली. याठिकाणी आल्यानंतर त्यांनी त्यांच्या समाजाला चांगल्या प्रकारे न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आवश्यक असेल त्यावेळी संघर्षाची भूमिका घेतली. सभापती महोदय, मला चांगले आठवते की, या सदनात सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.छगन भुजबळ यांनी त्यांचा उल्लेख "नकोसे" केला होता. त्यावेळी मी त्यांना सांगितले, "ते नकोसे नसून ते आपल्याला हवेसे आहेत आणि त्यांचे नावे निकोसे आहे."

श्री.रमेश निकोसे यांनी याठिकाणी जे काम केले त्याचा मी आदर करतो. त्यांना निरामय आयुरारोग्य लाभो व भविष्यात याहून अधिक यश मिळो अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

श्री. धोंडीराम हरीनाईक राठोड,मराठवाडा माझे कार्यक्षेत्र होते, जवळपास 9-10 वर्षे मी त्या भागात काम केल्यामुळे मला मराठवाड्यातील जिल्हयांची चांगली माहिती आहे. श्री.धोंडीराम राठोड हे जालन्यातील व्यक्तिमत्व आहे. त्यांनी शिक्षणक्षेत्रात चांगले काम केलेले आहे. त्यांनी काही शिक्षण संस्था उभ्या केल्या. शिक्षण क्षेत्रातील अडचणी सोडविण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले. ते जरी सत्ताधारी पक्षात असले तरी एक गोष्ट कधीही विसरु नये की,ज्यावेळी आपण सत्तेत असतो त्यावेळी लोकांना चांगल्याप्रकारे न्याय देण्याची क्षमता आपल्यात असते. विरोधी पक्ष ज्या हिरीरिने काही गोष्टी मांडत असतो त्याच्या दुप्पटीने सत्ताधारी पक्षातील सदस्यांनी त्यांची मते मांडली पाहिजेत असे माझे मत आहे. तुमच्याजवळ तशी क्षमता आहे. शिक्षण क्षेत्र जास्तीत जास्त समृध्द होईल यासाठी त्यांनी प्रयत्न करावेत. ते करीत असलेल्या कार्यावरुन ते पुन्हा या सभागृहात येतील याबद्दल माझ्या मनात संशय नाही. त्यादृष्टीने मी त्यांना शुभेच्छा देतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.............

श्री.जगन्नाथ आनंदराव शेवाळे, श्री.जगन्नाथ शेवाळे आज सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांना शेतकऱ्यांच्या अडचणींची चांगल्याप्रकारे माहिती आहे. त्यामुळे सदनात शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी चर्चा होत असे त्यावेळी ते नेमके व मुद्देसूद विचार मांडत. मला या निमित्ताने सांगावयाचे आहे की, सदस्य जेव्हा या सदनात येतात तेव्हा त्यांनी त्यांच्या विषयासंबंधी मर्यादित न राहता महाराष्ट्रातील अन्य विषयांचा अभ्यास करुन वेगवेगळ्या चर्चेत भाग घेतला पाहिजे. येथे येणारे सदस्य बहुरंगी, बहुढंगी असले पाहिजेत. अनेक प्रश्न लावून धरून त्यावर मार्ग काढणारा सदस्य असावा. श्री.शेवाळे यांनी शेतकऱ्यांच्या हक्कासाठी तसेच शेती मालाला योग्य भाव मिळण्यासाठी आंदोलन केलेले आहे. विजेचा व पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. त्यांनी यशवंत सहकारी साखर कारखाना, थेऊर, ता.हवेली, जिल्हा पुणे येथे 1979-89 मध्ये सचांलक व 1987-89मध्ये व्हाईस चेअरमन म्हणून काम केलेले आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी यापुढेही असेच प्रयत्न करावेत यासाठी त्यांना परमेश्वराने निरामय दीर्घायुरारोग्य द्यावे अशी मी परमेश्वराकडे प्रार्थना करतो.

यानंतर श्री.पुरी..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.धनाजी गणपतराव साठे हेही निवृत्त होत आहेत. सन्माननीय सदस्य येथे उपस्थित आहेत. ते मोजके तेवढेच आणि योग्य वेळीच बोलतात. आपली व माननीय श्री.विलासराव देशमुख यांची फारच चांगली मैत्री असल्याचे मी आजच ऐकले. आपण त्यांचे मित्र जरी असलात तरी ती मैत्री येथे न दाखवता समर्पित जीवनासाठी आपण आपल्या मतदारसंघांतील जनतेसाठी जे काम करीत आहात, ते खूपच चांगले आहे. आज येथे आपण केवळ मैत्रीच्या बळावर नव्हेतर कामाच्या बळावर सोलापूर जिल्हयामध्ये काम करीत असल्याचा उल्लेख आत्ताच माननीय विरोधी पक्षनेत्यांन केला. त्याच बळावर आपल्याला पुन्हा या सदनामध्ये येण्याची संधी मिळावी व परमेश्वराने आपल्याला प्रदीर्घ आयुष्य देऊन आपल्या हातून चांगल्या प्रकारे जनतेची सेवा घडावी, अशी शुभेच्छा याप्रसंगी मी आपल्याला देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सिताराम सावंत यांनाही आपण निरोप देणार आहोत. ते आज येथे उपस्थित नाहीत. त्यांनी खरोखरच राजीनामा दिला आहे की नाही याची मला कल्पना नाही. परंतु बाहेर यासंबंधीच्या बातम्या वाचायला मिळत आहेत. त्यांनी काँग्रेस पक्ष सोडला की नाही, याचीही मला माहिती नाही. खरे म्हणजे, आपल्या पक्षात राहूनच जीवनाची वाटचाल करायला पाहिजे, असे मला वाटते. त्यांनी कोणता विचार केला आहे याची मला कल्पना नाही. पक्षावर निष्ठा ठेऊनच त्यांनी आपले काम केलेले आहे. मिल्ट्रीमध्येही त्यांनी अतिशय चांगले काम केलेले आहे. त्यांनी मध्यंतरी निवडणूक लढवली, परंतु त्यांना यश आले नाही. त्यांनी मिल्ट्रीमधील जवानांसाठीही खूप योगदान दिले. मागे, एक तदर्थ समिती निर्माण करण्यात आली होती, त्यानिमित्ताने त्यांची तळमळ मी जवळून पाहिलेली आहे. देशाच्या संरक्षणासाठी ज्या जवानांनी आपले प्राण अर्पण केले त्यांच्या कुटुंबियांसाठी त्यांनी जे काम केले, ते खूप चांगले आहे. त्यांनाही याठिकाणी येण्याच्या दृष्टीने मी शुभेच्छा देतो. ते अतिशय लढाऊ आहेत. त्यांना पुढील वाटचालीसाठी मी हार्दिक शुभेच्छा देतो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गिरिष माणिकलाल गांधी यांनाही आपण निरोप देत आहोत. त्यांच्या घरी जाण्याची मला कालच संधी मिळाली. त्यांच्या घरातील संस्कार, घराची कार्यपध्दती, घराची रचना हे सर्व पाहिल्यानंतर एक सुसंस्कृत, सुविद्य, सुविचारी माणसाचेच हे घर आहे, अशाप्रकारचे एक इम्प्रेशन मला तेथे गेल्यानंतर पाहायला मिळाले. त्यांच्या घरी जाऊन मला खूप आनंद वाटला. आपण देशाची व महाराष्ट्राची संस्कृती खरेच जपत आहात. आपल्याला नागभूषण पुरस्कारही मिळालेला आहे. त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. आपल्याला भविष्यात असेच पुरस्कार मिळोत, अशी मी आशा व्यक्त करतो. आपली संस्कृती टिकवण्याची पध्दत, येथे शांतपणे बसून ऐकण्याची पध्दत, आपली आदराची भावना या माध्यमातून आपले भवितव्य निश्चितच उज्वल असल्याचे दिसून येते. आपल्याला याठिकाणी काम करण्याच्या दृष्टीने शॉर्ट टर्म जरी मिळाली असली तरी भविष्यात आपल्याला या सदनामध्ये पूर्ण 6 वर्षे काम करण्याची संधी मिळेल, अशी मला आशा वाटते. आपल्या पक्षाने आपला विचार केला पाहिजे, पक्षासाठी आपल्या सारख्या कार्यकर्त्यांची आज आपल्या पक्षास आवश्यकता आहे. कारण, आज पक्षामध्ये खूप स्पर्धा निर्माण झालेली आहे. पक्षामध्ये राहून पक्षाशी निष्ठा ठेऊन पक्ष वाढविण्याची फार आवश्यकता असते. लोकांमध्ये राहून लोकांची मनोभूमिका ओळखून त्यांना आपल्या पक्षात आणण्याचे जे काम असते ते आपल्यासारखी माणसेच करु शकतात, ते काम इतर लोक करु शकत नाहीत. माझा आणि आपला संबंध खूप कमी आला, परंतु या थोडया काळामध्ये मी जे पाहिले त्यावरुन आपले भविष्य उज्वल आहे, असेच मला वाटते. आई-भवानी करो व आपल्याला परत या सदनामध्ये येण्याची संधी मिळो.

सभापती महोदय, या सर्व निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना मी शुभेच्छा देतो व सर्वांचे आयुष्य अतिशय सुख-समृध्दीचे व भरभराटीचे आणि आरोग्यमय जावो, अशी विनम्र प्रार्थना करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद !

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ( अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, या सभागृहातील आमच्यासोबत काम करणारे 13 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. त्यांना मन:पूर्वक निरोप देण्यासाठी याठिकाणी सभागृहाच्या नेत्यांनी जो निरोपाचा कार्यक्रम सभागृहासमोर ठेवला त्यात सहभागी होण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, या एकाच सभागृहाला अशाप्रकारची संधी असून दुसऱ्या सभागृहाला अशी संधी नाही. दुसऱ्या सभागृहाला अशाप्रकारची संधी घ्यावीशी वाटली तरी ती त्यांना घेता येत नाही. कारण त्या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य बरोबरच येतात व बरोबरच जातात, अशी घटनेचीच व्यवस्था आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख............

सभापती महोदय, या सभागृहाच्या बाबतीत स्ट्रक्चरल ॲरेंजमेंट म्हणून घटनेने अशी व्यवस्था केली आहे की, सभागृहात सर्वांना एकदम येण्याची आणि सभागृहातून बाहेर जाण्याची परवानगी नाही. त्यामुळेच हा निरोप समारंभ किंवा कार्यक्रम या सभागृहामध्ये नेहमी होत असतो.

सभापती महोदय, मी निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांना शुभेच्छा देणार आहे त्या शुभेच्छा दोन प्रकारच्या आहेत. या शुभेच्छांना दोन पदर आहेत. पहिला पदर म्हणजे या सभागृहामध्ये पुनरागमन करण्यासाठी आणि दुसरा म्हणजे सर्व वेळेला शक्य होतेच असे नाही, म्हणून हे पुनरागमन झाले नाही तर आयुष्यामध्ये आपल्या उचित कार्यासाठी शुभेच्छा, सभागृहामध्ये काम करणा-याचे पाय हे सभागृहाबाहेर वेगवेगळया क्षेत्रामध्ये रुतलेले असतात म्हणून त्या कामासाठी शुभेच्छा, अशाप्रकारे माझ्या भाषणात शुभेच्छांचा दुहेरी अर्थ राहिल.

सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी व मी वयाने एखाद दुस-या वर्षाने फरक असला तरी समवयस्क होतो. राजकीय जीवनामध्ये त्यांनी त्यांच्या कामाची सुरुवात युवक चळवळीपासून केली. एन.एस.यु.आय., ऑल इंडिया काँग्रेस कमिटी यामध्ये त्यांनी काम केले. सतत काम करीत असतांना ते व्यवसायाने वकिल असल्यामुळे फार मोठा काळ त्यांनी पक्षासाठी दिलेला आहे. त्या मानाने ब-याच उशिरा या सभागृहामध्ये ते आले. सभागृहामध्ये आल्यानंतर एखादा सिझंड सदस्य कामाला सुरुवात करतो तशात-हेने त्यांनी कामाला सुरुवात केली, त्याचे फार मोठे श्रेय त्यांनी सभागृहाच्या बाहेरुन या सभागृहाचे कामकाज पाहिले होते, त्याला दिले पाहिजे. सभागृहाच्या बाहेर काम करणारी अनेक माणसे या सभागृहाच्या रचनेमध्ये सहभागी असतात, व्यक्तिशः संधी उशिरा मिळत असली तर तो अनुभव, सभागृहात प्रवेश केल्याबरोबर कामी येतो, जणू काही बरीच वर्षे सभागृहात काम केलेला सदस्य असावा, अशाप्रकारची छाप त्यांनी आपल्या सभागृहातील कामातून पाडली आहे. विशेषतः एका गोष्टीचा येथे उल्लेख केला पाहिजे की, महाराष्ट्राच्या वेगवेगळया भागामध्ये जो अनुशेष आहे त्या अनुशेषाविषयी ज्यांना मनापासून तिटकारा आणि तिरस्कार आहे, अशापैकी ते एक होते. एकदा मी भाषण करुन बसलो त्यावेळी ते मला म्हणाले की, कोकणाचा उल्लेख आपण फार केला नाही. आपल्याकडे जी काही सामुग्री आहे ती मला द्या. त्यानंतर कोकणातील अनुशेषाबद्दलच्या अनेक

....2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख..........

चर्चा त्यांनी या सभागृहामध्ये उपस्थित केल्या. या सभागृहामधील त्यांचे कामकाज पाहिले तर अनुशेषाचा प्रश्न पुढे जावा यासाठी अतिशय मोलाची मदत ज्या माणसांनी केली, त्यामध्ये त्यांचे नाव घ्यावे लागेल. त्याचा तपशील मुद्दाम मी येथे सांगत नाही कारण तो सर्व रेकॉर्डवर आहे.

सभापती महोदय, सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड हे युवक चळवळीपासून आपल्या राजकीय प्रवासास सुरुवात करणारे व्यक्तिमत्व आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांच्या उलट हिशेब त्याच्याबाबतीत सांगता येईल. तुलनेने हा प्रवास, राजकीय कामापासून तो सभागृहातील प्रवेशापर्यन्तचा प्रवास त्यांनी कमी वेळेत पूर्ण केला. हा तुलनेचा विषय आहे. सभागृहामध्ये आल्यानंतर युवक चळवळीत काम केल्याचा जो एक लाभ होतो तो लाभ म्हणजे त्यांच्या अंगी असलेली आक्रमकता. ज्या ज्या प्रश्नावर ते बोलायचे तो प्रश्न नीट माहिती घेऊन आक्रमकपणे मांडायचे आणि त्यांच्या आक्रमकतेचा प्रश्नाला न्याय मिळविण्यामध्ये त्यांना लाभ होत होता. त्यांना देखील मी शुभेच्छा देतो. या शुभेच्छा देत असतांना त्यांच्यासमोर फार मोठा कार्यकाळ आहे. त्या कार्यकाळाला निश्चितपणे ते न्याय देतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान या सभागृहात आल्या त्यावेळी त्यांनी कामाला अतिशय संथपणे सुरुवात केली. आपला विषय मांडण्याच्या बाबतीत त्यांची विशेषत: अशी होती की, त्या अतिशय मर्यादशील बोलायच्या आणि मराठीसुध्दा अतिशय बिनचुक बोलायच्या, शब्दांची निवडदेखील उत्कृष्ट असायची. संयमशीलपणे बोलणे असले तरी विचार मांडण्यामध्ये शब्दाची निवड करण्यामध्ये त्यांचा ठामपणा दिसून येत असे. एकदा त्यांनी इंग्रजी कोटेशन वाचून दाखविले. मी माझ्या अनेक शिक्षक प्रतिनिधींना सांगत असे की, त्यांचे मराठीतील उच्चार ऐकत रहावे, असे आहेत.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ प्रथम श्री.रोझेकर ........ 18:15

प्रा.बी.टी.देशमुख ..........

त्यांचे मराठी भाषेचे उच्चार ऐकत रहावे इतकेच नव्हे तर हिंदी आणि इंग्रजी सुध्दा ऐकत रहावे असे वाटे. मला अशी माहिती मिळाली की, त्या इंग्रजीच्या प्राध्यापिका आहेत. हेड ऑफ दी डिपार्टमेंट म्हणून त्यांनी काम केलेले आहे. सभागृहामध्ये शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांच्या बाबतीत ठामपणे भूमिका घेत असतांना आम्हाला ज्यांचा आधार वाटत होता त्यापैकी त्या एक आहेत असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांच्या बाबतीत असे म्हणता येईल की, त्यांनी अनेक क्षेत्रात काम केलेले आहे. परंतु या सभागृहामध्ये त्यांचा प्रवेश थोडा उशिराच झालेला आहे. पण ज्यावेळी त्यांचा या सभागृहात प्रवेश झाला त्यावेळी विदर्भातील माणसाच्या मनात अशी भावना आली की, माणसाने चिकाटीने काम करीत राहिले तर त्याला न्याय मिळतो. अनेक क्षेत्रात त्यांनी काम केलेले आहे. सामाजिक क्षेत्रामध्ये काम केल्याबद्दल त्यांना पुरस्कार मिळालेला आहे. शिक्षण, पर्यावरण, वनराई क्षेत्रात त्यांचे काम आहे. अनेक क्षेत्रात काम करीत असतांना कोणत्याही पदाचा आग्रह न धरता ते या सभागृहात आलेले आहेत. त्यांना अत्यंत कमी कालावधी मिळाला. पुनरागमनामध्ये त्यांचा पहिला क्रमांक रहावा, अशा मी त्यांना मनापासून शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शेवाळे हे सभागृहामध्ये कमी बोलत. पण जेव्हा ते बोलत असत त्यावेळी ते आपला विषय ठामपणे मांडत असत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी प्रदीर्घ अनुभव असलेल्या सदस्या आहेत. त्या अनेक दिवस राज्यसभेच्या सदस्या राहिल्या. पक्षाचे काम करतांना त्यांना लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांच्या वेळी किती राज्याचे निवडणूक निरीक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळाली याची यादी वाचायची म्हटले तर तो अत्यंत वैभवी, श्रीमंत असा अनुभव आहे, कारण माणसाची ओळख जवळून होण्यासाठी निवडणूक निरीक्षकासारखे दुसरे पद नाही. असा अनुभव आहे की, माणसाचा विशेषत: राजकीय जीवनामध्ये काम करणा-या माणसाचा जवळून परिचय होण्याचे माध्यम म्हणजे निवडणूक निरीक्षक. विशेषत: तालिका सभापती म्हणून त्या ज्यावेळी सभागृहामध्ये बसत असत त्यावेळी सभागृहामध्ये बोलण्याची संधी न मिळणा-या सदस्यांना आनंद होत असे, असे मला वाटते, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे ते श्रेय आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे)**

प्रा.बी.टी.देशमुख ..........

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित झालेले व्यक्तिमत्व आहे. त्यांनी या सभागृहामध्ये अनेकवेळा जे प्रश्न मांडलेले आहेत, विशेषत: "अश्रूतील भावना अंतरीच्या यातना" हे त्यांचे नाटक "गांधी, आंबेडकर, रमाई" हे एकपात्री नाटक हे साहित्यातील त्यांचे योगदान आहे. ते स्वत: लेखक, स्वत: दिग्दर्शक आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशी इतके समरस आहेत की, विशेषत: रेल्वेने प्रवास करीत असतांना आमच्याकडे भरपूर वेळ असायचा. त्यावेळी ते गाडीमध्येच त्या गोष्टी मांडण्यास सुरुवात करीत असत. रेल्वे गाडीच्या डब्यातील आजूबाजूचे लोक त्या ठिकाणी येऊन बसत असत आणि विचारत असत की हे काय सुरु आहे. मग त्यांना पुन्हा सांगावे लागे की हे एकपात्री नाटक आहे. लोक नाटक ऐकण्यासाठी बसायचे आणि सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोशे त्यांना सांगायचे की, स्वाभिमान हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी शिकविला आणि तो ते कधीही विसरले नाही. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार त्यांच्या नावाबाबत बोलल्यानंतर ते ताडकन उभे राहिले आणि त्यांनी सांगितले की, माझ्या नावाचा उल्लेख व्यवस्थित केला पाहिजे, मी त्यांना मनापासून शुभेच्छा देतो.

यानंतर कु.जयश्री......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड हे केवळ मागसलेल्या समाजातून आले एवढे म्हणून त्यांचे मुल्यमापन होणार नाही तर मराठवाडयातील अनुशेषाविषयी आणि शिक्षण क्षेत्रातील प्रगतीविषयी म्हणजे एखाद्या आदर्श लोकप्रतिनिधीच्या कामांची जी प्रमुख दोन दालने आहेत,याविषयी अतिशय जवळून सहानुभूती बाळगणारे असे ते सदस्य आहेत. सत्ताधारी पक्षामध्ये असले तरी, होईल ती मदत पोहोचती करणारा सदस्य म्हणून त्यांचा उल्लेख केला तरी तो अत्यंत यथोचित अशा प्रकारचा उल्लेख होईल. सन्माननीय सदस्य श्री.साठे यांच्या बाबतीत सांगावयाचे झ ाले तर आपल्या पक्षामध्ये जिद्दीने काम करीत असतांना आपल्या जिल्हयातील,पक्षातील मोठमोठया दिग्गजांना तोंड देत देत प्रवास करीत करीत ते येथपर्यंत पोहोचले. ते तसे दिसत नसले तरी, माती न सोडणा-या पैलवानासारखा चिवटपणात्यांच्या अंगी आहे. त्यांच्या बाबतीत पैलवान हा शब्द वापरणे, म्हणजे पैलवानाचा अपमान करण्यासारखे आहे. त्यांची काम करण्याची जी जिद्द आहे, ती बघितली तर त्यांचे वर्णन उपरोक्त शब्दातच केले जाऊ शकते. परदेशाच्या प्रवासामध्ये त्यांचा आणि सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शेवाळे यांचा माझ्याशी जवळून संबंध आला अत्यंत निर्मळ विचार घेऊन जीवनाचा प्रवास करीत असतांना,राजकीय भूमिकेच्या बाबतीत तडजोड न करण्याचा गुण निश्चितपणे स्वीकारार्ह आहे. सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव चव्हाण,डॉ.एम.ए.अझीज व इतर सन्माननीय सदस्य आज निवृत्त होत आहे, मी मनापासून या सर्वांना शुभेच्छा देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

------

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया,आज या सभागृहामध्ये निवृत्त होणा-या एकूण 12 सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याचा हा कार्यक्रम पार पाडीत असतांना मी आपले विचार मांडू इच्छितो. निवृत्त होणारे सन्माननीय सदस्य हे आमचे अनेक वर्षांपासूनचे सहकारी आहेत. काही सन्माननीय सदस्यांचा विद्यार्थी युवक चळवळीपासून ते आतापर्यंत आमच्याशी संबंध आलेला आहे. म्हणून अत्यंत जड अंत:करणाने मी त्यांना निरोप देत आहे. निवृत्त होणारे सदस्य गेल्या अनेक वर्षापासून आपल्याबरोबर सार्वजनिक जीवनामध्ये,राजकीय जीवनामध्ये सामाजिक जीवनामध्ये काम करीत होते. हे काम करीत असतांना लोकांचे प्रतिनिधी म्हणून एक प्रकारची प्रतिमा बिंबविण्याचे काम ते या सभागृहात करतात. आम्हीही काही दिवसांनी या सन्माननीय विधानपरिषदेतून निवृत्त होणार आहोत. निरोप समारंभाच्या वेळी त्यांच्या कार्याचा गौरव करणारे भाषण करण्याची ही संधी मला मिळाली म्हणून मी स्वत:ला अतिशय भाग्यशाली समजतो. महाराष्ट्रामध्ये जी दोन सभागृहे आहेत, विधानसभा आणि विधानपरिषद, त्यापैकी विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह आहे. या वरिष्ठ सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या निवृत्तीच्या वेळी असा समारंभ करुन त्यांना सन्मान दिला जातो. या समारंभाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा गौरव करण्याची संधी आपल्याला मिळत आहे.

आज या ठिकाणी सुरुवातीपासून माझ्याबरोबर काम करणारे,ज्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही काम केल, असे ते सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी आहेत.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे .....

कॉंग्रेस पक्ष एकत्र असताना विद्यार्थी व युवक चळवळीमध्ये आम्ही पुढाकार घेतला होता. त्यावेळी धडे देण्याचे काम अनेक महानुभवांनी केले, त्यामध्ये श्री.गिरीष गांधी आहेत. विधायक कामाची कास धरुन विद्यार्थी युवक चळवळीमध्ये विधायक कार्य झाले पाहिजे या दृष्टीकोनातून त्यांचा फार मोठा वाटा विदर्भात आहे. त्याचबरोबर विदर्भाचा अनुशेष, पर्यावरण, साहित्य, संस्कृती, कलेचा प्रश्न असो त्या प्रत्येक कार्यामध्ये अग्रक्रमाने आमचे मित्र श्री.गिरीष गांधी यांचा सहभाग राहिला आहे. त्यांना आम्ही "विदर्भ गौरव" समजतो. एक विधायक कार्यकर्ता म्हणून त्यांनी सातत्याने विद्यार्थी युवक चळवळीपासून सर्वांना सामील करुन घेऊन मार्गदर्शन करण्याचे काम वेळोवेळी केले आहे. विदर्भाला पुढे कसे नेता येईल, येथील प्रश्न कसे सुटतील, या दृष्टीकोनातून विचार करणारे व विदर्भाचा गौरव म्हणजे श्री.गिरीष गांधी आहेत. त्यांना या सभागृहाचे सदस्य म्हणून थोडया कालावधीची संधी मिळाली. मी सदिच्छा व्यक्त करतो की, त्यांनी पुन्हा या सभागृहाचे सदस्य म्हणून यावे. कारण विदर्भाचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचा फायदा झाल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.एम.ए.अझिज हे मितभाषी असून ते कमी बोलतात. त्यांचे व माझे संबंध 1978 मध्ये इंदिरा गांधीनी कॉंग्रेस पक्ष निर्माण केला तेव्हापासून व श्री.अब्दूल अझिज मंत्री झाले तेव्हापासूनचे आहे. अझिज घराणे सातत्याने सार्वजनिक जीवनात कार्यरत आहे. लोकांचे प्रश्न सोडविण्याकरीता व पक्ष कार्य करण्याकरिता वेळोवेळी त्यांचा सहभाग राहिला आहे. त्यांनीही पुन्हा या सभागृहात यावे अशी मी सदिच्छा व्यक्त करतो.

सभापती महोदय, आमचे महत्वाचे सहकारी श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे निवृत्त होत आहेत. माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना माहिती आहे की, महाराष्ट्रामध्ये विद्यार्थी युवक चळवळीत ज्या लोकांनी यशस्वीपणे नेतृत्व केले आणि दिशा देण्याचे काम ज्यांनी केले त्यामध्ये श्री.गुरुनाथ कुलकर्णी अग्रस्थानी आहेत. कोणतेही राजकीय प्रसंग, युवकाच्या चळवळीच्या प्रश्नांना ते सामोरे जातात. मी स्वत:, श्री.उल्हास पवार व श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी एकत्र विधायक काम केलेले आहे. मी एन.ए.सी.वाय. चा अध्यक्ष होतो, त्यावेळी ते मुंबई युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. याबाबत

.....2

PNG/ SBT/

श्री.सुधाकर गणगणे.....

माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांना माहिती आहे, त्यावेळी त्या महिला आघाडीमध्ये काम करीत होत्या. श्रीमती सुधाताई जोशी हया निवृत्त होणार असून त्यांनाही मी शुभेच्छा देणार आहे.

नंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्री. गागरे... 18:30

श्री. सुधाकर गणगणे....

सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी आतापर्यंत अत्यंत निष्ठेने काम केलेले आहे. ज्यावेळी कै. इंदिरा गांधी यांच्यावर संकटे ओढवली होती त्यावेळी त्याना मदत करणाऱ्या काही मोजक्या महिलांमध्ये श्रीमती सुधाताईंचे नाव आपल्याला घ्यावे लागेल. त्यांना राज्यसभेमध्ये देखील काम करण्याची संधी मिळाली होती. पूर्वी श्रीमती प्रेमलाताई याज्ञिक या मंत्री होत्या. त्या प्रत्येकाला नेहमी चॉकलेट देत असत. त्यांची आठवण म्हणून सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यादेखील आम्हा सर्व सदस्यांना चॉकलेट देत असत. त्यामुळे आता यानंतर त्यांच्या चॉकलेटप्रमाणे त्यांची गोड आठवण आमच्या मनामध्ये नेहमीच राहणार आहे. आपण त्यांच्या कार्याचा आढावा घेतला तर ते अतिशय व्यापक असलेले आपल्याला दिसून येईल. त्यांनी महिलांसाठी, अतिशय निष्ठेने कार्य केलेले आहे. मुंबईचा प्रश्न असो, महाराष्ट्राचा प्रश्न असो,किंवा महिलांच्या संदर्भातील एखादा प्रश्न असो हे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेऊन अतिशय चांगले काम सभागृहामध्ये केलेले आहे. त्यांचे कार्य हे खरोखरच गौरवास्पद आहे. आमच्या शुभेच्छा सदैव त्यांच्या पाठीशी राहतील. त्या पुन्हा या सभागृहामध्ये निवडून याव्यात यादृष्टीने आम्ही निश्चितच प्रयत्न करु.

सभापती महोदय, प्रा. फौजीया खान या आमच्या आणखी एक भगिनी आज सभागृहामधून निवृत्त होत आहेत. त्यांच्या कार्याबद्दल जेवढे सांगावे तेवढे थोडेच आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे मराठवाडयातील आहेत त्यामुळे आपल्याला माहिती असेलच की, निजामांच्या काळापासून अल्पसंख्यांकांमधील फारच थोडी घराणी ही पुढारलेली आहेत. प्रा. फौजीया खान या त्यातीलच एका पुढारलेल्या घराण्यातील आहेत. त्यांचे यजमान वन विभागामध्ये क्लास वन ऑफीसर आहेत, त्यांचे बंधू डॉक्टर आहेत. अशा प्रकारे त्यांचे संपूर्ण घराणे हे सुशिक्षित आहे. ज्या ज्या वेळी मी सभागृहामध्ये ओ.बी.सी. समाजाचे प्रश्न मांडतो त्या त्या वेळी त्यांनी मला पूर्णपणे समर्थन दिले. आताच आपण पाहिले असेल की, त्यांनी मुस्लिम समाजाच्या विकासाकरिता अतिशय तळमळीने काम केले आहे. मागील आठवडयामध्ये मुस्लिम समाजाच्या प्रश्नाबाबत त्यांनी आग्रही भूमिका घेऊन त्यांच्या प्रश्नाला न्याय मिळवून दिला होता.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड हे वंजारी समाजाचे आहेत. ते युवक कॉंग्रेसमध्ये असताना त्यांनी केलेल्या कार्याचा आपण खरे तर गौरव केला पाहिजे. त्यांचे

2..

DVG/ प्रथम श्री. गागरे... 18:30
श्री. सुधाकर गणगणे....

मार्गदर्शक माननीय श्री. शरद पवार यांनी देखील त्यांच्या कार्याचे प्रमाणपत्र दिले आहे. आपण पुन्हा या सभागृहामध्ये निवडून यावे यासाठी आम्ही निश्चितच प्रयत्न करु. आपल्याला शिफारशीची आवश्यकता असेल तर ती देण्यासही आम्ही तयार आहोत. त्यांनी सर्व जाती धर्माचे प्रश्न, ठाणे जिल्हयातील प्रश्न, कोकणातील प्रश्न अतिशय हिरीरीने मांडले. त्यांनी जे काम केलेले आहे ते आम्ही कधीही विसरु शकत नाही

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणगणे ....

सभापती महोदया, त्याचबरोबर आमचे ज्येष्ठ मित्र श्री.धोंडीराम राठोड, ज्यांनी या सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेरही मागासलेल्या समाजाला न्याय देण्याचे काम सातत्याने केले आहे. अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती इतकेच नाही तर ओबीसी समाजाच्या प्रत्येक प्रश्नावर त्यांनी समर्थपणे आपली बाजू या सदनात मांडलेली आहे. त्यांनीही या सभागृहामध्ये पुन्हा यावे आणि मागासलेला असा जो त्यांचा बंजारा समाज आहे त्याचे प्रतिनिधी म्हणून त्यांचे विकासाचे प्रश्न मांडावेत. यासाठी मी त्यांना शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे हेही आपल्यातून निवृत्त होत आहेत. त्यांच्याबद्दल मी अधिक काय सांगावे ? गेल्या 35 वर्षांचा त्यांचा आणि माझा संबंध आहे. म्हणजे विद्यार्थी, युवक चळवळीपासून ते आतापर्यंत त्यांच्याशी माझा वैयक्तिक संबंध आलेला आहे. तसे पाहिले तर ते माझे गुरूबंधू आहेत. याच नागपूर शहरामध्ये आमचे नेते श्री.बाळासाहेब तिरपुडे यांच्या नेतृत्त्वाखाली आम्ही तयार झालो आहोत. इतकेच नव्हे तर ते एका मोठ्या नेत्याचे, साहित्यिक असलेल्या श्री.ना.रा.शेंडे यांचे जावई आहेत. अगदी सुरूवातीपासून त्यांना लिखाणाची सवय असल्याने ते एक चांगले लेखक आहेत, नाटककार आहेत, कलावंत आहेत. त्यांचा माझा संबंध आला तेव्हा ते एक वृत्तपत्र चालवित होते. वृत्तपत्रापासून ते दलितांचे कोणतेही प्रश्न असोत त्यांनी अगदी मनापासून हिरीरीने त्यात काम केले आहे. या सभागृहामध्येसुद्धा दलितांचे प्रश्न मांडण्यासाठी त्यांनी मनापासून पुढाकार घेतला आहे. इतकेच नव्हे तर ओबीसीच्या चळवळीमध्येही ते आमच्या बरोबरीने राहिले आहेत. मागील वर्षी मी अखिल भारतीय ओबीसी साहित्य संमेलन पुणे शहरात भरविले होते तेव्हा त्यांनी आमच्या ओबीसी साहित्यिकांसमोर त्यांनी स्वत: लिहिलेल्या आणि काम केलेल्या गांधी आंबेडकर रमाई या नाटकाचा एकपात्री प्रयोग रंगविला होता. त्यातील त्यांचा मुद्राभिनय पाहून सारेजण थक्क होऊ गेले होते. हुबेहुब डॉ.आंबेडकर त्यांनी उभे केले होते. भविष्यात त्यांच्या या एकपात्री नाटकाचे जेव्हा जेव्हा प्रयोग होतील तेव्हा त्यात सर्वांनी सहभागी होऊन त्यांना प्रोत्साहित करावे. त्यांनाही पुन्हा या सभागृहात येण्याची संधी मिळावी अशी मी शुभेच्छा त्यांना देतो.

...... 4पी 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणगणे ....

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.धनाजीराव साठे हेही आपल्यातून निवृत्त होत आहेत. ते माननीय मुख्यमंत्र्यांचे नुसते मित्र नाहीत तर वर्गमित्रही आहेत. त्यांच्या बरोबर त्यांनी शिक्षण घेतले आहे. त्यांच्या सोलापूर येथील घरी देखील मी जाऊन आलो आहे. त्यांच्या वडीलांपासून त्यांना सार्वजनिक कार्याचा वारसा मिळाला आहे. सर्व जाती-धर्माला बरोबर घेऊन ते समाजकार्य करीत आहेत आणि माझ्या माहितीप्रमाणे त्यांच्या घरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे त्या काळात येऊन गेले आहेत. त्यांनी लोकांना मार्गदर्शन करण्याचेही काम केले आहे. सार्वजनिक जीवनामध्ये सहकार क्षेत्रात त्यांनी काम केले आहे. साखर कारखान्याचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी पुढाकार घेतलेला आहे. मी अपेक्षा करतो की, साखर कारखान्यातून ते गोड साखर तयार करीतच आहेत पण या ठिकाणी ते आपल्या स्वभावातील गोडवा कधीही कमी होऊ देणार नाहीत. माननीय मुख्यमंत्र्यांना मी पुन्हा विनंती करीन की, आपण त्यांनाही पुन्हा या सभागृहात येण्याची संधी द्यावी.

( यानंतर श्री.सरफरे .... 4क्यू 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे...

त्याचप्रमाणे माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत हे देखील माझे चांगले मित्र आहेत. या देशाचे पंतप्रधान कै. राजीव गांधी यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध असल्यामुळे फौजेमधून निवृत्त झ ााल्यानंतर ते राजकारणामध्ये आले. माझ्या माहितीप्रमाणे त्यांनी आमदारकीचा राजीनामा दिला असून तो अजून मान्य झालेला नाही. त्यांच्याशी माझे जिव्हाळयाचे संबंध होते. अगदी विद्यार्थी, युवक चळवळीपासून त्यांच्याशी माझा संबंध आला आहे. ते संसदेमध्ये असतांना आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून राज्याचे प्रश्न घेऊन त्यांच्याकडे जात होतो. त्यावेळी ते प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी वेळोवेळी आम्हाला सहकार्य केले आहे. कोकणचा विकास चांगल्या प्रकारे व्हावा यासाठी त्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी गेल्या वर्षीपासून आंबा महोत्सव भरविण्यास सुरुवात केली. अशाप्रकारे कोकणातील निरनिराळया घटकांचा विकास व्हावा म्हणून सभागृहामध्ये चांगल्याप्रकारे बाजू मांडण्याचे काम त्यांनी केले.

त्याचप्रमाणे माननीय सदस्य सर्वश्री वसंतराव चव्हाण, जगन्नाथ शेवाळे हे दोन्ही माझे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सहकारी मित्र आहेत. त्यांचे सुध्दा या सभागृहामध्ये चांगल्या प्रकारचे योगदान राहिले आहे. सभागृहातील सर्व माननीय सदस्यांशी त्यांचे चांगले ऋणानुबंध राहिले आहेत. या सर्व माननीय सदस्यांना शुभेच्छा देत असतांना मला विरह होत आहे. असे असले तरी त्यांनी भविष्यामध्ये या सभागृहामध्ये पुन्हा नव्याने येऊन आम्हाला असेच मार्गदर्शन करावे, आणि महाराष्ट्रातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी यावे अशाप्रकारची शुभेच्छा व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदया, या सभागृहाच्या एका चांगल्या प्रथेनुसार सभागृहातील सदस्यत्वाचा कार्यकाळ संपल्यामुळे निवृत्त होणाऱ्या माननीय सदस्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम याठिकाणी सुरु आहे. या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याकरिता मी या ठिकाणी उभा आहे. सभापती महोदया, मी अनेक वर्षापासून राज्यशास्त्राचा प्राध्यापक म्हणून मुलांना शिकवीत असतांना नेहमी म्हणत असतो की, विधानपरिषदेच्या वरिष्ठ सभागृहामध्ये कला, वाङ्मय, विज्ञान, सहकार या विविध क्षेत्रामध्ये ज्यांनी चांगले काम केले आहे, ज्यांच्याजवळ चांगला अनुभव आहे त्यांची नियुक्ती माननीय राज्यपालांमार्फत होत असते. सभागृहामधील या तेरा सन्माननीय सदस्यांना गेल्या दीड वर्षापासून जवळून अनुभवण्याची मला संधी मिळाली. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, सहकार, शैक्षणिक क्षेत्रामध्ये आणि अनेक सहकारी संस्थामध्ये, ग्रामपंचायतीपासून स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत, सेवाभावी संस्थामध्ये काम करीत असतांना ज्यांनी आपले कर्तृत्व आणि नेतृत्व घडविले अशा महानुभवांना या ठिकाणी संधी मिळते. आणि त्यांचा अनुभव माझ्यासारख्या नवीन सदस्यांना मिळतो. या निरोप समारंभाच्या निमित्ताने त्यांना सदिच्छा देतांना एक निराळी भावना माझ्या मनामध्ये येते. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक क्षेत्रामध्ये काम करीत असतांना माझे नेते व प्रमुख मार्गदर्शक ज्यांनी मला घडविले त्या माननीय श्री. अरुणभाई गुजराथी यांच्याबरोबर अनेक नेत्यांशी माझा याठिकाणी संबंध आला, आणि त्यामुळे मला या ठिकाणी चर्चेमध्ये भाग घेता आला.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे .....

आज या अनुभवी सदस्यांना निरोप देत आहोत. ज्यांनी क्रीडा क्षेत्रामध्ये काम केले तसेच ज्यांनी अनेक संस्थांमध्ये आपला ठसा उमटविला ते सन्माननीय सदस्य डॉ. अझिज साहेब यांच्याशी माझा जवळचा संबंध आला. एका समितीमध्ये काम करीत असताना त्यांचे काम बघण्याचा आणि त्यांच्याबरोबर काम करण्याचा खूप मोठा अनुभव मला मिळाला. सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड साहेबांबद्दल काय सांगावे ? अनेक वेळा तरुण मित्राची कामे घेऊन येत असताना त्यांच्या बाबतीत मला खूप चांगला अनुभव आला. सभागृहामध्ये आपला प्रश्न मांडण्याची त्यांची पध्दत तसेच आक्रमकपणे आपले मत मांडत असताना त्यांच्यापासून मी खूप काही शिकू शकलो. अशा प्रकारचा अनुभव मला त्यांच्याकडून मिळाला. विद्यार्थी दशेपासूनच एक चांगला कार्यकर्ता म्हणून तसेच एक वादळी व्यक्तिमत्व म्हणून श्री. जितेंद्र आव्हाड भाऊ, आपण या सभागृहामध्ये काम केले आहे. आपण या सभागृहात परत यावे अशी मी आपल्याला निश्चितपणे शुभेच्छा देतो.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांच्याशी माननीय श्री. अरुणभाई गुजराथी यांच्यासोबत काम करीत असताना माझा जवळचा संबंध आला. पक्षाचे काम असले की, श्री. अरुणभाई गुजराथी यांच्याकडे जात असे. ते गुरुजींना भेट असे सांगत असत. गुरुजी हा शब्द मी त्यांच्यात पाहिला. ते कधी कोणावर रागावले नाहीत. दुसऱ्याला समजून घेणे हा प्रकार मी त्यांच्याजवळ पाहिला. ते अतिशय हजरजबाबी आणि प्रसंगावधानी आहेत. अत्यंत अभ्यासपूर्ण भाषणे त्यांच्याकडून अनेकदा ऐकावयास मिळालेली आहेत.

सभापती महोदया, प्राध्यापक किंवा प्राचार्य असलेल्या सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांचे आणि माझे शिक्षण क्षेत्रातील काम एकच असले तरी शैक्षणिक क्षेत्रातील समस्या मांडत असताना त्यांना अतिशय पोटतिडिकीने बोलताना मी पाहिले आहे. एक शिक्षिका, एक प्राचार्या अशा पध्दतीचे काम त्यांनी केले आहे. त्यांचा कामाचा अनुभव आम्हाला या ठिकाणी मिळाला. त्यांनाही मी मनापासून शुभेच्छा देतो. सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव चव्हाण हे एक संस्था चालक आहेत. त्यांच्याशी बोलत असताना त्यांचाही मला अनुभव मिळाला.

त्यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांच्याबद्दल सांगेन. महिला सदस्यांशी

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे .......

बोलत असताना त्या नेहमी आग्रही असत. आपल्या मुद्याला नेहमी न्याय देण्याचे काम त्यांच्याकडून होत असलेले मी पाहिलेले आहे. त्यांनी महिलांसाठी कार्य केले. संगीत, नाटक अशा विविध क्षेत्रामध्ये त्यांनी कार्य केलेले आहे. त्यांच्यातील पक्षनिष्ठा आम्हाला खूप अनुभवावयास मिळाली. केवळ राज्यातच नव्हे तर राज्याच्या बाहेर सुध्दा त्यांनी काम केलेले आहे. त्यांनाही मी मनापासून शुभेच्छा देतो. पक्षामध्ये काम करीत असताना पक्षनिष्ठा कशी असावी हे श्रीमती सुधाताई जोशी यांच्याकडून शिकावयास मिळाले.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे यांच्याबद्दल सांगावयाचे म्हणजे दलितांचा प्रश्न असला की ते तुटून पडावयाचे. आपले विचार मांडत असताना ते आक्रमक होत असत. हा गुण मी त्यांच्यामध्ये पाहिला. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. धोंडीरामजी राठोड साहेब यांच्याशी दोन तीन वेळा श्री. देशमुख साहेबांच्या केबिनमध्ये भेट झाली. त्यावेळी त्यांना जवळून पाहात असताना शेतकऱ्यांचे प्रश्न आणि त्यांच्याविषयी जाणीव असलेला माणूस हा गुण मी त्यांच्यामध्ये पाहिला. शैक्षणिक क्षेत्रामध्ये तसेच भारत स्काऊट ॲंड गाईडच्या संदर्भात त्यांनी खूप चांगले काम केले. अन्यायाच्या विरोधात तसेच व्यसन मुक्तीच्या संदर्भात त्यांचे विचार ऐकावयास मिळाले. त्यांच्याकडून मला निराळा अनुभव मिळाला.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. जगन्नाथ शेवाळे साहेब यांच्यामध्ये राजकीय, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात काम करणारे, नेहमी धडपड करणारे नेतृत्व मी पाहिले. सन्माननीय सदस्य श्री. धनाजी साठे साहेबांच्या बाबतीत मात्र मला एक निराळा अनुभव आला. कमी बोलणे परंतु आपले काम करीत राहणे हा गुण मी त्यांच्यामध्ये सतत पाहात होतो. एकदा त्यांची लॉबीमध्ये भेट झाली. मी त्यांना सहज विचारले. त्यांनी एक एक अनुभव सांगण्यास सुरुवात केली.

यानंतर श्री. शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

(श्री. दिलीपराव सोनवणे...)

सूतगिरणी असेल, साखर कारखाना असेल, इतर सेवाभावी संस्था असतील अशा विविध क्षेत्रामध्ये त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविलेला आहे. ते माननीय मुख्यमंत्र्यांचे क्लासमेट आणि जवळचे मित्र आहेत असा या ठिकाणी त्याच्यासंबंधी उल्लेख करण्यात आला. परंतु मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या जवळचा आहे त्यांचा मित्र आहे असा अविर्भाव त्यांनी कधी दाखविला नाही. परंतु राजकारणामध्ये अशी काही व्यक्तिमत्वे दिसून येतात की, मोठया व्यक्तींशी काही संबंध नसला तरी तो कसा आहे हे दाखविण्याच्या सतत प्रयत्नात असतात. सन्माननीय सदस्य श्री.धनाजी साठे यांनी त्यांच्या व्यक्तिगत कार्याचा ठसा उमटविण्याचे काम केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. गिरीष गांधी यांच्याशी माझा अतिशय कमी संबंध आला असला तरी ते एक चतुरस्त्र व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या वाट्याला विधानपरिषदेच्या 6 वर्षापैकी फार कमी कालावधी आला. आज आपण या सर्व गुणी व्यक्तिमत्वांना निरोप देत आहोत. सहजासहजी राज्यपालांकडून नामनियुक्ती मिळणे सोपे नाही. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये ज्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविलेला आहे त्यांना राज्यपालांकडून नामनियुक्ती मिळते. खरे म्हणजे या लोकांनी विद्यार्थीदशेपासूनच हे बाळकडू घेतलेले असते. हे जे सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत त्यांनी मी सांगेन की, त्यांनी पुन्हा या सभागृहामध्ये यावे. त्यांच्या कार्याचा, कर्तृत्वाचा आणि नेतृत्वाचा अनुभव आम्हाला मिळावा, त्यांच्याकडून चांगली समाजसेवा घडो आणि या सदनाला त्यांचे दीर्घकाळ मार्गदर्शन मिळत राहो अशी ईश्वर चरणी मी प्रार्थना करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज आपल्या सदनाचे 12 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. अशा निवृत्त होणा-या सदस्यांना आपण निरोप देत असताना आपण त्यांच्याबद्दलच्या भावना व्यक्त करुन त्यांना शुभेच्छा देतो. या निवृत्त होणा-या 13 सदस्यांपैकी सन्माननीय सदस्य डॉ. एम.ए.अझिज, सन्माननीय सदस्य श्रीमती सुधाताई जोशी, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड, सन्माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड हे सर्व युवक काँग्रेसच्या चळवळीमध्ये काम करीत असताना त्या संघटनेच्या माध्यमातून राजकीय आणि सामाजिक पातळीवर आपापली वैशिष्ट्ये समाजामध्ये आणि राजकारणामध्ये सिध्द करणारी अशी व्यक्तिमत्वे आहेत. म्हणून या निवृत्तीच्या समारंभाच्या निमित्ताने अशा विशेष व्यक्तिमत्वाबद्दल ज्या काही माझ्या मित्रत्वाच्या भावना आहेत, तशा त्या सर्वांच्याच बद्दल आहेत, त्या व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे. डॉ. एम.अे.अझिज हे निष्णात प्रॅक्टिसिंग डॉक्टर आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांनी सांगितल्याप्रमाणे सन्माननीय अब्दुल अझिज हे राज्याचे मंत्री होते.त्यांचे हे बंधू. त्यांच्या उत्तम शिक्षण संस्था आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत अनेक समारंभातून त्यांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य मला पहाण्यास मिळाले. ते उत्तम डॉक्टर आहेत. ते औरंगाबादमधून मुंबईला आले आणि चांगल्या प्रकारचे हॉस्पिटल आणि आरोग्य सेवा त्यांनी उपलब्ध करुन दिल्या. विशेष म्हणजे जगप्रसिध्द असलेले पैगंबरवासी डॉ. रफिक झकेरिया यांनी त्यांचे गुण हेरुन त्यांना खिलाफत चळवळीमध्ये घेतले. खिलाफत चळवळीला मोठे ऐतिहासिक अधिष्ठान आणि महत्व आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार........

त्या खिलाफत हाऊसमध्ये, त्या खिलाफत चळवळीच्या केंद्रामध्ये त्यांनी डॉ.रफिक झकेरिया यांच्याबरोबर विश्वस्त व पदाधिकारी म्हणून काम केले व आजही कार्यरत आहेत. डॉ.रफिक झकेरिया यांचे वैचारिक विचार, ज्यांच्या पुस्तकांचे विवेचन जगाभरातील वृत्तपत्रातून आलेले आहे. त्यांचे लेखन आणि त्यांचा सहवास हा डॉ.एम.ए.अझीज यांना लाभला आहे. असे हे व्यक्तिमत्व, जसे आता समोरच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी डॉ.अझीज यांच्याबद्दल भावना व्यक्त केल्या, शांतपणे, कुठेही तोल ढळू न देता समोरुन कोणताही मुद्दा आला तरी....सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंगजी फुंडकर म्हणाले ते बरोबर आहे, शांतपणे आपला मुद्दा न सोडता मोजक्या शब्दांमध्ये परंतु प्रभावीपणे भूमिका मांडणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. ते वक्फ बोर्डाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष होते. बऱ्याच लोकांचा गैरसमज आहे. वक्फ बोर्डाचा अध्यक्ष म्हणजे सरकारने आणि मुख्यमंत्र्यांनी नेमलेला असतो. वक्फ बोर्डाची वेगळी घटना आहे. त्यामध्ये प्रत्यक्ष निवडणुका होतात. त्या निवडणुकीमध्ये सर्वांच्या मताने निवडून आलेले ते वक्फ बोर्डाचे अध्यक्ष होते. मला या निमित्ताने सदनामध्ये लोकांना कळावे म्हणून सांगावेसे वाटते. ज्यामध्ये श्री.दिलीप कुमार, श्रीमती शबाना आझमी यांचा समावेश आहे. नियमानुसार दोन मुसलमान खासदार ज्याचे मतदार आहेत अशा मंडळींनी निवडून दिलेले ते वक्फ बोर्डाचे अध्यक्ष होते. त्यादृष्टीने त्यांनी मनापासून काम करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यावर कितीही हल्ले झाले तरी वक्फ बोर्डाचे नियम, कायदे, नियमावली बघून त्यांनी काम करण्याचा अत्यंत प्रामाणिकपणे प्रयत्न केला. खैरुल इस्लाम हायर एज्युकेशन सोसायटीचे ते उपाध्यक्ष आहेत. केंद्रीय मानव संसाधन विभाग आहे त्या विभागाचा जो कॉम्प्युटर आणि माहिती तंत्रज्ञान विभाग आहे त्या विभागाचे ते व्हाईस चेअरमन आहेत. अशा विविध शैक्षणिक पातळीवर, शासकीय पातळीवरच्या समित्यांच्या माध्यमातून त्यांनी अतिशय उत्तम काम केले आहे. त्यांना निरोप देताना सगळयांनी याठिकाणी भावना व्यक्त केल्या आहेत. माननीय राज्यपाल महोदयांची कल्पना आहे, कोणाला याठिकाणी नेमावे, सदस्य कोण असावेत. या सगळ्या मुद्याचा विचार केला तर डॉ.एम.ए.अझीज यांना याठिकाणी पुन्हा यायला संधी मिळावी अशा निरोप देताना मी त्यांना शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांनी सांगितल्याप्रमाणे माननीय श्री.सुधाकर गणगणे, मी आणि माननीय सदस्य

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 18:55

श्री.उल्हास पवार.......

श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे एन.एस.यु.आय.चे अध्यक्ष, मी महाराष्ट्र युवक काँग्रेसचा अध्यक्ष होतो आणि काही काळ माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे मुंबई युवक काँग्रेसचे अध्यक्ष होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये विद्यार्थी चळवळीसाठी एन.एस.यु.आय.ही संघटना स्थापन करुन त्याची घटना तयार करण्यासाठी त्यावेळचे केंद्रीय मंत्री आणि संघटनेचे अखिल भारतीय काँग्रेस समितीचे महामंत्री असलेले एच.एन.बहुगुणा यांच्या नेतृत्वाखाली समिती होती, त्या समितीमध्ये त्यांनी काम केले. संघटनेला रुप द्यायचा प्रयत्न केला. या निमित्ताने या सभागृहामध्ये एक विशेष गोष्ट सांगतो. त्यांनी अनेक कामे केली, अनेक चळवळी उभ्या केल्या, अनेक शिबिरे घेतली, सभा सम्मेलने केली त्याचे वर्णन मी करीत नाही. त्यापेक्षाही मुंबईमध्ये आज ऑटोरिक्षा दिसतात, त्या ऑटोरिक्षा मुंबईमध्ये चालविण्यास बंदी होती, परवानगी नव्हती. त्यावेळचे बाजी आणि जॉर्ज फर्नांडिस यांनी टॅक्सी युनियनच्या माध्यमातून विरोध केला होता. मुंबईमध्ये सुशिक्षित बेरोजगारांना हा व्यवसाय उपलब्ध करुन द्यावा म्हणून सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी प्रयत्न केले आणि मी त्यांना सहकार्य केले होते. आझाद मैदानामध्ये ते मुंबई युवक काँग्रेसचे अध्यक्ष असताना ऑटोरिक्षा ट्रेनिंग सेंटर चालू केले आणि मुंबईमध्ये हजारो ऑटोरिक्षा दिसतात त्याची सुरुवात माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांच्या कल्पनेमुळे आणि मी त्यांना सहकार्य केल्यामुळे झाली. याचे श्रेय त्यांचेच आहे, हे या निमित्ताने सांगू इच्छितो. कोकणातील सामान्य कुटुंबातून ते आले, नोकरी करुन शिकले, एम.ए.,एल.एल.बी.पर्यंत शिक्षण घेतले. वकिली केली. हे करीत असताना सामाजिक, विद्यार्थी चळवळीमध्ये, युवक काँग्रेसमध्ये आणि संघटनेमध्ये फार मातब्बर नेत्यांबरोबर काम करण्याची त्यांना संधी मिळाली.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार.......

कित्येक वर्ष त्यांनी आणि मी कॉंग्रेसमध्ये पदाधिकारी म्हणून काम केलेले आहे. गुरुनाथ कुलकर्णी हे मनाने अत्यंत मोकळे आहेत. कोकणाचे प्रश्न ते पोडतिडकीने मांडत. आंगणवाडीची यात्रा, माझे गाव याची चर्चा त्यांच्या खाजगी आणि लाईव्ह चर्चेमध्ये आल्याशिवाय कधीच राहत नसे. नाही तर माणसे शिकली म्हणजे आपल्या गावाला विसरतात, गावच्या लोकांना विसरतात, आपल्या शेतीला विसरतात, गावच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक चळवळीला विसरतात पण गुरुनाथ कुलकर्णी हे कधीच विसरलेले नाहीत. त्यांच्या पत्नी एस.एन.डी.टी कॉलेजमध्ये मराठीच्या प्राध्यापक आहेत. त्या एक उत्तम कवियत्री आहेत. त्यांनी काव्यसंग्रह लिहिले आहेत, कोकणच्या विकासावर लेखन केलेले आहे, सांस्कृतिक चळवळीवर लिखाण केलेले आहे. परंतु त्यांनी जेव्हा हरिपाठावर निरुपण लिहिले तेव्हा माननीय गुरुनाथ कुलकर्णी मला म्हणाले की, "उन्हास मला हरीपाठातील काही कळत नाही, मी काही संप्रदायातला नाही. त्यामुळे माझ्या पत्नीने हरिपाठावर जे निरुपण लिहिले आहे त्यासाठी माननीय बाळासाहेब भारदे यांची प्रस्तावना मिळाली पाहिजे." म्हणून मी आणि कुलकर्णी माननीय बाळासाहेब भारदे यांच्या घरी गेलो व उत्तम अशी प्रस्तावना त्यांना मिळवून दिली. माननीय गुरुनाथ कुलकर्णी यांच्याकडे पाहिल्यानंतर त्यांचे जे व्यक्तीमत्व आहे त्यावरुन ते आक्रमक वाटतात परंतु व्यक्तिशः हा माणूस अत्यंत हळवा आहे. एखाद्या माणसाचे दु:ख, वेदना, गोरगरीब माणसांचे प्रश्न हळवे पणाने, कष्टाने, जिद्दीने सोडविण्याचा प्रयत्न करणारा, आमच्या चळवळीतील मित्र या सदनातून निवृत्त होत आहे त्यामुळे त्यांना या ठिकाणी येण्याच्या शुभेच्छा देतांना मी प्रार्थना करतो आपल्या सर्वांच्या सदिच्छेने ते परत या सभागृहात येतील.

आमचे मित्र माननीय गिरीष गांधी यांना आज निरोप देण्यात येणार आहे. मी 1971 पासून नागपूरमध्ये येत आहे. नागपूरमधील जवळच्या दोन तीन मित्रांमध्ये गिरीष गांधी यांचा समावेश आहे. त्यांची आणि माझी नाळ जोडली गेली आहे. त्यांच्या घरचे वातावरण, त्यांचा आदर्श , सुसंस्कृतपणा यामुळे त्यांचे आणि माझे नाते या अर्थाने जुळले आहेत. छात्र जागृतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कारक्षम वातावरण तयार व्हावे, व्यसनमुक्ती, स्वयंरोजगार निर्माण व्हावा म्हणून छात्र जागृती संघटनेच्या माध्यमातून तेव्हापासून आजपर्यंत ते काम करीत आहेत. आता आपण महिलांच्या उध्दाराच्या आणि उत्थापनाच्या खूप गोष्टी बोलतो परंतु 10-15 वर्षाच्याही अगोदर

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार .....

यासंदर्भात माननीय गिरीष गांधी यांनी संस्था स्थापन केली होती. उत्तम वसतिगृह तयार केले. कपडे शिलाईचे ट्रेनिंग देण्याचे काम अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून सामान्य महिलांना स्वयंरोजगार देऊन स्वत:च्या पायावर सबल करण्याचे काम माननीय गिरीष गांधी यांनी संघटनेच्या माध्यमातून केलेले आहे. वरुड हे त्यांचे मूळ गाव असून त्या ठिकाणी त्यांची एक शैक्षणिक संस्था आहे. माझ्या माहिती प्रमाणे त्या ठिकाणी त्यांनी सफाई कामगारांसाठी गृहनिर्माणाचे एक संकुल बनवले आहे. त्यांचे विदर्भलोक नायक नाव असलेले साप्ताहिक चालत होते. मी जेव्हा 71-72 मध्ये येत असे तेव्हा आमची बसण्याची जी दोन तीन केंद्र होती त्यापैकी अक्षर मुद्रणालय हे एक केंद्र होते. त्या ठिकाणी आम्ही सामाजिक, वृत्तपत्र स्वातंत्र्य, साहित्य, राजकीय गोष्टी करीत असू. आपल्याला मी सांगू इच्छितो की, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष अरुण साधू यांची अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर जे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नागपूरमध्ये झाले तेव्हा सर्वांनी मिळून, पक्षभेद विसरुन एकमुखी निर्णय घेतला की, स्वागताध्यक्ष गिरीष गांधी हेच राहतील. जागतिक मराठी परिषद असेल अशा विविध संघटनांच्या माध्यमातून साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय चळवळीमध्ये गिरीष गांधी यांनी भाग घेतलेला आहे. शेवटी पर्यावरण, वनराई यासंदर्भात माननीय मोहन धारिया यांनी गिरीष गांधी यांना विश्वस्त म्हणून नियुक्त केलेले आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.....

श्रीमती सुधाताई जोशी यांच्याबद्दल सांगावयाचे झाले तर, मी मुंबई आणि महाराष्ट्र असा मिळून युवक काँग्रेसचा अध्यक्ष झालो. श्री.गुरुनाथ कुलकर्णी आमच्या बरोबर होते, परंतु प्रदेश काँग्रेसचा दर्जा घटनेने बाजूला केला आणि मुंबई महाराष्ट्रात विलीन केली. त्यावेळी युवक काँग्रेसचे असंख्य कार्यकर्ते काम करीत होते त्यामध्ये श्रीमती सुधाताई जोशी होत्या. त्यांचे सासरे हे सुरुवातीच्या रुपारेल कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते. म्हणजे प्राचार्यांपैकी त्यांचे घराणे आहे. माहेरचे घराणेही असेच सुशिक्षित आहे. तोही वारसा त्यांना लाभलेला आहे. त्या राज्यसभेच्या खासदार होत्या. महिला प्रदेश काँग्रेसच्या पदाधिकारी होत्या. अखिल भारतीय पातळीवर त्यांनी काम केलेले आहे. समाज कल्याण बोर्डाच्या त्या चेअरमन होत्या आणि आता या सदनाचे सदस्य म्हणून त्यांनी अतिशय चांगल्याप्रकारे काम केलेले आहे. त्यांनी पुन्हा या सदनात यावे अशी मी सदिच्छा व्यक्त करतो.

श्री.धोंडीराम राठोड यांना मी अनेक वर्षापासून ओळखत आहे. मंठा हे त्यांचे गाव. पती, पत्नी व मुले असे सर्वजण शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात काम करीत आहेत. मराठवाड्यातील इरिगेशनचे प्रश्न त्यांनी अतिशय पोटतिडकीने मांडलेले आहेत. त्यांनी संघटनेमध्ये मनापासून काम केलेले आहे. त्यांनी बी.ए.बी.एड.चे शिक्षण पूर्ण केलेले आहे, म्हणजे पेशाने ते शिक्षक आहेत. त्याशिवाय बंजारा समाजामध्ये तांडा संस्कार केंद्र,शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्याकरिता त्यांनी आंदोलने केली, चळवळी केल्या. सर्वांना त्यांनी कन्व्हीन्स केले आणि माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्याकडून तो निर्णय घडवून आणला. त्यांचे हे वैशिष्टय मला प्रकर्षाने याठिकाणी सांगितले पाहिजे. त्यांनीही पुन्हा या सदनात यावे अशी सदिच्छा व्यक्त करतो.

माझे मित्र श्री.जितेंद्र आव्हाड हे संघटनेमध्ये तसे ज्युनिअर पण मी त्यांना कित्येक वर्षापासून ओळखतो. आपले माननीय उपसभापती आणि श्री.जितेंद्र आव्हाड हे दोघही ठाणे शहरातील. या दोघानांही राजकीय व सामाजिक चळवळीमध्ये तसेच सांस्कृतिक कार्यामध्ये सारखाच रस आहे. नाट्यसंगीतापासून लावणीपर्यंत व दहीहंडीपासून वेगवेगळ्या साहित्यिक महोत्सवापर्यंत श्री.जितेंद्र आव्हाड यांनी एक आपले वैशिष्टय निर्माण केलेले आहे. त्यांनीही पुन्हा या सभागृहात यावे अशी मी सदिच्छा व्यक्त करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.....

श्री.वसंतराव चव्हाण त्यांचे वडील श्री. बळवंतराव चव्हाण यांचे नुकतच निधन झाले. या घराण्याला एक राजकीय सामाजिक स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास आहे. त्या इतिहासाचा मागोवा घेत ते वाटचाल करीत आहेत. सहकार चळवळ असो वा सामाजिक चळवळ असो या चळीवळीमध्ये त्यांनी हिरीरिने भाग घेतलेला आहे. आज सकाळीच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी श्री.वंसतराव चव्हाण यांच्या कृषि शाळेचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, त्यांची कृषि शाळा महाराष्ट्रातील उत्तम कृषि शाळा आहे. त्यांनी सुध्दा सदनात पुन्हा यावे अशी मी सदिच्छा व्यक्त करतो.

श्री.धनाजी साठे यांचे वडील सोलापूर जिल्ह्यात मातब्बर पुढारी होते. त्यांच्या वडिलांच्या व्यक्तिमत्वामध्ये आणि श्री.धनाजी साठे यांच्या व्यक्तिमत्वामध्ये खूप फरक आहे. वडिलांच्या तुलनेत श्री.साठे खूपच शांत आहेत. पुण्याच्या आय.एल.एस.कॉलेजमधून त्यांनी एलएल.बी.शिक्षण पूर्ण केले व नंतर काही वर्षे वकिली केली. स्थानिक स्वराज्य संस्थापासून विधानसभा व विधानपरिषद आणि जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष अशा विविध पातळीवर त्यांनी काम केलेले आहे. माननीय मुख्यमंत्री व आपल्या सर्वांचेच ते जवळचे मित्र आहेत. त्यांनी देखील या सभागृहात परत यावे अशी मी निरोप देताना त्यांना सदिच्छा देतो.

श्री.रमेश निकोसे यांच्याबद्दल सांगावयाचे झाले तर सामाजिक चळवळीमध्ये भाग घेताना त्यांनी कधीही अभिनिवेष ठेवला नाही. राष्ट्रपिता महात्मा गांधी व परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशा उत्तुंग व्यक्तिमत्वांच्या विचारांचा त्यांनी प्रचार केला. सामाजिक समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. महान व्यक्तिमत्वांचे विचार घेऊन समाजापुढे जाण्याचा प्रयत्न केला तर तो अधिक यशस्वी होऊ शकतो हे त्यांनी स्वत: "गांधी, आंबेडकर, रमाई" हे एकपात्री नाटक लिहून व त्यात स्वत: काम करून यशस्वी करुन दाखविला. श्री.मोहन जोशी जे नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष आहेत, त्यांनी नांदेडच्या नाट्य संमेलनामध्ये श्री.रमेश निकोस याचा त्याठिकाणी प्रयोग घडवून आणला.
त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे समोरच्या लोकांच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहताना पाहिलेले आहे.

यानंतर श्री.पुरी..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार...

असे हे वेगळे व्यक्तिमत्व आहे. मराठी, हिंदी, ऊर्दू या सर्व भाषांमध्ये लिखाण करणारे, काव्य करणारे हे सर्वगामी व्यक्तिमत्व आहे. त्यांचे सभागृहातील भाषण एक तरी शेर म्हटल्याशिवाय पूर्ण होत नाही. हे त्यांचे वैशिष्ट आहे. दलित चळवळीतील, परंतु सामाजिक अभिसरणातील सामाजिक ऐक्य यांचा ख-या अर्थाने पुरस्कार करणाऱ्या आमच्या मित्रास निरोप देतांना दुःख होत आहे. त्यांनीही या सदनात पुन्हा परत यावे, अशी सदिच्छा मी त्यांना देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या प्रा. फौजिया खान यांनाही आपण निरोप देत आहोत. त्यांच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांनी म्हटल्या प्रमाणे, त्यांच्या घराला एक शैक्षणिक वारसा आहे. त्यांचे संपूर्ण घराणे सुशिक्षीत आहे. त्या स्वत: इंग्रजीच्या प्राध्यापिका आहेत. शैक्षणिक काम करीत असतांना, सामाजिक काम करतांना अत्यंत धिरोदत्तपणे, शांतपणे कुठेही विचलित न होता, त्या काम करतात. कधी कधी मध्येच व्यत्यय आला तर चांगले वक्तेही आपले मुद्दे सोडून देतात, परंतु मी फौजिया ताईंचे एक वैशिष्टय पाहिलेले आहे की, त्यांच्या भाषणात व्यत्यय आला तरीही त्या आपला मुद्दा कधीच सोडत नाही. त्यांनी येथे अतिशय सातत्याने विनम्रपणे आपला आग्रही मुद्दा मांडून आपले म्हणणे शासनाला पटवून दिलेले आहे. मग, तो कुपोषित बालकांचा विषय असो अथवा महिलांचा प्रश्न असो, तो सोडविण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्याने केलेला आहेत. त्यांनीही या सदनामध्ये परत यावे, अशी मी सदिच्छा व्यक्त करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, कर्नल सुधीर सावंत हेही निवृत्त होत आहेत. परंतु ते आज सभागृहात हजर नाहीत. मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, नॅशनल डिफेन्स अकॅडमी डेहराडूनसारख्या ठिकाणी निवड होत असतांना अत्यंत चिकित्सकपणे बुध्दीकौशल्य आणि इतर सर्व निकषांच्या आधारे त्या ठिकाणी निवड केली जाते. त्यातून निवडून आलेले ते एक आर्मीतील उत्तम ऑफिसर आहेत. कदाचित आज ते आर्मीत असते तर ब्रिगेडिअर पदापर्यंतही पोहचले असते. लोकसभेचे खासदार म्हणून आणि विधान परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी अतिशय चांगले काम केले. त्यांच्याही वडिलांचा राजकीय वारसा आहे. त्यांचे वडिल शेतकरी कामगार पक्षाचे आमदार होते. अशाप्रकारचा वारसा कर्नल सावंत यांना लाभलेला आहे. इंदिरा गांधीचे, राजीव गांधीचे आणि सोनिया गांधीचे एक अत्यंत निष्ठावंत सैनिक म्हणून त्यांनी काम केलेले आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार...

त्यांच्याबद्दलही मला अत्यंत आदर आहे. आज ते येथे उपस्थित नाहीत. त्यांनी अतिशय उत्तम काम केलेले आहे. मग ते माजी सैनिकांसाठी असो, राजकीय असो, कोकणच्या विकासासाठी असो अथवा काँग्रेस पक्षाच्या संघटनेकरिता असो त्यांनाही मी या निमित्ताने शुभेच्छा देतो की, त्यांनीही याठिकाणी परत यावे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जगन्नाथ शेवाळे यांनाही आज आपण निरोप देत आहोत. ते पुणे जिल्हयातील आहेत. त्यांनी माझ्यासोबत युवक काँग्रेसच्या चळवळीमध्ये काम केलेले आहे. थेऊरला असलेल्या यशवंत सहकारी साखर कारखान्यामध्ये अनेक वर्ष संचालक आणि उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केलेले आहे. या सभागृहाच्या माध्यमातून त्यांनी या ठिकाणी शेतक-यांचे प्रश्न अतिशय आत्मियतेने मांडले. त्यांनाही या निमित्ताने मी शुभेच्छा देतो व त्यांनीही या ठिकाणी परत यावे अशी मी त्यांना शुभेच्छा देतो.

या ठिकाणी निवृत्त होणा-या माझ्या सर्व बांधवांना व भगिनींना उदंड असे आयुष्य लाभावे तसेच त्यांच्या हातून उत्तमोत्तम असे कार्य व्हावे, अशी प्रार्थना करुन मी येथेच थांबतो.

धन्यवाद !

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, आपण अतिशय थकलेलो आहोत, आपल्या चेह-यावरुन ते दिसत आहे. निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांना आपल्याला चहा पाजावयाचा आहे, तोही थंड होत आहे. तेव्हा मी फक्त दोन मिनिटांत माझे म्हणणे संपवणार आहे. आपल्या सभागृहामधून जे सन्माननीय सदस्य निवृत्त होणार आहेत त्यांना निरोप देत असतांना आपल्या सगळयांची अंत:करणे जड झालेली आहेत. आपण जरी वेगवेगळया पक्षाचे असलो तरी आपण हसत-खेळत एकमेकांवर प्रेम करत अतिशय आनंदाने या सभागृहामध्ये काम करीत असतो. कधी हास्य निर्माण होते, कधी विनोद होतो, कधी राग येतो, कधी मतभेद होतात परंतु येथील मतभेदाला, टीकेला कधी द्वेषाची झालर नसते. मी जरी आज विरोधी पक्षात असलो तरी आणि निवृत्त होणारे सन्माननीय सदस्य जरी सत्ताधारी पक्षातील असले तरी आपण निवृत्त होत आहात म्हणून माझ्या अंत:करणामध्ये कुठेतरी दु:खाची एक झालर निर्माण होत आहे. आज जे सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत, त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड हेही निवृत्त होत आहेत. या सभागृहामधील एक तरुण, उत्साही आणि जनतेमध्ये जाऊन अतिशय मोठे कार्यक्रम करणारा तरुण नेते म्हणून महाराष्ट्राला ते परिचित आहेत. या सभागृहामध्ये अनेक प्रश्न त्यांनी अतिशय प्रखरतेने मांडलेले आहेत.

सभापती महोदय, ॲड.गुरुनाथ कुलकर्णीबद्दल मी काय बोलू ? त्यांचे आणि माझे खूप खटके उडाले. अनेकवेळा सभागृहामध्ये कॉन्स्टिटयूशनवर आणि कायद्यावर विशेषत: व्हॉयलेशनवर आमचे खटके उडाले. आजच व्हॉयलेशनसंदर्भात मुंबईच्या हायकोर्टात हिअरिंग संपले. यासंदर्भात मोठी केस सुरु आहे. सन्माननीय प्रा.बी.टी.देशमुख तीन दिवस मुंबईत होते. मी आणि त्यांनी माननीय राज्यपालांच्या निर्देशाबाबत हायकोर्टात केस टाकली.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.........

मी एकदा गमतीने म्हणालो की, गुरुनाथ कुलकर्णी महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल झाले असते तर बरे झाले असते. अर्थात श्री.गुरुनाथ कुलकर्णी हा एक उमदा मित्र होता आणि या सभागृहाच्या बाहेर निघाल्यावर त्यांनी कधी कटुता आणली नाही. एखाद्या प्रसंग आला की आम्ही नाराज होऊन सभागृहाच्या कामकाजावर बहिष्कार टाकून ज्यावेळी लॉबीमध्ये जाऊन बसायचो, त्यावेळी ते आमच्याजवळ येत, जाऊ द्या, मन मोकळे करा, असे आमच्या पाठीवर हात टाकून सांगत. अशाप्रकारे त्यांचा सर्वांशी व्यवहार अतिशय चांगलेला आहे. अतिशय चांगल्याप्रकारचे काम त्यांनी केले.

सभापती महोदय, प्रा.फौजिया खान यांची शिक्षणाची बॅकग्राऊंड अतिशय उत्तम आहे. मला वाटते त्या इंग्रजीच्या प्राध्यापिका आहेत. या सभागृहात महिलांचे प्रश्न, विशेषतः मुस्लिम समाजाच्या दृष्टीने महत्वाचे प्रश्न, अनेक संवेदनशील, सामाजिक मुद्यांबद्दल पोटतिडकीने त्यांनी आपले विचार मांडले. खरोखर त्यांच्या समाजाचे प्रतिनिधीत्व करणारी सुशिक्षित, उच्चविद्याविभूषित महिला म्हणून त्यांचा गौरव केला पाहिजे. मला माहित नाही, विधानपरिषदेच्या इतिहासात मुस्लिम महिला किती आल्या. पण गेल्या अठरा वर्षापासून मी पाहतो आहे, बहुदा त्याच एकटया असतील. त्यांनी या ठिकाणी येऊन अतिशय चांगल्या प्रकारे सभागृहाच्या कामकाजात भाग घेतला. त्यादृष्टीनेही त्यांचे योगदान मोठे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.वसंतराव चव्हाण फारसे सभागृहात बोलले नाहीत. परंतु, सगळयांना त्यांच्या विचारांची कायम सोबत राहिल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसेंचा आणि माझा जवळचा संबंध आहे. हा माणूस एक वेगळे रसायन आहे. आंबेडकरी चळवळीतून तयार झालेला कार्यकर्ता, कॉंग्रेस पक्षाचा झेंडा घेऊन इमानदारीने इतकी वर्षे काम करीत होता. मी नागपूरचे राजकारण जवळून बघितले आहे. निकोसेंचे एक होते, कोणाला हवेसे असो वा नकोसे असो, निकोसेंनी एक झेंडा घेऊन मन येईल त्याप्रमाणे भूमिका घेतल्या. नागपूरमध्ये विधानसभेमध्ये आम्हाला सगळयांना वाटत होते की, निकोसेना तिकिट मिळेल. ते येथील कॉंग्रेसचे पदाधिकारीही आहेत. दुर्देवाने त्यांना तिकिट मिळू शकले नाही. निकोसेंना या सभागृहामध्ये विदर्भाच्या प्रश्नावर, कामगारांच्या प्रश्नावर,

...2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.........

दलितांच्या प्रश्नावर अतिशय संवेदनशीलतेने विचार मांडतांना मी पाहिले आहे. त्यांचे स्वत:चे साहित्यिक आणि कवी म्हणून प्रगल्भ व्यक्तिमत्व आहे. आंबेडकरांवर त्यांची नितांत श्रध्दा आहे. खरे म्हणजे, एखाद्या विचारांवर श्रध्दा ठेवणारा माणूस , मग तो कोणत्याही विचारांचा असो, प्रामाणिक श्रध्दा असेल असा माणूस खरोखर माझ्या आदराचे स्थान असते. जय-पराजय, वाईट-चांगले, पक्षाचा-विरोधक असे असले तरी आपल्या विचारांवर प्रामाणिकपणे विश्वास ठेवून काम करणे ही खरे म्हणजे फार मोठी गोष्ट आहे. त्यांनी कायम आंबेडकरी विचारांवर श्रध्दा ठेवली. आपल्यापैकी अनेक लोकांनी देशपांडे सभागृहातील त्यांचा कार्यक्रम पाहिला असेल. मी देखील त्या कार्यक्रमाला गेलो होतो. लोकांसमोर, लोकांनी मला त्यांच्याबद्दल सांगितले. त्या ठिकाणी त्यांनी जे डायलॉग म्हणून दाखविले, अंगावर रोमांच उभे राहिले. आंबेडकरांच्या मुलाला आजार झाला आणि त्या मुलाला आंबेडकरांच्या पत्नीने डॉक्टरांकडे नेले, डॉक्टर उपचार करीत नव्हते, त्यामुळे आईचे आर्जव, त्या मुलाला वाचविण्याचा प्रयत्न, डॉक्टर ऐकत नव्हते, हे डायलॉग निकोसेंच्या तोंडून ऐकतांना क्षणभर मनामध्ये रोमांच उभे राहिले, याचे कारण त्यांची त्या विचारांशी असलेली प्रामाणिकता. स्वाभाविकपणे ते माझे अतिशय चांगले मित्र आहेत. त्यांचे नागपूरच्या राजकारणामध्ये प्रभूत्व आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धोंडिराम राठोड यांचेही वेळोवेळी अनेक विषयावर उत्तम मार्गदर्शन झाले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शेवाळे, श्री.धनाजी साठे या सगळया मंडळींनी सभागृहाची प्रतिष्ठा आणि सन्मान वाढविला. मेजर सावंत आज येथे नाहीत, याचे दु:ख आहे.

यानंतर श्री.बोरले........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ..........

खरे म्हणजे आपण सर्वांनी एक गोष्ट ठरविली पाहिजे. राजकारणी माणूस राजकारण करणारच. पण राजकारण करीत असतांना आपण एक गोष्ट ठरविली पाहिजे की, वाटेल ते झाले तरी चालेल, पण एका मर्यादेच्या पलिकडे आपण जाणार नाही. आपण एकमेकांचे विरोधक आहोत. पण एकमेकांचे शत्रू नाही. आपल्यामध्ये विचारांचे मतभेद असतील पण मतभेद होता कामा नये. लोकशाहीवर श्रध्दा ठेऊन आपण काम करीत असतो. सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत आज सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांनी पर्यटन विषय सभागृहात अतिशय उत्तमपणे मांडलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांच्याबद्दल मी काय बोलू. मी आपल्याला एवढेच सांगतो की, भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेच्या आमदारांपेक्षाही माझे आणि त्यांचे अत्यंत घरोब्याचे आणि जिव्हाळयाचे संबंध आहेत. सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी हे माझ ो शिक्षक होते. मी आठवीमध्ये असतांना त्यांनी मला मराठी विषय शिकविलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांचे व्यक्तिमत्व वेगळे आहे. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार आणि सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी हे सभागृहातील उत्तम नेतृत्व आहे. ही गोष्ट खरी आहे की, नागपूरमध्ये कोणताही सांस्कृतिक कार्यक्रम असो, संगीताचा कार्यक्रम असो तो कार्यक्रम सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांच्याशिवाय होऊच शकत नाही. मागच्या 10 वर्षात नागपूरच्या सांस्कृतिक, साहीत्यिक, संगीत, नाटक, कला हे सर्व क्षेत्र संपन्न करण्यामध्ये पहिल्या नंबरचे नाव कोणाचे असेल तर ते सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांचेच आहे. आम्ही त्यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली काम करतो. ज्यावेळी आम्ही एकत्र असतो त्यावेळी आमचे वाद होतात, ते म्हणतात तू अध्यक्ष हो आणि मी म्हणतो तुम्ही अध्यक्ष व्हा. ते माझे पक्षश्रेष्ठी आहेत. तुम्हाला तुमचे कर्तृत्व दाखवायचे असेल तर सत्ताधारी पक्षामध्ये राहून तुम्हाला तुमचे कर्तृत्व दाखविता येणार नाही. कारण सत्ताधारी पक्षामध्ये बोलण्यावर मर्यादा असतात. ते सत्ताधारी पक्षामध्ये असल्यामुळे त्यांचे विचार आपल्याला ऐकावयास मिळाले नाहीत. राजकीय नेता कसा असला पाहिजे, राजकीय नेत्याने 80 टक्के समाजकारण आणि 20 टक्के राजकारण केले पाहिजे. मी त्यांना नेहमी म्हणतो की, तुम्ही राजकारणापेक्षा समाजकारण करा. काही माणसे अशी असतात की, ती राजकारणात

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ..........

उठून दिसतात. परंतु समाजकारणात त्याही पेक्षा उठून दिसतात. सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी आणि मी अनेक वेळा एकमेकांविरुध्द लढलो. मग ती महानगरपालिकेची निवडणूक असेल किंवा इतर कोणती निवडणूक असेल. त्यांच्या पत्नीने आणि मुलाने त्यांना सांगितले की, तुम्ही कशाला नितीन गडकरींवर टीका करता ? त्यांचे कुटुंब ज्यावेळी माझ्या घरी जेवणासाठी आले त्यावेळी मी त्यांना सांगितले की, त्यांचे आणि माझे संबंध राजकीय नाहीत. त्यांनी यापेक्षा अजून 10 पट जरी टीका केली तरी आमचे संबंध तुटणार नाहीत. कारण त्यांचा पक्ष वेगळा आहे आणि माझा पक्ष वेगळा आहे. पक्ष वेगळा असल्यामुळे टीका करणे हे त्यांचे काम आहे. माझे काम त्यांच्या पक्षावर टीका करण्याचे आहे. आमच्या मैत्रीचा धागा एवढा पक्का आहे की, राजकारणामुळे तो तुटणार नाही. त्याची तुम्ही काळजी करु नका. खरोखर आमचे मैत्रीचे, प्रेमाचे संबंध असेच राहिले. तुमचा पक्ष काय करतो, आमचा पक्ष काय करतो ही चर्चा आमच्यामध्ये नसते. सांस्कृतिक कार्यकर्ता, नि:स्वार्थी कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. महाराष्ट्रामध्ये त्यांनी पर्यावरण क्षेत्रात चांगले काम केले म्हणून राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांचा गौरव झालेला आहे. नि:स्वार्थी, संवेदनशील आणि रचनात्मक कार्यकर्ता म्हणून सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी नागपूरच्या लोकांना परिचित आहेत.

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी......

राजकारण त्यांना फार काही मानवत नाही आणि म्हणून अनेकवेळा त्यांच्या संवेदनशील मनाला अडचणी येतात. या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांच्या रुपाने माझे एक उत्तम मित्र होते. या सभागृहाची खरोखर त्यांनी शान वाढविली.

आमच्या भगिनी सन्माननीय सदस्या श्रीमती.सुधाताई जोशी यांच्याबद्दल मी अनेक वेळा विनोद करीत होतो, परंतु आज मी येथे विनोद करणार नाही. मला खरोखर शल्य होते. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आणि सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी ज्यावेळी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्यासाठी सभागृहामध्ये उभे राहत होता, त्यावेळी मी परमेश्वराकडे प्रार्थना करायचो की, फक्त माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर अभिनंदनाचा ठराव मांडण्याची तुमच्यावर वेळ येऊ नये, तर शपथ घेऊन लोकांसाठी काहीतरी करण्याची देखील तुम्हाला संधी मिळाली पाहिजे. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी देखील या सभागृहामध्ये अतिशय उत्तम अशा प्रकारचे कार्य केले. एक संवेदनशील कार्यकर्त्या म्हणून त्यांचा आम्हाला परिचय झाला. महिलांच्या अनेक विषयांमध्ये त्यांचे अतिशय महत्वाचे योगदान आहे. निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांना निरोप देतांना मी परमेश्वरचरणी प्रार्थना करतो की, त्यांना उत्तम आरोग्य लाभो. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी आपण राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष आहात, तुमच्या पक्षाबद्दल सांगण्याचा मला अधिकार नाही परंतु सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांच्यासारखे सदस्य या सभागृहामध्ये पुन्हा निवडून येणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री.उल्हास पवार,सुधाकर गणगणे हे दोघेही काँग्रेसचे उपाध्यक्ष आहेत. मला विश्वास आहे की, ही जी मंडळी ज्यांनी आपल्याबरोबर 6 वर्ष काम केले ती पुन्हा या सभागृहामध्ये निवडून आली पाहिजेत. ही जी विधानपरिषद आहे, ती चालत्या गाडीसारखी आहे, यात लोक उतरत आणि चढत असतात. उतरणा-या आणि चढणा-या लोकांचा संबंध घनिष्ट होत जातो आणि वर्षानुवर्षे तो आपण विसरु शकत नाही. मी या सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून अभिनंदन करुन आणि शुभेच्छा व्यक्त करुन ते पुन्हा निवडून येवो न येवो त्यांचे आणि आमचे संबंध असेच राहतील,याची मी ग्वाही देतो. या सदस्यांनी या सभागृहामध्ये काम करीत असतांना या सभागृहाची गुणवत्ता आणि सन्मान सतत वाढविला आहे. मी निश्चितपणे त्यांना शुभेच्छा देतो

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी........

की, कधीतरी ते पुन्हा या सभागृहामध्ये येतील किंवा या लोकशाहीचे रक्षण करण्याकरिता त्यांना मोठी संधी जर मिळाली तर तेथेही ते उत्तमप्रमारे कार्य करु शकतील. निवृत्त होणा-या सदस्यांना मी मनापासून शुभेच्छा देऊन माझे दोन शब्द संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

डॉ.नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेले ) :सन्माननीय सभापती महोदय,आज या ठिकाणी एकूण 13 सन्माननीय सदस्यांना निरोप देण्यासाठी चर्चा उपस्थित केली गेलेली आहे. खर म्हणजे हा प्रघात आहे की, गटनेत्याने बोलल्यावर सदस्यांनी बोलावयाचे नाही. परंतु मार्टिन ल्युथर किंगचे एक वाक्य आहे " शत्रूचे अखेरचे शब्द विसरता येतात,परंतु मित्राचे मौन नाही." एक महिला सदस्या येथून निवृत्त होत असतांना तसेच,इतर सन्माननीय सदस्य निवृत्त होत असतांना माझ्या भावना व्यक्त करण्याची आणि त्यांना शुभेच्छा देण्याची संधी मला दिली म्हणून मी माननीय सभापतींचे आणि आमच्या पक्षाचे आभार मानते.

सन्माननीय सदस्य श्री.गिरीश गांधी यांच्याबद्दल आताच सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सुंदर व्यक्तिमत्व म्हणून विवेचन केलेले आहे. माझाही त्यांच्याशी अनेकवेळा संबंध आला संबंध म्हणण्यापेक्षा माझ्या आणि त्यांच्यामध्ये एक दुवा आहे. तो दुवा म्हणजे "कै.स्मिता पाटील " स्मिता पाटील यांच्याबद्दल "स्मिता स्मृती"नावाचा विशेषांक ते दरवेळी प्रकाशित करीत असत,ज्यावेळी पहिल्यांदा "महिलांचा राजकारणात सहभाग " या विषयावर विशेषांक विदर्भात तसेच, संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रकाशित केला होता. त्यावेळेस त्यांच्या कामाशी माझा परिचय झाला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमधील बैठकींच्या निमित्ताने,शासकीय बैठकांमध्ये,आदर्श गाव योजनांमधून आमचा परिचय वाढत गेला. ते आमचे चांगले स्नेही देखील आहेत. माजी विधानपरिषद सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे हे निवृत्त झाल्यावर आपण त्या जागी निवडून आल्यानंतर आम्हाला खूप आनंद झाला होता. आपल्याला पुन्हा या सभागृहामध्ये काम करण्याची संधी मिळेल,अशी मी शुभेच्छा व्यक्त करते.

सन्माननीय सदस्य मेजर सुधीर सावंत यांच्याबद्दल बोलावयाचे म्हटले तर कोकणचा प्रश्न म्हटला की सातत्याने अतिशय अहमहमिकेने बोलणा-या सन्माननीय सदस्यांमध्ये त्यांचा समावेश करावा लागेल. आज ते या सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांना फुंडकेश्वर लवकरात लवकर प्रसन्न होवो कारण सातत्याने ते कोकणामध्ये फुंडकेश्वरसाठी संघर्ष करीत होते.

सन्माननीय सदस्य श्री.धनाजी साठे यांचा आणि माझा महिलांचे हक्क व कल्याण समिती व आश्वासन समितीच्या माध्यमातून संबंध आलेला आहे. सोलापूर जिल्हयामधील दै.सकाळचे संपादक श्री.अरुण खोरे हे जे आमचे स्नेही आहेत.

यानंतर श्री.गागरे.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ पूर्वी कु.खर्चे 19:30

डॉ.नीलम गोऱ्हे .....

ते मला नेहमी विचारतात की, आमच्या सोलापूरचे श्री.धनाजी साठे कसे काय काम करतात. सोलापूर जिल्हयामध्ये आणि इतर उपेक्षित जिल्हयामध्ये त्यांचे स्थान आहे, त्यांना माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा. श्री.जगन्नाथ शेवाळे हे येथे आज उपस्थित नाहीत. त्यांचा माझा परिचय असा झाला की, डॉक्टर म्हणून मी हडपसर येथे 7-8 वर्षे प्रॅक्टीस केली. तेव्हापासून त्यांना एक कार्यकर्ता म्हणून मी ओळखते. पुणे जिल्हयातील कॉंग्रेस पक्षाचा कार्यकर्ता म्हटले की, अमुक एक अशी प्रतिमा असते. त्याच्या पलिकडे जाऊन अतिशय लो-प्रोफाईल, सहजगत्या सर्वांशी ॲडजेस्ट होणारे हे व्यक्तिमत्व आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची जेव्हा निर्मिती झाली. त्यावेळी पुणे जिल्हयात पक्षाचा पाया व्यवस्थित रचण्यासाठी त्यांची मदत झालेली आहे. पक्षाचा पाया घालणाऱ्यांमध्ये मोठ-मोठे नेते असले तरी ते काम निष्ठेने पुढे नेणाऱ्यांमध्ये श्री.शेवाळे यांचा समावेश आहे. सहकारी चळवळीतील कार्यकर्ते म्हणून मी त्यांना चांगल्या प्रकारे ओळखते. त्यांना पुढील भावी राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा देते. विशेषत: डी.पी.डी.सी.च्या मिटींगमध्ये आम्ही एकत्र येऊन प्रश्न मांडायचो. या मिटींगमध्ये कोणत्याही पक्षाचा वादविवाद न होता श्री.वसंतराव चव्हाण, श्री.जगन्नाथराव शेवाळे यांचे व माझे पुणे जिल्हयातील सर्व प्रश्नांवर उत्कृष्ट एकमत होते. मतभेद झाले तर प्रशासनाशी सर्वांचे मतभेद होत होते. अशी त्यांची कार्यपध्दती अविस्मरणीय आहे.

श्री.धोंडीराम राठोड व श्री.रमेश निकोसे हे दोघेजण बंजारा समाज व दलित चळवळीशी संबंधित असलेले कार्यकर्ते आहेत. बंजारा समाजाच्या महिलांचे वैशिष्टय आपण विसरु शकत नाही. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी बंजारा समाजाच्या महिलांच्या प्रतिष्ठेची सभागृहाला जाणीव करुन दिली होती. श्री.रमेश निकोसे हे प्रथम सभागृहात आले तेव्हा महिनाभर ते काय बोलत आहेत, हे मला कळायचे नाही. हळूहळू आंगणवाडीचा प्रश्न, आंबेडकरी चळवळ यावर चर्चा व्हायची. त्यांची कितीही थट्टा केली तर ही थट्टा ॲक्सेप्ट करत स्वत:चा मुद्दा ते पुढे सरकावीत असत. मला असे वाटते की, ज्यांचे मुद्दे सतत डावलले जातात, त्यांना हळूहळू सवय लागते की, कुशलतेने कसे आपले मुद्दे मांडायचे. त्यामध्ये श्री.धोंडीराम राठोड व श्री.रमेश निकोसे यांचा मी मुद्दाम समावेश करीन. त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा द्याव्या वाटतात. अतिशय चांगल्या प्रकारचे काम त्यांनी सभागृहात केलेले आहे. श्री.वसंतराव चव्हाण, श्री.गुरुनाथ कुलकर्णी, श्री.जितेंद्र आव्हाड, डॉ.एम.ए.अझिज, श्री.अब्दूल सत्तार या सदस्यांनाही मी शुभेच्छा देते.

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/

डॉ.नीलम गोऱ्हे .....

श्री.जितेंद्र आव्हाड म्हणजे संयुक्त महाराष्ट्राचा आवाज. ज्यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर सभागृहामध्ये भावना तीव्र असतात अशा वेळी कोठेही न डगमगता आमच्यापेक्षाही जास्त मोठयाने ओरडण्यामध्ये श्री.जितेंद्र आव्हाड पुढे असतात. ते आता निवृत्त होत आहेत. त्यांच्याएवढया जोरदार आवाजात घोषणा देण्यासाठी आम्हाला व्हिक्सच्या गोळया घ्याव्या लागतील. एखाद्या विषयावर मतभेद असले तरी त्यांना आमचे कायम सहकार्य राहील. पक्ष जरी वेगळे असले तरी तुम्ही ज्या जोमाने काम करीत आहात, त्यामुळे भावी आयुष्यासाठी तुम्हाला मन:पूर्वक शुभेच्छा देतो. माननीय उपसभापती महोदय ठाणे जिल्हयातील आहेत, आम्हाला ठाणे जिल्हयात सर्वांचे सहकार्य आहे, याची त्यांना कल्पना आहे. ते गंगा जमुनेमध्ये सरस्वतीसारखे अदृश्य आहेत. आम्ही खरोखरच सुदैवी आहोत की, आम्हाला वेळोवेळी सर्वांचे सहकार्य मिळत आहे. माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आमचे काम पुढे चाललेले आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे आज सभागृहात उपस्थित नाहीत. सभागृहात जेव्हा वादंग होतो, त्यावेळी लर्नेड ॲडव्होकेट म्हणून आपण त्यांची थट्टा करतो. त्यांचा आणि माझाही खूप वर्षांचा परिचय आहे. श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे सभागृहात आहेत आणि हमरीतुमरी झाली नाही असे साधारणपणे होत नाही. कोणत्याही वादविवादामध्ये ते अगदी तरुण असल्यासारखे उतरत असतात. त्यामुळे निरोप देत असताना त्यांना पुढची चांगली संधी मिळावी अशी मी अपेक्षा व्यक्त करते.

आमच्या दोन मैत्रिणी श्रीमती सुधाताई जोशी आणि प्रा.फौजिया खान या निवृत्त होत आहेत. राजकीय मतभेद असू शकतात. परंतु महिला समितीच्या निमित्ताने आम्ही बऱ्याचदा एकत्र काम केले आहे. कोणाला वाटत असेल की, महिला एकत्र गेल्या म्हणजे आमच्यामध्ये भांडणे होत असतील. परंतु आमच्यामध्ये एकदाही वादविवाद झाले नाही. आदिवासी आश्रमशाळांना भेट असेल, कोणत्या अधिकाऱ्यांची साक्ष घ्यायची असेल, एखादा मुद्दा शासनाकडे मांडावयाचा असेल अशा वेळेला त्यांची एक चांगल्या प्रकारे सुसंवादाची भूमिका असते. सभागृहात देखील अशा प्रश्नांवर आम्ही आवाज उठवत असतो. श्रीमती सुधाताई जोशी यांचा माझा परिचय खूप जुना आहे, त्या समाजकल्याण सल्लागार मंडळाच्या अध्यक्षा होत्या, त्यांच्या लक्षात आहे की नाही याची मला कल्पना नाही.

यानंतर कु.धनश्री.....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( **सभापतीस्थानी : माननीय तालिका सभापती श्री. अरविंद सावंत** )

डॉ. नीलम गोऱ्हे......

मस्जित भागामध्ये पूर्वी समाजकल्याण मंडळाचे एक कार्यालय होते. एका उच्च पदावर असलेली महिला इतक्या शांतपणे लोकांशी कशी काय बोलू शकते याचे मला त्यावेळी फार आश्चर्य वाटायचे. श्रीमती सुधाताई जोशी यांचा राजकीय प्रवास मी पाहिलेला आहे. महिलांच्या संदर्भात अनेक चांगली कामे त्यांनी केलेली आहेत. त्यांना पुढील आयुष्यामध्ये आणखी चांगली काम करण्याची संधी मिळावी अशी आशा व्यक्त करुन मी त्यांना शुभेच्छा देते.

सभापती महोदय, प्रा. फौजीया खान या आणखी एक भगिनी आज सभागृहातून निवृत्त होत आहे. त्यांच्याशी कामासंदर्भात अनेक वेळा आमची शाब्दिक चकमकी होत असत. तरी देखील त्यांच्या कार्याचे कौतुक करणाऱ्या लोकांमध्ये आमच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांचे बहुमत आहे. परभणी सारख्या जिल्हयामध्ये आपण काम करीत आहात. सभागृहामध्ये मुद्दे मांडण्याची अतिशय चांगली हातोटी त्यांच्याकडे आहे. त्यांना देखील मी याठिकाणी शुभेच्छा देते. एका नवकवीने केलेली कविता मी आपल्याला या आमच्या दोन मैत्रिणींबद्दल वाचून दाखविते.

आपली मैत्री "पेप्सी " सारखी नाही, " ये दिल मांगे मोअर....."
"बीपीएल " सारखी नाही, "बिलिव्ह इन द बेस्ट "
ती "रेमंड" सारखी नाही...,"1925 पासून....."
" आय सी आय " सारखी तर बिल्कुल नाही, "एट ए एम टू एट पीएम"
आपली मैत्री आहे, एल आय सी सारखी
" जिंदगी के साथ भी, जिंदगी के बाद भी"

.................

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. एम. ए. अझीज यांच्यावर वक्फ बोर्डाच्या संदर्भात मी काही वेळा सभागृहामध्ये टीका केली ही गोष्ट खरी आहे. परंतु ती टीका केवळ राजकीय टीका होती. त्यांनी या सभागृहामध्ये अनेक वर्षात फार चांगले योगदान दिले आहे. डॉ. एम.ए. अझीज मराठवाडयाच्या प्रश्नावर, अल्पसंख्यांकाच्या प्रश्नावर अतिशय प्रभावीपणे भूमिका मांडत असत. मघाशी माझ्या भाषणामध्ये त्यांचे नाव माझ्याकडून चुकून राहून गेले होते. मी त्यांचे याठिकाणी अभिनंदन करुन त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देतो. धन्यवाद.

................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

श्री. मंदा म्हात्रे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्याद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी गेल्या 6 वर्षामध्ये, जनसामान्यांच्या प्रश्नासाठी, राज्याच्या विकासासाठी, विविध आयुधे वापरून चांगले काम केले आहे. आमचे सहकारी मित्र व मैत्रिणी या सभागृहातून निवृत्त होत असताना, अतिशय भारावलेल्या मन:स्थितीमध्ये त्यांच्या कार्याचे वर्णन येथे केले जात आहे. सन्माननीय सदस्य श्री गिरीष गांधी अशा स्थितीमध्ये मला आता त्यांच्याबद्दल काय बोलावे हे सूचत नाही. तरी देखील मी त्यांच्याबद्दल आता बोलणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मघाशी सन्माननीय सदस्य श्री. गिरीष गांधी यांच्याबद्दल सभागृहात जी माहिती दिली ती खरी आहे. कारण मला सुध्दा त्यांच्या चांगुलपणाचे अनेक अनुभव आले आहेत. मी ज्यावेळी अडचणीत होते, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. गिरीष गांधी यांनी मला त्यांच्या शब्दांनी भावनिक आधार दिला होता. दु:खात असणाऱ्या व्यक्तिला आधार देण्यासाठी कोणत्या शब्दांचा वापर करावा हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. त्यांचा पुढाकार व सहभाग असलेल्या अनेक कार्यक्रमांच्या माध्यमातून मला विविध क्षेत्रात पुढे येण्याची त्यांनी संधी उपलब्ध करुन दिली. मी विविध विषयावर जे काही बोलते, सभागृहाच्या कामकाजात सक्रीय सहभाग घेते यात त्यांचाही सिंहाचा वाटा आहे हे मी कधीच विसरु शकणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना याची कल्पना आहे. त्यांना मिळालेले पुरस्कार, त्यांची वैचारिक जडणघडण, त्यांची काम करण्याची पद्धत या सर्व गोष्टींकडे पाहता, त्यांच्यासारखी व्यक्ति उच्च पदावर असावयास पाहिजे असे मला वाटते. आज सभागृहामध्ये सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील उपस्थित आहेत.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ कु. गायकवाड नंतर --- 19:40

श्रीमती म्हात्रे ....

तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष असलेले सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी साहेब हेही येथे उपस्थित आहेत. मी या दोन्ही सन्माननीय नेत्यांना सांगू इच्छिते की, श्री. गिरीश गांधी यांच्या सारख्या विचारवंतांना पक्षाने या सदनामध्ये येण्याची पुन्हा संधी दिली पाहिजे. अशा विचारवंतांमुळेच या सभागृहाची प्रतिष्ठा आणि मानसन्मान उंचावतो. सभापती महोदय, मी तर चळवळीतील एक साधी कार्यकर्ती होते, झोपडपट्टीमध्ये काम करणारी एक महिला कार्यकर्ती होते. माझ्या सारख्या कार्यकर्तीवर अन्याय होऊ नये म्हणून माननीय श्री.गिरीश गांधी यांनी मला नेहमीच सहकार्य केले आहे. मंदा म्हात्रेला कुठे तरी संधी मिळाली पाहिजे असे सतत त्यांना वाटत होते. इतरांसाठी झ टणारे फार कमी असतात. श्री.गिरीश गांधी यांचे मोठेपण यातच आहे. ते नेहमीच इतरांचाच विचार करतात. म्हणूनच अशा व्यक्ती पुन्हा पुन्हा या सभागृहात आल्या पाहिजेत. एक वेळ आमच्या सारख्यांचा विचार त्यासाठी झाला नाही तरी चालेल. पण त्यांचे उत्तम विचार या सभागृहाला मिळाले पाहिजेत असे मला वाटते. सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार यांनाही माझा हा स्वभाव माहिती आहे. ते काँग्रेसचे निरीक्षक होते. त्यांनी मला त्यावेळी सांगितले की., मंदाताई आताच्या आता तुम्ही महिला व बालकल्याण समिती सभापतीपदाचा राजीनामा द्या. मी कुलाही विचार न करता, राजीनामा मागण्यामागील कारण न विचारता राजीनामा दिला होता. त्याची उल्हासदादांनाही आठवण असेल. तेव्हा पक्षासाठी निष्ठावंत कार्यकर्ते हवेत. अशा निष्ठावंतांचा नेहमीच विचार केला जातो. माझ्या व माझ्या कुटुंबियांतर्फे मी सन्माननीय श्री.गिरीश गांधी यांना मनापासून शुभेच्छा देते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी हेही या सभागृहातून निवृत्त होत आहेत. त्यांना आम्ही आमच्या पक्षकार्यालयात 'गुरूजी' म्हणतो. त्यांचा स्वभाव कडक असला तरी ते अगदी फणसासारखे आहेत. फणस वरून खडबडीत असला तरी आतून मऊ व गोड असतो. तसे पक्ष-कार्यालयात आमचे नेहमीच तात्त्विक भांडण होत असते. कधी मला ते दम देतात तर मी त्यांना आव्हान देते. वाद घालते. पण काही वेळानंतर पुन्हा वातावरण पूर्ववत होते. आज आजारपणामुळे ते सभागृहात उपस्थित नाहीत. अत्यंत अभ्यासू असणाऱ्या गुरूजींची उणीव या अधिवेशनात आम्हाला सतत जाणवली. कोणताही प्रश्न असो, वादाचा प्रसंग असो, ते नेहमीच हिरीरीने भाग घेत असत. ते त्यांच्या आजारपणातून लवकर बरे होवोत आणि पुन्हा या सभागृहात सदस्य म्हणून येवोत अशी मी त्यांना शुभेच्छा देते.

....5सी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती म्हात्रे ....

सभापती महोदय, आमच्या ठाणे जिल्ह्याचे सुपुत्र श्री.जितेंद्र आव्हाड हेही या सभागृहातून निवृत्त होत आहेत. अत्यंत तडफदार आणि जिद्दीचा तरूण म्हणून त्यांची सर्वत्र ओळख आहे. त्यांच्या कार्याची मलाही चांगली माहिती आहे. ते राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष असतानाच मी राष्ट्रवादी महिला काँग्रेसची प्रदेशाध्यक्षा होते. त्यावेळी संयुक्तपणे अनेक कार्यक्रमांना आम्ही उपस्थित रहात होतो. या सभागृहाच्या माध्यमातून त्यांनी विविध प्रश्न सोडविले आहेत. मग ते दलितांचे प्रश्न असतील, कामगारांचे असतील, बेरोजगारांचे असतील. प्रत्येक वेळी हिरीरीने, आक्रमकपणे त्यांनी या सभागृहात आवाज उठविला आणि जनसामान्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. या सभागृहात महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नी चर्चा उपस्थित झाली तेव्हा बेळगाव-कारवार मधील मराठी जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आग्रह धरला. अशा अभ्यासू, आक्रमक तरूणांचीच खऱ्या अर्थाने या सभागृहाला गरज आहे. त्यांना समाजात मोठे मानाचे स्थान मिळेल यात शंकाच नाही. त्यांना माझ्यातर्फे हार्दिक शुभेच्छा.

सभापती महोदय, माझ्या अतिशय जवळच्या सहकारी, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी या माझ्या केवळ मैत्रीण नाहीत तर मार्गदर्शिका देखील आहेत. त्या राष्ट्रीय काँग्रेसच्या सरचिटणीस असताना मी जिल्ह्याच्या महिला कॉग्रेसची पदाधिकारी होते. तेव्हापासून मला त्यांचे मार्गदर्शन मिळत आहे. या सभागृहात आले तेव्हा मी नवीनच होते. माझा अनुभव केवळ महापालिकेतील कामाचा होता. त्यामुळे या सभागृहात कसे बोलावे ते सुचतच नव्हते. मला भीती वाटत होती. नागपूर येथे तर मी प्रथमच आले होते. परंतु मला सुधाताईंनी अत्यंत मोलाचे असे मार्गदर्शन केले. प्रश्न कसे उपस्थित करावेत, विविध समस्या कोणकोणत्या माध्यमातून मांडाव्यात, सभागृहात कसे बोलावे, या विषयी त्यांनी मला उत्तम मार्गदर्शन केले. त्यांना मी 'आई'ची उपमा दिली तरी ती कीच आहे असे मला वाटते. कारण सभागृहात प्रथमच येणाऱ्या सदस्याला मार्गदर्शन मिळणे महत्त्वाचे असते. मला त्यांनी नेहमीच मार्गदर्शन व सहकार्य केले आहे. काँग्रेस पक्षाच्या त्या निष्ठावंत कार्यकर्त्या आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या पक्षातर्फे या सभागृहात येण्याची पुन्हा संधी मिळेल किंवा याहून मोठी संधी, कामगिरी मिळेल याची मला खात्री आहे. त्यासाठी माझ्या त्यांना शुभेच्छा आहेत.

...... 5सी 3 ...



KBS/ कु. गायकवाड नंतर --- 19:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती म्हात्रे ....

सभापती महोदय, या सभागृहातून निवृत्त होणारी माझी दुसरी सहकारी, मैत्रीण म्हणजे सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान. तसे पाहिले तर त्यांना राजकीय क्षेत्राचा अनुभव नव्हता. त्या शैक्षणिक द्योत्रात काम करीत होत्या. नगरपरिषदेची निवडणूक लढविली परंतु यश मिळाले नाही. परंतु त्यांना समाजाबद्दल असलेली तळमळ, त्यांच्या सामाजिक समस्यांबद्दलची तळमळ पाहून त्यांना पक्षाने या सभागृहात येण्याची संधी दिली आणि त्या संधीचे त्यांनी सोने केले असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. त्यांनी वेळोवेळी या सभागृहात मांडलेले प्रश्न, प्रस्ताव पाहिल्यास, त्यांची भाषणे ऐकल्यानंतर त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील अनुभवाची आणि सामाजिक आस्थेची जाणीव होते. महिलांबद्दलचे अनेक प्रश्न या सभागृहात मांडून त्यांनी उत्कृष्ट असे काम केले आहे. भविष्यात त्यांना पुन्हा या सभागृहात येण्याची संधी मिळो अशा मी त्यांना शुभेच्छा देते.

( यानंतर श्री. सरफरे .... 5डी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे....

सभापती महोदय, त्याचप्रमाणे माननीय सदस्य डॉ. अझिज साहेब हे अत्यंत शांत आणि सुस्वभावी परंतु पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत. त्यांनी या सभागृहामध्ये चांगले काम केले आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्य सर्वश्री वसंतराव चव्हाण, रमेश निकोसे यांच्या बाबतीत बोलावयाचे झ ाले तर निकोसे साहेबांचे नाटक मी पाहिले आहे. ते नाटकातील भूमिकेमध्ये अगदी समरस होऊन गेले होते. त्या नाटकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आमच्यासमोर बोलत उभे आहेत की काय? असे वाटावे. तेव्हा आपल्या भूमिकेमध्ये कसे समरस व्हावे हे त्यांच्याकडून आपण शिकले पाहिजे. भूमिका कोणतीही असली तरी त्यामध्ये चांगल्या प्रकारे काम केले पाहिजे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड, माननीय सदस्य श्री. जगन्नाथ शेवाळे, श्री.सुधीर सावंत आणि माननीय सदस्य श्री. धनाजी साठे यांनी देखील समाजामध्ये आणि या सभागृहामध्ये चांगले काम केले आहे. मी या सर्व माननीय सदस्यांना त्यांच्या भावी आयुष्यामध्ये फार मोठी संधी उपलब्ध व्हावी अशाप्रकारे पुन्हा एकदा मनापासून शुभेच्छा देते आणि माझे भाषण संपविते. धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ 19:45

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, याठिकाणी सभागृहाचा वेळ जाईल. परंतु या सभागृहाचा वेळ अनेक वेळा वेगळया पध्दतीने सुध्दा जातो. या सभागृहामधून जे 13 माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. साधारपणे, दुर्दैवाने राजकीय जीवनाचा विषारी स्पर्श जीवनाच्या सर्व क्षेत्राला झाला आहे. महाराष्ट्रामध्ये एकमेव क्षेत्र असे आहे की, जिथे मैत्रीला अमृताचा स्पर्श आहे, हे आता या माननीय सदस्यांना निरोप देत असतांना लक्षात आले. कारण आपण नेहमी सभागृहामध्ये राजकीय अभिनिवेशाने बोलत असतो. यावेळी दादा बोलत असतांना आणि सर्व मंडळी बोलत असतांना लक्षात आले की, महाराष्ट्राची संस्कृती वेगळी आहे. याठिकाणी दोन-तीन गोष्टींचा उल्लेख केला पाहिजे. सभापती महोदय, याठिकाणी निवृत्त होणारे माननीय सदस्य सर्वश्री जितेंद्र आव्हाड, गुरुनाथ कुलकर्णी, सर्वश्रीमती फौजिया खान, सुधा जोशी, सर्वश्री वसंत चव्हाण, धनाजी साठे, धोंडीराम राठोड, गिरीश गांधी, जगन्नाथ शेवाळे, रमेश निकोसे, कर्नल सुधीर सावंत आणि डॉ. एम.ए.अझिज हे निवृत्त होणार आहेत. याबाबत आबा मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्या पार्टीबद्दल आम्हाला बोलण्याचा काहीही अधिकार नाही. परंतु गुरुनाथ कुलकर्णी हे आपल्या पार्टीचे ॲसेट्स आहेत. अनेक वेळा बाहेर बोलत असतांना ते म्हएरत असत की, "राजकारणामध्ये आम्ही काही प्राप्त करण्यासाठी याठिकाणी आलो नाही तर काही ध्येयाने प्रेरित होऊन आम्ही याठिकाणी काम करतो." माझी वकिली अतिशय चांगली चालली आहे. कधी कधी काही गोष्टी इथे बोलत असतांना मला वाटते की, याठिकाणी एखादा मुद्दा, विचार मांडला जात असतांना आपण चुकीचे तर बोलत नाही ना? मर्यादेच्या पलिकडे बोलत नाही ना? परवा माननीय श्री. गांधी साहेब एका विषयावर बोलत होते. आणि त्यांचा स्वभाव पाहून नंतर माझ्‍ या मनाला वाटायला लागले. मी बाहेर त्यांची भेट घेवून क्षमा मागितली आणि म्हणालो की," मी विषय म्हणून आपल्यासमोर कठोर बोललो." परंतु नंतर ज्यांची ओळख नसतांना सुध्दा त्यांचा स्वभाव पाहून सभागृहात बोलतांना आपल्या तोंडातून अधिकचा शब्द तर गेला नाही ना? काही परिचय नसतांना सुध्दा क्षमा मागायला लागावी यातच त्यांच्या व्यक्तिमत्वाचे मोठेपण आहे. सभापती महोदय, काही माणसे जवळ गेल्यानंतर किती लहान आहेत हे लक्षात येते. तर काही माणसे जवळ गेल्यानंतर किती मोठी आहेत हे लक्षात येते. आपण माणसांची परीक्षा लांबून करण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या बाह्य रुपावरुन परीक्षा करण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यांच्या अंतरंगाचे परीक्षण करण्याचा कधीही प्रयत्न करीत नाही.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. मधुकर चव्हाण....

याठिकाणी माननीय श्री. अझीजभाईना पहात होतो. वक्फ बोर्डासंबधी एकाच पक्षाच्या दोन कार्यकर्त्यांमध्ये आपापसात चाललेली प्रश्नोत्तर आम्ही पहात होतो. पण त्यावेळी या माणसाने कधीही आपला संयम सोडला नाही. एक-दोन प्रसंग सोडले तर हे सर्व मुस्लिम सदस्य त्यांच्या व्यक्तिगत भावना व्यक्त करीत असतांना दुसऱ्याचा अपमान होईल अशा धर्माभिनिवेशाने कधीही बोलले नाहीत. मी सुध्दा बोलतो, त्यामुळे त्यांनीही बोलले पाहिजे. हे माननीय श्री. अझिजभाईंचे वैशिष्टय आहे.

माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशींबद्दल मला असे वाटते की, श्रीमती मंदाताई त्यांच्यासंबंधी चांगल्याच बोलल्या. आम्ही अंदाज समितीमध्ये एकत्र काम करीत असतो. एकत्रपणे प्रवासाला जात असतो. ज्याला आपण आईची उपमा द्यावी... मुळामध्ये स्त्री आणि ममता हे दोन शब्द एकत्र जातात. स्त्री म्हटली की, प्रेम आणि ममता या दोन शब्दात फार फरक आहे. "प्रेम" हा माणसातील शब्द कधी तरी आटू शकतो, बुडबुडयासारखा किनाऱ्याला लागून फूटू शकतो. "ममता" ही जसजशी सूर्य वर येत जातो तसतशी तिची व्यापकता होत जाते. त्यामध्ये त्याचे ममत्व सामावून जात असते. त्यामुळे मला असे वाटते की, त्यांच्यामध्ये मला ममता पहावयास मिळाली. मी माननीय सदस्य श्री. गडकरींना म्हणावयाचो की, तुम्ही नको हो त्यांना बोलू ? परंतु मला असे वाटते की, माणसाने आयुष्यात काय बोलावे यापेक्षा काय बोलू नये हे ठरवावे लागते. हे ठरविणारी मंडळी याठिकाणी बसली आहेत. त्यापैकी सुधाताई आहेत त्या कधी चिडल्या नाहीत.

त्यानंतर माननीय सदस्या प्रा. फौजिया खान यांचेबाबत बोलतो. मी खरंच सांगतो की, आम्ही याठिकाणी हिंदुत्वाच्या अभिनिवेशाने बोलतो. त्यावेळी सभागृह दहा मिनिटे स्थगित झाल्यानंतर त्या माझ्याशी बोलायच्या. " क्या यहाँ ऐसा बोलना ठीक है, ऐसा नहीं बोलना चाहिए, ऐसा मुझे लगता है. क्या आपको अच्छा लगता है ? मग वाटायचे की, आपण मर्यादेचे उल्लंधन तर केले नाही ? आपण जास्त अभिनिवेशाने बोललो नाही. मला वाटते. हे याठिकाणी अतिशय महत्वाचे आहे.

(यानंतर श्री. बरवड)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

मघाशी सन्माननीय सदस्य श्री. उल्लासदादांनी जो उल्लेख केला त्याचा परत उल्लेख करावासा वाटतो. सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया ताई, मला आपल्याला सांगण्याचा अधिकार नाही. आमच्या हिंदू समाजामध्ये आम्ही स्त्रीच्या बाबतीत ती अधिक कशी शिकेल, अधिक कशी मोठी होईल हे बघत असतो. आपण मुस्लीम समाजामध्ये आपल्यासारख्या महिला अधिक कशा शिकतील, त्यांना प्रतिष्ठा कशी प्राप्त होईल हे पाहिले पाहिजे. ती केवळ चूल आणि मूल सांभाळण्यापुरतीच मर्यादित नाही तर ती विश्वाची माता आहे. आचार्य अत्रे यांनी असे म्हटले आहे की, स्त्री ही क्षणाची पत्नी आहे परंतु ती अनंत काळची माता आहे. आमच्या समाजामध्ये तिला मातृत्वाची भूमिका दिलेली आहे. आपल्या समाजामध्ये आपल्यासारख्या अशा अनेक स्त्रिया मोठ्या कशा होतील हे आपण पाहिले पाहिजे. मी या ठिकाणी कोणत्याही सदस्याबद्दल सांगत नाही. मी माझ्या व्यक्तिगत भावना व्यक्त करीत आहे. राजकारण हे जीवनामध्ये आपल्या गुणांचे संवर्धन करण्याचे एकमेव क्षेत्र नाही. येथून निवृत्त झाल्यानंतर आता आपले सर्व संपले असे आपण समजण्याचे कारण नाही. आपला पक्ष आपल्याला तिकिट देईल, आपण परत येऊ. परंतु या ठिकाणी कोणामुळे काही अडत नाही. "राम कृष्णही आले गेले, त्या विण जग का ओसचि पडले ? अशा जगास्तव का कुंठावे, मोही कुणाच्या का गुंतावे." राजकारणाचा मोह तर कधी कधी एवढा वाईट आहे की, आपल्याला सतत सत्तेवर राहावेसे वाटते. आपल्या अंगावर सतत कोणत्या तरी पदाची झूल पांघरूण राहावे असे वाटत असते. मला असे वाटते की, निवृत्तीचा क्षण हा कधी वेदनेचा क्षण मानू नये. या ठिकाणी आलो तर ठीक, नाही तर सी-सॉची बाहुली जशी फेकल्यानंतर अशी उभी राहते तसे जीवनाच्या ज्या क्षेत्रात जाईन त्या ठिकाणी परमेश्वराने दिलेल्या माझ्या अंगभूत गुणांनी मी काम करीन असे आपण समजले पाहिजे. म्हणून तो गुण मी त्यांच्याकडून घेतलेला आहे.

सन्माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड यांच्याशी माझा जास्त परिचय नाही. परंतु आम्ही जेव्हा परदेशात गेलो होतो त्यावेळचा एक प्रसंग अर्ध्या मिनिटात सांगतो आणि माझे भाषण संपवतो. कारण सगळ्यांना या ठिकाणी बोलावयाचे आहे. तसेच चहा थंड होईल. क्षण येतील पण काही क्षण असे असतात आणि विशेषत: निरोपाचे क्षण असे असतात की, वारा जसा मुठीत पकडता



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. मधुकर चव्हाण ......

येत नाही तसे तोंडातून बाहेर पडलेले शब्द कानात गेले तरी ते मुठीत साठवता येत नाहीत. ते मनामध्ये ठेवावे लागतात. आम्ही त्या ठिकाणी गेल्यानंतर एक दिवस त्यांचा बी.पी. वाढला. त्यांनी मला आणि श्री. डावखरे साहेबांना सांगितले की, माझा बी.पी.वाढला आहे हे माझ्या बायकोला सांगू नका, कारण ती घाबरेल. म्हणजे कुटुंब वत्सलता किती असते ती त्या ठिकाणी माझ्या लक्षात आली.

सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या बद्दल सांगावयाचे म्हणजे कधी कधी आम्ही त्याच्या विरोधात आवेशाने बोलत असू. जसे सन्माननीय श्री. डावखरे साहेबांनी ठाणे जिल्ह्यामध्ये आपले एक वेगळे क्षेत्र निर्माण केले आहे त्याप्रमाणे श्री. जितेंद्र आव्हाड यांनी ठाणे जिल्ह्यामध्ये सांस्कृतिक जीवनामध्ये एक काम उभे केले आहे. परवा सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी हंड्या उभारताना जे सात थर लावले जातात त्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यामागे त्यांचा विचार लहान मुले पडून अपघात होऊ नये हा होता. पण मी केलेल्या कामामध्ये कोठे अडचण तर येणार नाही ना, आपण स्वीकारलेल्या कामामध्ये हुरहुर लागणे हेच खरे प्रामाणिकपणाचे लक्षण असते. नाटक म्हणून अनेक लोक काम करतात. ध्येय स्वीकारणे हे फार सोपे असते. शपथ लेना तो सरल है पर निभाना ही कठीण है. साधना का पथ कठीण है. असे म्हटले जाते. तरी एखादे क्षेत्र स्वीकारल्यानंतर त्यामध्ये सुध्दा दहीहंडी लावण्यासाठी बाधा तर येणार नाही ना, आपण मंदाताईंना समजावून सांगू असे म्हणाले. असा तो एक उमदा मित्र आहे असे मला वाटते. त्या ठिकाणी आपण कोणत्याही पक्षात असा. कारण शेवटी आपण सगळ्यांनी मिळून वयं पंचादिकं शतम् या भावनेने आपण या महाराष्ट्रामध्ये काम करीत आहोत आणि या महाराष्ट्राचा विकास करीत आहोत.

सन्माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे साहेब, आपण बाबासाहेब आंबेडकर यांचे आदर्श बाळगता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील सगळ्यात महत्वाचा गुण मी वाचला. आपण अशी समजूत करुन घेऊ नका की सवर्ण साहित्य वाचत नाही. मी त्या सवर्णांपैकी एक आहे. या देशामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे काम तर खूप मोठे आहे. परंतु पिढ्या न पिढ्याला पुरेल असे फार मोठे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले आहे. त्यांचा सगळ्यात मोठा गुण मला

...3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

आपल्यात दिसला तो म्हणजे आपण कधी संयम सोडला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या चळवळीमध्ये कधी संयम सोडला नाही. मला माणूस म्हणून काळाराम मंदिरामध्ये दर्शन घेण्याचा अधिकार आहे, हे त्यांनी सांगितले. जमलेल्या जमावाला प्रेरणा देऊन, प्रोत्साहित करुन त्या मंदिरावर शेण मारा हे त्यांनी सांगितले नाही. संयमाने आपल्याला हवे ते प्राप्त करुन घेऊ शकतो. चवदार तळ्याचे पाणी मला माणूस म्हणून पिण्याचा अधिकार आहे. त्या चवदार तळ्यात घाण टाका असे त्यांनी सांगितले नाही. बाबासाहेब आंबेडकर यांनी मिळविलेले हक्क आणि केलेली दलित चळवळ ही आपली सीमारेषा आखून पण आपला मुद्दा न सोडता त्यांनी केली. तो गुण मला आपल्यामध्ये पहावयास मिळाला. आपण कधी जातीय अभिनिवेशाने बोलला नाहीत. परंतु कधी कधी आपण जरी बोलला तरी हे लक्षात ठेवले पाहिजे की, गाडगी मडकी गळ्यात बांधल्यानंतर काय अवस्था होते ? क्षणभर आपण अशी कल्पना केली की, माझी सावली देखील कोणी पडू देत नाही, मग आपल्या अंगावर शहारे येतात.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

गेली दोन-चार वर्षे मी आपला संयमीपणा बघतोय. काही माणसे मला माहीत आहेत परंतु मी मुख्यमंत्र्यांचा जवळचा मित्र आहे, त्यांच्याकडून काही काम करुन आणून देतो असा अविर्भाव सन्माननीय सदस्य श्री धनाजी साठे यांनी कधी दाखविला नाही. काही वेळा राजाची सावली सुध्दा जनतेला घाबरवून टाकते. त्या सावलीमध्ये काही नसते. पण राजाच्या सावलीला राजाचा मुकूट असतो. त्यामुळे ती सावली राजापेक्षासुध्दा मोठी असते. काही वेळा सूर्यापेक्षा वाळू जास्त तापते. तसे काही लोक सत्ताधीशांची जास्त चमचेगिरी करीत असतात. मी महाराष्ट्राच्या प्रमुखपदी असलेल्या व्यक्तीचा बालमित्र आहे असे श्री.धनाजी साठे यांनी कधीही दाखविले नाही. त्यांची मृदुता मी पाहिलेली आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री. जगन्नाथ शेवाळे हे देखील निवृत्त होत आहेत. मी परमेश्वराजवळ अशी प्रार्थना करतो की, या ठिकाणी ही जी सर्वसमावेकता या ठिकाणी व्यक्त केली गेली. या सदनामध्ये अनेक विषयावर काम करीत असताना आपण त्याच भावनेने काम करु. मी तर यातील अनेक सन्माननीय सदस्यांपेक्षा वयाने लहान आहे. परंतु नैतिक अधिकाराचे दोन्ही पक्षाचे जे धुरीण येथे बसलेले आहेत त्यांना मी विनंती करीन की या पक्षातील काही माणसे या सभागृहामध्ये पुन्हा यावीत. मी परमेश्वराजवळ पार्थना करतो की, आपणा सर्वांना परमेश्वर उदंड आयुष्य देवो, चांगले आरोग्य देवो आणि ज्या पक्षात आपण आहात त्या पक्षाशी निष्ठेने राहून या भारतमातेची सेवा तुमच्या हातून घडो एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, गेले तीन दिवस हा निरोपाचा कार्यक्रम कधी होणार याची चिंता मला लागलेली होती. आज आपण सर्वजण अतिशय जड अंत:करणाने या निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांना निरोप देत आहोत. जवळपास 13 सन्माननीय सदस्यांना आपण निरोप देत आहोत. त्यातील 4 सन्माननीय सदस्य हे माझ्या मराठवाडा विभागातील आहेत. या सभागृहामध्ये मी वयाने सर्वांपेक्षा लहान आहे. म्हणून मी हात वर केला की सगळीकडून, खाली बस, असा आवाज येतो.

सभापती महोदय, ज्यांच्याकडे पाहिल्यानंतर सानेगुरुजींची आठवण होते, ज्यांच्या दर्शनाने ते आधुनिक काळातील गांधी असल्यासारखे वाटते ते आमचे सन्माननीय सदस्य श्री. गिरीषभाई गांधी. खरे म्हणजे त्यांचा आणि माझा जास्त परिचय नाही. 19 नोव्हेंबर पासून आजपर्यन्त त्यांचा आणि माझा परिचय झाला. या येवढ्या परिचयाच्या काळामध्ये त्यांनी काल मला घरी चहापानासाठी बोलावले. त्यांच्या घरी जाण्यापूर्वी त्यांचे घर मोठे भव्यदिव्य असेल असे मला वाटले होते. प्रत्येक माणसाचे आपापले विचार असतात. तसे मला त्यांच्या घरी जाण्यापूर्वी वाटले. पण मी त्यांच्या घरी गेल्यानंतर, हेच का तुमचे घर, असे त्यांना विचारावेसे वाटते. म्हणजे अत्यंत साधी अशी त्यांची राहाणी आणि घर मला दिसून आले. त्यांच्यावर सानेगुरुजी आणि महात्मा गांधी यांच्या विचारांचा पगडा आहे. त्यांना विधानपरिषद सदस्यत्वाचा अतिशय अल्प कालावधी मिळाला. या कालावधीत त्यांनी विदर्भाचे आणि विविध सामाजिक प्रश्न या सभागृहाच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न केला. वनराईच्या माध्यमातून त्यांचे काम चालू आहे. पक्षावरील निष्ठा हे त्यांचे द्योतक आहे. त्यांच्या पक्षाचे नेते आणि प्रदेशाध्यक्ष या सदनामध्ये उपस्थित आहेत. मी काही सांगितले तर तो लहान तोंडी मोठा घास होईल. परंतु बाहेर जे बोलले जाते ते मला समजले. मी जेव्हा बाहेर चहापिण्यासाठी गेलो त्यावेळी काही लोक असे बोलत होते की आज सन्माननीय सदस्यांना निरोप आहे, परंतु श्री. गिरीष गांधी यांना आणखी संधी मिळणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. गिरीष गांधी हे समोर आहेत म्हणून मी हे बोलत नाही तर ही वस्तुस्थिती आहे. कारण आज अशा व्यक्तिमत्वाची येथे गरज आहे. म्हणून त्यांनी पुन्हा याठिकाणी यावे अशी सदिच्छा मी व्यक्त करतो.

...नंतर श्री. भोगले...

श्री.विक्रम काळे..........

सभापती महोदय, आदरणीय ॲड.गुरुनाथ कुलकर्णी साहेब, ज्यांच्याकडे पाहिल्यांनतर ते दिसायला जरी ऊंच दिसत असले तरी मनाने आणि व्यक्तिमत्वानेही तितक्याच ऊंचीचे आहेत. काँग्रेस पक्षापासून त्यांनी आपल्या राजकीय जीवनाला सुरुवात केली. व्यवसायाने वकील असले तरी पक्षनिष्ठा काय असते हा गुण आम्हा तरुण कार्यकर्त्यांनी त्यांच्याकडून घेण्यासारखा आहे. पक्षात सुध्दा शिस्तीचा माणूस म्हणून आज उभ्या महाराष्ट्रातील राष्ट्रवादी पक्षाचा कार्यकर्ता त्यांच्याकडे पाहतो. खरे म्हणजे आज ते सभागृहात उपस्थित नाहीत. ईश्वरचरणी आम्ही प्रार्थना करु की, पुढचे त्यांचे आयुष्य निश्चितपणाने त्याच उमेदीने पार पडो आणि सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी साहेब आम्हाला या सभागृहामध्ये पुन्हा पहायला मिळतील अशा शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, आमचे तरुण मित्र सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड हे व्यवसायाने मरिन इंजिनिअर, एनएसयुआय या विद्यार्थी संघटनेपासून त्यांनी राजकीय जीवनाला सुरुवात केली. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सुध्दा ते अध्यक्ष राहिले होते. सातत्याने या सभागृहामध्ये त्यांचा आणि माझा जो संबंध आला, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड सभागृहात आले म्हटल्यानंतर आता काही तरी निश्चितपणे ठोस घडणार असे नेहमी मला वाटत असे. शब्द हे शस्त्र आहेत, ते जपून वापरले पाहिजेत हे सुध्दा आतापर्यंत त्यांनी पाळले. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार म्हणाले, ते खालच्या सभागृहात असायला पाहिजे होते. सन्माननीय उपमुख्यमंत्री या सभागृहात उपस्थित आहेत, पक्षाचे माननीय अध्यक्ष सभागृहात उपस्थित आहेत, निश्चितपणे भविष्यकाळात अशा लढवय्या माणसाला वरच्या सभागृहात बसविणे उपयोगी नाही, त्यांना योग्य ती संधी देण्याचे काम भविष्यामध्ये आमच्या राष्ट्रवादी पक्षाकडून होईल अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करतो.

सभापती महोदय, प्रा.फौजिया खान मॅडम यांनी सुध्दा परभणी येथे महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून नोकरीला सुरुवात केली आणि शैक्षणिक क्षेत्राचे विविध प्रश्न, शिक्षकांचे प्रश्न, मुस्लिम समाजाचे प्रश्न मांडण्याचा सातत्याने प्रयत्न केला. मुस्लिम समाज हा शिकल्याशिवाय त्याचा विकास होऊ शकत नाही हे त्यांनी वारंवार लक्षात आणून दिले. सर्व विकासाचा पाया हा शिक्षण आहे हे त्यांना उमगले. म्हणूनच त्यांनी कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन संस्थेची स्थापना करुन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे........

परभणी येथे मुस्लिम समाज असो, इतर समाज असो, तळागाळातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे यादृष्टीने शिक्षण संस्था उभी केली. त्या माध्यमातून प्राथमिक शिक्षणापासून उच्च व महाविद्यालयीन शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली. जनरल एज्युकेशन असो, आय.टी.एज्युकेशन असो त्याची व्यवस्था त्यांनी त्याठिकाणी केली. सहा देशांचा परदेश दौरा त्यांनी केला. विशेष म्हणजे महिलांसाठी काम करीत असताना पक्षातर्फे सुध्दा परभणी येथे 2005 मध्ये "हर बदलाव वो नारी सहयोग के बिना अधूरा है" असे समजून महिलांसाठी परिवर्तन मेळावा आयोजित केला. महाराष्ट्रातील अभूतपूर्व मेळावा अशी त्यांची नोंद इतिहासामध्ये झाली. त्या आधाराने परिवर्तन महिला म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते, त्या आदरणीय प्रा.फौजिया खान यांना मी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.वसंत बळवंतराव चव्हाण हे निवृत्त होत आहेत. त्यांच्यावर बळवंतराव चव्हाण यांच्या विचाराचा पगडा असल्यामुळे, त्यांच्या संस्कारात त्यांचा वाटा असल्यामुळे अशा सर्वसामान्य कुटुंबात जन्म होऊन सुध्दा........

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

वडिलांच्या आशिर्वादाने, प्रेरणेने, मार्गदर्शनाने त्यानी काम केलेले आहे. त्यांनी नायगाव ग्रामपंचायतीपासून आपल्या राजकारणाला सुरुवात केली आहे. त्यानंतर जिल्हा परिषदेचे सदस्य तसेच विविध संस्थेवर त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी सकाळी उल्लेख केला की, त्यांनी शिक्षण संस्था स्थापन करीत असतांना स्वत:च्या उद्देशासाठी काम केलेले नसून समाजातील तळागाळातील गरीब मुलांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी शिक्षण संस्था सुरु केल्या आहेत. त्यांनी नायगाव एज्यूकेशन सोसायटीची तसेच महाविद्यालयाची स्थापना करुन गरीब मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी यांना सुध्दा निरोप देण्यात असून ते आज या ठिकाणी उपस्थित नसले तरीसुध्दा त्यांनी सिल्लोड नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून 7 वर्षे यशस्वीपणे काम केलेले आहे. मुस्लीम समाज आणि इतर समाजातील घटकांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केलेले आहेत. त्यांनी नॅशनल एज्यूकेशन सोसायटीची स्थापना करुन तळागाळातील मुस्लीम बांधवाना शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी सातत्याने प्रयत्न केला आहे. तिल्लारी, भूज या ठिकाणी जेव्हा भूकंप झाला, तेव्हा भूकंपग्रस्तांना मदत कार्य करण्यामध्ये त्यांनी विशेष सहभाग घेतला होता.

आज या ठिकाणी सन्माननीय सदस्य अजीज, डॉ. मोहम्मद अब्दुल ऊर्फ डॉ. एम.ए.अजीज यांना सुध्दा निरोप देण्यात येणार आहे. डॉ. एम.ए.अजीज हे माजी मंत्री श्री. अब्दुल अजीम यांचे बंधू आहेत. आज ते आमदार असले तरी ते व्यवसायाने डॉ. आहेत. ते अजून त्यांच्या दवाखान्यात रुग्णांची सेवा करीत असतात. आमदार असतांना सुध्दा त्यांनी आपल्या डॉक्टरकीचा पेशा सोडलेला नाही. त्यांनी सुध्दा मुस्लीम आणि इतर समाजातील गरीब घटकांना शिक्षण मिळावे यासाठी औरंगाबाद येथे शिक्षण संस्थेची स्थापना केलेली आहे. त्यांच्या शिक्षण संस्थेत कॉम्प्युटर शिक्षण, तांत्रिक शिक्षण तसेच विविध प्रकारचे उपक्रम शिकवले जातात. तसेच त्यांनी वक्फ बोर्डाचे चेअरमन म्हणून कारकीर्द पार पाडलेली असून अनेक महत्वाचे निर्णय यासंदर्भात त्यांनी घेतलेले आहेत.

...2

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. विक्रम काळे...

सभापती महोदय, सुधाताई जोशी यांना सुध्दा आज निरोप देण्यात येणार असून त्यांनी कोकण एज्युकेशन अँड मेडीकल ट्रस्ट या संस्थेची स्थापना करुन विरार येथे होमियोपॅथिक मेडिकल कॉलेज व पॉलिटेक्निकची स्थापना केलेली आहे. तळागाळातील मुलांना शिक्षण मिळावे यासाठी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून समाजामध्ये एक विशेष प्रकारचा ठसा त्यांनी जनमाणसात उमटवलेला आहें. संचालिका व महिला शाखेच्या अध्यक्षा अशा किती तरी पदांवर त्यांनी काम केलेले आहे. त्यांनी 24 देशांचा दौरा केलेला असून 19 तारखेला त्या जेव्हा सभागृहात आल्या, तेव्हा मी त्यांना विचारले की, आपण आज कोठून आला आहात ? त्यावेळेस त्यांनी सहज सांगितले की, मी कालच अमरिकेहून आले असून लागलीच अधिवेशनासाठी आज येथे आले आहे. या वयातही त्यांची काम करण्याची मानसिकता आमच्या सारख्या तरुणांना मार्गदर्शक ठरणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे यांना सुध्दा आज प्रेमभरा निरोप देण्यात येणार आहे. शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि जो वाघिणीचे दुध पिणार तो आपला पंजा वर करुन गुरगुरल्या शिवाय राहणार नाही हे आम्हाला त्यांच्याकडून शिकायला मिळालेले आहे. त्यांनी शिक्षण, व्यापार व शेती उत्कृष्टपणे केली असून आंबेडकर चळवळीने प्रेरित होऊन मागासवर्गीय समाजासाठी, दुर्लक्षीत समाजाला न्याय देण्याचे प्रयत्न या सभागृहात केलेले आहे. ते उत्कृष्ट नाटय लेखक असून नाटय दिग्दर्शक व नाटय भूमिका त्यांनी केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. निकोसे हे सर्वांना हवेहवेसे वाटणारे आहेत आणि यापुढेही ते हवेहवेसे वाटणार आहेत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विक्रम काळे........

श्री.धोंडीराम राठोड यांच्याबद्दल बोलावयाचे झाले तर कै.वसंतराव नाईक यांच्या विचारांचा पगडा त्यांच्यावर होता. श्री.राठोड यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला. आपल्या समाजातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे, शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे म्हणून त्यांनी जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली व मराठवाड्यातील मंठासारख्या दुर्लक्षित भागात बालवाड्या, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व वरिष्ठ महाविद्यालय सुरु केले. अखिल भारतीय बंजारा सेवा संघात अतिशय यशस्वीपणे काम करुन बंजारा समाजातील विविध घटकांना न्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. या सभागृहात प्रश्न मांडतांना फक्त विमुक्त जाती व भटक्या जमातील लोकांच्या प्रश्नांबरोबर मराठवाड्याच्या विकासाच्या प्रश्नाबाबत त्यांनी सातत्याने आवाज उठविला आहे. हा आवाज त्यांनी अतिशय दमदारपणे उठविला आहे. श्री.राठोड यांचा स्पष्टवक्तेपणा हा चांगला गुण सर्वांनी घेण्यासारखा आहे. मी त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा देतो.

श्री.जगन्नाथ शेवाळे यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला. शेतीमालाला योग्य भाव मिळावा यासाठी, तसेच विजेचा व पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी आंदोलन केले. यशवंतराव सहकारी साखर कारखान्याचे संचालक व व्हाईस चेअरमन म्हणून त्यांनी काम केलेले आहे. जवळपास सहा देशाचा परदेश दौरा त्यांनी केलेला आहे.

श्री.धनाजी साठे - "तुका म्हणे ठेविले अनंते तैसेची रहावे" श्री.साठे हे माझ्या शेजारच्या गावातील असल्यामुळे त्यांचा आणि माझा जवळचा संबंध आहे. व्यवसायाने ते वकील असले तरी त्यांचा स्वभाव अतिशय मृदू आहे. त्यांच्याकडे पाहिल्यानंतर ते आमदार आहेत असे वाटत नाहीत. मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या जवळचा मित्र आहे याचा त्यांनी कधीही गवगवा केला नाही. शैक्षणिक चळवळ, सामाजिक चळवळ व सहकार चळवळीमध्ये त्यांचा चांगल्याप्रकारे सहभाग होता. त्यांच्याकडून पक्षनिष्ठा हा गुण सर्वांनी घेण्यासारखा आहे. त्यांच्या हुर्डा पार्टीला माननीय मुख्यमंत्री आवर्जून उपस्थित राहतात. आता हुडर्याचा मोसम जवळ आलेला आहे तेव्हा त्यांना आम्हा सर्वांना या पार्टीसाठी निमंत्रित करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे........

कर्नल सुधीर सावंत यांनी सेनानी म्हणून काम केलेले आहे. त्यांनी खासदार म्हणून काम केलेले आहे.

जे सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मी त्यांना हार्दिक शुभेच्छा देतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांविषयी विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सार्वजनिक क्षेत्रात काम करणारी माणसे कधीही निवृत्त होऊ शकत नाहीत. ही निवृत्तीची प्रवृत्ती असणारी मंडळी नाहीत तर सातत्याने सेवेची प्रवृत्ती असणारी अशी ही आमची आमदार मंडळी आहेत. ज्याच्या दरवाजाचे दार 24 तास उघडे असते त्याला कार्यकर्ता म्हणतात.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री.अरुण गुजराथी....

माझे एक स्नेही आहेत, ते खाजगी संस्थेमध्ये सेवा करतात. ते मला म्हणाले की, आमच्या जीवनात 11, 5 आणि 55 हे अतिशय महत्वाचे आकडे आहेत. मी म्हटले की, माझ्या ते लक्षात आले नाही. ते म्हणाले की, 11.00 वाजता कामावर जायचे, 5.00 वाजता परतायचे आणि 55 व्या वर्षी निवृत्त व्हायचे. सार्वजनिक जीवनात वावरणारा जो माणूस आहे, त्याला 24 तासांची सेवा आहे. आपल्या शेजारच्या राज्यातील एक घटना आहे. पोलिसांच्या घरीच चोर आलेला असतो. पोलिसाच्या पत्नीस लवकर जाग आली. ती नवऱ्यास उठवत होती की, उठा चोर आलेले दिसतात. त्याने उत्तर दिले, ठीक आहे. दुसऱ्यांदा तिने सांगितले, लवकर उठा. त्याने सांगितले, ठीक आहे. तिसऱ्यांदा तिने सांगितले की, लवकर उठा, चोर घराच्या बाहेर पडत आहेत. त्यावेळी त्याने उत्तर दिले की, I am not on duty. सार्वजनिक जीवनात, समाज जीवनात काम करणारी जी माणसे असतात, त्यांना हा शब्द कधीही वापरता येणार नाही. 24 तास काम करणारी ही माणसे असतात. समाजामध्ये काही माणसे वाहून जाणारी आहेत आणि काही माणसे वाहून घेणारीही आहेत. आज ज्यांना आपण निरोप देत आहोत, ती समर्पित जीवन जगणारी आहेत. प्रत्येकाने सांगितले की, तुम्ही परत यावयास पाहिजे. आजच्या प्रसंगी "शुभास्ते पंथानः सन्तू" म्हणत असताना, "पुनरागमनायचं" असे मी सर्वांच्या संदर्भात म्हणेन. आपण सर्वांनी परत यावे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीचे विचार याप्रसंगी मांडलेले आहेत. राज्यातील या विधान परिषदेतील आपले संस्कार आणि संस्कृती कशा पध्दतीची आहे याचे दर्शन घडवणारा हा कार्यक्रम याठिकाणी संपन्न होत आहे.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी साहेब याठिकाणी आज उपस्थित नाहीत. त्यांचे बायपास झालेले आहे. परंतु सर्वांना बायपास करणारा हा माणूस आहे. जीवनातील 40 वर्षे त्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घातली. यासंबंधी इतिहास लिहित असताना ॲड.गुरुनाथ कुलकर्णींचे नांव कुठल्या पानावर नाही असे कुठलेही पान असू शकत नाही. ते इतक्या आत्मविश्वाने काम करतात की, My word is law. त्यांना घटनेचा अभ्यास आहे. माननीय श्री.नितीनजी याठिकाणी दिसत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

नाही. त्यांनी एखादा अर्थ सांगितला तर दुसरा अर्थ त्वरेने उचलून ते सांगणारच. इतका त्यांच्या जीवनातील कॉन्फिडन्स आहे. गुरुनाथजींच्या आक्रमकतेला सेवेची जोड, असे मला त्यांच्या संदर्भात सांगता येईल. आत्मविश्वासाचा महामेरु या शब्दात मी त्यांचे वर्णन करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड हेही निवृत्त होत आहेत. जितेंद्र म्हणजे, Even a sky is not a limit. चंद्रावर स्वारी करणारे, गगनाला गवसणी घालणारे असे हे व्यक्तिमत्व आहे. त्यांनी तरुणांच्या संदर्भात, विद्यार्थ्यांच्या संदर्भात केलेले जे काम आहे त्याची नोंद ठाण्याच्या जनतेने घेतलेली आहे. अनेक कार्यक्रम त्यांनी घडवून आणले. त्यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम असेल, साहित्याचे कार्यक्रम असतील हे सर्व त्यांनी यशस्वीरित्या घडवून आणले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.एम.ए.अजीज हेही निवृत्त होत आहेत. सभापती महोदय, जीवनामध्ये निष्ठा ही फार महत्वाची असते. मग ती स्वत:बद्दलची निष्ठा असो, सामाजिक निष्ठा असो, पक्षाबद्दलची निष्ठा असो वा देशाबद्दलची निष्ठा असो. या सर्व निष्ठांशी बांधिलकी असलेले त्यांचे व्यक्तिमत्व होते, असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. ते अत्यंत मितभाषी असून अमेरिकन बायोग्राफिकल इस्टिटयूट यांच्याकडून त्यांना सामाजिक कामगिरीबद्दल पुरस्कारही प्राप्त झालेला आहे, ही निश्चितच अभिनंदनीय बाब आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान याही निवृत्त होत आहेत. सर्वांकडून चांगल्या शब्दात त्यांच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन घडलेले आहे. ताई, मी आपल्या संदर्भात एवढेच म्हणेल की, Service is a Poem. या एका शब्दात आपले वर्णन मला करावे लागेल. आपण सामाजिक कार्य करीत आहात. शैक्षणिक सेवाही आपण केलेली आहे. शिक्षकांच्या संदर्भात एकाने म्हटले आहे की, "शिक्षकांची उंची हीच त्या समाजाची उंची." आपल्याला पाहिल्यानंतर त्या परिसरातील सामाजिक उंची किती आहे याचे दर्शन निश्चितपणे घडते.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ..........

सामाजिक एकता, कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतक-यांची करीत असलेली सेवा, नायगाव परिसरातील आपले विकास कार्य, निश्चितपणे आजच्या प्रसंगी या सर्वांचा उल्लेख केला पाहिजे.

सभापती महोदय, आमच्या भगिनी, श्रीमती सुधाताई जोशी येथे आहेत. दहा वर्षे आपण खासदार देखील होता. एक चांगले असे व्यक्तिमत्व आहे. "पुढे स्नेह पाझरे, मागे चालती अक्षरे, शब्द पाठी अवतरे, कृपा अभी" अशा प्रकारचे व्यक्तिमत्व, सुधाताई आपले आहे. असे मी त्यांचे एका शब्दात वर्णन करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे ज्यावेळी बोलायला उठतात आणि एखादा हिंदी शेर किंवा एखादी हिंदी कविता पोटतिडकीने मांडतात आणि स्वत:चे म्हणणे कसे खरे आहे, हे सांगण्याचा प्रयत्न करतात. रमेशजी, ही कला आपण सर्वांना दिली पाहिजे. कलावंत माणसे "साहित्य, संगीत, कलाविलीन साक्षात पशुपुच्छ विशाणहीन हा" अशा पद्धतीचे रमेशजी आहेत. आपल्याला देखील मी आजच्या या प्रसंगी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड, भटक्या, विमुक्त जाती, अस्पृश्यता निवारण, बंजारा समाजाची असणारी त्यांची तळमळ आणि कळकळ आपणही घेतली पाहिजे, असे मी आजच्या प्रसंगी सांगेन.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शेवाळे सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. शिक्षण, सहकार आणि क्रीडा या क्षेत्रात अतिशय उच्च दर्जाचे काम श्री.शेवाळे साहेबांनी केलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धनाजी साठे यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, सहकार क्षेत्र, सूतगिरणी अनेक क्षेत्रात काम केलेले आहे. माणूस सार्वजनिक जीवनात काम करणारा असो, शेक्षणिक क्षेत्रात काम करणारा असो, सहकात क्षेत्रात काम करणारा असो, राजकीय जीवनातला असो, प्रत्येक क्षेत्रात काम करण्याची आपल्याला जी संधी मिळते, ही संधी अत्यंत महत्वाची आहे.

सभापती महोदय, एकदा एक माणूस खोलीत बसला होता, दार बंद करुन. बाहेरुन एकाने नॉक केलं. टक..... टक..... टक....., आतल्या माणसाने काही त्याला रिस्पॉन्स दिला नाही, परत

....2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.........

त्याने नॉक केलं, टक......टक......टक.......,मग आतल्या माणसाने विचारले Who are you? बाहेरच्या माणसाने सांगितले I am an opportunity, open the door' पण त्याने दरवाजा उघडला नाही, परत दहा मिनिटांनी त्याने नॉक केलं, त्याने आतून विचारले Who are you? पुन्हा बाहेरच्याने सांगितले I am an opportunity मधून सांगितले गेले, No, opportunity does not comes second time.

सभापती महोदय, म्हणूनच आपली संधी असते ती अतिशय महत्वाची असते. संधी मिळाल्यानंतर, मी काय करु शकतो, मी काय केले पाहिजे, हे ठरविता आले पाहिजे. सार्वजनिक जीवनातला माणूस स्वत:साठी जगत नाही, तो दुस-यासाठी जगतो. 'In joy of others lies our own, In good of others rest our own, In progress of others abides our own. I want to be happy, but I can't be happy unless I see you happy to.' समोरच्या माणसाला ठेच लागल्यानंतर ज्याच्या डोळयात अश्रु येतात तो लोप्रतिनिधी. अशा पध्दतीने काम करण्याच्या संदर्भात आजच्या प्रसंगी आपण विचार केला तर आजचे सर्व निवृत्त होणारे आपले विधान परिषद सदस्य आहेत त्या सर्वांच्या संदर्भात आपल्याला असेच म्हणता येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मेजर सुधीर सावंत या ठिकाणी नाहीत. एक समर्पित जीवन जगणारा माणूस. जवान म्हटल्यानंतर समर्पीत जीवन हे ओघाने आलेच. 'Ask not what my country gives to me, ask what I give to my country' म्हणून जवानांच्यासंदर्भात नेहमी आपली हीच भावना असते "जय जवान, जय किसान"चा नारा आपण लावतो तो या समर्पित जीवनाच्या संदर्भातील आहे, असे मी म्हणेन.

सभापती महोदय, आमचे स्नेही, माझे सहकारी श्री.गिरीषजी गांधी यांचे अनेकांनी चांगल्या शब्दात वर्णन केले. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीनजी गडकरी आपणही केले. ते एक पूर्ण असे व्यक्तिमत्व आहे, असे मी सांगेन. साहित्यात आहेत, संगीतात आहेत, समाज जीवनात आहेत, वनराईमध्ये आहेत, "हर साग ऐक मुर्ती, हर पेड हरी का मंदर और पंछी पुजारी बनकर, गाते है वेदमंतर" अशा पध्दतीचे काम वनराईच्या माध्यमातून आपण केलं. झाडांनाच आपण कुटुंबातला

....3.........



SRR/ 20:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी..........

माणूस मानलं. त्या उच्च श्रेणीची सेवा गिरीषजी आपण केली म्हणून आपल्याला इंदिरा गांधी पुरस्कार मिळाला, डॉ.राधाकृष्णन पुरस्कार मिळाला, जागृती मंच पुरस्कार मिळाला, सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार मिळाला, असाधारण व्यक्तिमत्व पुरस्कार मिळाला आणि विशेष म्हणजे आपल्याला आज नितीन गडकरी पुरस्कार देखील मिळाला. अत्यंत चांगल्या शब्दात आपण बोलला, मतभेद असतील ते फार क्षणीक, पण आपण चिरंतर मित्र राहू शकतो, याचे देखील एक चांगले दर्शन आज श्री.नितीनजी गडकरी यांच्या वक्तव्यातून या सभागृहाला दिसले.

सभापती महोदय, सर्वांना आजच्या या प्रसंगी भावी जीवनाच्या शुभेच्छा देतो आणि बहुतेक सर्वजण या ठिकाणी परत येतील, अशा पध्दतीचा आशावाद व्यक्त करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------------

यानंतर श्री.बोरले.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ प्रथम श्री.रोझेकर ........... 20:25

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभा सदस्यांद्वारे निर्वाचित) : सभासपती महोदय, या सभागृहातील सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, डॉ.एम.ए.अझिज, जितेंद्र आव्हाड, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान, सन्माननीय सदस्य श्री.वसंत चव्हाण, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी, सन्माननीय सदस्य सर्वश्री रमेश निकोसे, जगन्नाथ शेवाळे, धनाजी साठे, कर्नल सुधीर सावंत आणि गिरीष गांधी हे आज निवृत्त होत आहेत. राजकारणातील आणि समाजकारणातील सहभागाबद्‌दल मी या सर्वांचे अभिनंदन करते आणि सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे ही निवृत्ती नाही तर त्यांनी या सभागृहाचे सदस्य म्हणून पुन्हा येथे यावे असा अशावाद व्यक्त करुन मी माझे विचार मांडणार आहे.

सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांचा आणि माझा तसा फारसा सहवास नाही. परंतु या अल्पशा सहवासातील त्यांच्याबद्दलची एकच बाब स्पष्ट करावयाची आहे आणि ती अशी की, सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी हे फार गाढे अभ्यासक आहेत. पॉईंटेड इश्यू ते बरोबर शोधून काढतात. परवा मी त्यांच्या घरी नाष्टयाला गेले होते, त्यावेळी त्यांच्या टेबलवर एक पुस्तक ठेवलेले होते. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, उषाताई मला लोकांना सांगावेसे वाटते की, ज्यावेळी घटना समितीचा अध्यक्ष कोण असावा अशी चर्चा होत होती त्यावेळी पंडित जवाहरलाल नेहरु यांनी असा प्रस्ताव मांडला की आपण बाहेरच्या देशातून कोणाला तरी बोलवायचे का ? त्यावेळी महात्मा गाधी असे म्हणाले की, तळागाळामध्ये काम करणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्यासमोर बॅरिस्टर असतांना आपण इतरांना कशाला बोलवायचे ? या बारीकसारीक चर्चा त्यांनी पुस्तकातून ऑब्झर्व केलेल्या आहेत. कोणतेही ऑब्झर्वेशन करीत असतांना, त्याचा जनमाणसावर काय परिणाम होतो हे पाहणे, त्या घटना वेचणे आणि समाजासमोर ठेवणे ही समाजपरिवर्तनााच्या प्रवाहातील फार मोठी गोष्ट आहे. सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधीजी आपण फार मोठे आहात, आपल्या सहवासामध्ये मला काम करण्याची खूप इच्छा आहे. मी अशी अपेक्षा करते की, आपल्या सहवासामध्ये मला पुन्हा येथे काम करण्याची संधी मिळेल.

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे ........

सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे देखील आज निवृत्त होत आहेत. ज्यावेळी मी महाराष्ट्राची महिला अध्यक्ष म्हणून काम करीत होते त्यावेळी त्यांना जवळून पाहिलेले आहे. येथे सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी बसलेले आहेत. श्री.छगन भुजबळ साहेब प्रदेशाध्यक्ष झाले, श्री.बबनराव पाचपुते प्रदेशाध्यक्ष झाले, श्री.आर.आर.पाटील प्रदेशाध्यक्ष झाले, आमचे भाईजी प्रदेशाध्यक्ष झाले, पण गुरुनाथ कुलकर्णी मात्र जनरल सेक्रेटरी एके गुरुनाथ कुलकर्णीच राहिले. त्यांच्याबाबतीत मला असा अनुभव आलेला आहे की, सुरुवातीला जर त्यांना उषाताईंची एखादी गोष्ट आवडली नाही तर ते अंगावर ओरडायचे. पण आम्हाला कळायचे की, ते आता चिडलेले आहेत. आता येथून पळ काढा, आम्ही दहा मिनिटांनी त्यांच्याकडे जायचो, त्यांना सांगायचो की, गुरुजी हे असे नाही, हे असे आहे. ते म्हणायचे असे आहे का ? मग मी बोलतो आणि ते लगेच प्रदेशाध्यक्षांना बोलायचे. त्यांची माननीय श्री.शरद पवार साहेबांशी देखील बोलण्याची तयारी असायची. मी एक ऑब्झर्व केले आहे की, प्रदेशाध्यक्षांना जर त्यांना एखादी गोष्ट सांगायची असेल तर मी सेक्रेटरी आहे मग मी कसे सांगू, अशी भावना त्यांच्या मनात कधी आली नाही. कोकणाच्या प्रश्नाविषयी त्यांना अत्यंत तळमळ असायची. माननीय श्री.नारायण राणेसाहेबांचा प्रश्न निघाला की, आमच्या पक्षामध्ये सर्वात मोठा आवाज कोणाचा असायचा तर तो गुरुजींचा असायचा. कणकवली निवडणुकीच्या वेळी त्यांनी आम्हाला ठणकावून सांगून तेथे प्रचाराला पाठविले होते. पक्ष वाढविण्याची जिद्द, आत्मविश्वास, आणि तळमळ गुरुजींकडून शिकण्यासारखी आहे. एक विधिज्ञ म्हणून इतकी वर्षे राजकारणात असतांना जी जिज्ञासा त्यांनी जपली ती सुध्दा जपण्यासारखी आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी येथे बसलेल्या आहेत. नाती फक्त जातीने जन्माने, पक्षाने, धर्माने जोडली जात नाहीत. नाती ही मानवतावादाने सुध्दा जोडली जातात. मी आळंदीला गेले होते. तेथील मधल्या गाभा-यामध्ये एका फळीवर "नामा म्हणे आता लोपला दिनकर, बाप ज्ञानेश्वर समाधीस्थळी" असे लिहिलेले आहे. नामदेवांनी ज्ञानेश्वरांना बाप म्हटले आहे. हे नाते कशातून निर्माण झाले ? माझ्या माऊलीला पंढरी म्हणणारा, वारकरी संप्रदायाचा वारसा सांगणारा माझा महाराष्ट्र, विठोबाला माऊली म्हणतो. सुधाताई अशाच प्रकारचे

..3...



GRB/ प्रथम श्री.रोझेकर ........... 20:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे ........

एक माणुसकीचे नाते माझे तुमच्याशी निर्माण झाले आहे असे मला वाटते. "तुला दीले रे देवाने दोन हात, दहा बोट," असे बहिणाबाई जेव्हा म्हणते तेव्हा या हाताचा, या बोटाचा, या बुध्दीचा संपूर्ण स्त्रीत्वाचा वापर तुम्ही राजकारण, समाजकारण, गृहीणी, आई, बहिण म्हणून उत्कृष्टपणे केलेला आहे. म्हणून जेव्हा महाराष्ट्राचा वुमन इन गव्हर्नन्स असा इतिहास लिहिला जाईल, त्यावेळी महिलाही सक्षमपणे काम करु शकतात, असा इतिहास लिहितांना सुधाताई आणि फौजियाताई उत्कृष्ट राजकारणी, उत्कृष्ट समाजकारणी, उत्कृष्ट भगिनी आहेत याची नोंद केली होईल. आपल्याला माहिती आहे की, "घार हिंडते आकाशी, परि चित्त तिचे पिल्लापाशी" अशी प्रत्येक आईची अवस्था असते. बायकांनी राजकारणात काम करणे आणि पुरुषांनी राजकारणात काम करणे यामध्ये फरक आहे. सुधाताई, आपण घरी जीव टांगलेला असतांना सुध्दा ज्या उत्कृष्ट पध्दतीने या सर्व विषयांना दाद देता ती उल्लेखनीय आहे. ज्यावेळी मी आमदार होऊन पहिल्यांदा या सभागृहात आले त्यावेळी बसायचे कोठे आणि कसे बोलायचे याची सुध्दा मला भीती वाटायची. पण माझ्या मनातील भीती कोणी दूर केली असेल तर ती सुधाताईंनी केलेली आहे. तालिका सभापती म्हणून आपण ज्या पध्दतीने काम केले याचा मला गर्व वाटतो, आनंद वाटतो. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड आणि डावखरेसाहेब यांनी माझे कचुंबर करण्याचा प्रयत्न केला होता. मी त्यावेळी 8/10 दिवस फार टेन्शनमध्ये होते. मी महिला अध्यक्ष असतांना ठाण्याच्या जिल्हाध्यक्षांचा प्रश्न निर्माण झाला होता आणि तो आमच्या एका भगिनीचा प्रश्न होता. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड आणि माननीय श्री.वसंतराव डावखरे यांची आक्रमकता मी पाहिलेली आहे.

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे.....

आणि त्यामधील निर्णय प्रक्रियेसाठी मी माननीय श्री.शरदचंद्रजी पवार साहेबांना फोन केला आणि विचारले की, मी ठाण्याचे काय करु ? ते म्हणाले की, उषाताई तुम्हाला जो योग्य वाटेल तो निर्णय घ्या. यासंदर्भात मी जो निर्णय घेतला त्यानंतर या दोघांच्याही ॲग्रेसिव्ह भूमिकेतून माझी सूटका झ ाली. जितेंद्रने माझ्या बाबतीत नेहमी सहकार्याची भूमिका ठेवली. "तुम्ही माझे ऐकले नाही" अशी त्यांची भूमिका कधीही नव्हती. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड हे ज्यावेळी ऑल इंडियाचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले, तेव्हा आम्हाला त्यांचे कौतुक वाटले की, महाराष्ट्रातील एक तरुण पोरगा देश पातळीवर पक्षाचा अध्यक्ष म्हणून काम करतो. सगळया राज्यामध्ये जाऊन काम करतो,लोकांच्या प्रश्नाविषयी त्याला तळमळ आहे.

सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांच्याविषयी मला बोलावयाचे आहे की, आम्ही जेव्हा जेव्हा भेटावयाचो तेव्हा तेव्हा मी त्यांना विचारावयाचे की," आपको ये सब कैसे मिला ? इतनी खुबसूरती कहाँ से लायी ?" त्या मला नेहमी मला म्हणायच्या की, आप ऐसा क्यों पूछती हो बार-बार ? परंतु मला तो प्रश्न पुनहा पुन्हा विचारण्याचा मोह आवरायचा नाही मी त्यांना विचारायचीच. मॅडमजवळ फक्त सौंदर्यच नाही तर विचारांचे सौंदर्य देखील आहे. दिनांक 08मार्च,003 च्या आझ ाद मैदानावरील महिलांच्या कार्यक्रमांच्या वेळी माननीय श्री.शरदचंद्रजी पवार साहेबांनी जाहीर केले की, विधानपरिषदेमध्ये महिलांना देखील प्रतिनिधीत्व देण्यात येणार आहे. हा बहुमान प्रथमतः प्रा.फौजिया खान,श्रीमती मंदाताई म्हात्रे व त्यानंतर मला मिळाला. महिलांना मसल पॉवर,मनी पॉवर,जात,धर्म,गुंडगिरी याच्यातून निवडून येणे महिलांना कठीण आहे, हे ओळखून त्यांनी महिलांना विधानपरिषदेमध्ये महिलांचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांना जो मान मिळाला, त्यांनी त्याचे पूर्णपणे सोने करण्याचे काम केलेले आहे. भुवनेश्वरला जे रिसर्च सेंटर फॉर वुमन ॲग्रीकल्चरीस्ट आहे,त्याच्या आपण आणि माननीय राजलक्ष्मी मॅडम सभासद आहात. तमाम महिला शेतकरी भगिनींच्या श्रमाला प्रतिष्ठा देण्यासाठी आपल्याला काही करता आले तर ते आपण करणार,असा मला विश्वास आहे. सच्चर समितीबाबत ज्याप्रमाणे आपण भूमिका केली त्याप्रमाणे महिलांच्या शेतीमधील सहभागाविषयी ,कष्टाविषयीदेखील आपण कार्य कराल,असा मला विश्वास आहे.

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे...

निवृत्त होणा-या इतर सदस्यांचा संयम येथे अत्यंत महत्वाचा आहे,त्यांच्याविषयी मी फार बोलणार नाही. मी निरीक्षक म्हणून पुण्याला काम करीत असतांना सन्माननीय सदस्य श्री.शेवाळे यांचा आणि नांदेड येथे काम करीत असतांना सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव पवार यांचा संयम मी पाहिलेला आहे. इतर सन्माननीय सदस्यांबरोबर मला काम करण्याची संधी न मिळाल्यामुळे आपल्या सर्व गुणांचा आदर करुन ते प्राप्त करण्याचा मी निश्चित प्रयत्न करेन. जाता जाता मॅडमसाठी गालिबचा एक शेर सांगते.

गालिब एकदा रस्त्याने चालले होते,आणि एका खोलीमध्ये आमची एक भगिनी उभी होती. जाता जाता एक शेर गालिब यांनी लिहिला होता.

"हिनाए दस्त ने अब्र से लिया मोती बरसाया
बरसकर हट गया बादल, मेहताब नजर आया."

गालिबला जी दृष्टी होती,ती सौंदर्याचा आदर ठेवण्याची होती, ती दृष्टी माझ्या समाजाला मिळावी. महिलांना राजकारणामध्ये निर्भिडपणे काम करण्याचे वातावरण निर्माण व्हावे,अशा प्रकारची मी अपेक्षा व्यक्त करते आणि माझे दोन शब्द संपविते.

-----

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत डावखरे ( उपसभापती ) : सभापती महोदय, आज या ठिकाणी ब-याचशा सदस्यांनी निवृत्त होणा-या सदस्यांविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या.  मला देखील या सर्व सन्माननीय सदस्यांबरोबर काम करण्याची संधी मिळाली.  या ठिकाणी प्रत्येकाबद्दल फारसे मी बोलणार नाही.  एक गोष्ट खरी आहे की, व्यक्ती तितक्या प्रवृत्ती या उक्तीप्रमाणे प्रत्येक माणूस आपल्या व्यक्तिमत्वाची या ठिकाणी स्वतंत्र छाप उमटवून गेला.  खासकरुन या ठिकाणी प्रत्येकाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर प्रत्येकाला स्वत:ची अशी स्वतंत्र प्रतिमा आहे.  असे हे सगळे उज्वल प्रतिमा असलेले, प्रतिभासंपन्न असलेले सन्माननीय सदस्य आज या सभागृहातून निवृत्त होणार आहेत.  आदरणीय गुजराथी साहेब आताच म्हणाले की, " सेवा करणारे कधीच निवृत्त होत नाहीत." त्यांच्या या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे.  जे अखंड सेवा करीत असतात,ते त्यांच्या सेवेतून कधीही निवृत्त होत नाहीत.   जरी ते विशेष कालावधीनंतर निवृत्त होत असले तरी ते त्यांच्या सेवेच्या व्रतातून कधीही निवृत्त होत नसतात.  अखंड सेवा हाच त्यांचा धर्म आहे.  म्हणून या ठिकाणी निवृत्त होणा-या सर्व सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये मनापासून एक नक्की भावना आहे की,

यानंतर श्री.गागरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत डावखरे .....

आपल्यापैकी पुन्हा प्रत्येक जण या सदनात यावा. पुन्हा आपणा सर्वांचा सहभाग या सदनाच्या कामकाजात असावा, उज्ज्वल महाराष्ट्राची प्रतिमा आपण सर्वांनी उराशी बाळगली आहे, ती पूर्ण करण्यासाठी तुम्हा सर्वांचा सहभाग आणि हातभार या शासनाला, विधिमंडळाला लाभावा अशा प्रकारची सदिच्छा मी व्यक्त केली तर ती चुकीची ठरणार नाही.

मी श्री.गिरीष गांधी यांच्याबाबत सांगेन की, सर्वच वक्त्यांनी त्यांचा उल्लेख गौरवपूर्ण केला आहे. त्यांचे व्यक्तिमत्व मला देखील फार वर्षांपासून परिचित आहे. ते एक अत्यंत सौजन्यशील, सुसंस्कृत, मितभाषी असे प्रभावी व्यक्तिमत्व आहे. मित्र मानल्यानंतर त्याला कठीणप्रसंगी योग्य मार्गदर्शन व सल्ला देऊन त्याच्या पाठीशी उभी राहण्याची त्यांची भूमिका प्रत्येकाला आठवण राहील अशा प्रकारची आहे. येथे सर्व सदस्यांनी इच्छा प्रदर्शित केली आहे की, श्री.गिरीष यांनी पुन्हा या सभागृहात यावे. मला पूर्ण खात्री आहे की, त्यांचे पुनरागमन या सभागृहात नक्की होईल. बाकीच्या मंडळींना देखील मी हीच शुभेच्छा देतो.

आमच्या ठाणे जिल्हयातील तरुण नेते श्री.जितेंद्र आव्हाड हे निवृत्त होत असून त्यांच्याबद्दल मला या ठिकाणी गौरवपूर्ण बोलावेसे वाटते. एक धडाडीचा कार्यकर्ता, एखादी गोष्ट मनावर घेतली तर कोणताही विरोध न जुमानता येईल ती जोखीम पत्करणारा असा एक तरुण नेता त्यांच्या रुपाने ठाणे जिल्हयाला भेटला आहे. आमचे एकमेकांशी काही विषयाबाबत मतभेद असू शकतात. परंतु ज्या ज्या वेळी माझ्यावर प्रसंग आला, त्यावेळी ते देखील माझ्या पाठीसी उभे राहिले, हे मी विसरु शकत नाही. म्हणून एक सच्चा मित्र आणि राजकारणामध्ये तरुणांचे आशास्थान असलेले व्यक्तिमत्व म्हणून मी त्यांच्याकडे पाहात आलेलो आहे. श्री.जितेंद्र आव्हाड यांनी पुन्हा या सभागृहामध्ये यावे व आपल्या नेतृत्वाचा फायदा या सभागृहाला, सरकारला, शासनाला करुन द्यावा, अशा प्रकारची सद्‌भावना मी व्यक्त करतो.

श्रीमती सुधाताई जोशी, हया सभागृहात अतिशय तडफेने काम करीत असतात, त्यांना देखील मी शुभेच्छा व्यक्त करतो. डॉ.एम.ए.अझिज हे निवृत्त होत आहेत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी, हे निवृत्त होत असून त्यांचे ऑपरेशन झालेले असल्यामुळे ते सभागृहात उपस्थित नाहीत. थोडया वेळापूर्वी माननीय सदस्यांनी सांगितले की, गुरुजींच्या

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/

श्री.वसंत डावखरे .....

ऑफीसमध्ये घटनेचे पुस्तक व शिस्तभंगाची नोटीस हया दोन गोष्टी फार कॉमन होत्या. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात मला दोन वेळा शिस्तभंगाच्या नोटीसा दिल्या होत्या परंतु त्यांना कोणत्या प्रकारचे उत्तर द्यायचे हे मला पक्के ठाऊक असल्यामुळे माझ्याकडे नोटीसीच्या उत्तराचा साचा तयार असायचा. तो मी त्यांना व्यवस्थित लिहून पाठविला तर गुरुजी पुन्हा मला म्हणायचे की, वसंतराव काय चालले आहे ? श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांच्यासारखी काही व्यक्तिमत्व ही कोणत्याही पक्षाची ॲसेटस् आहेत. गुरुजी बोलायला फटकळ असतील परंतु अत्यंत शिस्त असलेले हे व्यक्तिमत्व आहे. त्यांनी कोठे-कोठे काय धाडस केले आहे, कोकणामध्ये त्यांनी स्वत:च्या नेतृत्वाचा फायदा पक्षाला फायदा मिळवून दिलेला आहे.

प्रा.फौजिया खान यांनी सभागृहात केलेली भाषणे पाहिली तर लक्षात येईल की, एक अत्यंत अभ्यासपूर्ण असे महिला नेतृत्व सभागृहाला मिळाले आहे. अल्पसंख्यांक समाजातील दूरदृष्टी असलेल्या या भगिनीला सभागृहात पुन्हा येण्याची संधी मिळावी, अशी मी सदिच्छा व्यक्त करतो. श्री.वसंतराव बळवंतराव चव्हाण, श्रीमती सुधाताई जोशी, श्री.रमेश निकोसे, श्री.धोंडीराम राठोड, श्री.धनाजी साठे, श्री.सुधीर सावंत, श्री.गिरीष गांधी यांनाही मी मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

कर्नल सुधीर सावंत यांचा व माझा पहिला परिचय जेव्हा त्यांना लोकसभेचे पहिले तिकीट दिले होते, तेव्हा झाला. त्यावेळी आदरणीय कै.शंकरराव चव्हाण भारताचे गृहमंत्री होते. त्यांनी मला बोलावून घेऊन सांगितले होते की, कर्नल सुधीर सावंत यांना निवडणूकीमध्ये जी मदत लागेल ती मदत करा.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत डावखरे.....

आदरणीय श्री. शंकरराव चव्हाण यांच्या आशीर्वादामुळे, त्यांच्या प्रयत्नामुळे कर्नल सुधीर सावंत यांचा राजकीय क्षेत्रामध्ये प्रवेश झाला. याठिकाणी मी आपणास एक गोष्ट सांगू इच्छितो की, "Once a blind man asked to Swami Vivekanandaji, Sir, is there anything in life if you lose your sight or vision? To the above question, Swami Vivekanandaji replied: "Yes. Losing your vision, is worst than losing your sight. So, never lose your vision." याठिकाणी मी सर्वच सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांच्या दूरदृष्टीचा, त्यांच्या विस्तृत कार्याचा आपण कधीही विसर पडू देऊ नये. एवढे सांगून मी माझे निरोपाचे भाषण संपवितो. धन्यवाद.

...............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, कोणत्याही वेळी निरोप घेताना, त्या निरोपाला खिन्नतेची झालर असते. मग तो निरोप एखाद्या गावाचा असो, एखाद्या घराचा असो, एखाद्या संस्थेचा असो, किंवा एखाद्या पदाचा असो. निरोप घेताना मनामध्ये खिन्नतेची भावना नेहमीच असते. आज या सभागृहामध्ये माझ्या सर्व सहकार्यांच्या मनामध्ये खिन्नतेची आणि काहीशी उदासीनतेची भावना निर्माण झालेली आहे. माझ्या पक्षाच्या आदरणीय इंदिरा गांधी, माननीय राजीव गांधी, माननीय सोनिया गांधी यांनी मला अनेक पदावर काम करण्याची संधी दिली. आणि मी देखील त्या पदांना योग्य न्याय दिला. माझे सर्व सहकारी, कार्यकर्ते यांनी मला भरभरुन प्रेम आणि आदर दिला. आता देखील आदरणीय श्रीमती सोनिया गांधी, मला जे काम देतील ते काम मी इमानेइतबारे करीन यामध्ये कोणतीही शंका नाही. आज मला असे सांगावेसे वाटत आहे की, सत्ताधारी पक्षाचे सहकारी व माझ्या समोरच्या बाकावरील सहकारी यांनी मला नेहमीच स्नेह आणि सन्मान दिला. याठिकाणी तालिका सभापती म्हणून काम करीत असताना माझ्या सहकाऱ्यांनी मला अतिशय चांगल्या प्रकारे सहकार्य केले. या सभागृहामध्ये नेहमी जे खेळीमेळीचे वातावरण असायचे ते माझ्या मनाला अतिशय भावणारे होते. कधी कधी सभागृहामध्ये वादावादी देखील व्हावयाची . पण ती तेवढयापुरतीच मर्यादित होती. त्याबाबत कोणीही मनामध्ये कधीही आकस ठेवलेला नाही हे मला आपल्याला आवर्जून सांगावयाचे आहे. माझे नाव घेतल्याशिवाय आणि मला कोपरखळया मारल्याशिवाय सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य नितीन गडकरी यांचा कधीही दिवस जात नसे.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी ....

ते दरवेळेस हेच करीत आणि माझे धाकटे बंधू म्हणून तो त्यांना अधिकार आहे, तो त्यांचा हक्क आहे असे मी मानते आणि अतिशय उदार मनाने तो हक्क त्यांना बहाल करते. सभापती महोदय, मी या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांना सांगू इच्छिते की, येत्या वर्षामध्ये माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शक ठराव मीच मांडेन अशी अपेक्षा आपण सर्वांनी करू या.

सभापती महोदय, आपण स्वत:, माननीय उपसभापती, माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्य मंत्री आणि मंत्रिमंडळातील सर्व सदस्य आणि या सदनातील तुम्ही माझे सर्व सहकारी, यांनी माझ्या या कार्यकाळात मला जे प्रेम दिले त्याबद्दल मी आपली अत्यंत आभारी आणि ऋणी आहे. जयहिंद, जय महाराष्ट्र.

***

...... 5पी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एम.ए.अझीज (नामनियुक्त) : सभापती महोदय, निरोप आणि भावपूर्ण निरोप, आजच निरोप देणार, उद्या निरोप देणार, परवा देणार हे मी ऐकत होतो. आज मला असे वाटत होते की, सदनाने असे काही ठरविले आहे का की, माननीय राज्यपालांना एक प्रस्ताव पाठवावा आणि आणखी 6 वर्षासाठी यांनाच पुढे कंटिन्यू करावे. सभापती महोदय, काही प्राप्त करण्यासाठी परिश्रम, खूप परिश्रम करावे लागतात आणि परिश्रम करून आपण जे काही प्राप्त करतो ते आपल्या पासून दूर होत असेल तर दु:ख होणे हे साहजिकच आहे. एका उर्दू कवीने हे जे क्षण आहेत ते आपल्या काव्यामध्ये चांगल्याप्रकारे वर्णन करून ठेवले आहेत. त्याने म्हटले आहे की,

जिंदगी मे दो ही घड़िया गुजरी है, बहुत कठिन
एक तेरे मिलने से पहले और एक तेरे जाने के बाद.

सभापती महोदय, 2002 मध्ये माझी येथे सदस्य म्हणून नियुक्ती झाली आणि 2003 मध्ये वक्फ बोर्डाची निवडणूक आली. मला असे वाटले की, मी वक्फ बोर्डामध्ये खूप काही चांगले काम करू शकतो म्हणून मी त्या निवडणुकीला उभा राहिलो. माझ्या मतदार यादीमध्ये मोठमोठे लोक होते. दिलीपकुमार, शबाना आझमी वगैरे सारखे लोक होते. मी त्या निवडणुकीत निवडून आलो. तेव्हा माझे बंधू आणि माजी मंत्री श्री.अब्दुल अझिज मला म्हणाले, मियाँ, तूने लिया तो है, लेकिन इसमे सिर्फ बदनामी के और कुछ नही मिलेगा. पण मी डॉ.रफिक झकेरिया, ज्यांचे नाव केवळ या महाराष्ट्रातच नाही तर जगामध्ये आहे त्यांच्या बरोबर 30 वर्षे काम केले आहे आणि वक्फ बोर्डाला मी पुढे नेणार आणि असे म्हणून मी तेथे काम करण्यास सुरूवात केली. सभापती महोदय, मी खूप प्रयत्न केले. महाराष्ट्र शासनाने वक्फ बोर्डावर माझी नेमणूक झाल्यानंतर लाल दिव्याच्या गाडी शिवाय काहीही दिलेले नाही तरी पूर्ण महाराष्ट्रात मी एक वेगळे असे वातावरण निर्माण केले. चॅरिटी कमिशनरशी मी भांडण केले आणि किती तरी केसेस वक्फ बोर्डाकडे हस्तांतरित करायला लावल्या. त्यांच्याशी मी भांडलो, 1996 च्या ॲक्ट नुसार जेवढे पैसे मुसलमानांकडून तुम्ही काढले, ते तुम्हाला वक्फ बोर्डाला द्यावे लागतील असे सांगितले. ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे .... 5क्यू 1 ..

डॉ. एम. ए. अझिज...

त्याप्रमाणे मला यश प्राप्त झाले आणि 1 कोटी रुपयांचा पहिला हप्ता त्यांनी वक्फ बोर्डाला दिला. याबाबत मला झालेला एक पश्चाताप म्हणा किंवा या प्रकरणी मला असलेली तहान म्हणा, However, I could not give justice to the Business of this august House. मी पूर्णपणे चार ते पाच वर्षे वक्फ बोर्डामध्ये घालविली. मला माझे बंधू म्हणाले होते, त्याप्रमाणे शेवटी प्रकार झाला. मला फक्त एवढेच सांगावयाचे आहे की, हा जो वक्फचा कायदा आहे, त्याबाबत महाराष्ट्र सरकारने या कायद्यामध्ये असलेल्या तरतुदींची दखल घेतली नाही. महाराष्ट्र सरकाने याबाबत असे गृहीत धरले आहे की, ज्याप्रमाणे कंझ्युमर बोर्डाच्या बाबतीत किंवा इतर बोर्डांच्या बाबतीत मंत्र्यांना अधिकार असतात. त्याप्रमाणे या बोर्डाच्या बाबतीतही अधिकार आहेत. परंतु तसे नाही, हे स्टॅटयुटरी बोर्ड आहे, and its decisions can be challenged. It is a quasi-judicial body. या बोर्डाला ज्युडिशिअल पॉवर आहेत. या बोर्डाने घेतलेल्या निर्णयाला जर आपणास चॅलेंज करावयाचे असेल तर कोर्टामध्ये जावे लागते. ज्याप्रमाणे धर्मादाय आयुक्तांनी घेतलेल्या निर्णयामध्ये शासन हस्तक्षेप करु शकत नाही, त्याप्रमाणे या बोर्डाच्या कामकाजामध्ये शासन हस्तक्षेप करु शकत नाही. तरीदेखील सरकारने हस्तक्षेप केला आणि चौकशी केली, of that is irregular. आणि आताही मी चौकशीस तयार आहे. मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. माझ्या निर्णयाला चॅलेंज केले गेले. मी वक्फ बोर्डाचा अध्यक्ष म्हणून स्वत: निर्णय घेतले. चिफ जस्टीस स्वतंत्रकुमार यांनी आपल्या निर्णयात म्हटले आहे, त्यांनी चेअरमनना ॲड्रेस केले आहे." The Chairman, Maharashtra State Wakf Board is directed to decide the matter. It can call the Parties for hearing and give the decision within six months." सभापती महोदय, हे सायटेशन झाले त्यावेळी मी रजिस्ट्रारला विचारले की, हा माझा निर्णय हायकोर्टाने मान्य केला हे माझे सायटेशन यामध्ये घेणार काय? तेव्हा ते म्हणाले की, " This citation will come in the A.I.R. शेवटी दुसऱ्या दिवशी ते म्हणाले की, तुम्ही वकील नाही म्हणून सायटेशन करु शकत नाही.

सभापती महोदय, मला जर या सदनामध्ये पुन्हा येण्याची संधी मिळाली तर I can do the work and that vision will always be there. या सभागृहातील सर्व माननीय सदस्यांशी माझे जिव्हाळयाचे संबंध आले. सर्वांचे मला सहकार्य मिळाले. यामध्ये विशेष उल्लेख

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. एम. ए. अझिज...

माननीय सदस्य श्री. रावते साहेबांचा करावयाचा आहे. मी त्यांना भेटलो आणि माझ्याकडील संपूर्ण कागदपत्रे दाखविली. हायकोर्टाचे चार-चार निर्णय माझ्याकडे आहेत. या निर्णयावर कुणालाही चॅलेंज करता येत नाही. माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी सभागृहामध्ये माझी बाजू मांडल्यानंतर मला खूप आनंद झाला. माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांना भेटण्याचा मी बऱ्याच वेळा प्रयत्न केला. शेवटी ते म्हणाले की, हे सर्व राजकारण होते, त्यामध्ये व्यक्तिगत द्वेष नव्हता. तेव्हा पुन्हा एकदा मला सर्व माननीय सदस्यांनी सहकार्य दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानतो. आणि आपणा सर्वांना एक शेर ऐकवून माझे भाषण संपवितो.

"हो चले हम विदा इस सदनसे ऐसा क्यो,
अब तुम्हारे हवाले ये सदन साथियों"

धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड (नामनियुक्त) : सभापती महोदय, या वरिष्ठ सभागृहामध्ये सदस्य म्हणून येण्याकरिता आमच्या कॉग्रेस पक्षाच्या अध्यक्षा आदरणीय श्रीमती सोनियाजी गांधी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय श्री. विलासरावजी देशमुख, त्यावेळचे प्रांताध्यक्ष आदरणीय श्री.गोविंदरावजी आदिक, अखिल भारतीय कॉग्रेस महासमितीचे सचिव आदरणीय श्री. मुकुलजी वासनिक यांच्यामुळे मला हा मान मिळाला.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड ...

परंतु त्याच्या अगोदरची जी पार्श्वभूमी आहे ती म्हणजे आपण मला आणि श्री. कबीरबापू देशमुख यांना राजकारणाच्या बाबतीत जो कानमंत्र दिला होता त्यामुळे श्री. कबीरबापू देशमुख आमदार झाले आणि मी देखील आपणा सगळ्यांच्या आशीर्वादाने या सदनाचा सदस्य झालो. या सदनामध्ये आल्यानंतर या सदनाचे त्यावेळचे माननीय सभापती प्रा. ना. स. फरांदे साहेब, आपण तसेच श्री. वसंतराव डावखरे साहेब, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेब, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख सर, सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार, सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे या सगळ्यांनी मला या ठिकाणी मोलाचे मार्गदर्शन केले. आपल्यापासून मला खूप काही शिकावयास मिळाले. या महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख साहेब हे मराठवाड्याचे आहेत. मराठवाड्यामध्ये बंजारा समाज बहुसंख्येने राहतो. त्यांचे अनेक प्रश्न त्यांनी जवळून पाहिलेले आहेत. त्या समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक समस्यांची त्यांना जाणीव असल्यामुळे तसेच माजी मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे साहेब यांच्याही मतदार संघामध्ये बंजारा समाज भरपूर असल्यामुळे दोन्ही मुख्यमंत्र्यांनी या सदनामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीचे प्रश्न सोडविताना मला खूप मदत केलेली आहे. या सदनाचे माजी नेते श्री. छगन भुजबळ साहेब, विद्यमान नेते श्री. आर. आर. पाटील साहेब, आमच्या जिल्ह्याचे संपर्क मंत्री डॉ. पतंगराव कदम साहेब, आमच्या मराठवाड्याचे युवा नेतृत्व श्री. अशोक चव्हाण साहेब आणि राजेशदादा टोपे साहेब तसेच या शासनाचे सर्व मंत्री आणि राज्यमंत्री, विधानमंडळाचे सर्व अधिकारी यांचे देखील मला काम करीत असताना खूप सहकार्य मिळाले.

सभापती महोदय, या सदनामध्ये मला मागसवर्गीयांच्या प्रश्नावर, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर, सिंचनाच्या अनुशेषावर, विद्यार्थी, शिक्षक तसेच संस्था चालक यांच्या प्रश्नावर बोलण्याची संधी मिळाली. त्यामुळे मी आपल्याला भाग्यवान समजतो. विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अनेक प्रलंबित प्रश्न सोडविण्याची मला या ठिकाणी संधी मिळाली त्याबद्दल मी शासनाचे आणि विधिमंडळातील सर्वांचे ऋण व्यक्त करतो. माझ्या जीवनातील सगळ्यात महत्वाची घटना म्हणजे

...2...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

RDB

श्री. धोंडीराम राठोड ....

दलित वस्ती सुधार योजनेच्या धर्तीवर तांडा सुधार योजना या महाराष्ट्रामध्ये लागू करावी यासाठी सातत्याने दोन वर्षे प्रयत्न केल्यानंतर महाराष्ट्र शासनाने ही योजना मंजूर केली. हा माझ्या जीवनातील अत्यंत आनंदाचा क्षण आहे असे मी मानतो. मला या सदनामध्ये काम करीत असताना आपणा सगळ्यांचे जे भरभरुन सहकार्य आणि प्रेम मिळाले याबद्दल सगळ्यांचे ऋण व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. वसंतराव चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, आज हा निरोप समारंभ घेत असताना मनामध्ये धुगधुग निर्माण झाली. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी सांगितल्याप्रमाणे ते साहजिकच आहे. सहा वर्षे या सदनामध्ये आपल्या सर्वांबरोबर काम करीत असताना सर्वांनी सहकार्य दिले, प्रेम दिले. विशेषत: या सदनामध्ये येण्याच्या मागे आमचे नेते आदरणीय श्री. शरद्‌चंद्र पवार साहेब यांच्या माध्यमातून तसेच आमच्या सभागृहाचे नेते श्री. आर. आर. पाटील साहेब, आमच्या पक्षाचे अध्यक्ष श्री. अरुणभाई गुजराथी साहेब, आमच्या जिल्ह्याचे आमचे ज्येष्ठ नेते श्री. कमलकिशोर कदम साहेब यांच्या माध्यमातून मला या ठिकाणी येण्याचा योग आला.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. वसंतराव चव्हाण...)

मी सामान्य शेतकरी कुटुंबामध्ये जन्माला आलो. ग्रामीण भागामध्ये काम करीत असताना, शेतक-यांसाठी काम करीत असताना मी एका गावचा 20 वर्षे सरपंच म्हणून काम केले. दोन वेळा जिल्हा परिषदेचा सदस्य म्हणून निवडून आलो. सामाजिक, सहकारी क्षेत्रामध्ये कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या माध्यमातून मला काम करण्याची संधी मिळाली. तसेच शैक्षणिक क्षेत्रमध्ये देखील मला काम करण्याची संधी प्राप्त झाली. या सर्व संधी मला प्राप्त झाल्या त्याचे श्रेय माझे वडील कै.बळवंतराव चव्हाण यांना आहे. कै. बळवंतराव चव्हाण हे या सदनाचे तसेच विधानसभेचेही सदस्य होते. त्यांच्याकडूनच मला सार्वजनिक जीवनातील कार्याचा वारसा मिळाला आणि पुढे या सभागृहामध्ये काम करण्याची संधी मिळाली. एक सामाजिक बांधिलकी ठेवून समाजाचे काम करीत असताना राजकारणातही काम करावे असे मी ठरविले आणि राजकारण आणि समाजकारण अशी माझ्या कामाची चौकट राहिली. त्यामुळेच मला येथे येता आले. या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, या सदनामध्ये ज्येष्ठ-श्रेष्ठ अशी मंडळी आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार, सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी, सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम यांचे येथील काम पाहून मला खूप काही शिकता आले. या सदनाच्या माध्यमातून मी माझ्या भागातील प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. ते सोडवित असताना असताना सन्माननीय सदस्यांनी मला त्यांचा एक छोटा बंधू या नात्याने सहकार्य केले. मी आपणा सर्वांचे आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

---

(यानंतर हिंदी भाषण श्रीमती फौजीया खान यांचे)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान :(नामनियुक्त): सभापति महोदय, मैं दो शब्द कहना चाहती हूं.

दिल की तह की कही नहीं जाती
नाजुक है अहसास बहुत
अक्षर है इश्क के दो
लेकिन है विस्तार बहुत

सभापति महोदय, इश्क को विस्तार के दृष्टिकोण से देखा जाए तो इसमें बहुत कुछ समा सकता है. माँ की ममता, पिता-पुत्र का प्यार, भाई-बहन का प्यार, दोस्त-दोस्त की मुहब्बत, गुरु-शिष्य का प्यार इत्यादि. इसी तरह से मैं समझती हूं कि यह सभागृह मेरे लिए हमेशा के लिए गुरु का दर्जा रख रहा था. 6 साल पहले जब मैंने राजनीति में कदम रखा तो राजनीतिक अनुभव की मेरी तख्ती बिल्कुल साफ थी. मेरे पास कोई राजनीतिक अनुभव नहीं था. 12 खड़ी से मैंने यह प्रवास शुरु किया था और आज 6 साल में यहाँ इस सदन में हुए दर्जेदार डिबेट, विभिन्न विषयों पर की गई चर्चा, इन सब का अनुभव प्राप्त करने के बाद आज मैं यहाँ से ग्रेज्युएट हो कर जा रही हूं, ऐसा मुझे अहसास हो रहा है. यहाँ की गेज्युएशन की डिग्री चार-पाँच युनिवर्सिटी की डिग्री से भी ज्यादा बड़ी और महत्वपूर्ण है, ऐसा मैं समझती हूं. 6 साल के दौरान मुझे मिली बहुत सारी खट्टी-मीठी यादें लेकर साथ जा रही हूं. लेकिन ज्यादा यादें, ज्यादा अनुभव मेरा अच्छा और मीठा ही रहा है. क्योंकि मुझे यहां पर सभापति महोदय का फादरली फिगर मिला, सहयोगियों का फ्रेंडली एटीट्यूड मिला, मंत्रियों और पक्ष-विपक्ष के सदस्यों से सपोर्ट और सम्मान मिला. कभी-कभी लोग यह कहते हैं कि यहाँ हमारा काम नहीं है इसलिए हमें कोई पूछता नहीं है, हमारी कोई इज्जत नहीं होती है. ऐसी शिकायत सुनने को मिलती थी तो मुझे ताज्जुब होता था कि ये लोग ऐसा क्यों बोल रहे हैं क्यों कि मुझे हमेशा ही सपोर्ट और सम्मान मिला है. मेरे द्वारा यहाँ पर अच्छा भाषण करने पर विपक्ष के सदस्यों ने भी सराहना की है. मेरा भाषण समाप्त होने के बाद वे मुझे चिट्ठी भेजकर सराहना करते थे. इस तरह उन्होंने मुझे हमेशा ही प्रोत्साहित किया. सम्माननीय सदस्य श्री गडकरी, श्री मधुकर चव्हाण, श्री अरविंद सावंत जी हमेशा ही मेरी सराहना करते थे. माननीय सदस्या श्रीमती नीलम गोरहे हमेशा ही मेरे लिए एडमायर रही है. उनका हर विषयों का अभ्यास, सामाजिक अहसास और यहां पर प्रश्न रखने का अंदाज उनका

.3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निराला ही था. उनसे मुझे बहुत कुछ सीखने का मिला है. सम्माननीय सदस्य श्री रावते जी ने मेरे सामने हमेशा ही चेजेंज रखा है. लेकिन मेरे पीछे वे हमेशा ही प्रशंसा करते थे. वे मेरे बारे में अच्छी राय रखते है. इस संबंध में मुझे बहुत बार अनुभव हुआ है. मुझे हमेशा मालूम होता रहा है कि वे मेरे बारे में अच्छी राय रखते हैं. हालांकि सदन में उन्होंने अपनी ड्यूटी निभाई. लेकिन वे हमेशा ही मेरे विचारों के साथ रहे. यहाँ पर सार्वजनिक विषयों के संबंध में पक्ष-विपक्ष के सारे सदस्य एक साथ हो जाते थे. विरोधी पक्ष से प्रोत्साहन मिलता था. ओबीसी का प्रश्न हो, महिलाओं का प्रश्न हो, अल्पसंख्याक का प्रश्न हो, ऐसे विषयों पर हम सब एक दूसरे के साथ होकर समर्थन करते थे. इस तरह से एक दूसरे के सहयोग के साथ मेरा 6 साल का प्रवास गुजरा है. मैं सचमुच यहाँ से बहुत बड़ा खजाना लेकर जा रही हूं.

भाषण अपूर्ण, यानंतर श्री देवदत्त.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

30-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 5T.1

SGB/ DD/ (श्री तालेवार के बाद ) 21.05

श्रीमती फौजीया खान...

महिलाओं की पार्टी यानी तीन सदस्यों की पार्टी. उसमें श्रीमती सुधाताई जोशी, श्रीमती मंदाताई म्हात्रे और श्रीमती उषाताई दराडे जी. उनके गाढ़े अनुभव का मुझे बहुत फायदा हुआ. शुरु शुरु में मैं बिटविन द लाइन लेंग्वेज समझ नहीं पाती थी. क्योंकि शिक्षण क्षेत्र का वातावरण कुछ अलग है. इसलिए छोटे छोटे टिप्स देने का काम मुझे मेरी इन सहेलियों से मिलता रहा. जिसकी वजह से मैं यहां की सीढ़ियां बहुत जल्दी जल्प्दी चढ़ती गयी और इस वातावरण में एडजस्ट होने की स्किल मुझे आ गयी.

माननीय सभापति जी,आज मेरे बारे में यहां पर बहुत अच्छी अच्छी बातें कही गयी हैं. यहां पर मेरे बारे में इतनी अच्छी अच्छी बातें कहीं गयी हैं कि मैं सोच भी नहीं सकती . मुझे उम्मीद नहीं थी कि मुझे मेरे बारे में इतने मीठे बोल सुनने को मिलेंगे. यहां पर यह भी कहा गया कि मैं अल्पसंख्यक समाज की महिला हूं और उच्च शिक्षित हूं यहां पर कहा गया कि यदि मैं अपने समाज को ऐसा बना सकूं तो बहुत अच्छा होगा.

सभापति जी, मैं यहां पर कहना चाहूंगी कि जो कुछ यहां पर मेरे बारे में कहा गया है उसका एक फ्रेक्शन भी यदि सच है तो इसका सारा श्रेय मैं अपने पक्ष के श्रेष्ठ आदरणीय शरद पवार साहब को देना चाहूंगी. जिन्होंने एक मुस्लिम स्त्री के रुप में मुझे यहां आपके सामने लाकर एक उदाहरण रखा कि मुस्लिम स्त्री कैसी होती है. मुझे लगता है कि बहुत सी मिस अंडरस्टेंडिंग हमारे समाज के बारे लोगों के दिलों में हैं. जब हम नजदीक आते हैं और आपस में बातचीत होती है, तो मिस अंडरस्टेंडिंग दूर होती हैं. इस मिस अंडरस्टेंडिंग को दूर करने की कोशिश आदरणीय पवार साहब ने मुझे यहां पर प्रतिनिधित्व देकर की है. मैं कहना चाहती हूं कि मैं अपने समाज की महिलाओं और पुरुषों से कुछ अलग नहीं हूं. हमारी समाज की ज्यादातर महिलाएं और पुरुष इसी तरह के हैं. लेकिन शायद दूरी की वजह से ही एक दूसरे की कल्चर के बारे में अंडरस्टेंडिंग न होने की वजह से कभी कभी हमारी मिस अंडरस्टेंडिंग हो



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DD/ ( श्री तालेवार के बाद )

श्रीमती फौजीया खान....

जाती हैं. माननीय सभापति जी, मैं यहां पर कहना चाहूंगी ंकि मैं आप सबकी बेइंतहा शुक्रगुजार हूं. मैं यहां से जो खजाना लेकर जा रही हूं उसके लिए मैं इस सदन की हमेशा आभारी रहूंगी. लेकिन मैं इतनी छोटी हूं कि मेरे पास देने के लिए कुछ नहीं है. जबकि मैं यहां से लेकर बहुत कुछ जा रही हू. आखिर में मैं कहना चाहूंगी कि यह क्षण बहुत दुख का क्षण है. मैंने यहां पर जिस तरह से इस सदन में प्रेम की बात की तो मैं अपनी बात भी यहां पर एक शेर कहकर ही खत्म करुंगी. वह शेर इस प्रकार है कि--

हिज्र ने ही जी मारा, क्या कहिए क्या वहशत है
उससे ही जुदा होना होता है जिससे हमें प्यार बहुत

-0-.

5 u-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, फेब्रुवारी, 20 ला 6 वर्षे पूर्ण होतील. हॅर्निमन सर्कलला गाडी होती आणि संध्याकाळचे साडेपाच वाजले होते. तेवढयात मला साहेबांचा मोबाईल आला. त्यावेळेस मी ब्रिटिश कौन्सील लायब्ररीमध्ये पुस्तके घेत होतो. साहेबांनी मला विचारले "तू कोठे आहेस" तेव्हा मी सांगितले की, ब्रिटिश कौन्सील लायब्ररीमध्ये पुस्तके घेत आहे. त्यांनी सांगितले, "अभिनंदन तू आमदार झालास." तोपर्यंत मला कल्पना नव्हती की, आमदार म्हणजे काय? मी आमदार कसा झालो याबद्दल त्यांना विचारण्याचे मला धाडस झाले नाही. नंतर त्यावेळेस मी बबनराव पाचपुते यांना विचारले व त्यांनी सांगितले की, 21 तारखेला यादी येईल. आणि बोलता बोलता आता या गोष्टीला सहा वर्षे होऊन गेलीत. काळ हा कोणासाठी थांबत नाही. खरे म्हणजे निरोप म्हटला की, भावना विवश होऊन ढसाढसा रडणारा मी माणूस आहे. त्यामुळे निरोप समारंभाच्या कार्यक्रमात सभागृहात काही बोलावयाचे नाही असे मी ठरवले होते. सगळेच बोलले आणि मी बोललो नाही तर तेही चुकीचे होईल म्हणून मी या ठिकाणी बोलत आहे. 10 वी चा निरोप मी घेतला नव्हता, 12 वी चा निरोप मी घेतला नव्हता, कॉलेजचा निरोपही मी घेतला नव्हता. निरोप देणे यापेक्षा अजून दुसरा दुःखाचा क्षण नाही असे मानणारा मी आहे. निरोप देण्याचा कार्यक्रम हा जेवढा कमी वेळात होईल तेवढा तो मनाला चांगला वाटतो. माझ्या आईचा जेव्हा मृत्यू झाला तेव्हा मी माझ्या वडिलांना सांगितले की, अंत्ययात्रा अर्ध्या तासांनी काढा. कारण तेथे जाणे आणि तेथे जाऊन तिचे अस्तित्व नसणे ही गोष्ट मला पटूच शकत नाही. म्हणून मी आज, सारखा आत बाहेर करीत आहे. या ठिकाणी सांगण्यात आले की, तू येणार, नाही येणार अल्ला जाणे. परंतु पुढे काय ? तरी देखील मी या सहा वर्षात येथे खूप काही शिकलो आहे. या ठिकाणी मी चिडलेले रावते, अभ्यासपूर्ण रावते, रागावलेले रावते, पटकन अंगावर जाणारे रावते असे त्यांचे हे सर्व आविष्कार मला या ठिकाणी बघावयास मिळाले. पूट अप, नॉट टू पूट अप, झ ारीतील शुक्राचार्य, ब्युरोक्रसीला ठणकावून सांगणारे गडकरी मला बघायला मिळाले. अतिशय समृध्द भाषा शैलीत आपल्या पक्षाची भूमिका मांडणारे फुंडकर साहेब मला बघायला मिळाले. मधुकर चव्हाण आणि विनोद तावडे हे माझे मित्रच आहेत. परंतु माननीय मधु चव्हाणांचे आजचे भाषण मला वाटते तो साहित्यातील एक चांगला अविष्कार होता. डॉ. नीलम ताईकडून मला खूप काही



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ......

शिकण्यासारखे मिळाले. महाराष्ट्रात कुठेही एखादी वाईट घटना घडली की, ती घटना व्यवस्थितपणे सभागृहात मांडण्याचे काम ते करतात. डॉ. दीपक सावंत, अरविंद सावंत, परशुराम उपरकर यांचा देखील मला चांगला सहभाग मिळाला, खरे म्हणजे मला सर्वांचा चांगला सहभाग मिळाला. आमच्या शाऊटींग ब्रिगेडचा मी प्रमुख असल्यामुळे माझ्यावर माननीय गुरुनाथ कुलकर्णींचे जरा जास्तच प्रेम होते. त्यामुळे याबाबत खरे म्हणजे गुरुजींना धन्यवाद दिले पाहिजे. जेव्हा केव्हा असे प्रसंग येत तेव्हा ते मला नेहमी सांगायचे की, "तू पुढे हो."

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड..........

सभागृहात बेळगावचा प्रश्न उपस्थित झाला आणि त्यावर चर्चा घेण्याचे ठरले. या विषयावर सर्वप्रथम कोणी बोलावे, तेव्हा माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मला मोठ्या मनाने सांगितले, "या विषयावर आपली बोलण्याची इच्छा आहे, तर मग तू प्रथम भाषणास सुरुवात कर." बेळगाव कारवार यासह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे हे कधी काळी शब्द ऐकले होते. त्याबद्दल मला येथे मराठी माणसाच्या भावना मांडता आल्या, हा प्रसंग माझ्या आयुष्यात कायम लक्षात राहील.

खरे म्हणजे आज मला प्रमोद नवलकर यांची खूप आठवण येते. त्यांचे एकही भाषण कधीही मी सोडायचो नाही. त्यांची भाषा शैली, त्यांची शब्दावर असलेली पकड, त्यांचे वक्तृत्व, ते आपल्या भाषणातून अशा सहजतेने आपल्या भावना व्यक्त करायचे की, सर्वांना ते जागेवर खिळवून ठेवायचे. त्यांना हा एक दैवी आशीर्वाद होता. तो प्रत्येकाला मिळतोच असे नाही.

याठिकाणी माननीय सभापती व माननीय उपसभापती यांनी मला नेहमीच न्याय देण्याचा प्रयत्न केला. काल सभागृहात मेन्टल हॉस्पीटलाच्या प्रश्नावर मी खूप जोरजोराने बोलत होतो. मला माननीय सभापतींचा चेहरा थोडा चिडलेला दिसला. सार्वजनिक जीवनात एखादे व्रत घेतल्यानंतर सामाजिक प्रश्न लावून धरण्याची माझी एक वेगळी अशी पध्दती होती त्यातूनच मी हे सर्व करीत होतो.यात कोणताही व्यक्तिगत उद्देश नसायचा.

याठिकाणी मला संवेदनशील माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील पहावयास मिळाले. माननीय मुख्यमंत्र्यांकडून एक निर्णय घेतला तो माझ्या आयुष्यभर लक्षात राहील. तीन वर्षापूर्वी माननीय मुख्यमंत्री विधानसभा सभागृहात गिरणी कामगारांच्या प्रश्नासंबंधी बोलत होते. गिरणी कामगारांची देणी दिल्याशिवाय गिरणी मालकांना मिल विकू देणार नाही असे त्यांनी सांगितले. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, फक्त मुंबईतच गिरणी कामगार नाहीत तर समस्त ठाणे शहरातील उद्योग उद्ध्वस्त होऊन तेथील कामगार उद्ध्वस्त होत आहेत. कामगारांची देणी न देता जमिनी विकल्या जात आहेत, याबाबत आपण कोणता निर्णय घेणार आहात ? माननीय मुख्यमंत्र्यांनी त्वरेने निर्णय घेतला, ज्याप्रमाणे मिल कामगांराची देणी दिल्याशिवाय मालकाला मिल

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

विकता येणार नाही असा निर्णय घेण्यात आला आहे, त्याप्रमाणे कुठलाही कारखाना विकायचा असेल तर कामगारांची देणी दिल्याशिवाय तो विकता येणार नाही. हा माझ्या आयुष्यातील एक चांगला निर्णय आहे. आपण अनेक निर्णयांमध्ये सहभागी असतो. पण ज्या निर्णयातून गरीब माणसाला न्याय मिळाला, मराठी माणसाला न्याय मिळाला आणि त्या निर्णयात आपला वाटा आहे. यामुळे मनाला खूप समाधान मिळते. उद्ध्वस्त झालेल्या कामगारांमध्ये मोठ्या प्रमाणावर मराठी माणूस आहे, फार कमी कामगार इतर प्रांतातील आहेत. त्या मराठी माणसासाठी थोडे करु शकलो ही भावना माझ्या मनात कायम होती.

मंत्रिमंडळातील सर्व सहकाऱ्यांनी मला काम करण्याची संधी दिल्यामुळे मी दहा कोटी जनतेपर्यंत पोहोचू शकलो. महाराष्ट्रात स्वत:चे एक वेगळे स्थान निर्माण करु शकलो. आमदार झाल्यानंतर समाजात एक प्रतिष्ठा असते, एक वेगळेपण असते त्याचा फायदा घेऊन सांस्कृतिक क्षेत्रात, साहित्यिक क्षेत्रात तसेच विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून काम करण्याची संधी मिळाली. हे सर्व आदरणीय श्री.शरद पवार यांच्यामुळे मिळाले हे मी याठिकाणी कबूल करतो. अन्यथा हा जितेंद्र आव्हाड कोण आहे, कोण विचारते त्याला ? शेवटी एक नेता असतो जो आमच्या सारख्या सामान्य कार्यकर्त्यास परिसस्पर्श करुन पुढे नेतो. त्यांनी दिलेल्या संधीचा जेवढा फायदा घेता आला तेवढा घेतला, जेवढे करता आले तेवढे केले आणि ते सभागृहाच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. वेळप्रसंगी मतभेद झाले पण मन भेद कधी झाले नाही. कधी चुकलो तर माननीय श्री.नितीन गडकरी सांगायचे, "जितेंद्र तुझे आजचे वागणे बरोबर नव्हते, तू आज सभागृहातून लवकर निघून गेलास." पण जेव्हा जेव्हा चांगली भाषणे झाली त्यावेळी सर्वात जास्त चिठ्ठया श्री.नितीन गडकरी यांच्या आल्या. अशा मोठ्या मनाची माणसे याठिकाणी पहावयास मिळाली. चांगले अनुभव मिळाले. आज मी या ठिकाणांहून विचारांचा व मैत्रीचा धनसंचय घेऊन बाहेर जात आहे. हा धनसंचय आयुष्यभर हृदयात कायम राहील. शेवटी जीवनात काय असते, हेच धन सर्वात महत्वाचे असते हे मी कायम मानतो. आपण सर्वांनी खूप आशीर्वाद दिलेले आहेत,

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड..........

खूप शुभेच्छा दिलेल्या आहेत. माझ्या अंदाजाप्रमाणे या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.सागर मेघे यांच्यानंतर मीच कमी वयाचा आहे. या कमी वयाच्या भावाला आपण सर्वांनी प्रमाने आशीर्वाद दिला, शुभेच्छा दिल्या. त्याच पुढील आयुष्याच्या मार्गक्रमणात माझ्या साथीदार असतील, त्याच मला पुढे घेऊन जातील. मला उद्या गुजरातला जायचे असल्यामुळे मी रात्रीच्या विमानाने तिकडे जात आहे. मी आपल्या सर्वांचा प्रेमाने निरोप घेतो. असेच आशीर्वाद कायम राहू द्या, काही चुकले असेल तर माफ करावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष गांधी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये मी ज्यांच्यामुळे येऊ शकलो ते आमचे नेते माननीय श्री.शरदचंद्र पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करुन मी आपल्यापुढे उभा आहे.

राज्य शास्त्र, लोक प्रकाशन आणि समाज शास्त्र या तिन्ही विषयांचा मी विद्यार्थी असल्यामुळे एकंदरीत लोकशाही प्रणालीच्या संदर्भात, लोकशाहीच्या भवितव्या संदर्भात सातत्याने विचार करण्याची मला सवय आहे. मला या गोष्टीचे नेहमीच आश्चर्य वाटते केवळ मलाच आश्चर्य वाटते असे नाही तर सर्व जग आश्चर्य व्यक्त करते की, भारतासारख्या मोठ्या देशामध्ये लोकशाही अजूनही जीवंत का आहे ?

यानंतर श्री.पुरी......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरिष गांधी...

अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा मी सातत्याने प्रयत्न करीत होतो. लोकशाहीवर माझा अतूट विश्वास होता, म्हणून त्या लोकशाहीची काय बिजे आहेत, ती मला या सभागृहामध्ये आणि विशेष करुन आजच्या या प्रसंगामध्ये पहावयास मिळाली. अनेक वक्त्यांनी त्याचा उल्लेख केला. आज ज्या पध्दतीने माननीय सर्वश्री भाऊसाहेब फुंडकर, नितीनजी गडकरी, डॉ.नीलमताई गोऱ्हे, श्री.मधुकर चव्हाण या सर्वांनी ज्या पध्दतीने भावना व्यक्त केल्या, त्या लोकशाहीच्या दृढतेच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या आहेत, असे मला मनापासून वाटते. आज जे 12 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत, ते सगळे योगायोगाने सत्ताधारी पक्षाचे आहेत. एकंदरीत त्यांच्याप्रती त्यांनी ज्या स्पिरिटमध्ये भावना व्यक्त केल्या, त्या कौतुकास्पद आहे. मला फक्त दोनच अधिवेशनामध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. माननीय आबांनी सुरुवातीलाच सांगितले की, सर्वात कमी कालमर्यादा असणारा मी आणि सर्वात तरुण असणारे श्री.जितेंद्र आव्हाड असे दोघेही आज निवृत्त होत आहोत. एका अभंगामध्ये तुकाराम महाराजांनी असे म्हटले आहे की, "कन्या सासरासी जाये, मागे परतुनी पाहे, तैसे झाले माझ्या जीवा कधी भेटसी केशवा" त्यापुढे जाऊन कदाचित तुकाराम महाराजांना माहीत असेल की, त्यावेळची जी कन्या सासरी जायची ती वयाने 8-10 वर्षांची होती. म्हणून कदाचित स्वाभाविक त्यांना वाटले असेल की, ती 8-10 वर्षांची मुलगी सासरी जाताना स्वाभाविकपणेच मागे वळून पाहणार आहे, आप्तांना सोडताना तिचे दु:ख स्वाभाविकच राहणार आहे. परंतु तुकाराम महाराजांना हेही माहीत असेल व त्यांनी विचार केला असेल की, 21 व्या शतकातील मुलगी काही 8-10 वर्षांची राहणार नाही. तिला सासरी जाण्याच्या संदर्भात तेवढे दु:ख होणार नाही. भावनात्मक मी म्हणत नाही व्यवहारीक दृष्टीकोनातून मला म्हणावयाचे आहे. शेवटी ते असे म्हणाले की, "पाण्याविना मासोळी तैसा तुका तळमळे" हे अबाधित सत्य आहे. कोणत्याही कालखंडामध्ये मासोळी पाण्याशिवाय राहू शकत नाही.

याठिकाणी आदरणीय अरुणभाईंनी उल्लेख केला की, जो कार्यकर्ता हाडामासाचा असतो, जो जीवनामध्ये काही ध्येय-धोरण उराशी बाळगून काही करु इच्छितो, त्यांना जीवनामध्ये निवृत्ती वगैरे काही नसते. त्याला आयुष्यामध्ये अशा काही संधी मिळत असतात. त्या संधीचा फायदा केवळ स्वत:साठी करावा की त्या लोकशाही मूल्यांच्या जपणुकीसाठी करावा की उपेक्षित

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरिष गांधी...

लोकांसाठी करावा, याबाबत प्रत्येक लोकप्रतिनिधींनी मग तो कोणत्याही पक्षाचा असो याचा कुठेतरी गंभीरतेने विचार करण्याची गरज आहे, असे माझे अतिशय स्वच्छ व प्रामाणिक मत आहे. आज मलाही दुःख होत आहे, परंतु माझी मुदत संपत असल्याचे मला दुःख नाही वा मी पुन्हा सभागृहात येऊ शकेन की नाही याबाबतही मला चिंता नाही. परंतु दुःख निश्चित एका गोष्टीचे आहे की, या सभागृहातील माझे जे काही मित्र आहेत, त्यांच्या पासून मी आज दूर जाणार आहे. हेच खरे या देशाचे आणि राज्याचे सामर्थ्य आहे. जो महाराष्ट्र स्व.यशवंतराव चव्हाण यांना घडवायचा होता, त्याच पध्दतीचा सुसंस्कृतपणा महाराष्ट्राच्या राजकारणांमध्ये आज पहावयास मिळत आहे, ही माझ्या दृष्टीने अतिशय महत्वाची बाब आहे. विरोधी पक्षात सन्माननीय श्री.मधुकर चव्हाण असतील,

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष गांधी.........

सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत असतील ही तरुण मंडळी आणि इकडची तरुण मंडळी मंत्र्यांच्या रुपाने सर्वश्री.राजेश टोपे, राणा जगजितसिंह पाटील, राजेंद्र शिंगणे असतील, जे तरुण आहेत, ज्यांना आपण तिसरी पेढी म्हणू शकतो, ही सर्व तरुण मंडळी महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये ज्या दमदारपणे उभे आहेत, या सभागृहातील वातावरणामुळे माझा लोकशाहीवरील विश्वास पुन्हा दृढ झाला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, मात्रे मित्र श्री.नितीन गडकरी यांनी माझ्याबद्दल सांगितलेली एक गोष्ट खरी आहे. त्यांचे आणि माझे संबंध, त्यांच्या पक्षामध्ये त्यांना आणि माझ्या पक्षामध्ये मला अनेकदा अडचणीत आणणारे ठरले. पक्षविरहित मैत्रीवर लोकांचा विश्वास का बसू शकत नाही, हे कोडे आजही मला पडलेले आहे. सन्माननीय श्री.नारायण राणे साहेब शिवसेनेमध्ये असतांना पासून एकही अधिवेशन असे जात नव्हते की, ज्यावेळी ते स्वत: फोन करुन माझ्या घरी आले नाहीत. वैचारिक मतभेद असू शकतात. श्री.नितीन गडकरी हे नेहमी सांगतात की, श्री.गिरीष गांधी यांनी माझ्या पक्षातील कित्येक कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेले. पक्ष भूमिकेबाबत त्यांनी आणि मी कधीही तडजोड केली नाही. मात्र ज्यावेळी विकासाचे प्रश्न निर्माण होतात त्यावेळी एकत्रित पाठपुरावा करण्यामध्ये आम्ही मागेपुढे पहात नाही.

सभापती महोदय, अनेक महान नेत्यांच्या तसबिरी सभागृहात लावल्या आहेत. या तसबिरी केवळ लावण्यासाठी लावल्या असतील, त्यांचे नाव केवळ सोयीसाठी, राजकारणासाठी घेण्याचे ठरविले असेल तर ते योग्य होणार नाही. अलिकडे अशा पध्दतीने बोलणे न पटणारे आणि न रुचणारे झाले आहे. ज्या ठिकाणी विरोध करायचा असेल त्या ठिकाणी विरोधकाची भूमिका स्वीकारलीच पाहिजे, कारण वैचारिक मतभेद असू शकतील. काल आपण एक अतिशय महत्वाचे विधेयक पास केले. नागरी कमाल जमीन धारणा कायद्यासंदर्भातील ते विधेयक होते. परंतु, आपण सर्वांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे, ते यासाठी की, ज्या उद्देशाने प्रेरित होऊन सन 1976 मध्ये हा कायदा राज्याने केला त्यामध्ये आपण किती यशस्वी झालो आहोत ? ते विधेयक पास झाले, त्यावर अधिक भाष्य करण्याचा मला अधिकार नाही. पण कुठे तरी तो प्रसंग मला आठवतो. या देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भगतसिंग, चंद्रशेखर आझाद हे एका संघटनेमार्फत काम

...2.......



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष गांधी..........

करीत होते. त्या ठिकाणी चंद्रशेखर आझाद यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यासाठी भगतसिंग नावाचा तरुण चंद्रशेखर आझादांना भेटण्यासाठी गेला. त्याने सांगितले की, पंडितजी...त्याकाळी आझ ादांना पंडितजी म्हणत असत, पंडितजी मुझे आपके संगठन में शरीक होना है लेकिन मेरी एक कंडिशन है. चंद्रशेखर आझादांना कंडिशन टाकावी, असे तोपर्यन्त घडले नव्हते. चंद्रशेखर आझ ादांनी कंडिशन विचारली, त्यावेळी भगतसिंग त्यांना म्हणाले, 'हिंदुस्थान रिव्हॉल्युशनरी आर्मी' हे आपल्या संघटनेचे नाव बदलून 'हिंदुस्थान सोशिअलिस्टिक रिव्हॉल्युशनरी आर्मी' असे नाव ठेवले पाहिजे. नंतर ज्यावेळी भगतसिंगांवर खटला चालू होता, त्यावेळी त्यांनी न्यायाधीशांसमोर वारंवार सांगितले की, या देशाला केवळ स्वातंत्र्य मिळावे एवढा मर्यादित उद्देश माझा नाही, या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते स्वातंत्र्य कोणत्या आणि कशा पध्दतीने वापरण्यात येईल, कशा पध्दतीने त्याचा उपयोग होईल, अशा माझ्या संवेदना आहेत. अशा पध्दतीने आणि या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरुंनी आणि सर्व मान्यवरांनी समाजवादी अर्थव्यवस्था स्वीकारण्याच्या मागे काही तरी उद्दीष्टे होती. त्या उद्दिष्टांपासून आपण दूर जात आहोत, याचा चटका आपल्यापर्यन्त काही बसणार नाही, आपले सगळे आलबेल राहिल, पण पुढच्या पिढीचे काय ?

सभापती महोदय, शेतक-यांच्यासंदर्भामध्ये चर्चा होत असतांना एक गोंष्ट पुढे आली. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांनी एक महत्वाचा मुद्दा उपस्थित केला. एकीकडे आपल्या राज्याचा खर्च हा पगार देण्यासाठी किती खर्च होतो आणि बाकीच्या गोष्टींवर किती खर्च होतो, हे बघितले तर प्रामुख्याने याची झळ समाजामध्ये कुठे तरी पोहोचत आहे. पर्यावरणासंदर्भामध्ये मी नेहमी सांगत असतो की, याची झळ आपल्याला बसणार नाही, आपले 'राम नाम सत्य' चांगले होईल, तेवढी नैसर्गिक संपत्ती आपल्याकडे आता आहे, पण भविष्यातील पिढीला कोणत्या पध्दतीचे ताट आपण वाढून ठेवणार आहोत, या सर्वाची चिंता त्या त्या पिढीने करावयाची असते.

सभापती महोदय, राजकारणामध्ये अलिकडे एक गोष्ट झाली आहे. राजकारण करायचे ते सत्तारुढ होण्यासाठी, सत्ता मिळविण्यासाठी.

यानंतर श्री.बोरले.........

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ प्रथम श्री.रोझेकर .......... 21:30

श्री.गिरीष गांधी ..........

स्पर्धा कशाची तर सत्ता मिळविण्याची, स्पर्धा कशाची तर संपत्ती मिळविण्याची हे असेच प्रकार जर सभागृहात होत राहिले तर आपले सारे आलबेल होईल. आपण रोज गाडया बदलवू, आपल्याला वाटेल तशा पद्धतीने आपण आपले स्वत:चे साम्राज्य उभे करु शकू. पण येणा-या पिढीसाठी आपण फार वेगळे पायंडे पाडून ठेऊ त्यादृष्टीने या सभागृहात कामकाज चालावे, एवढीच माझी अपेक्षा आहे. मी तत्वज्ञान सांगण्याच्या भूमिकेतून बोलत नाही. मी सर्व दृष्य पाहिलेले आहे. नक्षलवाद का फोफावतो आहे याचा गंभीरतेने विचार करण्याची आवश्यकता आहे. आज फक्त उपोषणाचे मंडप घराजवळ येतात. माझ्या घराजवळ 10 फुटापर्यंत उपोषणाचे मंडप आले होते. मी माझ्या पत्नीला आणि मुलाला म्हणालो की, एक दिवस आपल्या घरामध्ये सुध्दा मडपवाले येतील. तशी जर परिस्थिती निर्माण झाली तर त्यासाठी फक्त आपण जबाबदार राहू. केवळ पक्षाभिनिवेष आणून सर्व प्रश्नांकडे पाहता येणार नाही. त्याच्या पलिकडे जाऊन विचार व्हावा, अशी एक लोकशाहीचा पुरस्कर्ता म्हणून माझी अपेक्षा आहे. या दृष्टीकोनातून सभागृहाचे कामकाज व्हावे, असे मला वाटते. सामाजिक क्षेत्रामध्ये जी बांधिलकी स्वीकारुन आपण येथे येत असतो त्यांच्यासाठी मी आमच्या विदर्भातील रमेश भटांच्या कवितेतील दोन ओळी सांगतो.

"एक एक युद्ध माझे मी हारलो,
तरीही मला अजिंक्य केले माझ्याच पराभवांनी."

सभापती महोदय, आयुष्यामध्ये जेव्हा आपण भूमिका घेत असतो, सामाजिक संदर्भातील भूमिका घेत असतो त्यामध्ये यश फार कमी वाटयाला येत असते. श्री.आर.आर.पाटील ज्या पद्धतीने काम करतात त्या पद्धतीने त्यांना लोकप्रियता मिळणार नाही. परंतु ज्या पद्धतीने ते काम करतात तसे नेतृत्व दुर्मिळ झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी आणि इतर काही मान्यवर येथे आहेत अशा नेत्यांची आज गरज आहे आणि तसे नेतृत्व घडविण्याची जबाबदारी सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सर्व सदस्यांवर आहे. आपण आपलेच जमवून घेण्यापेक्षा आपली खरी बांधिलकी त्यांच्यासाठी असेल या गोष्टींचा विचार कोठे तरी गांभीर्याने व्हायला पाहिजे, अशी माझ यासारख्या लहान कार्यकर्त्याची अपेक्षा आहे. या ठिकाणी मला अनेक चांगल्या गोष्टी दिसल्या.

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष गांधी ..........

सर्व गोष्टी वाईटच आहेत असे नाही. मी सुरुवातीलाच सांगितले की, लोकशाही सशक्त होण्याच्या दृष्टीने तरुण मंडळी तयार होत आहे. कृषी मंत्री श्री.बाळासाहेब थोरात येथे बसलेले आहेत. माझे त्यांच्याकडे लक्ष नव्हते. ते अतिशय चांगल्या पद्धतीने आणि अतिशय नम्रतेने काम करतात. अशा पद्धतीने नवीन नेतृत्व जर महाराष्ट्रामध्ये घडले तर यशवंतराव चव्हाणांच्या स्वप्नातील महाराष्ट्र, वसंत दादांनी ज्यासाठी धडपड केली तो गरीबांसाठी आस्था ठेवणारा महाराष्ट्र आणि ज्यांचे फोटो आपण या सभागृहात मोठया आदराने लावलेले आहेत या सर्वांचा उपयोग होईल, असे मला वाटते. या थोडया दिवसात मला सर्वांनी जे प्रेम दिले त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. माझे सर्वांशी संबंध होते. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.भाऊसाहेब फुंडकर यांच्याबरोबर मी काम केलेले आहे. 1978 ची विधानसभा निवडणूक आम्ही लढविलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल व इतर काही लोकांशी माझा संबंध आला होता. पण या सभागृहात आल्यानंतर विरोधी पक्षातील कोणत्या सदस्याच्या मी प्रेमात पडलो असेल तर ते सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या. शेतक-यांचे प्रश्न ते अतिशय पोटतिडकीने मांडतात. शेतकरी दिंडी पासूनचा मी त्यांचा सर्व प्रवास पाहिलेला आहे. कोणताही पक्ष असो शेतक-यांच्या प्रश्नांसाठी, सामाजिक हितासाठी जर कोणी प्रश्न उपस्थित करत असतील तर केवळ पक्षाभिनिवेष आणून आपण बोललोच पाहिजे हा दुराग्रह सोडला पाहिजे. या सभागृहात मला ब-याच गोष्टी शिकायला मिळाल्या. अनेक सन्माननीय सदस्यांचे प्रेम मला मिळाले. जे सन्माननीय सदस्य माझ्याविषयी चांगले बोलले त्याच्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. परंतु मी तेवढा चांगला नाही, हेही मला माहीत आहे. मी तेवढा चांगला व्हावा यादृष्टीकोनातून या सभागृहाच्या बाहेर सुध्दा मी आयुष्यभर प्रयत्नशील राहीन, अशी मी माझ्या सर्व मित्रांना खात्री देऊ इच्छितो आणि सर्वांचे पुन्हा एकदा अतिशय मन:पूर्वक आभार माणून मी आपली रजा घेतो.

-------

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.धनाजी साठे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, आज या ठिकाणी सन 2002 साली या विधानपरिषदेवर सदस्य म्हणून राज्यपालांच्या नामनियुक्तीतून आमची नियुक्ती या सदनावरती झाली. ही गोष्ट खरी आह की, मी या सदनापर्यंत पोहोचत असतांना सर्वसाधारणपणाने सर्वांना मी विलासराव देशमुख यांचा मित्र आहे म्हणून या ठिकाणी माझी नियुक्ती झाली,असे वाटते. ही गोष्ट जरी खरी असली तरीसुध्दा मी 80-85 सालामध्ये काँग्रेस पक्षाचा अधिकृत उमेद्वार म्हणून विधानसभेमध्ये निवडून आलो होतो. मी समाजाचे काम केलेले आहे. मी नशीबवान आहे. कारण मला परंपरा आहे. माझे वडील कै.गणपतराव साठे या सदनाचे सदस्य होते. एवढेच नाही तर त्यांनी सोलापूर जिल्हयामध्ये सामाजिक चळवळ केली आणि सोलापूर जिल्हयाचे नेतृत्व 15-20 वर्ष केले आणि त्या माध्यमातून समाजातील तळागाळातील हरिजन, गिरीजन सर्वसामान्य माणसासाठी त्यांनी काम केले. त्यांनी जी फळझाडे लावली त्याचा फायदा मला आजपर्यंत झाला त्यांच्या नावावरती आजपर्यंत मला हाताच्या फोडाप्रमाणे झेलणारी माणसे मिळाली. माझी माननीय मुख्यमंत्र्यांशी मैत्री होती पण त्याचबरोबर या सदनाचे माजी सभापती श्री.फरांदे साहेब आणि मी सोलापूरला कॉलेजला पाच वर्ष बरोबर होतो आणि त्यानंतर पुण्याला माननीय मुख्यमंत्री आणि मी एकाच रुममध्ये राहत होतो. एक गोष्ट खरी आहे की, मोठया माणसांशी मैत्री टिकवायची असेल तर ते खूप अवघड असते, हे मी अनुभवलेले आहे. लोकांकडून चांगले म्हणून घ्यावयाचे असेल तर ब-याच गोष्टी आपल्याला पचवाव्या लागतात, ब-याच गोष्टींचा त्याग ही करावा लागतो. ब-याच गोष्टींमध्ये लोकांची नाराजी सहन करावी लागते. त्या सगळया गोष्टी सहन करण्याचे काम आम्ही केले. समाजामध्ये सर्वसामान्य माणसासाठी करतांना मी माझी परिस्थिती काय आहे, याचा विचार फारसा कधीही केलेला नाही. माननीय मुख्यमंत्री यांच्याशी माझी मैत्री असली तरी मला फक्त एकच टर्म आमदार होता आले. निवडणुकीला उभे राहून विधानसभेमध्ये येण्याचा प्रयत्न केलेला मी माणूस आहे परंतु त्यावेळी ते यश मला मिळाले नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी मला निश्चितपणाने मित्र या नात्याने या सभागृहामध्ये आणण्याचे काम केलेले आहे. मी त्यांच्या मैत्रीचा माझ्या वैयक्तिक फायद्यासाठी कधीही उपयोग न करता समाजातील सर्वसामान्य माणसासाठी, गोरगरीब, हरीजन गिरीजन यांच्यासाठी केला. ज्यावेळी मा. विलासराव देशमुख या राज्याचे मुख्यमंत्री झाले त्यावेळी त्यांनी मला विचारले होते की, आता तुमची काय अपेक्षा आहे त्यावेळी मी त्यांना सांगितले की,

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनाजी साठे .....

माझी अपेक्षा काही नाही, माझी अपेक्षा आपण मुख्यमंत्री होण्याची होती ती आता पूर्ण झालेली आहे, आता मला काही नको. माननीय मुख्यमंत्र्यांनी मला 20 तारखेला रात्री फोन केला त्यावेळी मी टी.व्ही. पाहत होतो. आमच्या सौभाग्यवती जिल्हापरिषदेच्या निवडणूकीमध्ये निवडून आल्या होत्या. ते म्हणाले की, आपण त्यांना कोल्हापूर जिल्हापरिषदेच्या सभापती करुया. मी त्यांना म्हटले की, कोल्हापूरमध्ये काँग्रेसची मेजॉरिटी नाही राष्ट्रवादीची मेजॉरिटी आहे. कोल्हापूरमध्ये माझ्या सौभाग्यवतीला संधी नाही परंतु तरीही मतदारांनी त्यांना भरघोस मतांनी निवडून दिलेले आहे. ते म्हणाले की, यासंदर्भात आपण प्रयत्न तरी करुन बघूया.

यानंतर श्री गागरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनाजी साठे .....

असे करता करता मी म्हणालो की हे करु नका. परंतु शेवटच्या पाच मिनिटामध्ये मला त्यांनी सांगितले की, उद्या तुम्ही आमदार झालेला आहात. मी न मागता त्यांनी मला ही संधी दिली त्याबद्दल कॉग्रेस पक्षाचे, श्रीमती सोनिया गांधी यांचे मी आभार मानतो. 1980 साली इंदिरा गांधी यांनी मला तिकीट दिले, मला आमदार केले. त्यावेळी कोणालाही वाटत नव्हते की, धनाजी साठे आमदार होतील. ज्या माणसाने 20 वर्षे सोलापूर जिल्हा हाकला. ज्या व्यक्तीविरुध्द मी निवडून येईन अशी परिस्थिती नव्हती. त्यावेळी श्रीमती इंदिरा गांधी यांनी मला तिकीट दिले. त्यावेळी त्या माझ्या प्रचाराला आल्या. मी आमदार म्हणून निवडून आलो. माझी राजकीय कारकीर्द काँग्रेस पक्षातून सुरु झाली. मी काँग्रेस पक्षाशिवाय इतर कोणत्याही पक्षाचा सदस्य झालो नाही. मी माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्याशी मैत्री टिकवली. ही मैत्री, त्यांनी टिकवली, कोणी म्हणतात की, अमुक अमुक मोठी व्यक्ती माझी मित्र आहे, परंतु श्री.विलासराव देशमुख स्वत: म्हणतात की, श्री.धनाजी साठे हे माझे मित्र आहेत. त्यांच्या मैत्रीचा मला जो बहुमान मिळाला, त्यांच्यामुळे मला या सभागृहाचा सदस्य होण्याची संधी मिळाली. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो, काँग्रेस पक्षाचे व श्रीमती सोनिया गांधी यांचे आभार मानतो. जयहिंद, जय महाराष्ट्र

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



30-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 6A-2

श्री.रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी माझा परिचय नाटककार असा करुन दिला आहे. सुरुवातीस मी या सभागृहाचा सदस्य म्हणून कसा आलो ते सांगतो. एके दिवशी रात्रीचे बारा वाजले असतील मी घरी नव्हतो पण श्री.उल्हासदादा पवार यांचा फोन आला, परंतु मी नसल्यामुळे ते काही बोलले नाही. सकाळी 7.20 वाजता माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्या वर्षा बंगल्यावरुन फोन आला व तेथून सांगितले की, त्यांना माझ्याशी बोलावयाचे आहे. माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख स्वत: माझ्याशी बोलले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, आज घरीच थांबा, दिवसभर कोठे जाऊ नका. त्यांनी सांगितले की, तुम्ही आमदार झाला आहात, तुमच्या नियुक्तीची फाईल राज्यपाल महोदयांकडे गेली आहे. त्यावेळी माझ्या डोळयातून आनंदाश्रू  वाहिले. मी मागील 25 वर्षांपासून काँग्रेस पक्षाचे काम करीत आहे. हाडामासाचा कार्यकर्ता आहे. सभा संमेलनात जात होतो, पोस्टर चिटकावित होतो. सभा-संमेलनात बोलत होतो, हे त्यांना माहिती आहे. त्यांतर श्रीमती सोनिया गांधी आणि माझी भेट झाली त्यांना तडकफडक बोललो होतो.

सम्माननीया श्रीमती सोनिया गांधी जी से जब मेरी मुलाक़ात हुई थी तब मैंने उनसे पूछा था कि क्या काँग्रेस पार्टी में जो पैसे वाले लोग हैं, जो बड़े नेताओं को  मस्का लगाते हैं क्या सिर्फ उनको ही टिकट मिलेगा और मेरा जैसा गरीब, दलित आदमी केवल पार्टी के पोस्टर ही चिपकाता रहेगा, क्या आप दलितों की उन्नति के लिए कुछ नहीं कर सकती ? इतना कहने के बाद उन्होंने मुझसे मेरा नाम पूछा. मैंने उनसे कहा कि आप अपनी गोल्डन डायरी में मेरा नाम नोट कर लीजिए-रमेश निकोसे. तेव्हा त्या म्हणाल्या Mr.George please write his name in my diary माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख जेव्हा यादी घेऊन त्यांच्याकडे गेले, तेव्हा त्या यादीत माझ ो नाव वाचले आणि त्या म्हणाल्या की, Is there Mr. Nikose's name ? Then only give this list to Mr. George otherwise add his name in the list and then submit it to Mr. George. या यादीमध्ये श्री.रमेश निकोसे यांचे नाव आहे का ? नसेल तर या यादीमध्ये त्यांचे नाव लिहा व यादी श्री.जार्ज यांच्याकडे सादर करा. अर्थात श्री.विलासराव देशमुख यांच्या यादीमध्ये माझे नाव होते. मी आमदार झालो. शपथविधी झाला. अधिवेशन सुरु झाले. सभागृहात बोलत असताना तडकफडक बोलण्याचे धैर्य केले. श्री.नितीन गडकरी, श्री.दिवाकर रावते, श्री.मधुकर चव्हाण, डॉ.नीलम गोऱ्हे हे सदस्य म्हणायचे की, बोलो निकोसेजी बोलो.

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे .....

माझेही धैर्य वाढत गेले व बोलत गेलो. माझे सासरे श्री.नाना शेंडे हे विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष होते. त्यांचा संबंध माडगुळकर, पंडित इत्यादी ब्राम्हण साहित्यिकांशी होता. त्यांच्यामध्ये ते राहात होते. त्यांना साने गुरुजी म्हणत असत. त्यांनी मला एक मंत्र दिला होता. समाजात काम करीत असताना नुसते दलितांमध्ये काम करण्यापेक्षा ज्या जातीत आपण जन्माला आलो त्याचे ऋण फेडले पाहिजे. इतर जातीपातीमध्ये तुमचा संपर्क राहील, त्याचवेळी तुम्ही काही करु शकाल.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे....

यानंतर मी नाटके लिहिण्यास सुरुवात केली. त्यावेळी श्री. पंडित, डॉ. माडगूळकर, ॲड. खोब्रागडे, आरपीआय पक्षाचे श्री. दादासाहेब गायकवाड माझे नाटक पाहण्यासाठी आले होते. त्यांनी मला सांगितले की, नाटके लिहिण्याचे काम आपण आता बंद करु नका, नाटक लिहिण्याचे काम तुम्ही पुढे चालूच ठेवा. त्यावेळी मी वाल्मिकी समाज, भंगी समाजावर नाटके लिहिली होती. ही नाटके बघण्यासाठी श्री. पुरुषोत्तम दार्व्हेकर आले होते. त्या नाटकाचा शेवट पाहून त्यांनी सांगितले, "आपण फार मोठे नाटककार आहात, फार मोठा माणूस होणार. तुमच्या नाटकाचे दिग्दर्शन मी स्वत: करीन". यानंतर नाटकाचे दिग्दर्शन करीत असताना मी राजकीय वादळात सापडलो. आणि त्यामुळे माझे नाटके लिहिण्याचे काम बंद झाले. "जय हिंद, जय भारत", "आगे बढो, हम तुम्हारे साथ है" इ. नाटके मी केली. नाटके लिहिण्याच्या कामामध्ये, माझे साहित्य लेखन देखील बंद पडले. मी 1985, 1990 व 2006 मध्ये तिकिट मागितले परंतु त्यावेळी मला तिकीट देण्यात आले नाही. यावर मी एक शेर लिहिला.

"ए गमे दिल, किस दिल पर एतबार करु
दोस्त दुश्मन किस नेता से प्यार करु
जिंदगी मेरी खुशी की मलमल में सोयी थी
जवानी मेरी जन्नते सपनों में खोयी थी
कोई मतवाला यार मुझे परोस कर गया
टूटा मेरा सपना और किसी का प्यार तड़पा गया
प्यार बदल गया, यार भी बदल गया
वादा नहीं वक्त बदल गया
अरे बदलती है नेताओं की चाल, बदलता हे दस्तुर
तुम भी बदले और सारा जहाँ बदल गया.

सभापती महोदय, त्यावेळी श्री. दत्ताभाऊ यांनी मला सांगितले की, "आपण आमच्यातर्फे निवडणुकीसाठीउभे रहा". परंतु मी पक्षाशी गद्दारी केली नाही. मी त्या निवडणुकीस उभा राहिलो नाही. त्यावेळी एकूण 40 प्रतिनिधी निवडून आले होते अनेक वेळा लोक मला म्हणतात की,

....2

श्री. रमेश निकोसे.....

त्यावेळी आपण निवडणुकीमध्ये उभे राहिला असता, तर आपणही एकेचाळीसावे उमेदवार म्हणून निवडून आले असता, अलिबाबा आणि त्याचे चाळीस चोर याप्रमाणे आपण एकेचाळीसावे उमेदवार म्हणून निवडून आला असता. आपण येथे फार उशीरा निवडून आलात. या काळामध्ये माझ्यामध्ये असलेली नाटकाची दडपलेली कला, उभारुन आली. मी पुन्हा नाटके लिहू लागलो. मी दिग्दर्शित केलेली नाटके नेहमी हाऊस फुल्ल होत असत. पंधरा वर्षानंतर माझ्या नाटकांसाठी होणारी लोकांची गर्दी बघून माझा उत्साह वाढू लागला. यानंतर मी एकपात्री नाटके सुरु केली. माझ्या नाटकांसाठी कोल्हापूर जिल्हयामधून निमंत्रणे येऊ लागली. तेथे राष्ट्रवादी पक्षाचे खासदार, श्रीमती निवेदिता माने या माझे नाटक पाहण्यास आल्या होत्या. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, हे छत्रपती शिवाजी महाराजांवरील नाटक आहे. ज्यावेळी रंगमचावरील पडदा वर गेला तेव्हा मी शंभूराजांची भूमिका सुरु केली. शंभूराजे औरंगजेबांच्या अटकेमध्ये आहेत असा तो प्रसंग होता. शंभूराजे म्हणतात, "आबा, आम्हाला तुमची आज खूप आठवण आली. तुमचे मावळे म्हणजे तेली, माळी, महार, कुणबी, दऱ्याखोऱ्यातील आदिवासी. तुम्हाला विश्वासाचे मावळे भेटले आणि मला दगाबाज माणसे भेटली. म्हणून आज मी कैदेत आहे. तुम्ही तानाजी मालुसरे यांना बोलावून सांगितले की, कोंढाणा किल्ला सर झाला पाहिजे. त्यावेळी तानाजी मालुसरे यांच्या मुलाचे लग्न ठरले होते." त्यांनी सांगितले होते की, "आधी लगीन कोंढाण्याचे आणि मग माझ्या रायबाचे."

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ कु. गायकवाड नंतर --- 21:50

श्री.रमेश निकोसे ....

लढता लढता तानाजी शहीद झाला आबा, काय माणसे भेटली तुम्हाला विश्वासाची. अफझलखानाचा वध करून परतत असताना तुमच्यावर एका मोगली शिपायाने तलवार उगारली. तेव्हा दलित असलेला जीवा पुढे धावला आणि त्याने त्या मोगली शिपायाचा हातच कापून टाकला. म्हणूनच म्हणतात, होता जीवा म्हणून वाचला शिवा. काय माणसे भेटली तुम्हाला आबा विश्वासाची. बाजी प्रभू देशपांडेने खिंड रोखली आणि म्हणाला, छत्रपती तुम्ही व्हा गडावर, पोचल्यावर तोफ उडवा तोवर मी खिंड सोडणार नाही. लढता लढता बाजी खाली पडला, पण तरीही तोफांचे आवाज ऐकण्यासाठी फार आतुर होता. जसा छत्रपतींच्या तोफेचा आवाज आला तसा जीव सोडला. काय माणसे भेटली आबा तुम्हाला विश्वासाची आणि मला माणसे भेटली दगाबाज. तेवढ्यातच औरंगजेबाचा प्रवेश होतो आणि तो म्हणतो, शुभानअल्ला, क्या खूबसूरत आँखे है इसकी आँखे फोड़ डालो, इसकी आँखों को जतन करो. निकाल डालो इसकी आँखे. त्यावर संभाजी राजे म्हणतात, अरे आलमगीर बादशहा, तुम्ही आमचे डोळे जरी फोडलेत तरी हे शीर तुमच्या समोर झुकणार नाही. .... सभापती महोदय, केवळ पाच मिनिटेच मला आपण द्यावी. हे तुम्हाला पुन्हा येथे ऐकायला मिळणार नाही, म्हणून मी तुम्हाला हे सांगतो आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.निकोसे येथे पुन्हा भेटणार नाहीत असे म्हणताहेत. पण मला वाटते आपण सगळ्यांनी एकमताने ठराव करून मॅडम सोनिया गांधी यांचेकडे पाठवू या की, निकोसेंची सभागृहाला आणि महाराष्ट्राला आवश्यकता आहे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, धन्यवाद, धन्यवाद, तुमच्या प्रेमाबद्दल. असो. औरंगजेब बादशहा संभाजी राजांच्या उद्‌गारावर म्हणतो, मगरूर है ये, इसकी चमड़ी उतार दो, इसे हाथी के पाँव तले दो, इसके टुकडे, टुकडे कर डालो.

त्यावर संभाजीराजे उद्‌गारतात, हे आलमगीर बादशहा, तुम्ही आमचे टुकडे टुकडे केलात तरी पण माझ्या रक्ताच्या एक एक थेंबातून एक एक मावळा तयार होईल आणि तुझ्या दिल्लीच्या तख्ताला हालवून सोडेल. तसेच घडले.

छत्रपती शिवाजी राजांचा मावळा डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे लंडनला गेले आणि बॅरिस्टर होऊन परतले. सभापती महोदय, खासदार श्रीमती निवेदिता माने इतक्या खूष झाल्या आणि प्रेक्षक तर इतके खूष झाले, अगदी बेफाम झाले. नंतर मी माझा गांधी-आंबेडकर नाटकाचा प्रयोग सुरू

...... 6सी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. निकोसे ....

केला. ज्यावेळेस आंबेडकर सगळ्यांच्या गाठीभेटी घेतात. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी त्याचा उल्लेख केला, म्हणून मी ते येथे बोलतो आहे. डॉ. आंबेडकर साऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन, मिळालेले हारतुरे घेऊन निघाले, तेवढ्यात त्यांची नजर दूर कोठे तरी एकट्यानेच उभ्या असलेल्या त्यांच्या पत्नीवर पडली. ते तिच्या जवळ गेले. पती-पत्नीची दृष्टादृष्ट झाली, तिच्या डोळ्यात अश्रू तरळले. रमाई, त्यांची पत्नी, त्यांच्या पाया पडण्यासाठी खाली वाकली आणि तिच्या अश्रूंचे थेंब त्यांच्या बुटांवर पडले. डॉ.आंबेडकरांच्या चटकन ते लक्षात आले. त्यांच्या मनात आले, माझ्या रमाईला नेसण्यासाठी लुगडे नसेल, म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी दिलेला शालूच घालून आलेली आहे. ते म्हणाले, रामू मी तुझ्यासाठी काहीच आणलेले नाही. केवळ आणलेली आहेत ती पुस्तके आणि पुस्तकेच. ती म्हणते, साहेब घरी चला. त्यांच्या मुलाचा सहा महिन्यापूर्वीच मृत्यू झाला होता. घरी आल्यानंतर त्यांनी पत्नीला विचारले कोठे आहे माझा बाळ ? रामू त्याला बोलाव. तेव्हा रामू सांगायला लागली की, साहेब, त्याला खूप ताप आला होता म्हणून मी त्याला दवाखान्यात घेऊन गेले. डॉक्टरला विनंती केली की, हा माझ्या साहेबांचा आवडता पुत्र आहे, याला वाचवा, याला वाचवा. पण डॉक्टरने सांगितले की, तुझ्याकडे उधारीचे अगोदरचेच पैसे जास्त झाले आहेत, तुला मी औषध देऊ शकत नाही. तू याला म्युनिसिपालिटीच्या दवाखान्यात घेऊन जा. मी त्याला म्युनिसिपालिटीच्या दवाखान्यात घेऊन जात होते, तुमचा बाळ तळमळत होता, आणि त्याने तेथेच प्राण सोडला. सभापती महोदय, हा नाटकातला करूण रसाचा प्रसंग आहे, भारताच्या घटने संबंधातील प्रसंग आहे, तो मी तुम्हाला मुद्दाम सांगितला.

सभापती महोदय, दुसरे असे की, आताच माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेबांनी सांगितले की, आपल्या सभागृहाचा ठराव पास करू आणि मॅडम सोनिया गांधींना पाठवू. मला फार बरे वाटले त्यामुळे. नामनियुक्त 12 सभासदांमध्ये एखाद्या कलाकाराला घ्यावे लागते की काय असे मला वाटते. पण असे काही तरी आहे.

...3



KBS/ कु. गायकवाड नंतर --- 21:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दोस्त और दुश्मन को, मुझ पर सितम ढाने दो
नेताओं के फरेबी वादों पर मुझे जीने दो
इस मक्कार जालीम जमाने से मुझे लड़ने दो
जिस दम से हम निकले थे, वही दम आज मुझे आजमाने दो
इस आलम में किसी की किसी पर जबर्दस्ती नहीं है
हम पर बस चले, यह किसी की हस्ती नहीं है
मौत पर बस नहीं तो मौत से भी लड़ने दो
मरते मरते भी मुझे मेरी ताकत आजमाने दो
किसी को किसी के दिल की हकीकत क्या मालूम
मेरे मुकद्दर में क्या लिखा है किसी को क्या मालूम

सभापति महोदय, आप लोगों ने यहां मुझे जो प्यार दिया है, वह मेरे साथ है. जब आपका प्यार साथ है तो मैं फिर यहां आऊंगा. इन शब्दों के साथ मैं अपना भाषण समाप्त करता हूं. जय हिन्द, जय महाराष्ट्र.

.......

यानंतर श्री सरफरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहातील एकूण 13 सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याकरिता जवळ जवळ चार तास आपण एकत्र आलो आहोत. या सदनाच्या दोन्ही बाजूचे मूलभूत विचारांनी प्रेरित असणारे जबरदस्त ध्येयवादी आणि सातत्याने समाजाला केंद्रबिंदू मानणारे, प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे, अपयशाला टक्कर देणारे, नकळत यश मिळाले तर त्या ताकदीवर पुढे जाण्याचा प्रयत्न करणारे, गोरगरीब सामान्य समाजाच्या विकासासाठी सातत्याने रात्रंदिवस आपापल्या परीने प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे असे माझे हे सर्व 13 सन्माननीय सदस्य बंधू आणि भगिनी आहेत. या सर्व सन्माननीय सदस्यांनी या सदनामध्ये गेली सहा वर्षे आपापल्या परीने आपल्या विभागातील अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी अनेक वेळा पोटतिडिकीने आपापल्या प्रश्नांची बाजू मांडली आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अशा अनेक प्रश्नांचा सुध्दा पाठपुरावा त्यांनी केला आहे. आणि म्हणून या सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याचा प्रसंग येतो त्यावेळी त्यांना सुध्दा नकळत हूरहूर लागते. त्याचप्रमाणे या सभागृहातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य गेली सहा वर्षे एकत्रितपणे वावरल्यानंतर ज्या पध्दतीने त्यांना निरोप देण्याचा प्रसंग येतो त्यावेळी त्यांच्या मनामध्ये नकळत काहीसा पेच पडतो.

याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अब्दूल सत्तार नबी हे दिनांक 29 ऑगस्ट 2007 रोजी निवृत्त झाले. त्यामुळे आज त्यांना सभागृहामध्ये येता आले नाही. परंतु या सदनाचे सन्माननीय सदस्य म्हणून त्यांनी गेली सहा वर्षे अत्यंत चांगले काम केले. मराठवाडयातील औरंगाबाद जिल्हयात त्यांनी सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये काम केले. ते सिल्लोड या नगरपरिषदेचे सात वर्षे नगराध्यक्ष होते.

सन्माननीय सदस्य डॉ. एम.ए.अझिज यांच्या बाबतीत मी एवढेच म्हणेन की, ते मराठवाडयाच्या औरंगाबाद जिल्हयातील एका राजकीय, सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या मान्यवर कुटुंबातील आहेत. त्यांचे बंधू डॉ. अब्दूल अझिज हे माझ्याबरोबर मंत्रिमंडळामध्ये राज्यमंत्री होते. डॉ. एम.ए.अझिज हे निष्णात डॉक्टर आहेत, त्याचप्रमाणे त्यांनी महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस समितीच्या अनेक स्तरावर काम केले आहे. ते काही दिवस महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस समितीचे उपाध्यक्ष होते. त्यांनी अल्पसंख्यांक समाजासाठी जसे प्रयत्न केले, त्याप्रमाणे अन्य समाजासाठी सुध्दा मराठवाडा विभागात चांगले काम केले. अनेक वर्षे ते वक्फ बोर्डाचे अध्यक्ष होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**सभापती**...

मानीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड या तरुण व्यक्तीबद्दल मी एवढेच म्हणेन की, त्यांना मी गेल्या 15 वर्षापासून पहात आहे. सातत्याने धडपडणारा, आणि जे योग्य आहे ते परखडपणे मांडणारा, कुशाग्र बुध्दीचा आणि त्या पध्दतीची पक्षावर निष्ठा असणारा, ध्येयवादावर जबरदस्त पकड असणारा असा तरुण नेता म्हणून मी त्यांना पाहिले आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी साहेब यांनी या सदनामध्ये आणि सदनाच्या बाहेर एक निष्णात वकील म्हणून अनेक वर्षे हायकोर्टामध्ये वकिली केलेली आहे. नंतरच्या काळात पूर्णवेळ पक्षाशी एकनिष्ठ असणारे आहेत. दोन्ही काँग्रेस एकत्र असताना आणि मी प्रदेश काँग्रेसचा अध्यक्ष असताना श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी फार जवळून पाहिलेले आहे. एक ध्येयवादी, उत्कृष्ट संघटक, कार्यकर्त्यांकरिता तसेच समाजाकरिता प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे असे ते आहेत. ज्या वेळी एखाद्या विषयावर आपली परखड मते मांडावयाची असतील त्यावेळी कोणत्याही पध्दतीची फिकीर न करता ती गोष्ट बोलणारे अशा पध्दतीचे ते आहेत. ते आज या ठिकाणी उपस्थित नाहीत. कारण त्यांचे एक ऑपरेशन झालेले आहे.

सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान मॅडम या आपल्या सगळ्यांची भगिनी या पध्दतीची गेल्या सहा वर्षाची त्यांची खरी कमाई आहे. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने, आपल्या वक्तृत्वाने, आपल्या हुशारीने आणि एकंदरीत समाजाशी असलेल्या बांधिलकीने त्यांनी ते सिध्द केलेले आहे. मी त्यांची अनेक भाषणे ऐकलेली आहेत. कुशाग्र बुध्दी कशी असावी, सर्वसामान्य समाजाच्या अनुषंगाने कोणत्या पध्दतीने कोणते विषय हाताळावेत, परखड पध्दतीने तो विषय मांडत असताना त्याचा पाठपुरावा कसा करावा याबाबतीत प्रा. फौजीया खान ताईंचे काम मी फार जवळून पाहिलेले आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेब, मला अभिमान आहे की, महाराष्ट्र विधान परिषदेमध्ये आतापर्यंत आमच्या ज्या भगिनींनी काम केले आहे त्यामध्ये प्रा. फौजीया खान यांचा क्रमांक अतिशय उच्च दर्जाचा आहे आणि तो दर्जा तसाच टिकून राहावा अशी मी त्यांना शुभेच्छा देतो.

सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव बळवंतराव चव्हाण हे मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील एका अत्यंत ध्येयवादी विचारांच्या, समाजाशी बांधिलकी असणाऱ्या कुटुंबातील आहेत. त्यांचे वडील सुध्दा या सदनाचे प्रतिनिधी होते, विधानसभेचे प्रतिनिधी होते तसेच जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव चव्हाण हे मितभाषी आहेत परंतु आपल्या मुद्यावर पक्के कणखर असणारे आणि कोणत्याही प्रश्नावर अनेक मित्रांबरोबर चर्चा करणार ते आहेत. जवळजवळ 20 वर्षे

...2...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती** .......

ते सरपंच होते. सहकार क्षेत्रामध्ये, समाजकारणामध्ये, शैक्षणिक क्षेत्रामध्ये सुध्दा त्यांनी अत्यंत लक्षणीय काम केले आहे.

सन्माननीय सदस्य श्रीमती सुधाताई जोशी या आमच्या ज्येष्ठ भगिनी आहेत. अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या सरचिटणीस म्हणून त्यांनी काम केले आहे. महाराष्ट्र आणि मुंबईमध्ये काँग्रेसच्या संघटनेमध्ये जवळजवळ 30 वर्षे सातत्याने काम करणाऱ्या त्या माझ्या भगिनी आहेत. महाराष्ट्र समाजकल्याण मंडळाच्या त्या अनेक वर्षे अध्यक्षा होत्या. त्या राज्यसभेच्या सदस्या होत्या. अखिल भारतीय काँग्रेसच्या माध्यमातून अनेक राज्यामध्ये निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून जाण्याची सुध्दा त्यांना संधी मिळाली. या सदनामध्ये काम करीत असताना ताईंनी एखाद्या विषयावर एखादे मत मांडावयाचे ठरविले किंवा एखादा प्रश्न विचारावयाचे ठरविले तर त्यांची चिकाटी अशी असावयाची की, जोपर्यंत त्यांना त्यांचे मत मांडण्याची परवानगी मिळत नाही किंवा त्यांचा उपप्रश्न विचारण्याची परवानगी मिळत नाही तोपर्यंत सभापतींचे लक्ष वेधणे आणि सामान्य माणसांच्या हिताच्या ज्या अनेक योजना आहेत त्या मार्गी लावणे या अनुषंगाने त्या सातत्याने विचार करीत होत्या. एक अत्यंत चांगल्या आदर्श भगिनी आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये यापूर्वी अनेक माध्यमातून त्यांनी समाजाची सेवा केलेली आहे.

श्री. रमेश मोतीराम निकोसे यांच्याबाबतीत अत्यंत साधाभोळा स्वभाव या अनुषंगाने मी त्यांना या ठिकाणी आमदार होण्याच्या अगोदर पाहात होतो आणि गेली सहा वर्षे पहात आहे.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 22:05

**(सभापती...)**

आंबेडकर चळवळीतील हा कार्यकर्ता. आंबेडकर चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोप-यातील गोरगरीब दलित समाजाचे प्रश्न या ठिकाणी मांडून ते सोडविण्याची त्यांनी सातत्याने पराकाष्ठा केली. एखादा कार्यकर्ता ध्येयाने प्रेरित असेल तर तो कोणतीही अपेक्षा न करता कशा पध्दतीने काम करु शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे हे आहेत असे मला वाटते. अनेक वर्षे त्यांनी तिकिटाची अपेक्षा केली. त्यानंतरही त्यांना त्यामध्ये यश आले नाही. अनेक वेळा पक्षामध्ये असे घडते. सर्वच पक्षामध्ये ते घडते आणि घडत आले आहे. एखाद्या वेळी काही कार्यकर्त्यांकडे अगोदरच लक्ष जाते आणि काही वेळा पक्ष नेतृत्वाचे लक्ष खेचून आणण्याकरिता काही दिवस किंवा वर्षे लागतात. अत्यंत ध्येयवादाने प्रेरित होऊन काम करणारे, आंबेडकर चळवळीच्या माध्यमातून गोरगरिबांची, तळागाळातील समाजाची, दलितांची सेवा करणारे असे सन्माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. धोंडीराम हरीनाईक राठोड हेही निवृत्त होत आहेत. शिक्षण क्षेत्रामध्ये अखंड काम करणारे, ध्येयवादी विचारांशी बांधिलकी असणारे, ज्या समाजात जन्मले त्या 88 पाड्यांची सातत्याने सेवा करणारे मराठवाड्यातील एक व्यक्तिमत्व. त्यांच्या समाजाची सेवा करण्याचा हक्क त्यांना मिळावा या नात्याने गेली 25 वर्षे रात्रंदिवस राबलेले, फार माफक पण परखड बोलणारे सन्माननीय सदस्य श्री. राठोड हे माझे मित्र आहेत. त्यांनी एक आठवण सांगितली. त्यांचे मित्र श्री. कबीर देशमुख आणि ते एक दिवस मला भेटले. संघटनेमध्ये मला न्याय कसा मिळेल याची त्यांना हूरहूर लागली होती. मी त्यावेळी कॉंग्रेस पक्षाचा प्रदेशाध्यक्ष होतो. जिल्हा परिषदेच्या तिकीट वाटपाची गडबड होती. दोन-अडीच तास थांबून भेट होणे शक्य नव्हते. एके दिवशी मी त्यांना सांगितले की, मी जेव्हा बाहेर निघतो त्यावेळी माझ्या गाडीत शिरा आणि ते शिरल्यानंतर मी त्यांना सांगितले की अशी हूरहूर करुन फायदा होत नाही. त्यापेक्षा मी सांगेन तो उपाय करा. मी त्यांना उपाय सुचविला आणि त्यानंतर त्यांचे मित्र श्री. कबीर देशमुख हे जिल्हा परिषद सदस्य झाले आणि माझे मित्र श्री. धोंडीराम राठोड हे आमदार झाले. समाजाची अविरत सेवा करण्याचे गुण सन्माननीय सदस्य श्री. राठोड यांच्यामध्ये आहेत.

..2..

(सभापती...)

सन्माननीय सदस्य श्री. जगन्नाथ आनंदराव शेवाळे हे पुणे जिल्हातील युवक काँग्रेसच्या तसेच राष्ट्र सेवादेलाच्या माध्यमातून ध्येयवादाने प्रेरित असलेले कायकर्ते. त्यांचे काम मी पाहिलेले आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विषयावर अत्यंत तडफेने बोलणारी जी मंडळी आहेत त्यामध्ये श्री. जगन्नाथ शेवाळे यांची गणना करता येईल. त्यांची चिकाटी मी पाहिलेली आहे. त्यामुळे त्यांना यापुढच्या काळासाठीही उज्ज्वल भवितव्य आहे.

सन्माननीय सदस्य श्री. धनाजी गणपतराव साठे हे माझे जिवाभावाचे मित्र आहेत. सामाजिक कार्य हा त्यांच्या घराचा मोठा वारसा आहे. सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणाचा गेल्या 60-70 वर्षाचा इतिहास बघितला तर त्यांचे वडिल श्री. गणपतराव हे देखील या सदनाचे सदस्य होते. ते जिल्हा मध्यवर्ती बँक, जिल्हा भूविकास बँकेचे अध्यक्ष होते. एक-दोन नाही तर 15-15 वर्षे ते अध्यक्ष होते. या पध्दतीची राजकीय आणि सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील सन्माननीय सदस्य श्री.धनाजी साठे हे आहेत. शेवटच्या बाकावर बसून देखील सातत्याने सभापतीचे लक्ष वेधून अनेक प्रश्नावर चर्चा करणे अशी त्यांच्या कामाची पध्दत आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती**.......

मेजर सुधीर सावंत हा खऱ्याअर्थाने लष्करी पिंड असणारा ध्येयवादी कार्यकर्ता आहे. भारतीय लष्करामध्ये ते कर्नल रँकमध्ये असताना लोकसभेचे खासदारही झाले. नंतरच्या काळामध्ये विधानपरिषदेचे सदस्य झाले. या सदनामध्ये अनेकदा त्यांनी अत्यंत चांगल्या पध्दतीने चर्चेत भाग घेतला आहे.

सन्माननीय सदस्य श्री.गिरीष माणिकराव गांधी हे मागील अकरा महिने या सदनामध्ये सदस्य म्हणून आहेत. ते माझे आणि आपणा सर्वांचे मित्र आहेत. गेल्या 50 वर्षापैकी जवळजवळ 30 ते 35 वर्षे आदर्श कार्यकर्ता कसा असावा, ध्येयनिष्ठ कार्यकर्ता कसा असावा, तत्वाकरीता कोणतीही तडजोड न करणारा कार्यकर्ता कसा असावा, दे उसका भी भला और ना दे उसका भी भला असा मनाचा मोठेपणा असणारे कार्यकर्ते आता दुर्मिळ होत चालले आहेत. त्या दुर्मिळ कार्यकर्त्यांपैकी एक अत्यंत ध्येयवादी कार्यकर्ता यादृष्टीने मी सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांना सातत्याने ओळखतो. सन्माननीय श्री.शरद पवार साहेबांनी चांगला हिरा महाराष्ट्राच्या आणि विदर्भाच्या दृष्टीने हेरलेला आहे. अत्यंत छोटी टर्म मिळाल्यामुळे यापुढच्या काळात सुध्दा ते या सभागृहात यावेत यासाठी मोठ्या मनाने आदरणीय उपमुख्यमंत्र्यांनी प्रयत्न करावेत अशी मी अपेक्षा करतो.

मी मघाशी आपल्याला सांगितले की, निरोपाच्या दृष्टीने आज याठिकाणी आपण जमलेलो आहोत. माझी स्वत:ची अपेक्षा आहे, निवृत्त होणारे आपले सर्व बंधू आणि भगिनी यांना पुन्हा एकवेळा या सदनाच्या माध्यमातून सेवा करण्याची संधी मिळो यादृष्टीने परमेश्वराकडे आम्ही प्रार्थना करतो आणि सदनाच्या माध्यमातून आपल्या सर्वांची जी इच्छा आहे, ती त्यांच्या पाठिशी आहे याची मला खात्री आहे. परंतु कार्यकर्त्यांच्या जीवनाच्या अनुषंगाने ज्यावेळी विचार करतो त्यावेळी कार्यकर्ता कधी सत्तेत असेल, कधी सदनामध्ये तो प्रतिनिधी असेल किंवा सत्तेत नसेल, प्रतिनिधी नसला तरी तो समाजामध्ये सातत्याने ज्यावेळी जिवापाड मेहनत घेतो त्याचवेळी खऱ्याअर्थाने या सदनापर्यंत तो पोहोचू शकतो आणि म्हणून माझ्या कार्यकर्त्यांना, माझ्या प्रतिनिधींना माझी विनंती आहे, जरुर आम्हा सर्वांचे आशीर्वाद आपल्या पाठिशी आहेत. पण त्याचवेळेला उपेक्षित सामान्य समाजाने आपल्याला दिलेले जे आशीर्वाद आहेत तीच खऱ्या अर्थाने तुमच्या जीवनाची मोठी शिदोरी आहे. त्या सामान्य माणसांची सेवा करा. त्या सेवेच्या माध्यमातून तुमच्या प्रयत्नाला फळ येऊन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.......

तुम्ही पुन्हा या सदनामध्ये याल अशी मी अपेक्षा बाळगतो.

याठिकाणी सभागृहाचे पुढील अन्य कामकाज होणार नाही. सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याच्या निमित्ताने आता विधानभवनाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या पोर्चमध्ये एकत्रित छायाचित्र काढण्याचा व त्यानंतर विधानभवनासमोरील हिरवळीवर, खरे म्हणजे चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला होता, परंतु ती सायंकाळची वेळ होती आणि आता जेवणाची वेळ झालेली असल्यामुळे तेथेच भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, सर्वांनी तेथे उपस्थित रहावे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या शनिवार, दिनांक 1 डिसेंबर, 2007 रोजी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु होईल. या बैठकीमध्ये शासकीय विधेयके, नियम 260 अन्वये प्रस्ताव तसेच अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 10 वाजून 14 मिनिटांनी, शनिवार, दिनांक 1 डिसेंबर, 2007 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------------------

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही